# भारतीय लोकशाही : काल,आज आणि उद्या




कोल्हापूर

NAAC Reaccredited 'A'
with CGPA -3.24 (in 3rd cycle)

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'
-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

ISSN : 2281-8848

# VIVEK
## RESEARCH JOURNAL

**A Biannual Peer Reviewed National Journal of Multi-Disciplinary Research Articles**

**A Special Issue on**

# भारतीय लोकशाही : काल,आज आणि उद्या

**June, 2023**

# VIVEK RESEARCH JOURNAL

A Biannual Peer Reviewed National Journal of Multi-Disciplinary Research Articles

**Editor in Chief & Published**
**Dr. R. R. Kumbhar**
Principal-Vivekanand College, Kolhapur (Autonomous)
E-mail : editorvivekresearchjournal@gmail.com

**Executive Editor**
**Dr. Kailas Patil**
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)
E-mail: kailaspatil@vivekanandcollege.ac.in

## Editorial Board

**Dr. S. S. Latthe**
Asst. Professor,
Department of Physics,
Vivekanand College, Kolhapur (Autotnomous)

**Dr. S. M. Joshi**
Asst. Professor
Dept. of English
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. A. S. Kumbhar**
Professor,
Department of Chemistry,
Vivekanand College, Kolhapur (Autotnomous)

**Dr. T. C. Gaupale**
Asst. Professor
Dept. of Zoology
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. V. B. Waghmare**
Asst. Professor & Head
Dept. of Computer Science
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. S. R. Kattimani**
Asst. Professor
Dept. of History
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. A. S. Mahat**
Asst. Professor & Head
Dept. of Hindi
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. R. Y. Patil**
Asst. Professor
Dept. of Computer Science
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. Pradip Patil**
Asst. Professor
Dept. of Marathi
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. S. G. Bhosale**
Asst. Professor,
Department of Geography,
Vivekanand College, Kolhapur (Autotnomous)

**Dr. Neeta Patil**
Librarian
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

## Advisory Board

**Prin. Abhaykumar Salunkhe**
Executive Chairman
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,
Kolhapur.

**Prin. Mrs. Shubhangi Gavade**
Secretary,
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,
Kolhapur.

**Prin. Dr. Ashok Karande**
Former Jt. Secretary (Administration)
Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,
Kolhapur.

**Dr. Rajan Gavas**
Former Head, Dept. of Marathi,
Shivaji University, Kolhapur.

**Dr. D. A. Desai**
Former Head,
Dept. of Marathi,
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. M. S. Jadhav**
Former Head,
Dept. of Hindi
Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

**Dr. Namita Khot**
Director, Barr. Balasaheb Khardekar
Knowledge Resource Centre, Kolhapur



# VIVEK RESEARCH JOURNAL

**VIVEK RESEARCH JOURNAL** is a Multi-Disciplinary research journal, published biannually in English, Hindi & Marathi languages. All research papers submitted to the journal will be double bind peer reviewed, referred by the members of the review committee and editorial board. The articles recommended by the peer review committee shall only be published.

## Disciplines Covered :

- Arts, Humanities and Social Sciences.
- Commerce/Management/Accountancy/Finance/Business/Administration.
- Physical Education & Education.
- Computer Application/Information Technology
- Physics, Chemistry, Botany, Zoology, Microbiology, Agriculture, Biotechnology
- Library Science
- Law

## Guidelines for Contributors

- Articles submitted for the journal should be original research contributions and should not be under consideration for any other publication at the same time. A declaration is to be made by the author in the covering letter for that, along with full contact details with e-mail and mobile number.
- The desired length of the research paper should be of maximum 4000 words in English/Marathi/Hindi with an abstract of not more than 75 to 100 words. At least 5 key words and bibliography must be provided for indexing and information retrieval services.
- All the manuscripts should be typed in a single space with 12 point font for English & 14 point for Marathi & Hindi, on crown size paper with 1 inch margin on all sides.
- A hard copy of the Marathi/Hindi Articles in **ISMDVB_TT Dhruv Font or Shree Lipi Devratna Font** & a hard copy of the English articles in Times New Roman font in Word format (MS Word) should be sent to the editor. Please send the font in which you have typed the article in the soft copy. The contributors can e-mail their articles to **editorvivekresearch@gmail.com.**

VIVEK RESEARCH E-JOURNAL, Vol. VII, SPECIAL ISSUE NO. 3, JUNE, 2023 ISSN : 2581-8848

# VIVEK RESEARCH JOURNAL

A Biannual Peer Reviewed National Journal of Multi-Disciplinary Research Articles

## Editors of this issue

**Samiksha farakate**
Assistant Professor & Head
Dept.of Political Science
Vivekanand college, Kolhapur (Autonomous)

**Datta Jadhav**
Assistant Professor
Dept.of Political Science
Vivekanand college, Kolhapur (Autonomous)

**Ajay Patil**
Assistant Professor
Dept.of Political Science
Vivekanand college, Kolhapur (Autonomous)

# अनुक्रमणिका


| Sr.no. | Title of the Article | Author name | Page no. |
|---|---|---|---|
| 1 | भारतीय लोकशाही आणि वृत्तपत्रांची बदलती भूमिका | डॉ.धीरज सुरेश शिंदे | 1-4 |
| 2 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संदर्भातील विचार | डॉ. अतुल हणमंत कदम | 5-9 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक लोकशाही विचार | डॉ.सुनील संभाजी साठे | 10-11 |
| 4 | The next possible threat to democracy | Dr. Soma P. Gondane | 12-15 |
| 5 | पंडीत नेहरुंचे लोकशाही संबंधी विचार | डॉ.सय्यद कुरेशाबी नजीरसाब | 16-17 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून लोकशाही पुढील आव्हाने | डॉ.माया बापूराम मसराम | 18-21 |
| 7 | पंडित जवाहरलाल नेहरूंचे लोकशाही बद्दल विचार | डॉ.संजय संदीपान चव्हाण | 22-23 |
| 8 | भारतातील सामाजिक लोकशाही | मयूर विठ्ठल निंबाळकर | 24-25 |
| 9 | लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पंडित नेहरू यांची लोकशाहीची संकल्पना | प्रा.मदन पाडवी | 26-27 |
| 10 | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | प्रा.संतोष कोकरे | 28-29 |
| 11 | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | सौ . सीमा भास्कर सैंदाणे | 30-34 |
| 12 | Dr. Babasaheb Ambedkar's Political Thoughts | Shubhangi Nivrutti Lavate | 35-37 |
| 13 | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | शाहिद मुस्ताक मुल्ला | 38-42 |
| 14 | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने | संजय बाळगोंडा खोत | 43-47 |
| 15 | भारतीय लोकशाही | डॉ.शितल चंद्रकांत पाटील | 48-50 |
| 16 | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने | डॉ.सचिन श्रीरंग चव्हाण | 51-54 |
| 17 | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | विलास साळुंखे ,डॉ.अरुण चव्हाण | 55-65 |
| 18 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक लोकशाही विषयी विचार | डॉ.जयश्री साळुंके | 66-68 |
| 19 | भारतीय लोकशाही समोरील नवी आव्हाने | अतुल सुभाष टिके | 69-74 |
| 20 | A Geopolitical Boundries: Ancient, Modern and Post Modern | Aishwarya P. Hingmire | 75-80 |
| 21 | A Study Of Attitude Toward Voting Among College Students: A Case Study Of Vivekanand College, Kolhapur | Ms. Samiksha Farakate | 81-91 |
| 22 | भारतीय लोकशाहीची अमृतमहोत्सवी वाटचाल व त्यापुढील आव्हाने | डॉ. संजय सागरू सपकाळ | 92-98 |
| 23 | भारतीय लोकशाही पुढील आव्हान:विरोधी पक्षाचा शक्तिपात | सौ. प्रकृती श्रीकांत कोरगावकर | 99-101 |
| 24 | उत्तर गांधीवादी विचारवंत आचार्य दादा धर्माधिकारी यांचा लोकशाही विषयक विचार | डॉ. विद्याताई निवासराव जगताप | 102-106 |
| 25 | वैशिष्ट्यपूर्ण भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्था | डॉ.मीनाक्षी गंगाधर मिणचे | 107-113 |

| | | | |
|---|---|---|---|
| **26** | भारतीय लोकशाही | कु. प्राजक्ता अजितकुमार वाडकर | **114-115** |
| **27** | लोकशाही शासनपद्धती मधील प्रचाराचे बदलते स्वरूप | प्रा. प्रदीपकुमार आनंदराव चरणकर | **116-120** |
| **28** | **A Study of emerginig issues & challenges to Indian democracy** | **Prof.Gujar Kishor Shivaji** | **121-124** |
| **29** | अकार्यक्षम विरोधी पक्ष : भारतीय लोकशाहीसमोरील आव्हान | डॉ. प्रवीण अरुण पोवार | **125-127** |
| **30** | भारतीय लोकशाही एक अभ्यास | डॉ.भीमाशंकर मधुसूदन डहाळके | **128-132** |
| **31** | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची संकल्पना | डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर | **133-139** |
| **32** | नेहरू आणि लोकशाही समाजवाद | डॉ. महेश एम.लोहार | **140-145** |
| **33** | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने | जयसिंह सुभाष ओहोळ | **146-150** |
| **34** | भारतीय लोकशाही व पाकिस्तानची लोकशाही यांचा तुलनात्मक अभ्यास | अपूर्वा स्वामी | **151-154** |

# Editorial

## Past, Present and Future of Indian Democracy

Indian democracy is celebrated as one of the most successful experiments in institutionalization of democracy. The Constitution of India laid a strong foundation of it, apart from the democratic nature of Independence Struggle. India successfully set up the primary and supporting formal institutions of democracy. These institutions gained legitimacy and trust of the people. They became the operative mechanisms for decision-making, coordination and management for a huge and complex society. They also were supposed to play the role of uplifters of the masses and the means of democratic inclusion. State took up the leading role imparter of the social and economic justice in the society. Democracy in India was equated with a social revolution, though a distinctively top-down revolution. Though the scale of democracy in India has registered its large and sustaining successes, the very scale and responsibilities of the State, and the continuing social hierarchies have created some fundamental contradictions in Indian democracy. These contradictions and paradoxes confront us every now and then and make us wonder at the limits of democratic transformations. This precisely becomes the reason why the anomalies need to be analysed, understood and worked upon, in order to create better possibilities for a fuller democratic transition of Indian society.

It was said in our Constituent Assembly by the founders of the Constitution that political democracy cannot effectively work or survive in the absence of social and economic democracy. The fundamental civil rights granted to the citizens by the Constitution would not make sense for individuals and groups battling the very battles of survival and social dignity. Hence the political democracy was in fact assumed to be a tool in the hands of citizens to push the state towards adopting measures for bringing about increasing social and economic justice. We chose to be a liberal democracy. Justiciable fundamental rights are given in Chapter 3 of the Constitution. The social and economic rights are part of the Directive Principle of State Policy, which are supposed to serve as guidelines for the State in carrying out governance. The latter are non-justiciable, they cannot be claimed in the court of law. India had started out as a formal democracy when the currents of social revolution and solid economic change, though sprouted in a marked way during pre-Independence period, had not fructified into creating an equal, rights based, democratic society. The burden of bring this social change and annihilation of poverty lay heavily on the Indian 'State'. Indian State had descended from its colonial predecessor. It relied heavily on its bureaucracy. The State represented and was directed by the interests of dominant classes in the society, as brought out by the social character theories of the State. This contradiction between socio-economic requirements of democracy and the character of the agency which was to progressively fulfil these requirements remained a challenge in democratic transformation of Indian society. The seminar will try to have a look at the changing nature of social base of Indian State and its impact on the changing nature of democracy. Also, as an important subtheme, the seminar will focus on the status of progressive attainment of social justice (democracy) and economic equitability (democracy) through Indian democracy.

The democratic awareness about their rights increased among Indian citizens, especially post 1960s. And the State was made accountable to various degrees in different points of time. The study of these democratic interface between State and people is an important theme that we need to study at this important threshold in its trajectory. The seminar threw light on the

history of people's participation in democracy and the possible future direction and scope of the same.

The papers in this special volume contribute to the discussion on Indian democracy, the challenges before it, the role of opposition party, the place of religion and caste in our politics, comparison with other democracies in the world.

We hope the students and teachers will benefit from the writings in this special issue.

# भारतीय लोकशाही आणि वृत्तपत्रांची बदलती भूमिका

**डॉ. धीरज सूरज शिंदे**
विभागप्रमुख,
इतिहास विभाग,
अक्काताई रामगोंडा पाटील कन्या
महाविद्यालय,
इचलकरंजी, जि. कोल्हापूर.

**गोषवारा :**

वृत्तपत्रे हि आजच्या युगात एक प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून ओळखली जातात. आजच्या 'इलेक्ट्रोनिक मिडीयाच्या' युगात 'प्रिंट मिडीयाने' आपले स्थान अबाधित राखले आहे.वृत्तपत्राचे नाते नेहमी विश्वासार्हतेशी जोडले जाते. वृत्तपत्रांचा संबंध सर्वसामान्य जनतेच्या थेट प्रश्नांशी येतो. लोकांचा कल,आवडीनिवडीनुसार आजची वृत्तपत्रे आपला चेहरा जास्तीत जास्त लोकाभिमुख करण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतात. त्यामुळे प्रसारमाध्यमे समाजाचा अविभाज्य भाग बनली आहेत.
लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून परिचित असलेल्या वृत्तपत्रांचे स्थान हे अत्यंत वेगाने आधुनिक काळामध्ये बदलत असले तरी वाचकांची वृत्तपत्रावरील विश्वसनीयता हे वृत्तपत्राचे सामर्थ्य असलेने आपल्या बलस्थानाचा वापर करून वृत्तपत्र सक्षम होणे हे सुदृढ लोकशाहीसाठीही महत्वाचे आहे.

**बीज शब्द :** प्रसार माध्यमे, वृत्तपत्र स्वातंत्र्य , लोकशाही, विकास

प्रास्ताविक-

वृत्तपत्रे हि आजच्या युगात एक प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून ओळखली जातात. आजच्या 'इलेक्ट्रोनिक मिडीयाच्या' युगात 'प्रिंट मिडीयाने' आपले स्थान अबाधित राखले आहे.वृत्तपत्राचे नाते नेहमी विश्वासार्हतेशी जोडले जाते. वृत्तपत्रांचा संबंध सर्वसामान्य जनतेच्या थेट प्रश्नांशी येतो. लोकांचा कल,आवडीनिवडीनुसार आजची वृत्तपत्रे आपला चेहरा जास्तीत जास्त लोकाभिमुख करण्याचा सातत्याने प्रयत्न करत असतात. त्यामुळे प्रसारमाध्यमे समाजाचा अविभाज्य भाग बनली आहेत.

वृत्तपत्रांचा विकास आणि भूमिका-

भारतामध्ये 'हिकीज गॅझेट' नंतर वृत्तपत्रांच्या विकासास अधिकृतप्रारंभ झाल्याचे मानतात.भारतात प्रादेशिक वृत्तपत्रांची उत्तरोत्तर निर्मिती,विकास,विस्तार घडून आला. स्वातंत्र्य लढ्यावेळी ही वाढ मोठ्या प्रमाणावर घडून आली. ब्रिटीश कालखंडामध्ये एका बाजूस लोकमत जागृत करणे आणि दुसऱ्या बाजूने लोकमताचे संघटीत दडपण शासनावर आणण्याची अवघड कामगिरी भारतीय पत्रकारितेने नेटाने केली आहे.भारतीय स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय नेत्यांनी एक प्रभावी प्रसार माध्यम म्हणून वृत्तपत्रांचा वापर सुरु केला आहे.त्याकाळामध्ये वृत्तपत्रे मतपत्रे होती.जनजागृतीसोबत लोकशिक्षणाचे कार्य वृत्तपत्रांनी केले. लोकमान्य टिळकांनी केसरी,मराठा,महात्मा गांधीजीनी हरिजन,यंग इंडिया,नवयुग,पंडित नेहरूंनी नॅशनल हेरॉल्ड,मौलाना आझाद यांनी 'अल हिलाल' ही वृत्तपत्रे सुरु केली. वृत्तपत्रांबाबत म.गांधीजीनी मत व्यक्त केले कि,'लोकांना काय हवे,' या प्रश्नांचा संपादक जसा विचार करतात तसाच 'लोकांना काय दिले पाहिजे' याचा विचार संपादकांनी करणे आवश्यक आहे.1वृत्तपत्रांची ताकद ब्रिटिशांना ज्ञात असल्यामुळे त्यांनी इ.स १७९९ पासून वृत्तपत्रांवरती अनेक निर्बंध घातले.पुढे लोकआंदोलनामधून वृत्तपत्रावरील निर्बंध सैल होत गेले.

स्वातंत्र्यानंतरची वृत्तपत्रे आणि मांडणीमधील बदल-

भारत स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेत कलम १९ (१)'अ' नुसार सर्व नागरिकांना भाषण व अविष्कार स्वातंत्र्यात (फ्रीडम ऑफ स्पीच अॅण्ड एक्स्प्रेशन) वृत्तपत्र स्वातंत्र्याचा समावेश केला आहे.2 स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने वृत्तपत्रांनी लोकशाहीभिमुख धोरण अवलंबले.देश उभारणीच्या ध्येयाने तात्कालिक नेतृत्वाने देशाच्या प्रगतीची पायाभरणी केली.3पंचवार्षिकयोजनांची अंमलबजावणी सुरु झाली.परंतु कालानुरूप या प्रगतीस भ्रष्टाचाराची वाळवी लागू लागली.असा भ्रष्टाचार उघड करण्यास तत्कालीन वृतपत्रांनी सुरवात केली.त्यामधून वृत्तपत्रांची प्रतिमा उजळून निघाली.देशपातळीवरील हर्षद मेहता प्रकरण,बोफोर्स घोटाळा,सिंगूर-नंदीग्राम सारख्या घटना असतील किंवा महाराष्ट्रामधील प्रातिनिधिक स्वरूपामध्ये अंतुले यांचे सिमेंट प्रकरण,तेलगी घोटाळा,आदर्श प्रकरण

अशी प्रकरणे वृत्तपत्रांनी लावून धरली.तसेच पिढ्यानपिढ्या समाजात असणाऱ्या अंधश्रद्धेवर मार्गदर्शन करण्याचे कार्य वृत्तपत्रांनी केले.त्यामधून आजचा वैचारिक महाराष्ट्र घडत गेला.त्यामध्ये मोलाचा वाटा वृत्तपत्रांचा आहे.वृत्त देण्याच्या प्रधान कार्यासोबत अग्रलेख,स्फुटलेख,वाचकांचा पत्रव्यवहार,विविध सर्वे,वैचारिक लेख,विडंबनात्मक लेखन यामधून सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.त्यामधून असे प्रामाणिक पत्रकार आणि वृत्तपत्रे सत्ताधारी पक्षाच्या रडारवर आली.आणि सर्वसामान्य जनतेचा दृढविश्वास अशा निष्पक्षपाती पत्रकार आणि वृत्तपत्रावर दृढ झाला.

राजकीय फायद्यासाठी वृत्तपत्रांचा वापर-

जागतिकीकरणानंतर परिस्थिती बदलली.वृत्तपत्रांचा जनमानसावरील प्रभाव पाहता ती आपल्या ताब्यात असावीत अशी मानसिकता नेते मंडळींमध्ये वाढत गेली. त्यासाठी संपादकांशी मैत्री वाढवून आपल्या प्रतिमेला फार गालबोट लागणार नाही याची काळजी नेते मंडळी घेत असत. त्यामुळे राजकीय मंडळींमध्ये पत्रकार आणि संपादक यांचे महत्व खूप होते. त्याचवेळी वृत्तपत्र आपल्या मालकीचे असावे ही भावनाही बळावत गेली. त्यामुळे त्यांना मोठा राजकीय फायदाही होत होता. अशातच ज्यांच्या मालकीची वृत्तपत्रे होती त्यांची राजकीय नेतृत्वाची इच्छाही बळावत गेली. त्यामुळे मालक मंडळी त्यांना हव्या त्या पक्षाला, नेतृत्वाला आवडेल अशी वृत्तपत्रीय रचना करू लागले. त्यामुळे वृत्तपत्राचा मुळ निष्पक्षपाती गाभा हरवत गेला. वृत्तपत्र हे उत्पादन बनले. नफा हेच उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून वृत्तपत्रांचे नियोजन सुरु झाले. वैचारिक खाद्य देणाऱ्या आणि समाजमन जागृत करणाऱ्या पुरवण्या कमी होत गेल्या. गल्लो-गल्ली पैसे देणाऱ्या दादा लोकांवर वाढदिवस पुरवण्या निघू लागल्या.तालुका,ग्राम पातळीवर पुरवण्यांचे आर्थिक फायद्यानुसार नियोजन सुरु झाले.4

संपादक हा व्यवस्थापक बनला.त्यामुळे त्याच्या कामाला मर्यादा आल्या. त्या मर्यादेतच वृत्तपत्र चालवायचे बंधन निर्माण झाले. मराठी वृत्तपत्रसृष्टीमध्ये लोकमान्य टिळकांचा 'केसरी' अथवा प्र.के अत्रे यांचा 'मराठा' आणि त्यानंतर बाळासाहेब ठाकरे यांचा 'सामना' यांनी विशिष्ठ विचारसरणीने वृत्तपत्र चालवले. परुळेकरांच्या 'सकाळ' नेही मोठा ठसा समाजात उमटवला. 'महाराष्ट्र टाईम्स' सारखे व्यावसायिक वृत्तपत्र असूनही गोविंद तळवलकरांनी उत्तम संपादकीय छाप सोडली. माधव गडकरींचे 'चौफेर' असो वा अरुण टीकेकारांचे संदर्भ लेख असो, वाचकांची उत्तम वैचारिक मशागत असे. विजय कुवळेकरांनी संपादकीय व्यवस्थापनाचा नवा धडा वृत्तपत्र सृष्टीत राबवला. कुमार केतकरांनी स्वतःचा वाचक वर्ग निर्माण केला. भारतकुमार राउत यांनी अनेक नवे तरुण लेखक तयार केले. खाडिलकरांच्या 'नवाकाळ' नेही एक काळ गाजवला. अनंत भालेरावांच्या 'मराठवाडा' नेही मोठी चळवळ उभा केली होती, असे शेकडो दाखले देता येतील. परंतु गेल्या दोन दशकांमध्ये यात अमुलाग्र बदल होत गेला.

कालानुरूप वृत्तपत्रासमोरील आव्हाने-

माध्यम स्पर्धेमध्ये वृत्तपत्रांची थोडी पिछेहाट झाल्याने धोरणामध्ये बदल करून संपूर्ण व्यावसायीकरण स्वीकारले, ते योग्यही होते. वाढता खर्च पाहता जाहिराती हाच एकमेव स्रोत राहिला.त्याचबरोबर २४ तास सतत चालणाऱ्या वृत्तवाहिन्यांचे मोठे आव्हान वृत्तपत्रांपुढे उभे राहिले. त्यानंतर डिजिटल मिडिया, सोशल मिडिया यांची आव्हानेही प्रिंट मिडियापुढे उभी राहिली. यास्थितीत वृत्तपत्रांना स्वतःमध्ये बदल करणे अपरिहार्य होते. ज्या नावाचे वृत्तपत्र होते त्याची 'ब्रॅण्ड व्हॅल्यू' वाढवण्याचे काम व्यवस्थापनाने सुरु केले. त्यातून मोठमोठे 'इव्हेंट' ही संकल्पना आली. मग त्याला प्रायोजक आले, म्हणून मग याची व्यावसायिक गणिते आली. वृत्तपत्रांनी त्यांच्या 'वेबसाईट' सुरु केल्या. त्यातून वर्तुळ वाढवत नेले गेले. त्यामुळे वृत्तपत्रांचा खप कमी झाला, तरी त्याची प्रतिमा तशीच ठेवण्यात व्यवस्थापनाला यश आले. काही वृत्तपत्रांनी वृत्तवाहिन्याही काढल्या. सताधारी नेत्यांना सर्व प्रमुख प्रसारमाध्यमे आपल्या अंकित असावी, असे वाटते. त्यांचा तसा प्रयत्नही सुरु असतो. आज तर 'गोदी मिडिया' अस उल्लेखच प्रसारमाध्यमांबाबत केला जातो. इतकी माध्यमांची अहवेलना कधीही झाली नव्हती. आज वृत्तपत्रांना कोणतेही मिशन राहिलेले नाही. 'प्रोडक्ट' झाल्याने ते आता प्रोफेशन झाले आहे.वृत्तपत्रातला साधा पत्रकार ते संपादक सगळेजण तिथे नोकरी करतात.अनेक जाहिरातदार मालकांवर थेट दबाव आणून संपादकांकडून त्यांना हवे ते घडवून आणतात.व्यवस्थापनाचीही व्यावसायिक गणिते सांभाळायची असल्याने जाहिरातदारांच्या मागणीला बळी पडावे लागते. हे दुष्टचक्र आहे पण कटू सत्य आहे. आज मालक त्याच्या मर्जीतला संपादक बसवतो, त्याचा लिखाणाचा दर्जा कसा आहे, तो समाजात किती प्रतिष्ठित आहे, याची गणना केली जात नाही. त्यापेक्षा जाहिरात मिळवण्याचे कौशल्य तपासले जाते. त्यामुळे संपादकपदाची पूर्वीसारखी प्रतिष्ठा राहिली नाही. त्याचप्रमाणे नोकरी टिकवण्यासाठी मालकांची मर्जी सांभाळण्याचे काम संपादकांनी स्वीकारल्याने पदाची अहवेलना झाली आहे. वृत्तपत्र व्यवसायामध्ये अनेक राजकारणी,उद्योगपतींनी प्रवेश केलेला आहे. परिणामी लोकशिक्षणाच्या मुळ हेतूपासून वृत्तपत्रे दूर जात आहेत.प्रचंड आर्थिक गुंतवणूक,वृत्तपत्रांतर्गत स्पर्धा यामुळे समाजाचा विकास,भाषेची जडणघडण अशा नैतिक मुल्यांऐवजी राजकीय फायदा,काहीजण उद्योगांना संरक्षण मिळावे या हेतूने या व्यवसायामध्ये आहेत. आता तर उपभोक्त्याच्या गरजेप्रमाणे निर्माण होणाऱ्या बाजारपेठेतील घटक/उत्पादित वस्तू म्हणून वृत्तपत्राकडे पाहतात. इंटरनेट,टी.व्ही,इतर प्रसारमाध्यामाद्वारे बातमी पाहिली,ऐकली जाते. परंतु

चिकित्सक सर्वसामान्य वाचक त्यावर समाधान न मानता त्या घटनेचा अधिक तपशील जाणून घेण्यासाठी,वृत्ताची मांडणी,विश्लेषण जाणून घेण्यासाठी वृत्तपत्र वाचतो.5

लोकशाहीमध्ये शासनाची भूमिका-

सरकार आणि वृत्तपत्रे हे एकमेकांचे मित्र असू शकत नाहीत. किंबहुना ते प्रतिस्पर्धी असतात, परंतु अलीकडे प्रतिस्पर्धी कोणताही असू दे त्याला शिल्लक ठेवायचे नाही अशी सत्ताधाऱ्यांची धारणा झाल्याने वृत्तपत्रेही त्याला अपवाद ठरली नाहीत. राजधानी दिल्लीत तब्बल एक वर्ष शेतकऱ्यांचे आंदोलन चालले. त्याचे शेतकऱ्यांच्या बाजूने किती कव्हरेज झाले हा तपासायचा विषय ठरेल. मात्र या आंदोलनामुळे कायदे मागे घ्यावे लागले हा ताजा इतिहास आहे. या प्रकरणामुळे प्रसारमाध्यमांवरील विश्वास पुन्हा डळमळीत झाला. लोकभावना आणि प्रसारमाध्यमे यांच्यात तफावत वाढत गेली.

व्यवस्थापनाच्या किंवा मालकाच्या जवळ असणाऱ्याना खुश करायचे त्यांच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचे धोरण अवलंबले गेले. त्यामुळे जनतेचे खरे प्रश्न मागे पडत गेले. फक्त वृत्तपत्रांबाबत बोलायचे झाले तर,अजूनही लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी वृत्तपत्रांना मोठा वाव आहे. पर्यावरण, ग्रामीण व्यवस्थेचे प्रश्न मांडणारे शेकडो पत्रकार आहेत, पण त्यांना पुरेशी संधी मिळत नाही.अर्थात व्यवस्थापनाने वृत्तपत्राचा समाजाभिमुख चेहरा कायम ठेवण्याचा प्रयत्न यशस्वी केला आहे. म्हणूनच आजही माहितीच्या जंजाळात वृत्तपत्रीय बातम्यांकडे आदराने पाहिले जाते.

वृत्तपत्रांच्या छापील मजकुरावर विश्वास ठेवणारा मोठा वर्ग समाजामध्ये आहे. मात्र वृत्तपत्रे स्वतःच आशयापासून भरकटत चालली आहेत. व्यावसायिक गणिते सांभाळताना वृत्तपत्रांची कसरत होत आहे. त्यातून गेल्या दोन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोनाच्या संकटामुळे वृत्तपत्रांना त्याचा मोठा फटका बसला. त्यातून अजूनही वृत्तपत्र व्यवसाय सावरत आहे. वृत्तपत्रांतर्गत गळेकापू स्पर्धा,वाहिन्यांचे आणि सोशल सोशल मिडियाचे आव्हान यामुळे वृत्तपत्रसृष्टी आक्रसून गेली आहे.या साऱ्या पार्श्वभूमीवर लोकशाही टिकवण्याचे शिवधनुष्य वृत्तपत्रांनी पेलावे ही अपेक्षा जरा जास्तच वाटते. अर्थात, ती वृत्तपत्रांची जबाबदारी आहे, परंतु आज समाजामधील विविध जाती,गट,समूह अत्यंत आक्रमक झाले आहेत. त्यांच्या मनाविरुद्ध एक ओळ जरी छापून आली तरी मालकांवर दबाव आणतात. त्यामुळे वृत्तपत्रांचे जगणेच संकुचित झाले आहे. आज अनेक पत्रकारांना मुलाखतीच्या वेळी जाहिरात आणू शकता का, असा प्रश्न केला जातो. वृत्तपत्रांचे संपूर्ण व्यापारीकरण झाल्याने त्यांच्याकडून निव्वळ आदर्शाची अपेक्षा करणे व्यर्थ ठरेल. मात्र इतर प्रसारमाध्यमांपेक्षा वृत्तपत्राविषयीची आदराची भावना शिल्लक आहे,तीच भावना त्याचे भांडवल आहे.

निष्कर्ष :

वृत्तवाहिन्या,सोशल मिडिया यांनी विश्वासार्हता गमावल्याने लोकांचा अजूनही छापील शब्दांवर विश्वास आहे. त्याचा आधार घेऊन वृत्तपत्रे अजूनही फिनिक्स पक्षाप्रमाणे भरारी घेऊ शकतात. टीआरपी वाढवणाऱ्या तयार बातम्या छापण्याबरोबरच शोधपत्रकारिता आणि दूर्लक्षित वृत्तांना प्राधान्य द्यावे लागेल.कोरोनामुळे खचलेल्या समाजाला उभारी देण्याचे काम वृत्तपत्रांनाच करावे लागणार आहे. नितीमुल्यांची चर्चा मागे पडली असली, तरी लोकांच्या लढाईत वृत्तपत्रांनी स्वतःला सामावून घ्यायला हवे. वृत्तपत्रांचे झालेले व्यापारीकरण आता मागे फिरू शकत नाही. नफेखोरी हा उद्देश असल्याने फार मोठ्या मुल्यांची अपेक्षाही धरता येणार नाही. मात्र, पुढच्या काळात समाजातल्या संवेदनशील गटांबरोबर, संस्थांसोबत, व्यक्तींसोबत व्यवहार वाढवल्यास त्याचे प्रतिबिंब वृत्तपत्रांत उमटेल. फार आदर्शवादी नसले, तरी किमान मुल्यांची जपणूक वृत्तपत्रे अवश्य करतील आणि करत आहेत.

वृत्तपत्रांनी त्यांचा समाजाभिमुख चेहरा जपला, तरच त्यांची प्रतिष्ठा कायम राहील आणि त्या प्रतिष्ठेचे फायदे व्यवस्थापनाला पर्यायाने मालकांना मिळवता येतील. त्यासाठी तरी वृत्तपत्रांना 'जिवंत' ठेवणे, ही त्या व्यवस्थापनाची जबाबदारी असणार आहे. लोकशाही मुल्यांची जपणूक अशाच पद्धतीने होत राहील. वृत्तपत्रसृष्टी डिजिटल माध्यमांकडे अधिक वळते आहे. त्यात आता जरी नफा असला तरी, हळूहळू वृत्तपत्रीय जग डिजिटल माध्यमात रुपांतरीत होणार, हे तीव्रतेने जाणवते. अर्थात, माध्यमाचे व्यासपीठ कोणतेही असो त्यातून कंटेंट काय देता हेच शेवटी महत्वाचे ठरते. लोकांना उत्तम जगता यायला हवे, त्यासाठी काय करता येईल, याचा वृत्तपत्रांनी सातत्याने विचार करायला हवा.त्यामधून वृत्तपत्राची आणि पर्यायाने लोकांची प्रगती होईल, यात शंका नाही.लंडन विद्यापीठाचे पत्रकारितेचे प्राध्यापक रॉबर्ट मेक यांनी या स्थितीविरोधी इशारा दिला आहे.त्यांचे पुस्तक'रिच मिडिया पुअर डेमोक्रसी' मध्ये ते लिहितात 'पत्रकारांची स्वायत्तता धोक्यात आली आहे.आता हा संपूर्ण व्यवसाय झाला आहे.कोणत्याही सिद्धांत,नैतिक मूल्यांशी याचा काही संबंध नाही.नैतिक पत्रकारिता हा तोट्याचा व्यवसाय झाला आहे आणि दुर्देवाने हलक्या पत्रकारितेचा व्यवसाय फायदयाचा मानला जातो6.त्यामुळे सामाजिक जबाबदारीचे तत्व नष्ट होऊन जास्तीत जास्त बाजारीकरण आणि त्यातून वैचारिक,अभ्यासू मांडणीपेक्षा चटपटीत,भडक वृत्त प्रसारणाकडे लक्ष दिले जाते.इलेक्टोनिक माध्यमांचे मोठे आव्हान दैनिक वृत्तपत्रासमोर आहे.परंतु त्याबाबत समीरण वाळवेकर हे इलेक्टोनिक क्षेत्रामध्ये कार्यरत जेष्ठ पत्रकार मत व्यक्त

करतात कि,''डिजीटल माध्यमे वर्तमानपत्रांच्या आधी सारे काही दाखवतील कुरघोडी करतील,पण विचार करायला लावण्याइतपत प्रभाव टाकू शकणार नाहीत,ते कार्य वर्तमानपत्रांना करावे लागेल''6

एकूणच लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून परिचित असलेल्या वृत्तपत्रांचे स्थान हे अत्यंत वेगाने आधुनिक काळामध्ये बदलत असले तरी वाचकांची वृत्तपत्रावरील विश्वसनीयता हे वृत्तपत्राचे सामर्थ्य असलेने आपल्या बलस्थानाचा वापर करून वृत्तपत्र सक्षम होणे हे सुदृढ लोकशाहीसाठीही महत्वाचे आहे.

**संदर्भ :**

1) Basu Durgadas, Introduction to the constitution of India, lexis Nexis Publication, Gurgaon, Haryana 1960, Page no 110,111
2) इंटरनेट साधन – http://en.m.wikipedia.org/wiki.Eo/A4
3) हर्षदेव,उत्तर आधुनिक मिडिया तकनीक,वाणी प्रकाशन,दिल्ली 2012,पृष्ठ क्र 32,33
4) संपादक : डॉ दिपक पवार लेखक:विनायक पात्रुडकर,लोकशाही समजून घेताना,मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय,ऑनलाईन लेखमालिका
5) कित्ता
6) तुपे केशव ,लेख- वृत्तपत्र एक प्रभावी प्रसारमाध्यम,प्रसारमाध्यमे आणि मराठी भाषा,संपा. भास्कर शेटके,स्नेहवर्धन प्रकाशन पुणे,एप्रिल 2012,पृष्ठ क्र 197.198

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संदर्भातील विचार

**डॉ. अतुल हणमंत कदम,**
सहयोगी प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग,
के. एन. भिसे आर्टस्, कॉमर्स ॲण्ड विनायकराव पाटील सायन्स कॉलेज,
विद्यानगर, भोसरे ता. माढा.
जि. सोलापूर 413208

**सारांश:**

जागतिक पातळीवर भारत हा एकमेव असा देश आहे जो लोकशाही शासन प्रणाली या राजकीय व्यवस्थे मधून आपली धोरणे राबवत आहे. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या, उभ्या केलेल्या लोकशाहीच्या रचनेला जाते. विविध विभागात विभागलेला व प्रदिर्घ असा भूभाग, हरतऱ्हेच्या रूढी, प्रथा, परंपरा, जाती, भाषा, धर्म, पंथ, परंपरा अशा विविधतेने नटलेल्या व नव्याने वसाहतीच्या जोखडातून स्वतंत्र झालेल्या भूभागाला, सजीवाला एका सुत्रात बांधण्याचा प्रयत्न केलेल्या अनेकांमध्ये डॉ. बाबासाहेब यांचे स्थान निश्चितच अग्रभागी व महत्वपूर्ण आहे. कोणतीही इतर राजकीय वारसा नसण्याच्या पाश्वभूमीवर, प्रच्छन्न दारिद्रय, मागासलेपणा, बेरोजगारी, विकासाचा अभाव, निरक्षरता, भेदभाव या समस्यांच्या व लोकशाहीच्या विकासात आणि अम्मलबावणीत अडथळा असणाऱ्या घटकाच्या पाश्वभूमीवर भारतात लोकशाहीचा प्रयोग राबविणे खरेच अवाहनात्मक होते. मानवाला कोणत्याना कोणत्या राजकीय व्यवस्थेचा भाग बनने आवश्यक असते. त्यामध्ये जगातील प्रगत राजकीय व्यवस्थांचा अभ्यास करून संविधान निर्मात्यानी इतर राजकीय व्यवस्थांच्या तुलनेत लोकशाही या शासनप्रणालीचा स्विकार भारतासारख्या देशात करून सामाजिक, राजकीय, आर्थिक लोकशाही प्रत्यक्षात आणण्याचा केलेला प्रयत्न निश्चितच प्रशंसनीय आहे. लोककल्याणकारी लोकशाही जीवनप्रणाली चालू राहण्यासाठी, लोकशाही बळकट होण्यासाठी, टिकण्यासाठी, उत्क्रांत होण्यासाठी संविधानभेतील सर्वच स्वातंत्र्य संग्रमातील नेत्यांबरोबर मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाची तरतूद करून ठेवली आहे. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ, निवडणूक आयोग यासारख्या संस्था, विविध शासकीय व संविधानिक पदे याबाबतची अतिशय सविस्तर व सर्वच बाबींचा सांगोपांग विचार करून लिहून ठेवलेल्या संविधानामुळे राज्यकर्त्यांना राज्यकारभार करत असताना दिशा दाखवण्याची महत्वपूर्ण जबाबदारी संविधान पार पाडत आहे. लोकशाही शासनप्रणालीमुळे नाहीरे वर्गाचे म्हणजेच गरीबांचे शोषण भांडवलदार, श्रीमंत किंवा आहेरे वर्गाकडून होणार नाही याची शाश्वती मिळते. एक व्यक्ती एक मत हे तत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तवात आणलेल्या लोकशाहीचे होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दलित, गरीब, शोषित, कष्टकरी, मजूर, शेतकीर यासारख्या मागास वर्गाला राजकीय समतेच्या प्रवाहात आणण्याचे महत्वाचे कार्य या लोकशाहीने केले. राजकीय समतेच्या आधारावर सामाजिक व आर्थिक समता आणण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत आणाऱ्या लोकशाहीला प्रयत्न करावे लागत आहे. यामध्ये राजकीय पक्ष, सुजान नागरीक, दबाव गट यांची भूमिका महत्वाची आहे. कारण लोकशाही म्हणजे लोकांची सत्ता. लोकांनी, लोकांसाठी, लोकांचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष चालवलेले शासन होय. यांच्या प्रयत्नावरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर राजकीय नेत्यांनी कल्पिलेली लोकशाही प्रत्यक्षात येईल हे विसरून चालणार नाही.

**बीज शब्द :** लोकशाही, समता, न्याय, अधिकार, कर्तव्य

प्रस्तावना -

या वरील व्याख्यांचा अभ्यास केला असता असे दिसते की, लोकशाही ही अशी राजकीय व्यवस्था आहे जिथे व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिविकास, लोककल्याण जोपासण्यासाठी लोकांच्या सार्वभौमत्वाचा आदर केला जातो. प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात समान वागणूक, सर्वांना विकासाची समान संधी, प्रत्येकाला राजकीय संसूचनामध्ये समान वाटा व हक्क, सामाजिक हितातून व्यक्तीहीत, समान व सर्वांना सारखाच न्याय, सर्वजन एकाच दर्जाचे असल्याने सर्वंनी सर्वधर्मसमभावाने, बंधुतेच्या भूमिकेतून, विश्वबंधुत्व, विश्वशांती, मानवतावदी दृष्टीकोनातून सार्वजनिक क्षेत्रात वावरणेही महत्वाची लक्षणे लोकशाही व्यवस्थेची आहेत.

संशोधन पध्दती, तंत्रे व साधने -

या शोधनिबंधाचा विषय बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संदर्भातील विचार असा असून या शोधनिबंधाचे लिखाण करण्याकरिता ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. संशोधनतील माहिती मिळविण्यासाठी द्वितीय सामग्री स्त्रोतांचा वापर केलेला आहे. या स्त्रोतांमध्ये या विषयाशी संबंधित संदर्भग्रंथ, पुस्तके, संधोधन निबंध, शासकीय-निमशासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य तसेच इंटरनेट, विकिपिडिया या ऑनलाईन साधनांचा वापर करण्यात आला आहे.

संशोधन समस्या -

1) लोकशाही म्हणजे काय व तिचा विकासकसा झाला ते पहाणे
2) भारतीय लोकशाहीच्या विकसात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान पहाणे
3) लोकशाही मधील अवाहणेकोणती आहे

संशोधनाची उद्यिष्टे -

1) लोकशाही या संकल्पनेचा आर्थिक, सामाजिक, राजकीय, दृष्टीकोणातून अभ्यास करणे.
2) लोकशाही राजकीय व्यवस्थेमुळे लोकांच्या जीवनात बदल झाला किंवा कसे याचा अभ्यास करणे.
3) डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत असणाऱ्या लोकशाहीच्या विकासामध्ये भारतीय स्थितीचा अभ्यास करणे.
4) लोककल्याणकारी लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी, विकासासाठी उपाय सुचविणे.

संशोधनाची गृहितके -

1) भारतातील लोकशाहीच्या प्रवाहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे आहे.
2) भारतातील संसदीय लोकशाही लोककल्याणाचे महत्वाचे साधन असल्याने नागरिकांचा या राजकीय व्यस्थेकडे कल वाढला आहे.
3) लोकशाही जीवंत ठेवण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न होत असले तरी शासनाचीभूमिका महत्वाची आहे.
4) लोकशाही व्यवस्था सामाजिक, आर्थिक, राजकीय समतेतील, स्वातंत्र्यातील, न्यायातील अविभाज्य भाग आहे.

लोकशाहीचा विकास -

प्राचीन ग्रीक विचारवंत हेरोडोटस्, ॲरिस्टॉटल यांनी आपल्या चिंतनामध्ये लोकशाही या संकल्पनेबद्यल चर्चा करून लोकशाही व्यवस्थेतील फायदे-तोटे यांची चिकित्सा करून लोकशाहीमध्ये अनुस्यूत असणारा कोणता शासन प्रकार योग्य आहे याबाबत विचार मांडले आहेत. प्राचीन भारतात राजाकडे अमर्याद सत्ता असणारी स्वराज्य ही शासनपध्दती अस्तित्वात होती. तर मध्ययुगात सरंजामदार वर्गाला सर्वाधिकार असणाऱ्या सरंजामशाही शासन पध्दतीचा विकास झाला. इंग्लंड मधील स्टुअर्ट घराण्यातील राजा विरूध्द प्रजा असा आधूनिक काळात 17 व्या शतकात झालेल्या संघर्षातून तेथे लोकशाही शासनप्रणालीचा जन्म व विकास सुरू झाला. तद्नंतर फ्रान्स, अमेरिका येथील राज्यक्रांत्यांनी लोकशाहीच्या समृध्दीमध्ये नव्या, विकासित, जनकल्याणकारी संकल्पनांची भर घातली. दोन्ही महायुध्दांच्या काळात जनतेमध्ये हक्क-अधिकार, कर्तव्य, स्वयंनिर्णयाचे तत्व याबाबत जागृती होवून लोकशाही या राजकीय जीवणप्रणालीची संपूर्ण जगातच नव्याने मांडणी होवून प्रगत स्वरूप येवू लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय लोकशाहीतील योगदान -

भारतीय संविधानाचे शिल्पकार, संसदीय लोकशाहीचे पुरस्कर्ते, सामाजिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्याचे, समतेचे, न्यायाचे महान कैवारी, परिवर्तनवादी विचाराचे पाईक, दलितउध्दारक, घटणात्मक मार्गाचे प्रवक्ते, चतुरस्त्र विद्वान, व्यासंगी, ज्ञानयोगी पंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय लोकशाहीच्या प्रस्थापनेत, अम्मलबजावणी मध्ये, विकासामध्ये जे योगदान दिले आहे ते अमेरिकेचे घटनापंडित जेफरसन यांच्या तोडीचे आहे. ॲनहिलेशन ऑफ कास्ट या पुस्ताकात त्यांनी लोकशाही शासनाबाबत आपले विचार त्यांनी मांडले आहेत. त्यामध्ये त्यांनी लोकशाही केवळ शासनप्रकार नसून जनतेने एकसंध राहण्याची, एकमेकाबद्यल अस्था असणारी, सहजीवन असणारी व्यवस्था आहे. आपल्या भोवतालच्या सर्वांचा आदर करणारी वृत्ती बाळगण्याची व्यवस्था आहे असे ते म्हणतात. रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासनव्यवस्थेच्या प्रकारास आणि पध्दतीस लोकशाही म्हणतात. अशी त्यांनी लोकशाहीची व्याख्या केली आहे.

कॅबिनेट मिशन योजने नुसार संविधान तयार करण्यासाठी जूलै 1946 साली मध्ये प्रांतिक विधिमंडळांनी घटना समितीवरील प्रतिनिधींची निवड केली. बंगाल विधिमंडळातील सहकार्याने सुरवातीला डॉ. बाबासाहेब संविधान समितीवर निवडून गेले. 1947 साली बंगालच्या फाळणी नंतर डॉ. जयकरांच्या रिकाम्या जागेवर मुंबई विधिमंडळातून डॉ. बाबासाहेब संविधान

समितीमध्ये निवडूण आले. संविधान परिषदेने 3 ऑगस्ट 1947 रोजी मसुदा समिती स्थापन करून या समितीचे अध्यक्षपद डॉ. आंबेडकर यांना दिले. 9 डिसेंबर 1946 ते 24 जानेवारी 1950 या कालखंडात मसुदा समितीमधील आपल्या इतर सहकार्यांच्या सोबत डॉ. बाबासाहेब यांनी भारताचे शोषणकारी, असमानता असणारे, गरीब-श्रीमंत मोठी दरी असणारे चित्र पालटून टाकणारी व स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुभावाची प्रस्थापना करणारे संविधान लिहून तयार केले. या संविधानाद्वारे भारतात संसदीय लोकशाहीचा प्रयोग डॉ. बाबासाहेब यांनी सुरू केला.

संसदीय लोकशाहीवर निष्ठा असणारे, लोकशाहीचे उपासक म्हणून डॉ. बाबासाहेब यांचे स्थान शीर्ष स्थानी आहे. प्रगत व लोकशाही परंपरा आणाऱ्या देशांमध्ये डॉ. बाबासाहेब यांचा वावर असल्याने सहाजिकच लोकशाही बद्दल यांच्या मनामध्ये अस्था निर्माण झाली. फॅसिझमचा, साम्यवादाचा त्यांनी अभ्यास केला असलातरी या व्यवस्थांपासून ते नेहमीच लांब राहिले. अध्यक्षीय लोकशाही व्यवस्थेत एका व्यक्तीची हुकूमशाही प्रस्थापित होवू शकत असल्याने अध्यक्षीय लोकशाहीपेक्षा संसदीय लोकशाहीवर त्यांची श्रध्दा होती. सन 1919 मधील साऊथ ब्युरो कमिशनपुढील दिलेल्या साक्षीवरून डॉ. बाबासाहेब प्रातिनिधीक लोकशाहीवादी नेते होते हे दिसून येते. बुध्दिप्रामाण्यवादी व इहवादी लोकशाही शासनाचे ते प्रमुख घटनाकार होते.

लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याद्वारा रक्तपाताशिवाय मूलगामी क्रांतिकारक बदल घडवून आणता येतात अशी शासनाची घडण किंवा पध्दती म्हणजे लोकशाही होय अशी लोकशाहीची व्याख्या डॉ. बाबासाहेब यांनी केली होती. उदारमतवादी लोकशाहीतील व्यक्तिवाद, मर्यादित शासन ही वैशिष्ट्ये मान्य करून संसदीय लोकशाहीचा पुरस्कार डॉ. बाबासाहेब करतात. सत्तेचा ज्यांना कधी स्पर्श झाला नाही अशा समाजतळी खितपत पडलेल्या पददलित वर्गाला सत्ता प्राप्त होणे हीच खरी लोकशाही असते असे ते म्हणत. डॉ. बाबासाहेब यांची लोकशाहीची संकल्पना ही व्यक्ती हेच स्वयंमेव साध्य आहे, व्यक्तीला काही अदेय हक्क असतात व संविधानाने त्या हक्कांची हमी त्याला दिलीच पाहिजे, कोणत्याही विशेषाधिकाराच्या प्राप्तीमुळे व्यक्तीला आपल्या संवैधानिक हक्कांचा त्याग करावा लागू नये, इतरांवर शासन करण्याची सत्ता राज्यसंस्था कोणाही खाजगी व्यक्तींना प्रदान करणार नाही या चार गृहितांवर आधारलेली आहे.

आपल्या राजकीय विचारांच्या दुसऱ्या अवस्थेत 1931-32 नंतरच्या कालावधीत काळाराम मंदिर प्रवेशासारख्या चळवळी करून उपयोग नाही तर दलितांच्या मुक्तीसाठी राजकीय सत्ता हस्तगत करणे आवश्यक आहे असे ते म्हणतात व दलितांच्या विभक्त मतदारसंघाची मागणी करतात डॉ. बाबासाहेब आपल्या लोकशाहीच्या विचारमध्ये प्रभावी, समर्थ विरोधी पक्ष, विरोधी वृत्तपत्रे यांचे महत्व व उचित स्थान अधोरेखीत करतात. म्हणूनच 1935 च्या भारत सरकारच्या सुधारणा कायद्याप्रमाणे 1937 मध्ये महाराष्ट्रात झालेल्या राज्य विधानसभेच्या निवडणुका लढविण्यासाठी त्यांनी जातीय नव्हे तर वर्गीय पायावर उभा राहणाऱ्या स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात मजूर पक्षाच्या ऐवजी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष स्थापन केला. तसेच न्याय्य व मुक्तवातावरणातील निवडणुकांचा पुरस्कार ते करतात. कारण त्यामुळे सार्वत्रिक निवडणुकांनंतर होणारे सत्तांतर हे रक्तरंजित न होता किंवा दडपशाहीमुक्त असणारे असते. या अशा प्रकारच्या लोकशाहीमुळे राजकीय पक्षांत खिलाडू वृत्ती जोपासली जाते जी लोकशाहीला पुरक व पोषक असते. कार्ल मार्क्सचा सशस्त्र क्रांतीचा मार्ग डॉ. बाबासाहेब यांना मान्य नव्हता. कामगारवर्गाच्या हुकूमशाहीला, एकाधिकारशाहीला त्यांनी विरोध केला. कारण कामगारांची ही हुकूमशाही शेवटी कम्युनिस्ट पक्षाची हुकूमशाही ठरते असे त्यांची धारणा होती. म्हणून त्यांनी संसदीय लोकशाहीचा पुरस्कार केला.तत्कालीन लोकशाही व्यवस्था त्या काळातील समाजाला नवखी होती. त्यामुळे तिची फळे लगेच लोकांना मिळतील असे नाही. ही लोकशाही रूजायला वेळ लागेल असे ते म्हणतात. लोकशाहित कायदा महत्वाचा असला तरी घटणात्मक नीतिमत्तेला ते अधिक प्राधान्य देतात. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राजकीय पक्षांची गरज ते प्रतिपादित करतात. मात्र हे राजकीय पक्ष संघटित व शिस्तबध्द असेलेलेद्वि किंवा बहुपक्ष असले पाहिजे असे ते मत मांडतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाही शासन प्रकाराकडे केवळ व्यवस्था म्हणून पाहिले नाही तर ती एक जीवनपध्दती आहे असे ते म्हणतात. लोकशाहीतील लोक हा शब्द त्या व्यवस्थेतील सर्व लोक जे राजकारणात प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेमध्ये सहभागी असतात ते या नजरेने त्यांच्याकडे पाहतात. ज्या लोकांनी शासनाची सार्वभौम सत्ता निर्माण केली आहे त्या सर्व लोकांचे कल्याण साधणारी लोकशाही अस्तित्वात यावी असे ते म्हणतात. लोकशाहित विरोधी पक्ष, प्रसारमाध्यमे, विचारस्वातंत्र्य, संविधानिक नैतिकता, अल्पमतवाल्यांची सुरक्षितता, लोकनिष्ठा याबाबत त्यांनी विचारमांडून त्यांचे लोकशाहिच्या विकासात महत्व अधोरेखीत केले आहे. लोकशाहीचा संबंध राज्यशास्त्राशीच नव्हे तर नीतिशास्त्राशी देखील घातला. लोकशाहीचे रोपटे भारतात संविधानाच्या जोरावर वाढावे, व्यक्तीपुजेमुळे सत्तेवर हुकूमशहा येवू नये असे त्यांना वाटत होते. एक व्यक्ती, एक मत, एक मूल्य या त्रिमितीय लोकशाहीच्या संकल्पनेवर त्यांचा भर होता. 26 जानेवारी 1950 रोजी मिळालेली राजकीय समता आर्थिक व सामाजिक

विषमतेमुळे उलथवून जाऊ नये असे म्हणतात. सामाजिक, आर्थिक समतेसाठी, स्वातंत्र्यासाठी प्रत्येकाने झटले पाहिजे अन्यथ: मोठ्या प्रयत्नाने संविधानाने उभा केलेला लोकशाहीचा इमला उध्द्वस्त होईल याची त्यांना भिती होती.

निष्कर्ष -

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता घेण्यात आलेल्या गृहितकांची पडताळनी वरील विश्लेषणाच्या आधारावर केल्यानंतर पुढील निष्कर्ष निघतात.आज आपण ज्या लोकशाही मार्गाने रक्तपात न घडविता सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक तसेच सार्वजनिक क्षेत्रात जे परिवर्तन घडवून आणत आहोत त्या लोकशाही शासनप्रणालीची पायाभरणी करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे आहे. जगभरातील विविध देशांच्या संविधानांचा अभ्यास करुन डॉ. बाबासाहेब यांनी भारतीय संविधानाची निर्मिती केली. आदर्श लोकशाही शासन पध्दतीमुळे नागरिकांत चारित्र्य, शील, सचोटी, उद्योगशीलता, धारिष्ठ इत्यादी गुणंाचा विकास होत असल्याने इतर कोणत्याही राजकीय व्यवस्थेपेक्षा लोकशाही ही राजकीय व्यवस्थेचे पाईक होण्याचा लोकांना कल वाढला आहे. लोकशाही पुढे घेवून जाण्यात शासनाची भूमिका महत्चावी असते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक असे लोकांच्या खाजगी व सार्वजनिक कोणतेही क्षेत्र घ्या त्यावर शासनाच्या निर्णयांचा परिणाम होत असतो. त्यामुळे निर्णय घेत असताना पक्षीय राजकारण, विचारधारेतील भिन्नता या बाबींचा अडसर नयेवू देता शासनाने आपली भूमिका बजावणे गरजेचे आहे.ह्या सर्वच गृहितांचा स्विकार करण्यात आला आहे. प्रस्तुत शोध निबंधाची सर्वच गृहितके तपासून पडताळणी केल्यानंतर स्विकृत करण्यात येत आहेत.

3 एप्रिल 1955 च्या सिध्दार्थ कॉलेजमधील भाषणात लोकशाहीच्या विकासातील हुकूमशाही म्हणजेच भांडवलशाही व माणसामाणसातील भेद भाव ज्याला ते ब्राम्हणशाही या नावाने संबोधतात ते दोन शत्रू हाटवले पाहिजेत असे मत मांडतात.

शिफारशी -

1. लोकशाहीची फळे सर्वांना समान मिळण्यासाठी स्त्री-पुरूष, गरीब-श्रीमंत, साक्षर-निरक्षर, सबल-दूर्बल, स्पृश्य-अस्पृश्य, मागास-विकसित असा कोणताही भेदभाव नकरता सर्वांना समान संधी दिली पाहिजे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असणारी लोकशाही अस्तित्वात येण्यासाठी वंशपरंपरेच्या कोणत्याही तत्वाला राजकीय प्रक्रियेमध्ये स्थान देता कामा नये. ज्यामुळे सामाजिक न्याय, सामाजिक समता अस्त्वित येईल. राजकीय समता, स्वातंत्र्याबरोबर सामाजिक व आर्थिक समता, स्वातंत्र्य प्रत्यक्षात येणे गरजेचे आहे.
3. लोकशाही मध्ये प्रत्येक व्यक्तीच्या सार्वभौमत्वाचा आदर राखत त्याचा सन्माननीय नागरीक म्हणून त्याच्या विकासासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करून देणे गरजेचे आहे.
4. बदलत्या काळानुसार, लोकांच्या बदलत्या आशा-अपेक्षा यानुसार लोकशाहीचे स्वरूप, तिचे उद्दिष्ट बदलून लोकशाही मुळे जनतेला आत्मनिर्भर, उपक्रमशील, जबाबदारीची जाणीव झाली पाहिजे.
5. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी मोफत, दर्जेदार व सक्तीच्या शिक्षणाची सोय असली पाहिजे, नागरिकांना भयमुक्त, आरोग्यदायी जीवणाची हमी असली पाहिजे. समाजाची पुनर्रचना लोकशाहीच्या तत्वावर झाली पाहिजे.
6. कायदा आणि प्रशासनातील संविधानाने मान्य केलेली समानता मान्य करून विरोधी पक्षाचे अस्तित्वसत्ताधारी पक्षाने टिकवले पाहिजे, त्यांच्या नकाराधिकाराचा आदर केला पाहिजे. प्रभावी विरोधी पक्षाचे लोकशाहितील महत्व नाकारून चालणार नाही.
7. शासनाने आणि नागरिकांनी घटनात्मक नीतिमत्तेचे पालन करून आपले आचरण स्वविकासाचे आणि देशाच्या विकासाचे राहिल याकडे लक्ष दिले पाहिजे.
8. शासन, नागरीक, प्रसारमाध्यमे या सर्वांनी सार्वजनिक विवेकबुध्दीचा अवलंब करून महिला, अल्पसंख्यांकांचा विकास,जनकल्याण कसे साध्य होईल याकडे जाणिवपूर्वक लक्ष दिले पाहिजे. तसेच विवेकी लोकमत तयार करण्यात महत्चाची भूमिका निभवली पाहिजे.
9. समाजातील सर्वांच्या न्याय्य मागण्या व हितसंबंधांमध्ये सुसंवाद प्रस्थापित होवून बहुसंख्यांकांनी अल्पसंख्यांकांच्या हिताचे व कल्याणाने धोरण स्विकारावे.
10. वैचारिक निरक्षरता, अंधश्रध्दा, जातीयता, सामाजिक आर्थिक विषमता, व्यक्तिपूजा या लोकशाहीच्या मार्गातील अडथळयांना मुठमाती दिल्या शिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही याची जाणीव प्रत्येकाला असली पाहिजे.
11. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी जनमताला, साधक-बाधक चर्चेला वाव दिला पाहिजे. या विचारविनिमयातून लोकहिताचे निर्णय घेतले पाहिजेत.

12. भारताचे संविधान आदर्श स्वरूपाचे आहे. त्याची अमलबजावणी योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे. तेव्हाच संविधानातील आदर्श तत्वे, मूल्ये प्रत्यक्षात येवून डॉ. बाबासाहेब यांना अभिप्रेत असणारी आदर्श लोकशाही अस्तित्वात येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यसंस्था रचनेबद्दल आपले विचार मांडले आहेत. राज्य व्यवस्था मानवी गरजेतून जनतेच्या क्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, लोककल्याण साधण्यासाठी, राज्यसमाजवाद निर्माण करण्यासाठीआवश्यक अशी सामाजिक संस्था आहेनिमार्ण झाली असे ते म्हणतात.जेव्हा राजकीय व्यवस्थेकडून न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व ही मूल्ये जोपासली जातात तेव्हा राज्यसमाजवाद अस्तीत्वात येतो असे ते म्हणतात. संसदीय शासनप्रणालीतील प्रातिनिधीतक शासनपध्दतीचा ते पुरस्कार करून अध्यक्षीय शासनव्यवस्थेतील एकाधिकारशाहीला विरोध करतात. आपल्या लोकशाही शासनपध्दतीच्या विचारांत लोकशाही शासनपध्दत यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांची चर्चा देखील त्यांनी केली आहे. भारताच्या स्वातंत्र्या पासून आजच्या 21 व्या शतकातील लोकशाहीची वाटचाल पाहिली तर असे म्हणावे लागेल की. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेला प्रातिनिधीक संसदीय लोकशाहीचा दाखवलेला मार्ग खरोखर सर्वच मानवजातीच्या कल्याणाचा आहे. या लोकशाहीचा डोलारा टिकवण्याची खरी जबाबदारी ही जनतेबरोबर शासनाची आहे असे राज्यशास्त्राचा अभ्यासक म्हणून मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ -**


1. नानी पालखीवाला अनु. वि. स. वाळिंबे- वुइ, दि पीपल, मेहता पब्लिशिंग हाऊस, 1216, सदाशिव पेठ, पुणे 30 तिसरे पुनर्मुद्रण, सप्टेंबर 2002
2. भास्कर भोळे - आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर 2003
3. आधुनिक भारतीय राजकीय विचारश्: प्रवाह आणि अंत:प्रवाह - डॉ. अशोक चौसाळकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे 411 030, प्रथमावृत्ती 1 ऑगस्ट 2014
4. धनंजय कीर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1966
5. डॉ. ज्ञानराज काशीनाथ गायकवाड - महामानव डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, राजवंश पब्लिकेशन, मुंबई 400 709, चौथी आवृत्ती - ऑक्टोबर 2011
6. नागोराव कुंभार - डॉ. आंबेडकर विचारदर्शन, प्रबोधन प्रकाशन, 1991
7. टी. ए. गवळी - डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती 1991
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड 18 भाग 3 (महाराष्ट्र शासन, 2002)
9. समाज प्रबोधन पत्रिका, क्रमांक - 216, ऑक्टोबर - डिसेंबर 2016
10. समाज प्रबोधन पत्रिका क्रमांक - 221, जानेवारी - मार्च 2018
11. https://mr.wikipedia.org/wiki/डॉ._बाबासाहेब_आंबेडकरांचे_विचार#लोकशाहीसंबंधी_विचार
12. https://visheshmarathi.com/ambedkar-vichar/
13. https://maharashtratimes.com/editorial/article/dr-babasaheb-ambedkar-mahaparinirvan-diwas-2019-dr-babasaheb-ambedkar-and-democracy/articleshow/72387206.cms
14. https://www.loksatta.com/lokprabha/vishesha/ambedkar-and-democracy-in-modern-days-1677325/
15. Indian Constitution (Govt. Copy)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक लोकशाही विचार

**डॉ. सुनील संभाजी साठे**,
श्रीमती विजयादेवी देसाई सि. कॉलेज दौलतनगर,
(मरळी) ता. पाटण
Email: drsunilsathe@gmail.com

**गोषवारा :**

भारतात विविधता आहे. ते एक राष्ट्र व्हायचे असेल तर सर्व घटकांना एकत्र करणारी विचारसरणी फक्त लोकशाहीच्या मार्गानेच निर्माण होऊ शकते. अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता हि मानवाच्या आयुष्यातील महत्वाची तत्वे होय. सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याबरोबरच समानताही तितकीच महत्वाची आहे आणि यावर आधारीत डॉ. आंबेडकरांना समाज निर्माण करावयाचा होता. दारिद्रय, अज्ञान, विषमता जातीयवाद हा लोकशाहीतील अडथळा आहे. तो दूर होत नाही तोपर्यंत खरी लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही. या संशोधन लेखात लोकशाही शासन पद्धती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक लोकशाही बाबतीत असणाऱ्या विचारावर अधिक भर दिला आहे. सामाजिक लोकशाहीमध्ये धर्मभेद, जातीभेद, प्रांतभेद, लिंगभेद या पगड्यावरती मात करुन भारतीय लोकशाही कशी समृद्ध करता येईल या विषयीचा शोध निबंधात अभ्यास करण्यात आला आहे.

**पारिभाषिक शब्द:** डॉ. आंबेडकर, लोकशाही, सामाजिक लोकशाही, जातीभेद

**प्रस्तावना**

ब्रिटिशांनी प्लासीच्या लढाई च्या माध्यमातून भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेत भारतातील पंजाब, सिंधप्रांत व दक्षिणेतील राज्ये यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करुन राजकीय सत्ता हस्तगत केली. इंग्रजी राजवटीमुळे आलेल्या पाश्चात्य शिक्षण व्यवस्थेमुळे प्रस्थापित भ्रम, अज्ञानापासून व सामाजिक विषमतेपासून मानवाची मुक्ती असे अनेक धडे या राजवटीने भारतीयांना दिले तसेच स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय मुल्ल्यावर आधारीत लोकशाहीची संकल्पनाही सोबत आली. आज जगातील प्रगत राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला आहे. तरीसुद्धा भगवान गौतम बुध्दांच्या काळापासून जगातील पहिले लोकशाही राज्य म्हणून जगाच्या लोकशाही इतिहासामध्ये भारताची ओळख आहे. भारतामध्ये वैशालीचे गणराज्य प्राचीन काळातील लोकशाहीचे ते एक आदर्श राज्य मानले गेले होते. 20 व्या शतकामध्ये नव्याने स्वतंत्र झालेल्या अनेक देशांनी लोकशाहीचा स्वीकार केला. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्वावर आधारलेली लोकशाही रुजविण्यासाठी देशातील सामाजिक परिस्थितीही अनुकुल असावी लागते. समाजामध्ये विषमता भेदभाव असेल तर लोकशाहीची तत्वे मुळ धरु शकणार नाहीत. त्यामुळे लोकशाही देशातील समाजव्यवस्था तेथील मुल्ल्ये यांचाही स्वीकार भारतीयांनी केला.

भारतात विविधता आहे. ते एक राष्ट्र व्हायचे असेल तर सर्व घटकांना एकत्र करणारी विचारसरणी फक्त लोकशाहीच्या मार्गानेच निर्माण होऊ शकते. अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती. स्वातंत्र्य, समता, बंधुता हि मानवाच्या आयुष्यातील महत्वाची तत्वे होय. सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याबरोबरच समानताही तितकीच महत्वाची आहे आणि यावर आधारीत डॉ. आंबेडकरांना समाज निर्माण करावयाचा होता. दारिद्रय, अज्ञान, विषमता जातीयवाद हा लोकशाहीतील अडथळा आहे. तो दूर होत नाही तोपर्यंत खरी लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही. सत्ताधारीवर्ग, राजकीय घराणी, पारंपारिक समाजरचना यांच्याकडून अल्पसंख्यांकाचे शोषन लोकशाहीत मान्य नाही. समाजातील दलित, मागासवर्ग, अल्पसंख्यांक, अडाणी, विकासापासून वंचित असणारा घटक सत्तेत सहभागी झाला तरच खरी लोकशाही अस्तित्वात येईल अशी भूमिका डॉ. आंबेडकरांची होती. म्हणून डॉ. आंबेडकरांच्या या भूमिकेचा सदर शोध निबंधात अभ्यास करुन त्यांच्या सामाजिक लोकशाही विषयीच्या विचाराचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**अभ्यासाची उदिष्टे**

1. लोकशाही शासनपद्धतीचा आढावा घेणे.
2. सामाजिक लोकशाही विषयीची डॉ. आंबेडकरांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

**अभ्यासाची गृहितके**

1. भारतीय लोकशाहीमध्ये व्यापक बदल होताना दिसतो आहे.
2. लोकशाहीमुळे लोकांचा राजकीय सहभाग वाढता परंतु सामाजिक लोकशाही मार्गात अडथळे असल्याचे दिसते.
3. संशोधन पद्धती
4. प्रस्तुत शोधनिबंधात क्षेत्रीय व ग्रंथालयीन संशोधन या दोन्ही पद्धतीचा अवलंब करुन पाक्षिके, मासिके, वर्तमानपत्र, इंटरनेट व विविध संदर्भ सहित्याचा आधार घेऊन संशोधनाची मांडणी केली आहे.

**शोधनिबंधाचे स्पष्टीकरण: डॉ. आंबेडकरांचे सामाजिक लोकशाही विषयीचे विचार**

भारतीय समाजव्यवस्थेत असलेली सांस्कृतिक व आर्थिक तफावत लोकशाही समाजव्यवस्था निर्माण करण्याच्या मार्गातील प्रमुख अडचण आहे. लोकशाही हा शासनाचा सर्वोत्तम प्रकार आहे. परंतु हा प्रकार योग्य पद्धतीने भारतात कार्यान्वित करण्यासाठी समाजव्यवस्थेत व्यापक बदलाची आवश्यकता आहे. गुलामगिरी आणि शोषनातून मुक्त करण्यासाठी लोकशाही व्यवस्थेचा हातभार लागला पाहिजे निव्वळ शांततेच्या मार्गाने सत्तांतर व प्रौढमताधिकारावर चालणारी लोकशाही आंबेडकरांना नको होती. सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल घडवून आणणारी आणि भारतातील सामाजिक परिवर्तनाला चालणा देणारी लोकशाही हवी होती. लोकशाही वर दृढ विश्वास असला तरी भारतातील लोकशाहीच्या मार्गात काही अडथळे त्यांनी नमुद केले आहेत. भारतीय समाजव्यवस्थेत असलेले विषमतेचे प्राबल्य आणि जातीय व्यवस्थेमुळे भारतात लोकशाही यशस्वी करणे त्यांना अग्नीदिव्य वाटत होते. भारतीयांमधील परंपरागत वृत्ती, दारिद्रय, निरक्षरता, राजकारणावर असलेली वरिष्ठ वर्गाची पकड इत्यांदी गोष्टी लोकशाहीच्या मार्गात अडथळे आणतील. भारतीय सामाजिक रचनेत व्यापक बदल घडवून आणल्याशिवाय लोकशाहीची इमारत भक्कम पायावर उभी राहणार नाही. आंबेडकर आपल्या विचारात राजकीय स्वरुपाच्या लोकाशाहीवर भर देत नाहीत तर सामाजिक लोकशाहीच्या बाजूवर भर देतात. एक व्यक्ती एक मत हे तत्व सामाजिक लोकशाहीसाठी पुरेसे नाही तर यामध्ये सहबांधवासोबत स्नेह, प्रेम, सामाजिक बंधंनापासून मुक्तता आणि विशेषाधिकाराचा अभाव समाविष्ट आहे.
आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही विचार हा केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजनातून उपजलेला नव्हता तर भोवतालच्या सामाजिक, राजकीय वास्तवाच्या मुशीतून तो तावून सुलाखून निघाला होता. भारतात लोकशाहीची उभारणी करणे एवढ्यापुरतेच त्यांचे राजकीय ध्येय परिमित नव्हते तर जगात जिथे जिथे लोकशाही असेल त्या सर्वच राष्ट्रांशी सहकार्य जुलूम जातीयता व गुलामगिरीतून सामान्य मानसाला मुक्त करणारी शासनव्यवस्था कशी असावी हाच शोध त्यांनी आमरण चालविला होता. या देशातील सामाजिक संबंधाची फेररचना फक्त लोकशाही राजवटच करु शकेल असा त्यांना विश्वास होता.

**निष्कर्ष**

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक लोकशाही विषयाचे स्वरुप राहिले असून त्यांनी सामाजिक लोकशाही विचाराच्या माध्यमातून देशातील सर्व जाती धर्माच्या लोकांमध्ये ऐक्य निर्माण करुन त्यांच्या सर्वांगीन विकासाचा मार्ग सांगितला तसेच सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याबरोबरच समानताही तितकीच महत्वाची आहे. म्हणून समाजातील जातीभेद, लिंगभेद, धर्मभेद, अज्ञान, दारिद्रय व विषमता हे अडथळे दूर झाल्याशिवाय भारतामध्ये खरी लोकशाही अस्तीत्वात येणार नाही. असे असले तरी भारतीय लोकशाहीत सर्व काही अलबेल आहे. असं धाडसाने म्हणावे लागेल. कारण समाजातील विषमता, भेदभाव, प्रादेशिकवाद, भाषावाद असे अनेक प्रश्न भारतीय लोकशाहीतील प्रमुख अडथळे निर्माण झाले आहेत. भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था आहे. भारतामध्ये अनेक जाती, धर्म, भाषा, प्रांत व लिंगभेद असे आहेत. या सर्वांना एकत्रित करुन त्यांच्यामध्ये समता प्रस्थापित केल्याशिवाय भारतीय लोकशाही भक्कम होणार नाही. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावयास हवेत.

**संदर्भ:**

1. मोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार पिंपळापुर डिस्ट्रीब्युटर्स नागपूर, **2016**
2. डॉ. शैलेंद्र देवलाणकर, राज्यशास्त्रातील मुलभूत संकल्पना, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद **2017.**
3. देशापांडे निर्मला, दिल्लीहून नियोजन नको, पंचायतराज्य जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास परिसंवाद, निवडक निबंद सं.प्र.प्रा.पी.बी.पाटील 1989.

# The next possible threat to democracy

**Dr. Soma Pandurang Gondane,**
Assistant Professor
Rajiv Gandhi Kala Mahavidyalaya,
Patan Dist. Chandrapur
E-mail - bodhibandhu@gmail.com
Mo. No 7744999936

**Abstract**

The situation of democracy that Babasaheb Ambedkar described can be a mirror not only for the then society but also for today's society. In this mirror we must look at the mess in our democracy today and think about what we can try to fix and where we can start. Finally one thing needs to be noted here that people look at Babasaheb only as an engineer of law and constitution. They forget their moral appeal and efforts to awaken public conscience. They don't even remember his conscience. He used to say that democracy is not a political machine. It depends on the democratic society. If democracy does not create a good society, this system will not work. It is the misfortune of this country that the rift that existed between a morally strong hero and egalitarian like Mahatma Gandhi and a constitutionalist like Babasaheb is being aired even today. If the Indian society had been guided by the combination of Babasaheb's constitution and Gandhiji's moral appeal, this plight of democracy would not have happened, which is happening today.

**Key Words** :- Bloodshed, Revolutionary, Society, Violence, Robbery, Justice, Fairness, Bureaucracy

**Introduction**

Along with democratic countries around the world, there is growing concern about the future of democracy in India as well. People believe that democracy is only in name but according to some it is slowly disappearing. In such a situation, it is necessary to know what essential conditions were laid down by Dr. Babasaheb Ambedkar, the architect of our constitution for the functioning of democracy and whether we can implement those conditions.

In this context Babasaheb's lecture held at Poona on 22 December 1952 is very important, which he delivered for the successful functioning of democracy. He questioned the attitude that many people in India talk about democracy as if it is already established or has been here for years. He quotes Walter Baghet's definition centered on the British Constitution and says that 'democracy is a system that operates through debate and discussion'. He then referred to US President Abraham Lincoln's speech at Gettysburg after the victory of the Southern states, in which he gave his famous definition of democracy, according to which ``A democracy is government by the people, for the people, and for the people. After this, Babasaheb gives the definition of democracy. According to him, "democracy is the form and method of government where revolutionary changes can be brought about in the social and economic life of the people without bloodshed." To know how democracy works, one has to look at history when and why it fails. Following are the four essential conditions mentioned by him for effective governance of democracy.

**Equality**

Equality means that there is no inequality in the society, there is no discrimination, that is, there is no oppressive class in the society, which class will do injustice to the weak class. Also, they should not

have any such special rights that the weaker sections can commit injustice. Because if such classes exist, violence can be created in the society and these classes become fatal for democracy. Similarly, democratic ideas and oppressive classes would have been created. Dr.Babasaheb Ambedkar wrote an article on the future of democracy in India on 20 May 1956 and in that article he attacked the political party and the government with harsh words to maintain the caste system and class system. Can the caste system of that ideology be ended through education? They are of the opinion that education creates the power to create rebellion in the lower class castes, but education is given to such a class which always tries to maintain the caste system. That's why caste system is not destroyed. That's why education should be given to such junior class whose interests are in breaking the caste system, as well as those who give importance to freedom, equality, fraternity and friendship or values in a democracy, exactly as Dr. Babasaheb Ambedkar was of the opinion that friendship is the basis of freedom and equality or both, and the word India is the creation of Buddha. Done.

**Opposition**

Babasaheb writes that how important the opposition party is for democracy, the democratically ruling Vargala does not do arbitrary work, that's why arrangements have been made to bring the ruling Vargala to Vatnivar. Those tasks are known first of all, until the ruling party and their leaders reach the details of their work every five years and complain about it or not. However, the opponents do the work of immediately putting a check on the decisions of the government after five years. That's why the leader of the opposition party is given respectable status by giving honorarium from the government.

**Equality before law and administration**

Dr. Babasaheb Ambedkar says that equality before law is important, but equally important is equality in administrative work. Giving that example, I understood that the District Magistrate said that he will not take action against such a person because he is related to such a party which is truthful. It is a biased situation reminding us of America's spoils system. The party that came to power there elected the administration in its own way and showed favoritism. In comparison, the neutral and stable system of the British bureaucracy is considered good. That's why America made a part of bureaucracy permanent by gradually improving the system. Despite the permanent form of bureaucracy in India, today its form has moved to the soil of America's intelligence system and because of this all kinds of favoritism and discrimination are spreading.

**Phenomenological ethics**

Dr. Babasaheb Ambedkar would have said that many people are very enthusiastic about the constitution but not me. Because the constitution does not work properly with a view to raise the standard of living of the people, I would like to automatically reject it and re-draft it, I would like to join it, he said. Because the constitution is only a structure. The flesh and blood in him came from epistemological morality. Referring to the traditions of England in this regard, he has mentioned the first President of America, George Washington, in the context of America. They say that Washington would have been a god for the American people. But once again he refused to contest the presidential election. Rahu Shakt would have been the president of America till then. When people thought about the reasons, they said, "My dear countrymen, we have made the Constitution, you are forgotten. We don't want a hereditary monarchy, so we should make a constitution. That's why you cannot accept any hereditary ruler or dictator. If you make us the President again and again, then what will happen to the eventful ideals.

**Majority minority minority fear new**

Or along with this, Dr. Babasaheb Ambedkar emphasized on one more thing, that the minority should not face any kind of fear of the majority. Here he has given reference to the current errors in India where proposals to adjust the work in the assembly are repeatedly rejected. Or in this context, he has referred to his experiences in the Mumbai Legislative Assembly, where Speaker Mavalankar's speech was not democratic, because he would have bowed down to the pressure of the minister.

Moral system:- It is also necessary to have moral system in the society for democracy. However, most of the political scientists do not mention it. But Harold Laski is an exception. Laski says that the democratic moral system is taken for granted. That means democratic moral system should be genuine. Democracy will disintegrate if there is no moral order, says Laski. As is happening in our country.

Public Conscience :- In the eyes of Babasaheb, the last and most important requirement of democracy is public conscience. Public conscience clarifies the difference between justice and injustice and awakens the spirit of standing against injustice in people and inspires them to do justice. He has a craving for injustice and is happy to do justice. In this context, he has mentioned the atrocities on Jewar and then the atrocities on scheduled class in South African society. Christians in England did not raise their voice against the atrocities on Jews, they expressed their complaint. There only Maharajani Juna helped.

**Secular democracy**

Dr. Babasaheb Ambedkar's opinion - "I have faith in religions that teach freedom, equality, justice and fraternity, and if we want to have a united modern India, then the supremacy of the scriptures of all religions should be confirmed." Religion is for the individual, the individual is not for the religion. On the basis of Dr. Ambedkar's democratic principles, who advocated for giving the right to vote to every person, the weaker sections of the society reached the center of power, Dr. Babasaheb Ambedkar said this. Today, inspired by his thoughts, majority of the people are leading the process of democracy forward by fighting a tough life based on democratic values and making the dictatorial power ineffective. Towards democratic ideas, Dr. Babasaheb Ambedkar said, "Man is mortal and so are thoughts. There is a need for the propagation of every idea, if water is not given to the ropala, it dries up and dies." The incomparable contribution of Dr. Babasaheb Ambedkar in the development of democracy will never be forgotten.

**Freedom**

Freedom of movement, life and property are essential. Dr. Babasaheb Ambedkar said that all people should have free travel and accommodation. At the same time, he supported the right to private property. When a person has the right to keep and use private property, then only the security of life and health will be possible in a better way. According to him, the right to freedom will definitely be beneficial if the rights of the individual are used effectively and efficiently. Dr. Babasaheb Ambedkarani strongly supported the establishment of his social political freedom party, contesting elections, exercising franchise, getting organized, fame and expression etc. Dr. Babasaheb Ambedkar would have considered religious freedom necessary for an ideal society, according to him every person should be given the freedom to follow and propagate religion. Every citizen should have the right to establish a religious institution. Do not discriminate against any person or community on the basis of religion. Politically, he supported the secular form of the state. Yavorun, it is clear that Dr. Babasaheb Ambedkar was in favor of all kinds of freedom for the progress of individual, society and nation, organization and strength. Democratic freedom is always very thunderous.

**Conclusion**

1) For democracy to be effective, further information should be given. 2) Level of education

should be increased among people. 3) Poverty should be removed. 4) People should be encouraged to vote. 5) Intelligent educated people should be given leadership role. Medium should be crossed 8) It is very important to have a democratically responsible opposition party, therefore it should be a legislative opposition party. 9) Democratically elected members should be the machinery that keeps an eye on the work of the people's representatives.

Dr. Babasaheb Ambedkaran's democracy would have immense loyalty. There is no better governance system than democracy in the world, such would have been their opinion. Full development of individual's personality can happen only in democracy. Dr. Babasaheb Ambedkar has made politicians accept democracy as a way of life. So that politics can be used to build a society free from justice, freedom, equality and exploitation.

**References**

1) Dr. Phadke, Bhalchandra - Thoughts on democracy of Dr. Babasaheb Ambedkar - Prachar Prakashan Nagpur 1997

2) Gaikwad Sudhakar S. - Dr. Ambedkar's Samaj Rachechi Cultural Mandani -, Dr. Babasaheb Ambedkar's article in Gaurav Granth - Publication M.Ra. Ha and Cultural Circle Mumbai- 1

3) Dr. Teltumbde Anand - Social Justice and Globalization Publication Lokvaangmaya Gruh Mumbai 2010

4) Prof. Chitni M.B, Nimbalkar Vaman - Social Justice and Globalization - Prabodhan Prakashan Nagpur 2006.

# पंडीत नेहरुंचे लोकशाही संबंधी विचार

**डॉ. सय्यद कुरेशाबी नजीरसाब**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
आझाद महाविद्यालय, औसा
Email. kureshabi@gmail.com
mo.no. 9975478111

## सारांश

पं. नेहरुनी लोकशाहीची चौकट कोठेही खिळखिळी होवू न देता भारताला प्रगतीपधावर नेण्याचा आणि भारताची सर्वांगिण प्रगती साधण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न पंतप्रधान नेहरुंनी केला. भारतीय राज्य घटनेचे पावित्र्य त्यांनी अबाधित ठेवले लोकशाहीच्या वास्तुला कोठेही तडा जावू न देण्याची खबरदारीही त्यांनी सातत्याने घेतली. कारण त्यांना लोकशाही वर विश्वास दृड होता. ते लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. नेहरुंना लोकशाही केवळ राजकीय जिवनातील नको होती तर त्यांना समाजिक व आर्थी लोकशाही हवी होती. लोकशाहीकडे पाहण्याचा नेहरुंचा दृष्टीकोण खुप व्यापाक होता. लोकशाही म्हणजे केवळ हुकुमशाही किंवा अधिकारशाही यांच्या विरुध्द असलेली एक प्रतिक्रिया या संकुचित अर्थाने ते लोकशाहीला समजत नव्हेते तर ती एक जिवनपध्दती, विचार पध्दती आणि एक वैशिष्टपुर्ण राजकीय क्षेत्रात संधीचा समता याचेच चित्र पाहता असत नेहरुंच्या लोकशाही विचारांमध्ये व्यक्ती व त्यांच स्वातंत्र्य हा त्यांच्या वैचारिक केंद्रबिंदू होता.

**पारिभाषिक शब्द :** लोकशाही संबंधी विचार, लोकशाहीची आवश्यकता, लोकशाहीचे स्वरूप

**प्रस्तावना :**

पं. नेहरू हे लाकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. इंग्लडमध्ये असताना जे. एस. मील, ग्लॅडस्टंट या विचारवंतांच्या उदारमतवादी विचारसरणीने ते प्रभावित झाले व त्यांनी लोकशाहीचा स्वीकार केला. नेहरुंचा मानवता व त्यावरील विश्वास दृढ असल्यामुळे त्यांनी लोकशाही शासण प्रणालीचे समर्थ केले. नेहरुंना संसदीय लनोकशाही अपेक्षीत होती. कारण ब्रिटीशांच्या एकछत्री राज्यकारभारामुळे भारतातील सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण झाले. आर्थीक विषमता निर्माण झाली त्यातुनच सामाजिक उच्च निच्च भावना निर्माण होऊन लोकांमधीन अन्याय व अत्याचार वाढले. या दयनिय परिस्थीतीवर मात करण्यासाठी लोकाशाही शासन पध्दतीचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे मत पं. नेहरुंनी व्यक्त केले.

**1) पं. नेहरुंचे लोकशाही संबंधी विचार :**

पं. नेहरुंनी लोकशाहीची व्याख्या अत्यंत समावेशक आहे. लोकशाही म्हणजे कांही राजकीय संस्थाची उपस्थिती एवढाच मर्यादित अर्थ होत नाहीत. तर व्यक्तीच्या विकासासाठी पुरेपूर संधी उपलब्ध्द करून देणारा चैतण्यमय समाज असता त्यांचा लोकशाहीचा अर्थ आहे. ते म्हणतात लोकशाही केवळ राजकीय नसते. केवळ आर्थीक ही नसते ती एक मनोअवस्था असते. सर्वांना राजकीय व आर्थीक क्षेत्रात समान संधी मिळणे त्यात अभिप्रेत असते. व्यक्तीला विकासारचे स्वातंत्र्य असून आपल्या क्षमतेचा व पात्रतेचा पुरेपुर फायद्या घेण्याचे स्वातंत्र त्यात असते. दुसऱ्या बद्दल व आपल्याशी न जुळणाऱ्या त्यांच्या मताबद्दल सहिष्णुता असते. ती एक प्रवाही गोष्ट आहे. शेवटी आपल्या राजकीय समस्थाकडे पाहण्याच्या लोकशाही हा एक माणसिक दृष्टीकोण असतो.

**2) लोकशाहीची आवश्यकता :**

पं. नेहरू यांनी लोकशाहीची आवश्यकता हि पुढील कारणामुळे आवश्यक वाटत होती.

अ) समाजिक आणि राजकीय बदल घडवून आणण्यासाठी नेहरुंना लोकशाहीची आवश्यकता वाटत होती. नेहरुंना लोकशाही ही केवळ राजकीय जिवनातील लोकशाही या मर्यादित अर्थाने नको होती तर त्यांना राजकीय लोकशाही बरोबर समाजिक व आर्थीक लोकशाही हवी होती.

ब) नेहरुंच्या मते राजकीय लोकशाही टिकविण्यासाठी आर्थीक लोकशाही साथ आवश्यक आहे. त्यांनी समाजवाद प्रस्थापित

करण्यासाठी त्यांच्या लोकशाहीवर विश्वास होता.
क) संधीची समानता : शोषणमुक्त समाज निर्माध करण्यासाठी संधीची समानता आवृयक असते व लोकशाहीद्वारे संधीची समानता निर्माण करता येवू शकते.
ड) आर्थिक न्याय : लोकशाहीच्या माध्यमातून आर्थीक न्याय प्रस्थापित केला जावून शकतो असा विश्वास नेहरुंना होता म्हणून त्यांना लोकशाही इतर व्यवस्थांपेक्षा योग्य आहे असे वाटत होते.

**3) लोकशाहीचे स्वरूप :**
i) व्यक्तीस्वातंत्र : लोकशाहीत व्यक्ती ही केंद्रस्थानी असेल व्यक्तीचा विकास म्हणजे कुटुंबाचा, समाजाचा व देशाचा विकास होय. व्यक्ती स्वातंत्राला नेहरुंनी लोकशाहीचा आत्मा असे म्हटले आहे.
ii) विचार विनिमय व शिस्तीला महत्व :
लोकशाहीत इतरांच्या मताला महत्व देणे लोकशाहीत इतरांची मते जाणुन घेतली पाहिजेत, लोकशाही हे लाकांचे सरकार असल्यामुळे त्यात विचार विनियमयाप्रमाणेच शिस्तीचे भान असावे.
iii) मुलभूत हक्कांना प्राधाण्या देण्यात यावे.
iv) लोकशाही व समता नेहरुंच्यामते लोकशाहीचा मुख्य आधार समाजिक आणि आर्थीक समानता आहे.
v) संसदीय लोकशाहीचा स्वीकार संसदीय लोकशाहीत संसदेचे सर्व श्रेष्ठत्व व सार्वभौमत्व मान्य असते. त्यामुळे परिस्थीतीनुसार नियमात बदल करणे शक्य असते.
vi) लोकशाही व समाजवादाचा समन्वय : नेहरुंनी लोकशाही व समाजवाद यांचे एकत्रीकरण करून मोठे उद्योगधंदे राष्ट्राच्या मालकीचे केले तर लहान उद्योगधंदे खाजगी मालकीचे ठेवले.

**सारांश :**
अशा प्रकारे व्यक्ती विकास व राष्ट्र विकासाचे उद्दीष्टे डोळ्यासमोर ठेवून पं. नेहरुंनी लोकशाही विचारसाणीचा स्विकार केला. पं. नेहरुंनी केवळ लोकशाहीचे विचारच मांडले नसुन तर ते स्वत: आचरणात देखील आणण्याचा प्रयत्न केला. संसदेला व विरोधकांना त्यांनी कधीच तुच्छ मानले नाही स्वत: प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष हुकुमशहा होण्याचा खटाटोप त्यांनी केला नाही. व आज 75 वर्षे या देशात लोकशाही रूजविण्याचे श्रेय नेहरुनांच द्यावे लागेल म्हणूनच बट्रान्ड रसेल नेहरुबद्दल बोलताना एकदा म्हणाले होते. "मी नेहरुंना एक थोर नेता मानतो, कारण हुकुमशाह बनण्याकरता लागणारी मार्ग स्विकारला भारताची प्रगती लोकशाहीद्वोर साधण्यातच भारताचे कल्याण आहे. हे मसजण्याकरता लागणारे शहाणपण आणि ऐतिहासीक दृष्टी नेहरुंजवळ आहे म्हणून मी त्यांना एक द... पुरूष माणतो.

**संदर्भ :**


| | | | |
|---|---|---|---|
| 1) | भा.ल. भोळे | - | आधुनिक भारतातील राजकिय विचार |
| 2) | डॉ.प्रभा कस्तुरे वाडकर | - | पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत<br>अरुणा प्रकाशन, लातूर. |
| 3) | प्रा. डॉ. शुभांगी राठी | - | भारतीय राजकीय विचारवंत<br>कैलाश पब्लीकेशन, औरंगाबाद |
| 4) | लोकसत्ता | - | पं. नेहरु : दृष्टये लोकशाहिवादी 7 जुन 2020. |
| 5) | महाराष्ट्र टाईम्स | - | पं. जवाहरलाल नेहरु : आधुनिक भारताचे<br>शिल्पकार, 14 नोव्हेंबर 2020 |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून लोकशाही पुढील आव्हाने

**डॉ. माया बापूराव मसराम**
शरदराव पवार आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,
गडचांदूर, ता. कोरपना, जिल्हा चंद्रपूर
मोबा. नं. 7744999935
ई-मेल-mayagondane1972@gmail.com

**सारांश**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरनी लोकशाहीची जी परिस्थिती सांगितली ती तत्कालीन समाजासाठीच नव्हे तर आजच्या समाजासाठीही आरसा ठरू शकते. या आरशात आपण आपल्या आजच्या लोकशाहीतील गडबड पाहिली पाहिजे आणि आपण काय निराकरण करण्याचा प्रयत्न करू शकतो आणि कोठून सुरुवात करू शकतो याचा विचार केला पाहिजे. शेवटी इथे एक गोष्ट लक्षात आणून देणे आवश्यक आहे की लोक बाबासाहेबांकडे फक्त कायदा आणि राज्यघटनेचे अभियंता म्हणून पाहतात. त्यांचे नैतिक आवाहन आणि सार्वजनिक विवेक जागृत करण्याचे प्रयत्न ते विसरतात. त्यांना त्याचा सद्सद्विवेक सुद्धा आठवत नाही. लोकशाही हे राजकीय यंत्र नाही, असे ते म्हणायचे. ही लोकशाही समाजावर अवलंबून आहे. लोकशाहीने चांगल्या समाजाची निर्मिती झाली नाही तर ही व्यवस्था चालणार नाही. महात्मा गांधींसारखा नैतिकदृष्ट्या खंबीर नायक आणि समतेचा नेता आणि बाबासाहेबांसारखा घटनातज्ज्ञ यांच्यात जी दुरवस्था होती, त्याला आजही हवा दिली जात आहे, हे या देशाचे दुर्दैव आहे. बाबासाहेबांचे संविधान आणि गांधीजींचे नैतिक आवाहन यांची सांगड घालून भारतीय समाज चालला असता तर लोकशाहीची ही दुर्दशा झाली नसती, जी आज होत आहे.

**पारिभाषिक शब्द : रक्तपात, क्रांतिकारक, समाज, हिंसा, दरोडे, न्याय, निष्पक्षतेने, नोकरशाही, माणूस**

**प्रस्तावना**

जगभरातील लोकशाही देशांबरोबरच भारतातही लोकशाहीच्या भवितव्याबद्दल चिंता वाढत आहे. लोकांचा असा विश्वास आहे की,लोकशाही फक्त नावापुरतीच राहिली आहे तर काहींच्या मते ती हळूहळू नष्ट होत आहे. अशा परिस्थितीत आपल्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीच्या कार्यासाठी कोणत्या अत्यावश्यक अटी घातल्या होत्या आणि त्या अटी आपण अंमलात आणू शकतो का हे जाणून घेणे आवश्यक आहे.

या संदर्भात पूना इथे 22 डिसेंबर 1952 रोजी आयोजित केलेले बाबासाहेबांचे व्याख्यान अतिशय महत्त्वाचे आहे, जे त्यांनी लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी दिले होते. भारतातील अनेक लोक लोकशाहीबद्दल बोलतात, जणू काही ती पूर्वीपासूनच प्रस्थापित झाली आहे किंवा वर्षानुवर्षे येथे आहे, अशा वृत्तीवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. त्यांनी ब्रिटीश राज्यघटनेवर केंद्रीत वॉल्टर बगेहत यांची व्याख्या उद्धृत केली आणि त्यांच्या मते 'लोकशाही ही एक अशी व्यवस्था आहे जी वादविवाद आणि चर्चेतून चालते'. त्यानंतर त्यांनी अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी दक्षिणेकडील राज्यांच्या विजयानंतर गेटिसबर्ग येथे दिलेल्या भाषणाचा संदर्भ दिला, ज्यामध्ये त्यांनी लोकशाहीची त्यांची प्रसिद्ध व्याख्या दिली आहे, त्यानुसार `लोकशाही म्हणजे लोकांकडून , लोकांकरीता आणि लोकांसाठी सरकार असते त्याला लोकशाही म्हणतात. यानंतर बाबासाहेब लोकशाहीची व्याख्या देतात. त्यांच्या मते, "लोकशाही हे शासनाचे स्वरूप आणि पद्धत आहे जिथे लोकांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात रक्तपात न करता क्रांतिकारक बदल घडवून आणले जाऊ शकतात." लोकशाही कशी चालेल, हे जाणून घेण्यासाठी इतिहासात ती कधी आणि का अपयशी ठरते, हे पाहावे लागेल. लोकशाहीच्या कार्यक्षम कारभारासाठी त्यांनी नमूद केलेल्या चार अत्यावश्यक अटी पुढीलप्रमाणे आहेत.

**समानता :**

समानतेचा अर्थ समाजात कोणत्याही प्रकारची असमानता नसणे भेदभाव नसणे म्हणजेच समाजात कोणत्याही प्रकारचा दमनकारी वर्ग नाही जो वर्ग कमजोर वर्गावर अन्याय अत्याचार करेल. तसेच त्यांच्याकडे कोणतेही असे विशेष अधिकार नसावे की जे कमजोर वर्गावर अन्याय अत्याचार करू शकेल. कारण असे वर्ग अस्तित्वात असतील तर समाजात हिंसा दरोडे निर्माण होऊ शकतात आणि हे वर्ग लोकशाहीला घातक ठरतात. तसेच लोकशाहीला विचार अश्या दमनकारी वर्गात निर्माण होतो. भारतातील

लोकशाहीच्या भविष्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 20 मे 1956 ला एक लेख लिहिला आणि त्या लेखात लिहितात की जाती व्यवस्था आणि वर्ग व्यवस्था टिकवून ठेवण्याकरिता राजकीय पार्टी आणि शासन यावर कठीण शब्दा त प्रहार केला. ते विचारतात की जातीव्यवस्थेला शिक्षणाच्या माध्यमातून समाप्त केल्या जाऊ शकतो का? त्यांच्या असे मत होते की शिक्षण कनिष्ठ वर्गातील जातींमध्ये विद्रोह निर्माण करण्याची ताकद निर्माण करते परंतु शिक्षण अशा वर्गाला दिल्या जातो जो वर्ग जातिव्यवस्था टिकवून ठेवण्याकरिता नेहमी प्रयत्न करतो. म्हणून जातिव्यवस्था नष्ट होत नाही. त्यामुळेच शिक्षण अशा कनिष्ठ वर्गाला दिले पाहिजे ज्यांचे हित जातीव्यवस्था तोडण्यामध्ये आहे त्याचबरोबर ज्यांनी लोकशाहीमध्ये स्वतंत्रता समता बंधुत्व आणि मैत्री या मूल्यांना महत्त्व दिल्या जातो त्याच बरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे असे मत होते की स्वतंत्रता आणि समता या दोन्ही गोष्टीचा आधार मैत्री यामध्ये आहे आणि हे शब्द भारतात बुद्धांनी निर्माण केलेले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर समतेच्या तत्त्वाला वैचारिक आणि व्यावहारिकदृष्ट्या महत्त्व देत असत. सर्व माणसे समान जन्माला येत नाहीत हे त्यांनी मान्य केले पण सर्व मानवांना असमान वागणूक द्यायला हवी का असा प्रश्न त्यांनी केला. कारण ते जन्माणे असमान आहेत. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्पष्ट केले की, वैयक्तिक प्रयत्नांला भिन्न किंवा असमान मानले जाऊ शकतात परंतु लोकांना त्यांची वैयक्तिक प्रतिभा आणि सामर्थ्य प्रदर्शित करण्याची संधी दिली पाहिजे. जेणेकरून ते स्वतःला प्रगतीशील बनवून समाजासाठी काहीतरी योगदान देऊ शकतील. लोकांना असमान वागणूक दिली तर त्यांची अवस्था अकल्पनीय होईल. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, माणसाचा जन्म, संपत्ती, शिक्षण, कुटुंब, नाव आणि व्यावसायिक संबंध याला आधार मानले तर, ते लोक मानवजातीत प्रथम येतील. त्यांनाच संधी मिळेल. मात्र गुणवत्तेवर नव्हे तर विशेष प्रतिष्ठेवर आधारित ती कृत्रिम निवड असेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने निवड ही नेहमीच गुणवत्तेच्या आधारावर व्हायला हवी. अन्यथा सामाजिक लोकशाही आणि मानवतावादावर घोर अन्याय होईल. जे लोक सुविधांशिवाय पुढे जाऊ शकत नाहीत, त्यांना आवश्यक सुविधा दिल्या पाहिजेत. असे काम न्याय आणि निष्पक्षतेने केले पाहिजे. तर ते छान होईल. बाबासाहेबांच्या मते, एखाद्या समाजाला आपल्या सदस्यांना प्रगतीशील, परिपूर्ण आणि जबाबदार बनवायचे असेल, तर ते समानतेचा आधार मानूनच शक्य होऊ शकते. सर्व लोक समान आहेत म्हणून नाही, परंतु त्यांना न्याय्यपणे विभागणे अशक्य आहे म्हणून. त्यांनी संधींच्या एकतेवर भर दिला नाही, तर प्राधान्यांच्या समानतेला न्याय्य स्थान दिले. लोकशाहीत समानता खूप महत्त्वाची आहे.

**विरोधी पक्ष :**

लोकशाहीसाठी विरोधी पक्ष किती महत्त्वाचा आहे हे सांगताना बाबासाहेब लिहितात की, लोकशाहीत सत्ताधारी वर्गाला मनमानी कारभार करता येत नाही म्हणून सत्ताधारी वर्गाला वटणीवर आणण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ते काम सर्वप्रथम जनतेने केले आहे, ज्यांच्यापर्यंत सत्ताधारी पक्ष आणि त्यांचे नेते त्यांच्या कामांचा तपशील दर पाच वर्षांनी पोहोचव तात आणि त्यावर हो किंवा नाही असा शिक्का मारतात. पण या पाच वर्षांत सरकारच्या निर्णयांवर तात्काळ अंकुश लावण्याचे काम विरोधक करतात. त्यामुळे विरोधी पक्षनेत्यालाही सरकारकडून मानधन देऊन सन्माननीय दर्जा दिला जातो.

**कायदा आणि प्रशासनासमोर समानता :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की कायद्यापुढे समानता महत्त्वाची आहे पण त्याहूनही महत्त्वाची म्हणजे प्रशासकीय कामामध्ये समानता असणे. ते उदाहरण देत सांगतात की समजा जिल्हा दंडाधिकारी म्हणाले की मी अशा व्यक्तीवर कारवाई करणार नाही कारण तो अशा पक्षाशी संबंधित आहे जो सत्त्येवर आहे. अमेरिकेच्या स्पॉइल्स सिस्टमची आठवण करून देणारी ही पक्षपाती परिस्थिती आहे. तिथे जो पक्ष सत्तेवर आला तो आपल्या पद्धतीने प्रशासन निवडायचा आणि पक्षपातीपणाने वागायचा. त्या तुलनेत ब्रिटीश नोकरशाहीची तटस्थ आणि स्थिर व्यवस्था चांगली मानली जाते. त्यामुळेच अमेरिकेने हळूहळू या व्यवस्थेत सुधारणा करून नोकरशाहीचा एक भाग कायमस्वरूपी केला. भारतातील नोकरशाहीचे कायम स्वरूप असूनही आज तिचे स्वरूप अमेरिकेच्या गुप्तहेर यंत्रणेच्या धर्तीवर चालले आहे आणि त्यामुळेच सर्व प्रकारचे पक्षपात आणि भेदभाव फोफावत आहे.

**घटनात्मक नैतिकता:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, संविधानाबाबत अनेक लोक खूप उत्साही आहेत पण मी नाही. कारण संविधान नीट लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टिकोनातून योग्य काम करत नसेल तर ते मी स्वतः नाकारेन आणि त्याचा मसुदा पुन्हा तयार करणाऱ्यांमध्ये मला त्यात सामील व्हायला आवडेल, असे ते म्हणाले. कारण संविधान हा फक्त एक सांगाडा आहे. त्याच्यातील रक्तआणि मांस घटनात्मक नैतिकतेतून आलेली आहे. त्यांनी याबाबतीत इंग्लंडच्या परंपरांचा संदर्भ देऊन अमेरिकेच्या

संदर्भात अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात की वॉशिंग्टन अमेरिकन लोकांसाठी देव होता. मात्र त्यांनी पुन्हा एकदा अध्यक्षपदाची निवडणूक लढवण्यास नकार दिला. जरी ते हवे तोपर्यंत अमेरिकेचे अध्यक्ष राहू शकत होते . लोकांनी याचे कारण विचारले असता ते म्हणाले, “माझ्या प्रिय देशबांधवांनो, आम्ही हे संविधान का बनवले हे तुम्ही विसरत आहात. आम्हाला वंशपरंपरागत राजेशाही नको म्हणून आम्ही हे संविधान बनवले. म्हणूनच आपण कोणताही वंशपरंपरागत शासक किंवा हुकूमशहा स्वीकारू शकत नाही. इंग्लंडची व्यवस्था नाकारून तुम्ही आम्हाला पुन्हा पुन्हा राष्ट्रपती बनवले तर घटनात्मक आदर्शांचे काय होईल.

**बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांवर दहशत माजवू नये :**

या सोबतच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुढे आणखी एका गोष्टीवर जोर दिला तो म्हणजे अल्पसंख्याकावर कोणत्याही प्रकारची बहुसंख्याकांची दहशत माजवू नये.त्यांच्यावर विविध प्रकारचे बंधन आणू नये. येथे त्यांनी भारतात चालू असलेल्या त्रुटींचा संदर्भ दिला आहे जेथे सभागृहातील कामकाज तहकूब करण्याचे प्रस्ताव वारंवार फेटाळले जातात. या संदर्भात त्यांनी मुंबई विधानसभेतील त्यांच्या अनुभवांचा संदर्भ दिला आहे जिथे सभापती मावळंकर यांची वागणूक लोकशाहीवादी नव्हती कारण ते मंत्र्याच्या दबावापुढे झुकले होते.

**नैतिक व्यवस्था:**

लोकशाहीसाठी समाजात नैतिक व्यवस्था असणे देखील आवश्यक आहे. जरी बहुतेक राजकीय शास्त्रज्ञ त्याचा उल्लेख करत नाहीत. पण हॅराल्ड लास्की हा अपवाद आहे. लास्की म्हणतात की लोकशाहीत नैतिक व्यवस्था गृहीत धरली जाते. म्हणजेच लोकशाहीत नैतिक व्यवस्था असली पाहिजे. नैतिक व्यवस्था नसेल तर लोकशाहीचे विघटन होईल, असे लास्की म्हणतात. जसे आपल्या देशात होत आहे (बाबासाहेबांनी १९५२ मध्येच लोकशाहीचे तुकडे झाल्याचे सांगितले होते).

**सार्वजनिक विवेक :-** बाबासाहेबांच्या दृष्टीने लोकशाहीची शेवटची आणि महत्त्वाची गरज म्हणजे सार्वजनिक विवेक. सार्वजनिक विवेक न्याय आणि अन्याय यातील फरक स्पष्ट करतो आणि लोकांमध्ये अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची भावना जागृत करतो आणि त्यांना न्याय करण्यास प्रेरित करतो. त्याला अन्यायाचा राग येतो आणि न्यायाने तो प्रसन्न होतो. या संदर्भात त्यांनी ज्यूंवर होणारे अत्याचार आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिकन समाजातील अनुसूचित वर्गावरील अत्याचारांचा उल्लेख केला आहे. इंग्लंडमधील ख्रिश्चनांनी ज्यूंवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली. तिथे फक्त महाराजांनी ज्यूना मदत केली.

**धर्मनिरपेक्ष लोकशाही**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते - "स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता शिकवणाऱ्या धर्मावर माझा विश्वास आहे आणि जर आपल्याला एकसंध आधुनिक भारत हवा असेल तर सर्व धर्मांच्या धर्मग्रंथांचे वर्चस्व संपुष्टात आले पाहिजे." धर्म हा व्यक्तीसाठी असतो, व्यक्ती धर्मासाठी नाही. प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार देण्याचा पुरस्कार करणाऱ्या डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही तत्त्वांच्या आधारे समाजातील दुर्बल घटक सत्तेच्या केंद्रस्थानी पोहोचेल, असा विचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी केला. आज बहुसंख्य लोक त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन लोकशाही मूल्यांवर आधारित खडतर जीवन संघर्ष करून हुकूमशाही शक्तींना नाकारून लोकशाहीची प्रक्रिया पुढे नेत आहेत. लोकशाही विचारांच्या दिशेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "माणूस नश्वर आहे आणि विचारही. प्रत्येक विचाराचा प्रचार-प्रसाराची गरज आहे, जसे रोपाला पाणी न दिल्यास सुकते आणि मरते." डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाहीच्या विकासातील अतुलनीय योगदान कधीही विसरता येणार नाही.

**स्वातंत्र्य**

मुक्त प्रवास जीवन आणि मालमत्ता स्वातंत्र्य आवश्यक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, सर्व लोकांना मोफत प्रवास आणि फिरण्याची सोय असावी. त्याच वेळी, त्यांनी खाजगी मालमत्तेच्या अधिकाराचे समर्थन केले. जेव्हा माणसाला खाजगी मालमत्ता ठेवण्याचा आणि वापरण्याचा अधिकार असेल तेव्हाच जीवन आणि आरोग्याची सुरक्षितता चांगल्या प्रकारे शक्य होईल. त्यांच्या मते, व्यक्तींच्या अधिकारांचा प्रभावी आणि कार्यक्षमतेने वापर केल्यास स्वातंत्र्याचा हक्क निश्चितच फायदेशीर ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजात राजकीय स्वातंत्र्य पक्षांची स्थापना, निवडणूक लढवणे, मताधिकार वापरणे, संघटित होणे, प्रसिद्धी आणि अभिव्यक्ती इत्यादींचे जोरदार समर्थन केले. आदर्श समाजासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी धार्मिक स्वातंत्र्य आवश्यक मानले होते, त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीला धर्माचे पालन व प्रचार करण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. धार्मिक संस्था

स्थापन करण्याचा अधिकारही सर्व नागरिकांना असला पाहिजे. धर्माच्या आधारावर कोणत्याही व्यक्ती किंवा समुदायामध्ये भेदभाव करू नये. राजकीयदृष्ट्या त्यांनी राज्याच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे समर्थन केले. यावरून हे स्पष्ट होते की डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती समाज आणि राष्ट्राच्या उत्कर्षासाठी, संघटना आणि सामर्थ्यासाठी सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यांच्या बाजूने होते. लोकशाहीत स्वातंत्र्य असणं खूप गरजेचं आहे

**प्रमुख सूचना**

1) लोकशाही प्रभावी होण्यासाठी पुढील सूचना देता येतील.2) लोकांमध्ये शिक्षणाचा स्तर वाढला पाहिजे 3) गरिबी हटवली पाहिजे 4) लोकांना मतदानासाठी प्रोत्साहित केले पाहिजे 5) हुशार शिक्षित लोकांना नेतृत्वाची भूमिका दिली पाहिजे 6) जातीयवाद नाहीसा झाला पाहिजे 7) निष्पक्ष आणि जबाबदारीची भूमिका माध्यमांनी पार पाडली पाहिजे 8) लोकशाहीत जबाबदार विरोधी पक्ष असणे अत्यंत गरजेचे आहे, त्याकरिता विधायक विरोधी पक्ष असला पाहिजे. 9) लोकशाहीत निवडून आलेले सदस्य म्हणजे लोकप्रतिनिधींच्या कामावर लक्ष ठेवणारी यंत्रणाही असावी.

**निष्कर्ष**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीवर अपार निष्ठा होती. जगात लोकशाहीपेक्षा चांगली शासन व्यवस्था असूच शकत नाही, असे त्यांचे मत होते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास लोकशाहीतच होऊ शकतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राजकारणात लोकशाहीचा जीवनपद्धती म्हणून स्वीकार करण्यावर भर दिला आहे.त्यांनी लोकशाहीच्या गरजांवर पूर्ण निष्ठेने आणि विश्वासाने भर दिला. जेणेकरून राजकारणाचा उपयोग न्याय, स्वातंत्र्य, समता आणि शोषण विरहित समाज निर्माण करण्यासाठीकरता येईल.

**संदर्भ**

1) डॉ. फडके, भालचंद्र - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लोकशाही विषयक चिंतन- प्रचार प्रकाशन नागपूर 1997

2) गायकवाड सुधाकर शी. - डॉ आंबेडकर यांची समाज रचनेची सांस्कृतिक मांडणी-, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ मधील लेख - प्रकाशन म.रा. हा. आणि सांस्कृतिक मंडळ मुंबई- 1

3) डॉ. तेलतुंबडे आनंद - सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण प्रकाशन लोकवाङ्मय गृह मुंबई 2010

4) प्रा.चिटणी म.भी., संपा. प्रा. निंबाळकर वामन- सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण- प्रबोधन प्रकाशन नागपूर 2006

# पंडित जवाहरलाल नेहरूंचे लोकशाही बद्दल विचार

**डॉ. संजय संदिपान चव्हाण**
सहाय्यक प्राध्यापक
लोकप्रशासन विभाग,
आझाद महाविद्यालय औसा,
जि. लातूर.

**शोधालेख का सार**

लोकशाही हा शासन संस्थेचा प्रकार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. भारतामध्ये देखील लोकशाही हा प्रकार प्राचीन कालखंडात अस्तित्वात आल्याची दिसून येते. दुसऱ्या महायुद्धानंतर बऱ्याशा राष्ट्रांनी लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. 20 व्या शतकामध्ये लोकशाही बद्दलचे विचार जोराने वाहू लागले. आधुनिक कालखंडामध्ये लोकशाहीचा उदय सर्वप्रथम ब्रिटनमध्ये झाला. ब्रिटन हे राष्ट्र लोकशाहीची जननी म्हणून ओळखले जाते.जगात अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला असला तरी बऱ्याच राष्ट्रात हुकूमशाही, राजेशाही, साम्यवादी राजवट असल्याचे दिसून येते. बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाही पुरस्कार केला आहे.

**पारिभाषिक शब्द**: जवाहरलाल नेहरू, लोकशाही, सामाजिक लोकशाही, भारत

**प्रस्तावना :-**

लोकशाही हा शासन संस्थेचा प्रकार प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. भारतामध्ये देखील लोकशाही हा प्रकार प्राचीन कालखंडात अस्तित्वात आल्याची दिसून येते. दुसऱ्या महायुद्धानंतर बऱ्याशा राष्ट्रांनी लोकशाहीचा पुरस्कार केला आहे. 20 व्या शतकामध्ये लोकशाही बद्दलचे विचार जोराने वाहू लागले. आधुनिक कालखंडामध्ये लोकशाहीचा उदय सर्वप्रथम ब्रिटनमध्ये झाला. ब्रिटन हे राष्ट्र लोकशाहीची जननी म्हणून ओळखले जाते. जगात अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला असला तरी बऱ्याच राष्ट्रात हुकूमशाही, राजेशाही, साम्यवादी राजवट असल्याचे दिसून येते. बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाही पुरस्कार केला आहे.

**लोकशाहीचा अर्थ :-**

लोकशाही शासन म्हणजे "ज्या राज्यात राज्यसत्ता ही लोकांच्या हाती असते आणि लोक ती राज्यसत्ता स्वतः किंवा आपल्या प्रतिनिधीद्वारे वापरतात यालाच लोकशाही असे म्हणतात." जनतेच्या इच्छा आकांक्षा हे अंतिम आणि सर्वोच्च मानून शासन हे लोकांना जबाबदार असतात आणि जनतेच्या इच्छेनुसार शासन संस्थेने कार्य करावे ही अपेक्षा असते. अब्राहम लिंकनने "लोकांचे, लोकांनी आणि लोकशाही लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही शासन होय." शासन हे लोकांचे व लोकांनी चालविलेले असले तरी ते लोकहित व लोककल्याणासाठी असावे म्हणून लिंकनने लोकशाही शासनाचे नैतिक अधिष्ठान स्पष्ट केले आहे. लोकशाहीला एक नैतिक अधिष्ठान प्राप्त झाल्यामुळे शासनाचा एक प्रकार एवढाच अर्थ अप्रेरित नाही तर लोकशाहीला फार व्यापक अर्थ प्राप्त झाल्यामुळे राजकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक व आर्थिक क्षेत्रात ही तिची अनन्य साधारण महत्त्व आहे. ग्रीक भाषेतील "Demos" आणि "Kratia" या दोन शब्दापासून "Democracy" हा शब्द बनला आहे "Demos" या शब्दाचा अर्थ जनता हा होय, आणि "Kratia" याचा अर्थ शक्ती असा होतो.

हेरोल्ड लास्की :- लोकशाहीच्या कल्पनेचा गाभा हाच की, "प्रत्येक माणसाने आपल्या स्वतःच्या जीवनाचे सार शोधावे आणि त्याची प्राप्ती करण्याच्या मार्गातील अडचणी दूर कराव्यात."

हेनरी मेन :- यांच्या मते लोकशाही म्हणजे निव्वळ शासनाचा एक प्रकार होय तसेच ज्या शासनाच्या प्रकारात लोकांच्या किंवा बहुजनांच्या हातात राजकीय निमंत्रण असते त्यांना लोकशाही म्हणतात.

महात्मा गांधी :-"लोकशाही लहानात लहान व मोठ्या मोठ्या व्यक्तीला पुढे येण्यास समान संधी प्राप्त व्हावी."

**पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवन परिचय :-**

पंडित जवाहरलाल नेहरू यांचे प्राथमिक शिक्षण घरीच झाले, आणि उच्च शिक्षण मात्र इंग्लंडमध्ये हॅरो आणि केंब्रिज विद्यापीठात झाले. इंग्लंड मध्ये असताना ते मिल ग्लॅडस्टन यांच्या उदारमतवादी विचारसरणीने तसेच बर्नार्ड शॉ आणि बार्ड्रान्ड रसेल या विचारवंतामुळे ते प्रभावीत झाले. पंडित जवाहरलाल नेहरू यांना राजकीय व सामाजिक विचारसरणी व चळवळीचा वारसा त्यांचे वडील पंडित मोतीलाल नेहरू यांच्याकडून मिळाला. 1920 नंतर म्हणजेच लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधीजींच्या

नेतृत्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद आणि सुभाष चंद्र बोस यांच्याप्रमाणेच नेहरूंचाही मोठा वाटा होता. महात्मा गांधींचे ते अनुयायी राहिले आहेत.

**पंडित जवाहरलाल नेहरू आणि लोकशाही :-**

पंडित जवाहरलाल नेहरूंचा लोकशाही सिद्धांत, आचरण पद्धती साधनसूचीतेवर गाढ विश्वास होता. हिंसा आणि अधिकारशाही याबद्दल त्यांच्या मनात तिरस्कार होता. स्वातंत्र्य संग्रामात लढताना त्यांनी केलेले अग्निदिव्य, त्यांनी सोसलेले हाल अपेष्टा, हक्क भंग आणि मानभंगाचे अनेक प्रसंग त्यांनी अनुभवलेले होते. त्यामुळे त्यांच्या मनात स्वातंत्र्याबद्दल ओढ होती. त्यांच्या प्रदेश दौऱ्यातून आणि भाषणातून लोकांशी उत्कृष्ट संवाद साधत आणि त्यांनी यातूनच लोकनेता ही आपली प्रतिमा जनतेच्या मनात त्यांनी रुजवली होती. त्यांचा सर्वसाधारण माणसावर दृढ विश्वास होता. त्यामुळे सर्वसामान्यांची प्रतिष्ठा हे त्यांच्या लोकशाही निष्ठेचे मुख्य सूत्र होते.

**विशाल दृष्टिकोन :-**

लोकशाही कडे पाहण्याचा पंडित जवाहरलाल नेहरूंचा दृष्टिकोन अतिशय व्यापक होता. लोकशाही म्हणजे ती एक जीवन पद्धती, विचार पद्धती आणि एक वैशिष्ट्यपूर्ण राजकीय, आर्थिक व्यवस्था आहे असे त्यांचे मत होते. त्यामुळे ते लोकांच्या जीवनाच्या आर्थिक व राजकीय क्षेत्रात संधीची समानता ते पाहत असत.

व्यक्तीस्वातंत्र्य हाच केंद्रबिंदू :- नेहरूजींच्या लोकशाही विचारात व्यक्ती व तिचे स्वातंत्र्य हा त्यांच्या वैचारिक केंद्रबिंदू होता.

मूलभूत हक्कांवर श्रद्धा :- व्यक्तीचे मूलभूत अधिकार या संकल्पनेवर त्यांची अपार श्रद्धा व निष्ठा होती.

आर्थिक व सामाजिक लोकशाहीची गरज :- पंडित जवाहरलाल नेहरूंना केवळ राजकीय जीवनातील लोकशाही अपेक्षित नव्हती. त्यांना त्याचबरोबर सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील लोकशाही हवी होती.

संधीची समानता :- समाजातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना संधीची समानता उपलब्ध करून देऊन समाजातून पिळवणुकीचे पूर्ण उच्चाटन होणे आवश्यक आहे असे त्यांना वाटत होते. ते वर्ग विहिरीत समाज रचनेचे ते चित्र रेखाटत असत.

अडचणींची जाणीव जाणीव :- आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मार्ग सोपा असून त्यात अनेक अडचणी आहेत हे ओळखून ते असे म्हणतात, "जे जे काही त्यांच्या मार्गात उभे राहत असेल ते ते दूर करावे लागेल शक्यतो सौम्य मार्गाचा अवलंब करावा" असे ते म्हणत असत.

व्यवहारवादी दृष्टिकोन :-पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या लोकशाहीकडे पाण्याचा दृष्टिकोन होता तो व्यवहारवादी आणि वास्तववादी होता. यांचे सातत्य दिसते. व्यक्ती स्वातंत्र्यवाद देशाची सुरक्षा ते नेहमीच सांगड घालत असत. राजकीय परिस्थिती, आंतरराष्ट्रीय तणाव, देशाचे सार्वभौमत्व आणि सुरक्षितता या दृष्टिकोनातून व्यक्तिस्वातंत्र्यावरील आणाव्या लागणाऱ्या विविध बंधनाचे समर्थन त्यांनी केलेले आहे. पक्षीय लोकशाहीचे पंडित जवाहरलाल नेहरू हे समर्थक होते.

**सारांश :-**

पंडित जवाहरलाल नेहरूंना संपूर्ण भारतात लोकशाही आणायची होती. जी सर्वांना स्वातंत्र्य मिळवून देईल. आर्थिक व सामाजिक समता, बंधुभाव निर्माण करेल. त्यांच्या मते, लोकशाही म्हणजे केवळ व्यक्ती स्वातंत्र्य, प्रतिनिधिक स्वरूपाची लोकशाही आणि आर्थिक व सामाजिक समानता नाही तर, समाजाच्या प्रश्नाकडे जाण्याचा स्वयंशिस्तीचा मार्ग होय. थोडक्यात म्हणजे लोकशाही म्हणजे निश्चित साधनसुचिता हा पंडित जवाहरलाल नेहरूंचा आग्रह होता.

**संदर्भसूची :-**

1. सुरेश द्वादशीवार, जवाहरलाल नेहरू, स्वातंत्र्यलढ्याचे नेते आणि देशाचे पंतप्रधान, साधना प्रकाशन, 431, शनिवार पेठ, पुणे 411030
2. डॉ. वि.मा. बाचल व र.घ. वराडकर, राज्यशास्त्र पेपर 1, ऐच्छिक- निराली प्रकाशन 1312, शिवाजीनगर, अच्युदय प्रगती, जे.एम. रोड, बँक ऑफ बडोदा लेन, पुणे 411005.
3. डॉ. अलका देशमुख, राजकीय सिद्धांत आणि राजकीय विचार, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4. प्रा.डॉ. व.गो. नांदेडकर, राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, 2011 अक्षरवेल, पुणे.

# भारतातील सामाजिक लोकशाही

**मयूर विठ्ठल निंबाळकर**
बी.ए भाग ३
मुधोजी महाविद्यलय, फलटण
**Email:** mayurnimbalkar590@gmail.com

**सारांश:**

भारतीय सामाजिक लोकशाही ही विविधीतीने नटलेली आहे.भारतात विविध जाती,धर्म,भाषा,पंथ त्यामुळे तिचा अभ्यास करणे खूप आवश्यक आहे.म्हणून मी हा शोध निबंध लिहित आहे .त्या साठी मी वर्णात्मक समीक्षा पद्धतीचा वापर करणार आहे .

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, सामाजिक लोकशाही, भारतीय राज्यघटना, मूलभूत हक्क

**प्रस्तावना:**

भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे.भारतामध्ये विविध जाती, धर्माचे लोक एकजुटीने राहतात भारतीय लोकशाही मुळे जातीभेद, मतभेद निर्माण होत नाही. हा उददेश समोर ठेऊन मी भारतातील सामाजिक लोकशाही' हा शोध निबंध लिहित आहे.

**उददेश:**

१) सामाजिक लोकशाही म्हणजे काय समजून घेणे.

2) सामाजिक लोकशाही असोरिल आव्हाने यांची पडताळणी करणे.

**गृहितके:**

1) भारताने सामाजिक लोकशाचा स्वीकार केला आहे.

2) भारताने सामाजिक लोकशाही तत्त्वांचा स्वीकार करून दैनंदिन जीवनामध्ये तिचा खऱ्या अर्थाने सामाजिक लोकशाही जीवन जगण्याचा प्रयत्न केला आहे.

3) भारतीय लोकशाधने संपत्तीच्या केंद्रीकरणाला विरोध केला आहे.

**विषय विवेचन:**

भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये 1976 साली 42 व्या घटना दुरुस्तीने समाजवादी व धर्म निरपेक्ष हे शब्द समाविष्ट करण्यात आले. याचाच अर्थ असा होतो कि भारताने समाजवादी लोकशाही चा स्वीकार केला आहे .भारतीय सामाजिक लोकशाहीचे प्रमुख महात्मा गांधी आहेत. महात्मा गांधींच्या अहिंसा, शांतता. सर्वधर्मसमभाव इ.बाबींचा स्वीकार हा संविधानामध्ये केला गेला आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा फुले यांच्यापासून अनेक विचारवंतांनी समाज परिवर्तनाच्या चळवळी चालविलेल्या आपण पाहतो.अगदी 20 व्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणाबरोबरच जातिव्यवस्थेच्या निर्मुलनाचा आदर्श समाजापुढे ठेवलेला आहे. या चळवळींमधून समानता आणि बंधुभाव हे आदर्श किती महत्त्वाचे आहेत याची जाणीव अनेकांना झालेली आहे. संविधान तयार करत असताना समाज परिवर्तनाच्या चळवळीचा हा वारसा एक महत्त्वाचा स्तोत्र ठरलेला आहे.भारत एक कल्याणकारी राज्य व्हावे, त्याच बरोबर समाजवाद व आर्थिक, राजकीय व सामाजिक न्यायावर आधारित समाज साकार व्हावा - सामाजिक विषमता नष्ट व्हावी, व्यक्ती व व्यक्तीसमूहना समान संधी त्याचबरोबरीने समान दर्जा प्राप्त व्हावा ही आपल्या भारतीय राज्यघटनेतीला मार्गदर्शक तत्वामागची भुमिका आहे . असमानता रोखणे , वंचित गटांचे अत्याचार दुर करणे आणि गरिबीचे निर्मूलन करणे तसेच बालसंगोपण शिक्षण, वृदयांची काळजी, आरोग्य सेवा, आणि कामगारांची भरपाई यासारख्या सर्व सुलभ अशासार्वजनिक सेवांना पाठिंबा देणे या धोरणाप्रती वचनबद्धतेचे वैशिष्ट्य आहे .''सामाजिक लोकशाही म्हणजे काय ? तर तो एक जीवनमार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आाणि बंधूता या तत्त्वांना मान्यता देतो.

स्वातंत्र्य, समता, बंधुता या तीन तत्त्वंचा अंगे म्हणून विचार करता येणार नाही. समतेपासून स्वातंत्र्य हे वेगळे करता येणार नाही. कारण समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही मुठभर लोकांचेच बहुतांश लोकांवर प्रभुत्व मिळवणे होय आणि बंधुते विना स्वातंत्र्य आणि समता स्वाभाविकरित्या अस्तित्त्वात राहणार नाहीत. " भारतीय संविधानाने कलम 19 नुसार अ) भाषण आणि

अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य ज्यात मुद्रण स्वातंत्र्याचा समावेश आहे. (ब) निःशस्त्र सभा संमेलनाचे स्वातंत्र्य (क) संघटनांचे स्वातंत्र्य (ड ) संचार स्वातंत्र्य (इ) देशात निवास करण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य (ई)कोणताही व्यवसाय, व्यापार व धंदा करण्याचे स्वातंत्र्य अशा सहा प्रकारची स्वातंत्र्ये भारतीय नागरिकांना बहाल केलेली आहेत.भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य व व्यवसाय, धंदा करण्याचे स्वातंत्र्य वगळता सर्वांना बाकीच्या स्वातंत्र्यांचा सर्वसाधारणपणे उपभोग हा घेता येतो, हे या 75 वर्षाच्या स्वातंत्र्योत्तर भारताच्या वाटचालीचे यश म्हणतायेईल, सोप्या भाषेत सांगायचे झाले तर, सामाजिक लोकशाही ही एक सरकारी व्यवस्था आहे. ज्याची मुल्ये समाजवादासारखीच आहेत, परंतू भांडवलशाही चौकटीत आहेत. लोकशाहीचे नाव दिलेली विचारसरणी जिये सरकारी कृतीमध्ये लोकांचे म्हणणे असते, ती स्पर्धात्मक अर्थव्यवस्वेता पैशाने समर्थन देते आणि ज्यांच्या नोकऱ्या जास्त पैसे देत नाहीत अशा लोकांना मदत करते.

**निष्कर्ष:**

१) “भारतातील सामाजिक लोकशाही” हा शोध निबंध लिहिताना मला असा निष्कर्ष पहायला मिळाला की – सामाजिक समाजपरिवर्तनासाठी लोकशाही आवश्यक आहे.

२) सामाजिक लोकशाही ही राजकीय लोकशाहीचा पाया आहे.

३) “सामजिक लोकशाही भक्कम मजबूत असल्याशिवाय राजकीय लोकशाहीचा पाया भक्कम होत नाही.”

**संदर्भ:**

1. भारतीय लोकसभा चर्चा ग्रंथ ,खंड ७ पान नं १५९ -६०
2. मार्क्सवाद :लोकशाही ;लोकशाही समाजवाद ; संसदीय लोकशाही देशपांडे .सु .र स्तोत्र : मराठी विश्व कोश
3. आठवले , सदशिव , लोकशाहीचा कारभार , पुणे १९६०
4. १२ वी राज्यशास्त्र स्टेट बोर्ड

# लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ बाबासाहेब आंबेडकर व पंडित नेहरू यांची लोकशाहीची संकल्पना

**प्रा.मदन पाडवी**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
मुधोजी महाविद्यलाय ,फलटण
mpadvi915@gmail.com\

**गोषवारा:**

भारत व एक संसदीश धर्म लोकशाही प्रजासत्ताक आहे.ज्यामध्ये भारताचे राष्ट्रपती हे राज्याचे प्रमुख साठी भारताचे प्रथम नागरिक आहेत व आताचे पंतप्रधान हे सरकारचे प्रमुख आहेत. हा शब्द जरी राज्यघटीत वापरला जात असला तरी सरकारच्या संघीयसंरचनेवर आधारित आहे.म्हणुनच आपल्या भारतातील राजकीय विचारवंताची लोकशाहीबद्दलची संकल्पना अतिशय अभुतपूर्व आाहे.

पारिभाषिक शब्द: राजकीय लोकशाही,सामाजिक लोकशाही,ग्रामाधिष्टित लोकशाही.

**प्रस्तावना:**

लोकशाही ही एक जीवन पद्धती आहे .तो राज्यव्यवस्थेचा प्रकार आहे. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व पंडित नेहरू यांची लोकशाहीची संकल्पना मला अत्यंत समर्पक वाटते. लोकशाहीची संकल्पना आता कुठेतरी लुप्त होत चालली आहे.म्हणुनच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरू यांची लोकशाहीची संकल्पना मला अत्यंत अमुल्य वाटते म्हणूनच हा उद्देश डोळयासमोर ठेवून मी हा शोध निबंध लिहित आहे.

**विषय विश्लेषण**:

डॉ. आंबेडकर यांच्या मते, लोकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात जिच्याद्वारा रक्तपाताशिवाय मूलगामी क्रांतिकारक बदल घडवून झागता येतात अशा शासनाची धडा किंवा पदधती म्हणजे लोकशाही होय. पंडित नेहरू यांच्या मते, लोकशाही ही केवळ शासनपद्धती नसून ती एक जीवनप्रणाली आहे.भारत एक लोकशाही प्रजासत्ताक आहे.ज्यामध्ये भारताचे राष्ट्रपती हे राज्याचे प्रमुख साठी भारताचे प्रथम नागरिक आहेत व आताचे पंतप्रधान हे सरकारचे प्रमुख आहेत. हा शब्द जरीराज्यघटनेत वापरला जात असला तरी सरकारच्या संघीयसंरचनेवर आधारित आहे.म्हणुनच आपल्या भारतातील राजकीय विचारवंताची लोकशाहीबद्दलची संकल्पना अतिशय अभुतपूर्व आाहे. भारताने लोकशाही व्यवस्थेचा पर्याय निवडला आहे,कारण त्याला सार्वभौम सत्ता प्रत्येक भाषा, समुदाय आणि धर्मासाठी समान दर्जा मिळण्यासाठी लोकांच्या हातात दयायची होती. आणि ही लोकशाही सत्यात उतरवण्यासाठी महात्मा गांधी,पंडित नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक यांच्यासारख्या राजकीय विचारवंतांचा मोलाचा वाटा आहे.तसे पहायला गेले तर, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते जवाहरलाल नेहरू के भारताचे पहिले पंतप्रधान बनले,परंतु स्वातंत्र्यलढ्याशी सर्वाधिक संबंधित असलेल नेते ,महात्मा गांधी यांनी कोणतेही पद स्वीकारले नाही.मध्ये स्वीकारलेल्या राज्यघटनेने भारताला लोकशाही देश बनवले आणि तेव्हापासून ही लोकशाही टिकून आहे.1950 स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय राजकीय विचारवंतांनी काही विचार मांडले होते,ते पुढिलप्रमाने आहेत.

१) महात्मा गांधींच्या मते, स्वतंत्र भारतात लोकांच्या संमतीने चालणारे सरकार असले पाहिजे. आपली संमती लोकांनी आास्तीत जास्त दर्शविली पाहिजे. जे राष्ट्राची परिश्रमपूर्वक सेवा करत असतील मतदारांच्या यादीत आपले नाव नोंदविले आहे.स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार असेल. बहुमताने आणि ज्यांनी अशा सर्व महात्मा गांधीजींचे सारे राजकारण अध्यात्माच्या अधिष्ठानावर आधारलेले होते. कारण त्यांची आत्मबलात अपार श्रद्धा होती.महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा, समता, न्याय या तत्त्वांचा अंगीकार करून राजकारण केले.त्यांच्या मते - प्रतिपक्षाचे डोके उडविण्यापेक्षा त्याच्या डोक्यातीला विचार बदली व त्याला आपल्या मताकडे वळविणे हे लोकशाहीचे मुख्य सूत्र होय.महात्मा गांधीजींचे सारे राजकारण अध्यात्माच्या अधिष्त्नावर आधारलेले होते. कारण त्यांची आत्मबलात अपार श्रद्धा होती.महात्मा गांधींनी सत्य, अहिंसा, समता, न्याय या तत्त्वांचा अंगीकार करून राजकारण केले

त्यांच्या मते - प्रतिपक्षाचे डोके उडविव्यापेक्षा त्याच्या डोक्यातील विचार बदली व त्याला आपल्या मताकडे वळविणे हे लोकशाहीचे मुख्य सूत्र होय.

2) पंडित नेहरू यांनीकेवळ संसदीय लोकशाहीचा पुरस्कार, राजकीय लोकशाही अभिप्रेत होती, असे नाही, तर राजकीय लोकशाहीतून परिपूर्ण लोकशाही निर्माण करावयाची होती. नेहरूंची लोकशाही व्यवस्थेवर नितांत श्रद्धा होती. |पंडित नेहरू यांनी लोकशाही ही केवळ एक शासनपदधती न मानता ती एक जीवनप्रणाली मानली होती. राजकीय पक्षाचा साधन म्हणून स्वीकार करून जनतेच्या पाठिंब्यावर व टीकेवर चालणारी लोकशाही पदधती त्यांना अभिप्रेत होती. खरच पं. जवाहरलाल नेहरू यांची लोकशाही बद्दलची संकल्पना दिशादर्शक वाटते.

3) डॉ बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, लोकशाहीचे पुरस्कर्ते,

सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे प्रमुख प्रणेते, दलितांचे कैवारी असा ज्यांचा उल्लेख होतो ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीबददल आपले विचार व्यक्त केलेले आहेत. भारतीय समाजातील पारंपारिक विषमता नष्ट करण्यासाठी तिच्यात करावयाचे आमुलाग्र बदल म्हणजे सामाजिक लोकशाहीची निर्मिती, असे डॉ. आंबेडकर म्हणतात. कारण या पारंपारिक समाज रचनेत बदल न करता, लोकशाहीची इमारत उभी केल्यास ती पाया नसलेल्या इमारतीप्रमाने कोसळून पडेल याबाबत कोणतेही शंका नाही,ते असे म्हणत.डॉ आंबेडकरांच्या मते "लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्तविरहित मार्गानी आणणारी शासन पद्धती म्हणजे लोकशाही होय.

**निष्कर्ष:-**

भारतातील राजकीय विचारवंतान जी लोकशाहीबद्दलची संकल्पना मांडली ती उल्लेखनीय आहे, हे आपल्याला आढळून आले. पंडित नेहरू, लोकमान्य टिळक, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी आपल्याला जाणवते की यांच्या विचारांतून भारतीय लोकशाहीला किती अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

**संदर्भ :-**

१) पा. वा. गाडगीळ : शांतिदूत नेहरू
२ ) संपादक, अजित वर्टी, दिवाकर गधे :
'लोकमान्य' (म. गांधीजींचा 125 वी जयंती
समारोह विशेषक, ऑक्टोबर, 1993)
३)संपादक मंडळ, महाराज्य राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1993 :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ
4) संपादक रावळी टी . ए.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, गवळी
प्रकाशन, कोल्हापूर (प्रथमावृत्ती, 1991)
5) संपादक, बी. सी. कांबळे
19 भारतीय घटनेची मीमांसा (प्रथमावृत्ती, 1966)

# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**प्रा.संतोष कोकरे**
मुधोजी महाविद्यालय ,फलटण
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
मो.७३८७७४२६१५

**सारांश:**

आज रोजी जगातील सर्वात मोठ्या लोकशाही ला पंचाहत्तर वर्ष पूर्ण झाली , त्या निम्मित शासनच्या प्रत्येक स्तरावर ‘आझादी का अमृत महोस्तव’ साजरा करण्यात आला त्याचे औचित्य साधून मी हा शोध निबंध लिहित आहे .त्या साठी मी वर्णात्मक समीक्षा पद्धतीचा वापर करणार आहे .

**पारिभाषिक शब्द:** धर्मनिरपेक्ष राज्य,सार्वभौमत्व

**प्रस्तावना :**

आज जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताकडे पहिले जात आहे ,पण गेली ७० दशकाहून जास्त काळ होऊन देखील जेवढी प्रगती व्हयाला पाहिजे होती तेवढी प्रगती भारतीय लोकशाहीची झाली नाही त्याच्या कारणाचा मागोसा आपण या शोध निंबंधात घेणार आहोत.

**उद्देश :**१.भारतीय लोकशाही पुढील आव्हाने शोधून काढणे व त्यावर उपाय शोधणे.
२ .लोकशाही समृद्ध करण्यसाठी संशोधन करणे .

**विषय विश्लेषण:**

सन १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय लोकशाही चा सूर्योदय झाला कॅबिनेट मिशनच्या योजनेनुसार संविधान सभेने २ वर्ष ११ महिने १८ दिवस काम करून भारताचे संविधान बनवले. घटना कर्त्यांनी भारतासाठी लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली ,२६ नोव्हेंबर १९४९ मसुदा समितीने संविधान सभा अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांच्या कडे सपुर्द केली .२६ जानेवारी १९५० रोजी राज्य घटनेचा अंमल संपूर्ण देशाला लागू करण्यात आला. १७ एप्रिल १९५२ रोजी पहिल्या लोकसभेची स्थपना झाली व देशाचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांची निवड करण्यात आली. सुरुवात तर चांगली झाली पण लगेचच २० ऑक्टोबर १९६२ भारत चीन युद्ध झाले त्यामुळे देशातील शांतात भंग पावली . त्या वेळी देशात प्रथम कलम ३५२ नुसार प्रथम आणीबाणी लावण्यात आली. भारत पाक युद्ध १९७१ झाले त्यावेळी आणीबाणी लावण्यात आली तर १९७५ मध्ये अंतर्गत बंडाळी मुळे आणीबाणी लावण्यात आली हे लोकशाही च्या दृष्टीने खूप शरमेची बाब होती त्यामुळे आपण या ठिकाणी असे म्हणू शकतो शेजारील . अति महत्त्वकांशी व साम्राज्यवादी राष्ट्रे भारतीय लोकशाही ला आव्हाने आहेत हे वरील उदाहरणावरून हे गृहीतक सिद्ध होते .

१९८४ मध्ये देशात शीख दंगल इंदिरा गांधीजी यांच्या हत्ये नंतर देशात मोठी दंगल उसळी त्या मध्ये एकट्या दिल्लीत २००० हजार पेक्षा जास्त लोक मरण पावले. कारण होते शीख समुदायची स्वातंत्र्य खलिस्तान देशाची मागणी अमृतसर मंदिर प्रकरण या मध्ये खलिस्तानी नेत्यावर इंदिरा गांधीनी गोळ्या घालनया चे आदेश देण्यात आले. त्यामुळे देशच्या लोकशाही प्रतिमेला धक्का पोहचला .या वरून असे दिसून येते प्रादेशिकता व धर्मवाद हे लोकशाही पुढील सर्वात मोठे आव्हान आहे .यावरून हे गृहीतक सिद्ध होते. २५ जुन १९७५ ते २१ मार्च १९७७ देशात तब्बल २१ महिने राष्ट्रपती राजवट लावण्यात आली. भारतीय राज्यघटना कलम ३५२ नुसार तत्कालीन राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी २४ जानेवारी १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाल्याची घोषणा केली. त्यामुळ देशातील प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली . खूप मोठ्या प्रमणात पुरुष नसबंदी करण्यात आली . वर्तमान पत्रवर बंदी घालण्यात आली. नागरिकांच्या मुलभूत अधिकरावर बंधन घालण्यात आली . जयप्रकाश नारयण यांनी भारतीय

लोकशाही इतिहासातील सगळयात काळा काळ म्हंटले. या ठिकाणी अति राजकीय महत्त्कांक्षा व सत्तापिपासू नेते हे भारतीय लोकशाही पुढील सर्वात आव्हान आहे. वरील गृहीतक वरून सिद्ध होते.

भारतीय लोकशाही ला लागलेली सर्वात मोठी कीड म्हणजे धर्मनिरपेक्षता होय.गेली सत्तर वर्ष धर्मनिरपेक्षता आणि धर्मनिरपेक्षता वादी राज्य या संकल्पना भारतीय राजकरणात परवलीचा शब्द मानल्या गेल्या आहेत. कारण भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात फक्त धर्मनिरपेक्षता हा शब्द आढळून येतो. संपूर्ण राज्यघटनेत कोठेही धर्मनिरपेक्षता या बद्दल कोणतीच व्याख्या अथवा कलम आढळून येत नाही त्यामुळ संपूर्ण गोंधळ उडलेला दिसतो. त्यामुळ धर्मनिरपेक्षता हे भारतीय लोकशाही पुढील सर्वात मोठे आव्हान आहे हे या ठिकाणी सिध्द होते.ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलने अहवाल दिलेल्या 2022 च्या भ्रष्टाचार धारणा निर्देशांकानुसार, भारत 180 देशांपैकी 85 क्रमांक लागतो हि भारतीय लोकशाही साठी खूप चिंतेची बाब आहे.खासगी तसेच सरकारी क्षेत्रात नोकरी व प्रत्येक शासकीय काम करण्यासठी लाच द्व्यावी लागते. हे प्रमाण वाढत आहे .त्यामुळ भारतीय लोकशाही वरील लोकांचा विश्वास उडत चाला आहे. हे देखील भारतीय लोकशाही समोरील सगळयात मोठे आव्हान आहे.

संसदीय लोकशाही देखील भारतीय लोकशाही पुढील सर्वात मोठे आव्हान आहे, कारण संसदीय लोकशाहीत राष्टपती नामधारी प्रमुख असतो तर , पंतप्रधान वास्तववादी प्रमुख असतो. , पंतप्रधान व मंत्री मंडळ लोकसभेला जबाबदार असतात. पण जेव्हा संपूर्ण देशात आणीबाणी लागू होते तेव्हा खरी सत्ता पंतप्रधान व मंत्री मंडळ वापरात असते. त्यावेळी त्यांच्या वर कोणचे जास्त बंधन आणू शकत नाही. त्यावेळी जर सत्ताधारी पक्षाला पूर्ण बहुमत असेल तर परस्थिती अजून बिकट असते , ता पूर्वी अशी वेळी भारताने १९७५ वेळी पहिली आहे. तसेच भारतात बहु पक्ष पद्धती असल्याने कधी कधी बहुमत मिळत नाही. त्यावेळी अस्थिर सरकार स्थापन होते . लोकविकास खुंटला जातो. अशी सरकार अपल्जीवी असतात. त्यामुळे देशाला सारखे मध्यवधी निवडणुकीला सामोरे जावे लागते. यावरून संसदीय लोकशाही भारतासाठी अयोग्य आहे .हे ठिकाणी सिद्ध होते.

मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यामधील विसंगती हे खूप मोठे आव्हान भारतीय लोकशाही समोर आहे . कलम १४ कायदा पुढे सर्व समान असे सांगते.तर कलम १६ नोकरी मध्ये समानता चे संधी सांगते. पण लगेच आरक्षण देऊन त्याचा भंग केला जातो. नोकरी मध्ये आरक्षित जागा ठेऊन समता तत्व भंग केले जाते.तर कलम ४४ मध्ये सांगण्यात आले समान नागरी कायदा पण तो आज पर्यंत लागू केला नाही. मुलभूत हक्कना न्यायालीन संरक्षण आहे. तर मार्गदर्शक तत्वाना न्यायालीन संरक्षण नाकारले आहे . या वरून मुलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे हे देखील भारतीय लोकशाही समोरील आव्हान हे सिद्ध होते.

**निष्कर्ष:**

वरील गृह्तिक का वरून असा निष्कर्ष निघतो की , भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हान आहेत त्याचा परिणाम लोकशाही वर होत आहे. खूप मोठी आव्हान असले तरी भारतीय संसदेने व भारतीय लोकशाही ला लाभलेल्या नेत्यांनी त्या आव्हानच निराकरण करण्याचा खूप चांगला प्रयत्न केला आहे.

**संदर्भ:**


1. भारतीय संविधान डी.डी. बसू
2. भारतीय राज्यघटना – एम .लक्ष्मीकांत
3. भारतीय लोकशाही शोध आणि आव्हाने – अरुण सारथी
4. इंडियन हेराल्ड दै. २६ जुन १९७५
5. THE HINDUSTAN TIMES 26/6/1975
6. THE HINDUSTAN TIMES 22/3/1977
7. Quint Hindi youtube Channel Documentry on Punjab Shikh Dangal 31 Oct 2017
8. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल अहवाल ,२०२२
9. ABP हिंदी न्यूज वाहिनी ,२० नोव्हेंबर,२०१८ पंजाब दंगल शीख वृतांकन

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

**डॉ. सीमा भास्कर सैंदाणे.**
उपशिक्षिका,
लाडकुबाई विद्या मंदिर,
भडगाव. जि. जळगाव.
मोबा.- 9405672028.

**सारांश:**
लोकशाही हा सर्व शासन प्रकारात सर्वात श्रेष्ठ प्रकार मानला जातो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने भांडवलशाही किंवा साम्यवाद यापैकी एकाची निवड न करता संविधानाद्वारे लोकशाहीचा स्वीकार केला. भारत तर जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश आहे; कारण यात सर्व सत्ता अप्रत्यक्षरीत्या जनतेच्याच हातात आहे. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ हे भारतीय लोकशाहीचे तीन मुख्य आधारस्तंभ आहेत, तर पत्रकारिता किंवा प्रसारमाध्यमे यांकडे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून पाहिले जाते. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. याद्वारे भारतातील लोकशाहीचे अस्तित्व आजपर्यंत टिकवून ठेवण्यात आले आहे. पण स्वातंत्र्यप्राप्तीपासून तर आजच्या या अमृत महोत्सवी वर्षापर्यंत भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. या आव्हानांचा स्वीकार करून त्यावर मात करून भारतीय लोकशाहीला अधिक बळकट करणे हे फार मोठे आव्हान भारतीय शासनापुढे आहे.

**पारिभाषिक शब्द :** भ्रष्टाचार ,बेरोजगारी,जागरूक मतदार इ.

**प्रस्तावना :-**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असली तरी भारतीय लोकशाही व्यवस्थेत होणारा बदल फार धोकादायक आहे. खोटेपणा, लबाडी, व्यक्तिद्वेष, समूहद्वेष, पक्षद्वेष, अविचारी पक्षनिष्ठा, ईडीचा विरोधी पक्षांसाठीचा वापर हे भारतीय लोकशाहीला मारक ठरत आहेत. लोकशाहीचा विकास तिच्या अंगभूत सक्रियेतून होणे अपेक्षित असताना आज लोकशाहीला कृत्रिम ठरविण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. लोकशाही हा भारतीय राज्यघटनेचा केंद्रबिंदू आहे. यात मतदानरुपी सत्तेची चाबी ही सर्वसामान्य नागरिकांच्या हातात दिलेली आहे. भारतात लोकशाही पद्धतीने आज निवडणुका होत असल्या तरी पैशाच्या जोरावर मतदारांना भुलवून देशाचे प्रतिनिधी आपली सत्ता शाबूत ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. यातूनच निवडणुकांवर झालेल्या बेसुमार खर्चाची भरपाई करण्यासाठी भ्रष्टाचाराचा भस्मासुर वाढून देशाच्या अर्थव्यवस्थेला सुरुंग लागत आहे. त्यामुळे भारतीय लोकशाही आतून पोखरली जात आहे व तिचा नुसता सांगाडाच शिल्लक राहील की काय असे भितीदायक वातावरण आज सारे सुज्ञ भारतीय अनुभवत आहेत. तेव्हा शेजारील पाकिस्तानी राष्ट्रासारखी परिस्थिती आपल्या देशात निर्माण होऊन लोकशाहीचे उच्चाटन होण्याआधी साऱ्या भारतीयांनी जागरूक होऊन भारतीय लोकशाही समोरील आव्हाने स्वीकारून त्यावर मात करणे नितांत गरजेचे आहे.

**विषय विश्लेषण:**

**भारतीय लोकशाहीचा अर्थ व स्वरूप :-**

लोकशाही या शब्दाची उत्पत्ती 'डेमोक्रसी' या ग्रीक शब्दापासून झाली आहे. Democracy या शब्दाची फोड demo + cracy अशी केली असून demos म्हणजे सामान्य लोक व cracy म्हणजे सत्ता; अर्थात सर्वसामान्यांच्या हाती सत्ता असा त्याचा मतितार्थ आहे. भारतीय संविधानानेही वयाची 18 वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक भारतीय नागरिकास जात, वंश, लिंग, धर्म, प्रतिष्ठा यांवर आधारित कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सरसकट प्रौढ मतदानाचा अधिकार दिला आहे. याद्वारे अब्राहम लिंकन यांची, 'लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालवलेली शासनपद्धती म्हणजे लोकशाही', ही लोकशाहीची व्याख्या सार्थ ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रचंड संघर्षानंतर 1947 साली महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल आदी नेत्यांनी देशासमोरील आव्हानांना न जुमानता लोकशाही शासनपद्धती स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

26 जानेवारी 1950 रोजी संविधानाचा स्वीकार करून भारत देश सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि प्रजासत्ताक बनला व खऱ्या अर्थाने सत्ता ही सर्वसामान्य लोकांच्या हातात देण्यात आली.

**भारतीय लोकशाहीचे वास्तव स्वरूप :-**

आज भारताने अमृत महोत्सवी वर्षात मोठ्या दिमाखाने पदार्पण केले आहे. सुलतानशाही, बादशाही, राजेशाही यांच्यानंतर ब्रिटिश साम्राज्यांच्या जुलमी राजवटीचा मुकाबला करून फार मोठ्या संघर्षातून व बलिदानातून स्वतंत्र अशा लोकशाही राष्ट्राची भारताने निर्मिती केली आहे. भारतीय राज्यघटनेतील एक महत्त्वाचे मूल्य म्हणून आपण सारे लोकशाहीकडे पाहतो. जगात सर्वात मोठ्या लोकसंख्येची लोकशाही म्हणून भारताचा लौकिक आहे; मात्र गेल्या काही वर्षांपासून या लोकशाहीला ग्रहण लागून तिच्यात हुकूमशाहीवृत्ती वाढताना दिसत आहे. स्वीडनमधील व्हरायटी ऑफ डेमोक्रेसी (व्ही डेम) या संस्थेच्या 11 मार्च 2021 रोजी प्रसिद्ध झालेल्या अहवालातही भारतात गेल्या काही वर्षांपासून लोकशाहीचा संकोच होत आहे, हे उदाहरणांसहित अधोरेखित केले आहे. भारतातील सर्वच निवडणुका लोकशाही पद्धतीने होत असल्या तरी या पद्धतीने मिळवलेली सत्ता व्यक्तीकेंद्रित होत आहे, असे या अहवालात नमूद केले आहे.

वाढती बेरोजगारी, प्रचंड महागाई, शेतकरी आंदोलने, पेट्रोल व गॅसची दरवाढ, अतार्किक निर्णयांचे गंभीर परिणाम यामुळे सर्वसामान्य भारतीयांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. याशिवाय माध्यम स्वातंत्र्य, स्वायत्त संस्थांचे स्वातंत्र्य आणि नागरी समाज यांच्यावरही पद्धतशीरपणे आघात केले जात आहेत. एक प्रकारे त्यांच्यावर सेन्सॉरशीपच लादली जात आहे. संविधानाने दिलेले राजकीय हक्क व नागरी स्वातंत्र्य यांचा संकोच वेगाने होत आहे. नागरी स्वातंत्र्याच्या इंडेक्समध्ये भारताचे स्थान घसरत जाऊन 162 देशांच्या यादीत भारताचे स्थान 111 व्या क्रमांकावर आलेले आहे. 2014 साली लोकशाही निर्देशांकात भारताचे स्थान 27 वे होते, ते 2019 मध्ये 51 वे झाले; तर 2020 मध्ये त्यात आणखी घसरण होऊन भारत 53 व्या स्थानावर पोहोचला आहे. या साऱ्या अहवालांवरून भारतीय लोकशाहीच्या वास्तव स्वरूपाची कल्पना येते. यावरून भारतात लोकशाहीचा संकोच होतो आहे, हेच दिसून येते. आणि त्यातूनच आज भारतीय लोकशाहीपुढे आव्हानांचा डोंगर निर्माण झाला आहे.

**भारतीय लोकशाही पुढील आव्हाने :-**

लोकहितापेक्षा सत्ता मिळविणे हाच भारतीय लोकशाहीचा आज प्रमुख उद्देश झाला आहे. लोकप्रतिनिधींसाठी सत्ता हेच एकमेव साध्य झाल्याने कोणत्याही मार्गाने निवडणुकीत विजय प्राप्त करून सत्ता काबीज करण्यासाठी कायदे, नियम, नीतिमत्ता पायंदळी तुडवली जात आहे. त्यामुळे भ्रष्ट आणि गुंड लोकांना राजकारणात महत्त्वाची पदे मिळू लागली आहेत. बरेच लोकप्रतिनिधी निरनिराळ्या गुन्ह्यांत अडकलेले दिसतात. त्यामानाने त्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्यच आहे. अशा भ्रष्ट लोकांच्या हाती देशाची सत्ता असल्याने भारतीय लोकशाहीसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहे.

1) जागरूक मतदानाचा अभाव :-

लोकशाहीचे मुळ हे सर्वसामान्य मतदार आहेत. त्यांच्या हातात खरी सत्ता आहे. मतदानरूपी शस्त्राद्वारे कोणाच्या हाती सत्ता सोपवावी हे सारे अधिकार मतदारांच्या हाती लोकशाहीने सुपूर्द केले आहेत. भारतीय लोकशाही आणि नागरी समाजाची संपूर्ण भिस्तच लोकजागृतीवर आहे. परंतु वास्तवात भारतात जागृत जनमताचा अभाव आहे. शिक्षणाचा अभाव, शिक्षणाप्रतीची उदासीनता व दारिद्र्यामुळे शिक्षणाकडे न झुकणाऱ्या लोकांचे प्रमाण भारतात अधिक आहे. त्यामुळे आज भारतातील मतदार जागरूक आहेत की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मतदान करताना भारतीय मतदार कोणता उमेदवार योग्य आहे? कोण आपल्या प्रभागाचा योग्य विकास करू शकेल? याऐवजी कोणता उमेदवार आपणास मोठे पाकीट देईल? हे पाहताना दिसत आहे. जो जास्त पैसे देईल तोच उमेदवार सध्याच्या परिस्थितीत निवडत आहे. भारत हा एकमेव असा देश असेल की ज्यात अडाणी व्यक्ती मंत्री वा मुख्यमंत्री बनला असेल. सहाजिकच अशा पद्धतीने निवडून आलेल्या उमेदवारांकडून विकासाची अपेक्षा करणे व्यर्थ असते. त्यामुळे प्रामाणिक लोकसेवा करणाऱ्यांपेक्षा अनैतिक मार्गाने पैसा कमावणाऱ्या प्रतिनिधींच्या हाती देशाची

सूत्रे गेल्याने लोकशाही म्हणजे गुंडांची शाही होईल की काय? अशी भीती निर्माण झाली आहे. देशाच्या कारभाराशी आपल्याला काय करायचे आहे? आपण आपले बघावे, या आजच्या भारतीय मतदारांच्या भावनेमुळे आज मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करून योग्य प्रतिनिधींच्या हाती सत्ता देणे हे भारतीय लोकशाहीपुढील मोठे आव्हान आहे.

2) भ्रष्टाचार निर्मूलन :-

मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल करून निवडून येणारे प्रतिनिधी झालेल्या निवडणूक खर्चाची भरपाई करण्यासाठी भ्रष्टाचाराचा मार्ग अनुसरत आहे. कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचारामुळे भारतीय लोकशाहीला सुरुंग लागला आहे. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनल संस्थेच्या मते जगातील सुमारे पावणेदोनशे देशांच्या यादीत भ्रष्टाचारात भारताचे स्थान 94 व्या क्रमांकावर आहे. त्यामुळे भारतात काही मूठभर लोकांच्या हाती पैसा केंद्रित झाल्याने, 'आहे रे आणि नाही रे' या दोन गटातील दरी वाढतच जात आहे. ही गरीब श्रीमंतांमधील विषमता आर्थिक असंतोषाचे कारण ठरत आहे. या आर्थिक असंतोषातून या दोन्ही गटांमध्ये वारंवार संघर्ष होताना दिसत आहे. त्यामुळे भारतीय लोकशाहीला फार मोठा धोका निर्माण झाला आहे. कोट्यावधींची कर्जे बुडवून भ्रष्टाचार करणारे व्यापारी देश सोडून परदेशात आरामदायी जीवन जगत आहेत तर अगदी काही हजारोंचे कर्ज फेडू न शकल्याने देशाचा आधारस्तंभ असणारा शेतकरी मात्र हतबल होऊन आत्महत्या करत आहे. भ्रष्टाचाराच्या मोठमोठ्या आकड्यांमुळे देशाचा विकासदर खाली येऊन महागाई, बेरोजगारी या समस्यांमुळे सर्वसामान्य भारतीय मात्र बेजार झालेला आहे. तेव्हा भारतातील या भ्रष्टाचाराच्या भस्मासुराचा नाश करण्याचे फार मोठे आव्हान भारतीय लोकशाहीपुढे आहे.

3) बेरोजगारी :-

भारतीय लोकशाहीसमोर तरुणवर्गातील वाढत्या बेरोजगारीचे फार मोठे आव्हान आहे. कोविड-19 नंतर तर या आव्हानाने उग्र स्वरूप धारण केले आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (CMIE) या संस्थेने जारी केलेल्या अहवालानुसार डिसेंबर 2021 पर्यंत भारतात बेरोजगारांची संख्या ही 5.3 कोटी इतकी होती. उल्लेखनीय बाब म्हणजे यात महिलांचा आकडा 1.7 कोटी इतका मोठा आहे. या अहवालानुसार जवळपास या 5.3 कोटी बेरोजगारांपैकी 3.5 कोटी कामाच्या शोधात आहे. यामध्ये 20 लाख महिला आहेत. याच अहवालात पुढे नमूद केले आहे की, भारतात केवळ 38 टक्के लोकांनाच रोजगार मिळत आहे आणि जर भारतीय अर्थव्यवस्था प्रबळ बनवायची असेल तर कमीत कमी 60 टक्के लोकसंख्येला रोजगार उपलब्ध करून देणे नितांत गरजेचे आहे. या वाढत्या बेरोजगारीमुळे देशाचे भवितव्य असणाऱ्या तरुण वर्गाचे मानसिक खच्चीकरण होऊन ते व्यसनाधीन होताना दिसत आहे. तेव्हा या समस्येचा मुळापासून नायनाट करण्याचे फार मोठे आव्हान भारतीय लोकशाहीपुढे आहे. या आव्हानाला स्वीकारून सध्याच्या स्थिर ज्ञान देणाऱ्या या शिक्षणपद्धतीऐवजी रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या व्यावसायिक शिक्षणपद्धतीवर भर देणे गरजेचे आहे. उद्योग-व्यवसायांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी त्या अनुषंगाने शासकीय धोरणे आखली पाहिजेत. याशिवाय लोकसंख्येवर नियंत्रण हा सुद्धा बेरोजगारी कमी करण्यावर प्रभावी उपाय असल्याने त्यादृष्टीने धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी तरतुदी केल्या पाहिजेत.

4) धार्मिकता आणि दहशतवाद :-

भारत हा विविध धर्मांच्या संस्कृतीने नटलेला देश आहे. 2011 च्या जनगणनेनुसार भारतातील विविध धर्मीयांचे प्रमाण खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| हिंदू | 79.8% |
| मुस्लीम | 14.2% |
| ख्रिश्चन | 2.3% |
| बौद्ध | 0.7% |
| जैन | 0.4% |
| यहुदी | 0.6% |

1976 सालच्या 42 व्या घटनादुरुस्तीच्या कायद्यानुसार भारत एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र झाले आहे. पण तरीसुद्धा हिंदू-मुस्लिमांतील संघर्ष भारतात नित्याचाच आहे. वारंवार होणाऱ्या या संघर्षांमुळे दहशतवादाचे मोठे आव्हान भारतीय लोकशाहीपुढे आहे. दहशतवादातून उद्भवलेला गोध्रा हत्याकांड, मुंबई साखळी बॉम्ब स्फोट, 26/11 चा हल्ला, काश्मिरी पंडितांचे हत्याकांड यांचे विध्वंसक परिणाम भारतीयांनी अनुभवले आहे. भारतासारख्या जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या या देशात अंतर्गत राजकारणात लोकप्रियता मिळविण्याच्या किंवा कुरघोडीचा भाग म्हणून धार्मिक भावनांचे दहशतवादाच्या माध्यमातून राजकारण केले जाते. त्यामुळे धार्मिक संघर्षातून देशात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाल्याने आंतरराष्ट्रीय संबंधांवरही याचे अनिष्ट परिणाम होताना दिसत आहे. तेव्हा खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्षता भारतीयांच्या मनात रुजवून दहशतवादाला आळा घालण्यासाठी भारतीय लोकशाहीने त्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत.

5) वाढती महागाई :-

सर्वाधिक महागाई असलेल्या 12 देशांच्या यादीत आता भारताचा समावेश झाला आहे. देशातील किरकोळ महागाईने उच्चांक गाठल्याने सर्वसामान्य भारतीय नागरिक हवालदिल झाला आहे. जून 2022 मध्ये भारतातील किरकोळ महागाई 7.1 नोंदली गेली. या वाढत्या महागाईमुळे भारताचा जीडीपी मात्र सतत खालावताना दिसत आहे. दुष्काळ, महापूर यांसारख्या नैसर्गिक संकटामुळे शेती उत्पादनांचेचे प्रमाण कमी झाल्याने मागणी जास्त आणि पुरवठा कमी अशी स्थिती उद्भवते; आणि त्याचा परिणाम म्हणून अन्नपदार्थांच्या किमतीत अवाजवी वाढ होते. यांशिवाय युद्ध, हरताळ संप, भ्रष्टाचार यामुळेही जीवनावश्यक वस्तूंच्या किमती भारतामध्ये गगनाला पोहचल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य भारतीयांना उदरनिर्वाह करणेदेखील कठीण झाले आहे. त्यातून जागतिक मंदीचे संकटही भारतीय लोकशाहीसमोर आ वासून उभे राहिल्याने या वाढत्या महागाईला आटोक्यात आणून देशाचा आर्थिक विकास साधण्याचे फार मोठे आव्हान भारतीय लोकशाहीपुढे निर्माण झाले आहे. या आव्हानांचा सामना करण्यासाठी भारतीय लोकशाहीला नियोजनबद्ध पावले टाकणे गरजेचे आहे.

याव्यतिरिक्त साक्षरतेचा अभाव, पारंपरिक शिक्षण पद्धती, देशनिष्ठेचा अभाव, सत्तेचे राजकारण, स्वार्थासाठी स्वायत्त संस्थांचा गैरवापर, स्पष्ट बहुमताअभावी निर्माण झालेली आघाडी शासने यांसारखी अनेक आव्हाने भारतीय लोकशाही पुढे आहेत. भारतीय लोकशाहीने स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, समाजवाद, संघराज्यीय एकात्मता यांसारख्या मूलभूत तत्त्वांचा स्विकार केलेला असला तरी या मूल्यांना आता तडा गेल्याने भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वालाच आव्हान निर्माण झाले आहे. लोकशाहीत अंतिम सत्ता लोकांची गृहीत असली तरी आज भारतात लोकांना सत्तेऐवजी फक्त गृहीत धरले जात असल्याने भारतीय लोकशाहीची परवड सुरु आहे. हे असेच चालले तर पाकिस्तान या राष्ट्रासारखी भारतातूनही लोकशाहीचा लोप होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

**भारतीय लोकशाहीपुढील आव्हानवरील उपाय :-**

भारतीय लोकशाही ही फार मोठी संस्था असल्याने तिचा अधिकाधिक दुरुपयोग करण्यात आला आहे. आणि त्यामुळेच भारतीय लोकशाहीपुढे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. या आव्हानांचा सामना करून त्यावर वेळीच योग्य उपाययोजना केली नाही तर भारतीय लोकशाहीचे उच्चाटन व्हायला फारसा वेळ लागणार नाही. तेव्हा भारतीय लोकशाहीच्या संवर्धनसाठी खालील उपाय योजना करणे गरजेचे आहे :-

1) मतदारांमध्ये जागरूकता निर्माण करून योग्य प्रतिनिधी कसे निवडून येतील? यादृष्टीने मतदारांचे प्रबोधन झाले पाहिजे.

2) कायद्याचा गैरवापर करून मोठमोठे भ्रष्टाचार करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून त्यांना सक्त शिक्षा करून नवीन भ्रष्टाचार करण्याच्या वृत्तीला आळा घातला पाहिजे.

3) रोजगाराभिमुख शिक्षण व्यवस्था आणून जास्तीत जास्त रोजगाराच्या उपलब्धतेसाठी देश विकासाचे प्रकल्प राबविले पाहिजे.

4) सर्वधर्मसमभावाची भावना लोकांमध्ये रुजवून इतर धर्मांचा द्वेष थांबवून दहशतवादाला आळा घालण्यासाठी तळागाळातील लोकांसाठी विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन केले पाहिजे.

5) योग्य आर्थिक नियोजनाने वाढती महागाई नियंत्रणात आणून हतबल झालेल्या सर्वसामान्यांना दिलासा दिला पाहिजे.

6) सत्ताधाऱ्यांनी केवळ सत्तेच्या राजकारणाचा विचार न करता देश विकासाच्या दृष्टीने प्रयत्नशील राहिले पाहिजे.

7) देशातील सर्वच घटकांना केवळ कागदोपत्री नव्हे तर खऱ्या अर्थाने साक्षर बनवून देशाच्या विकासात त्यांचे योगदान वाढविण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत.

8) स्वायत्त संस्थांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवून केवळ व्यक्तीद्वेषातून विरोधी पक्षासाठीच्या त्यांच्या वापरावर निर्बंध ठेवले पाहिजे.

9) प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा न आणता त्यांच्याद्वारा योग्य व अचूक माहिती लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

10) सर्वात महत्वाचे म्हणजे जनतेचा लोकशाहीवरील विश्वास टिकून ठेवण्यासाठी शासनाने सदैव प्रयत्नशील राहिले पाहिजे.

**निष्कर्ष :-**

आजच्या 21 व्या शतकात भारतीय लोकशाहीला मानवी विकासाचे ध्येय प्राप्त करण्यासाठी अनेक आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. देशाचा शाश्वत व सर्वांगीण विकास साधण्यासाठी भारतीय लोकशाहीने सकारात्मक दृष्टिकोनातून स्वतःला नवीन दिशा दिली पाहिजे. नव्या युगाच्या नव्या गरजा पूर्ण करून स्वतःची प्रस्तुतता टिकविण्यासाठी, तसेच भारतात गुणात्मक, सहभागी व पारदर्शक शासन व्यवस्थेद्वारा जागरूक लोकमताच्या स्थापनेसाठी लोकशाहीने योग्य मार्गांचा अवलंब केल्यास येणाऱ्या काळात भारताची जगाच्या पटलावर महासत्ताक म्हणून ओळख निर्माण होईल यात शंकाच नाही.

**संदर्भ:**

1)कांबळे, डॉ. बाळ & डॉ. एकनाथ खांदवे. भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने. डायमंड पब्लिकेशन्स.

2)कुलकर्णी, प्रसाद माधव. "आव्हानांच्या विळख्यातील लोकशाही." 21 मार्च 2022. वायर मराठी. <https://marathi.thewire.in>.

3)"लोकशाहीचा दुरुपयोग." 17 मार्च 2021. प्रेस मीडिया लाईव्ह. <https://www.pressmedialive.com>.

4)डहाळके, डॉ. भीमाशंकर मधुसूदन. "ग्रामीण विकास व भारतीय लोकशाही समोरील आव्हाने." Navjyot Peer Reviewed, Referred & Indexed Journal 11.2 : 18-23.

5)पाटील, शामिभा. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर : भारतीय राज्यघटना आणि आजचे समाज वास्तव." 20 एप्रिल 2020. प्रबुद्ध भारत.

6)बाम्बले, रोहिदास. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने. 10 एप्रिल 2017. <http://bambalerohidas.blogspot.com>.

"भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने मराठी निबंध." 12 फेब्रुवारी 2022. Essay मराठी. <https://www.essaymarathi.com>.

7)मेश्राम, इतिहास. "भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने." 7 ऑगस्ट 2020. Max Maharashtra. <https://www.maxmaharashtra.com>.

8)लक्षटे, प्रा. डॉ. रत्नाकर बाबुराव. "नागरी समाज आणि लोकशाही समोरील आव्हाने." Current Global Reviewer 1.8 (2016): 61-70.

9)"लोकशाहीसमोरील आव्हाने." जनशक्ती 25 जानेवारी 2019. संपादकीय. "राज्यघटना आणि पुढील आव्हाने." महाराष्ट्र टाईम्स 24 जानेवारी 2021.

# Dr. Babasaheb Ambedkar's Political Thoughts

**Shubhangi Nivrutti Lavate**
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,
Ramanandnagar (Burli)
Mobile No. : 8329562139
E mail: lavatesulbha@gmail.com

**Abstract:**

Dr. Ambedkar says, Democratic Government is the best government in all. Democracy is the only way by which we can change the society. Freedom of the person is protected in this government. There are various types of democracy. But Dr. Ambedkar appreciates parliamentary democracy. Why Dr. Ambedkar appreciates parliamentary Democracy?

**Key Words:** social democracy, social justice, one vote-one value.

**Introduction:**

Dr. Babasaheb Ambedkar is called as a 'Great Indian of the Millionaire.' He is the great thinker, philosopher and practitioner in his age. He is the modern Manu. He dedicated his life for the upliftment of the down trodden society of the India. He is the sculptor of Indian constitution. This great personality born on 14th April 1891. He completed his education of the initial stage in Dapoli and High school in Satara. He passed his Matric at the age of 16. With the help of the scholarship given by Maharaja Sayajirao Gaikwad, he completed his education in Elphinston College. Then he went to America for the further education. He achieved his higher education in Columbia University. He completed his M. A. under the guidance of Seligman, one of the world famous Economist. 'The Evolution and the Growth Casts in India' was the subject of his research in M.A. Further he achieved Ph.D. in "National Dividend of India – A Historical and Analytical Study'. After one year, he completed his M.Sc. in 'London School of Economics and Politics.' When he was doing service in Badoda Sansthan, he was ill-treated by Savarna people. Because he was born in untouchable society. In 1917, he worked as a professor in Sidney Ham College. With the help of Rajarshi Chatrapati Shahu Maharaj's financial help, he went London in 1920. There he completed his M.Sc. degree in Ecnomics. He published his research under the title 'The Evolution of Provincial Finance in British India. In 1923, he achieved D. Sc. Degree. The title of his research was 'The Problem of Rupees.'

In 1930, he represented him as a leader of down trodden society. In 1942,-1946, he was the member of labors in Executive Board of Governor General. In 1946, He elected as a member of constitutional Committee. He elected as a member of constitutional committee in 1946. He was awarded D. Lit in Columbia University. Dr. Ambedkar was a versatile personality. He had a mastery over numerous aspects. One of the most important aspect of his personality was his mastery over economics. He was the world famous economist. He had written so many thesis on the base of economics. Some of the famous among them are- 1. Ancient Indian Commerce 2. National Dividend of India – A Historical and Analytical Study 3. The Evolution of Provincial Finance in British India. 4. Small Holdings and in India and their Remedies and 4. The Problem of Rupees.

Subject explanation

**Dr. Ambeedkar's Political Thoughts:**

**Democracy:**

Dr. Ambedkar says, Democratic Government is the best government in all. Democracy is the only way by which we can change the society. Freedom of the person is protected in this government. There are various types of democracy. But Dr. Ambedkar appreciates parliamentary democracy. Why Dr. Ambedkar appreciates parliamentary Democracy? The following are the reasons of it:
People's views, opinions are regarded in this parliamentary democracy. Elections are taken within specific period and conducted without corruption.

Parliamentary democracy promotes to develop the innate qualities of an individual. Individual/person is an undividable constituent of the political life. It makes wide an individual's attitude.

The government is elected by the in this parliamentary Democracy. All the representatives are elected by the people. The change is happened in a peaceful manner.

It is a huge platform to express people's complaints. All the complaints are solved with the help of this government.

The political parties can organize the people's views/opinions only in this parliamentary democratic government system. The opposite party can criticize the established government. If any wrong decision against the people's welfare is taken by the established government then the opposite party can oppose it and can take a proper decision against it.

Though Ambedkar advocated parliamentary democracy, he was doubtful about this government system to be followed in India. He says, if we accept government system in India, there will be bad effects of it. The majority of British parliament is political and the base of Indian majority will be cast. Further he expands this point that, Minority societies will be neglected. Because there will not be any restriction on majority to make enter to minorities in political system. The effect will be that minorities will be exploited by the majorities. Further this parliamentary democratic system will lag behind and transform into imperialism. So Dr. Ambedkar puts forth some conditions before us:

There should be representatives of minority community in cabinet.

Those representatives should be trustworthy who are elected by minority community, If they are not trustworthy, they should not be participate in this government.
Executive board should be free from parliament in which most of the representatives are elected from majority community.

**Obstacles in the success of Indian Parliamentary Democratic System:**

According to Dr. Ambedkar, Indian society is strictly adhered to blind-belief, traditions and customs. The society which is adhered to the old concepts cannot accept the the new democratic principles. Another obstacle is 'Varna system' and non-cooperation of casts in India. The voting is done on the basis of cast. So all the politics is stirred by the castism. Illiteracy is another obstacle in ii. Most of the people in India are illiterate. In Dr ambedkar's view, parliamentary democracy is totally a new concept for Indians. It is British concept. They are totally unknown about it. The British people had taken the great efforts to make the parliamentary democracy success. But Indians are not ready for that.
In the opinion of Dr. Ambedkar, economic asymmetry is the main obstacle. Some people are economically strong and innumerable people are living poor condition. Tolerance is very important for democracy. Acceptance of the convenient thoughts and suppression of the contrast thoughts is the dangerous situation for the democracy. If this situation last for a long time, then it will be transformed into autocracy. The attitude of worshipping God is the tradition of Indian society. It is deep rooted in India. It is not occurred in another nation. In the field for religion, worship of God leads to the ultimate truth and in the field of

politics, it leads to downfall of an individual. He further states, an individual may be so great, we should not render their freedom to anyone.

**Which factors can make the democracy successful in India?**

According to Dr. Ambedkar, The established government should give the first preference to national development. It should not be self-centred. There should be an innate feeling of love for the nation among the people. The feeling of national integration should grow among the different people of different society. Minority communities should treat properly. They would not feel that they are not safe. There should not be injustice for minority communities. They should feel that they are enjoying freedom and their rights are safe. The role of opposite party in democracy is very important. The opposite party can criticize the established government. If any wrong decision against the people's welfare is taken by the established government then the opposite party can oppose it and can take a proper decision against it.The fundamental rights should be manifest in the constitution. But there should be the right to make the change in the right as per the circumstances. The fundamental rights should be protected. The responsibility of the protection the fundamental rights goes to the court. The character of the citizens should be good. If they are good in character then should not be any place to immoral, corruption and illegal money.

**Conclusion:**

Though there are so many obstacles in the way of democracy, Dr. Ambedkar says, Democratic Government is the best government in all. Democracy is the only way by which we can change the society. Freedom of the person is protected in this government.

**Referances:**

1. Dr. Shrikant V. Deshpande: Bharatiya Rajkiya Vicharwant. 1st edition. Vishal Mudran. Nagpur, 1991.
2. Dr. Shantaram Bhongale: Adhunik Bharatiya Vicharvant.
3. K. D. Boralkar: Bharatiya Rajkiya Vicharwant.

# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**शाहिद मुस्ताक मुल्ला**
संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
**Mail ID- shahidmullasm93@gmail.com**
फोन नंबर-**9665686971**

**सारांश:**

लोकशाही म्हणजे लोकांचे सत्ता लोकांनी चालवलेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सत्ता होय. लोकशाही (democracy) ही संज्ञा लोक (demos)आणि सत्ता (krates) या दोन ग्रीक शब्दांपासून निर्माण झालेले आहे .प्राचीन ग्रीक नगर राज्यात लोकांचे प्रत्यक्ष सत्ता होती लोक राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेत असत आधुनिक काळात लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधी राज्यकारभार चालवतात म्हणून तिला अप्रत्यक्ष किंवा प्रतिनिधीक लोकशाही असे म्हणतात लोकांची इच्छा आकांक्षा विचार यानुसार लोकशाही शासन पद्धतीचा राज्यकारभार चालतो लोकांचे संमती consent of the people आणि लोकांचे टीका criticism of the people या प्रक्रियेतून लोकशाहीचा कारभार चालतो लोकांचा बहुमताचा निर्णय मान्य करणारी आणि लोकांना समान संधी देणारे शासन पद्धती म्हणजे लोकशाही होय. परंतु आपल्या येथे फक्त पुस्तकी लोकशाही तेही निवडणुकीपुरती असल्याचे दिसते .वास्तवतेत लोकशाही कुठेच नाही असे माझे स्पष्ट मत आहे. असो चार खांबांवर लोकशाही समर्थपणे उभी आहे असे मोठ्या अभिमानाने सांगितले जाते आता त्यात समाज माध्यमांची भर पडली आहे .आता सध्याचे तर चित्र असे आहे की हे सर्व काम एकाच व्यक्तीच्या किंवा व्यक्तीसमूहाच्या नियंत्रणात आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

पारिभाषिक शब्द: लोकशाही, धर्मांधता, बेरोजगारी, निरक्षरता.

**प्रस्तावना :-**

लोकशाही डेमोक्रेसी म्हणजे लोकांचे सत्ता लोकांनी चालवलेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सत्ता होय. लोकशाही (democracy) ही संज्ञा लोक (demos)आणि सत्ता (krates) या दोन ग्रीक शब्दांपासून निर्माण झालेले आहे .प्राचीन ग्रीक नगर राज्यात लोकांचे प्रत्यक्ष सत्ता होती लोक राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेत असत आधुनिक काळात लोकांनी निवडून दिलेला प्रतिनिधी राज्यकारभार चालवतात म्हणून तिला अप्रत्यक्ष किंवा प्रतिनिधीक लोकशाही असे म्हणतात लोकांची इच्छा आकांक्षा विचार यानुसार लोकशाही शासन पद्धतीचा राज्यकारभार चालतो लोकांचे संमती consent of the people आणि लोकांचे टीका criticism of the people या प्रक्रियेतून लोकशाहीचा कारभार चालतो लोकांचा बहुमताचा निर्णय मान्य करणारी आणि लोकांना समान संधी देणारे शासन पद्धती म्हणजे लोकशाही होय. परंतु आपल्या येथे फक्त पुस्तकी लोकशाही तेही निवडणुकीपुरती असल्याचे दिसते .वास्तवतेत लोकशाही कुठेच नाही असे माझे स्पष्ट मत आहे. असो चार खांबांवर लोकशाही समर्थपणे उभी आहे असे मोठ्या अभिमानाने सांगितले जाते आता त्यात समाज माध्यमांची भर पडली आहे .आता सध्याचे तर चित्र असे आहे की हे सर्व काम एकाच व्यक्तीच्या किंवा व्यक्तीसमूहाच्या नियंत्रणात आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. लोकशाहीत विरोधी मतांचा विचार झाला पाहिजे त्यावर चर्चा झाली पाहिजे सर्व बाजूंनी विचार करून जनतेच्या हिताचे निर्णय झाले पाहिजेत हे अपेक्षित आहे तसे होत असते का? होत आहे का? सत्ता एकमेव साध्य मुळात आपले व्यवस्थित तसेही करून निवडून येणे आणि सत्ता काबीज करणे हे सर्व राजकीय नेत्यांचे पक्षांचे ध्येय झाल्यापासून नीतिमत्ता साधन सूचिता कायदे नियम आणि संकेत याकडे कोणी लक्ष देईल असे झाले आहे एकदा खुर्चीवर बसलो की सर्व काही ठीक करता येईल ही मानसिकता वाढीस लागले. मग सरकारी यंत्रणा आणि न्यायालयाचा ही वापर प्रतिस्पर्ध्यांच्या विरोध करण्यास सुरुवात झाली .बेस्ट आणि गुंड लोकांना राजकारणात महत्त्वाचे पद मिळू लागले

त्यांच्याकडून घटनाबाह्य वर्तन झाले तरी त्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्यच असल्याचे दिसू लागले एखादा लालूप्रसाद भ्रष्टाचार चा आरोप करून दोषी ठरून भ्रष्टाचार प्रकरणी शिक्षा झाली पण त्यामुळे भ्रष्टाचार थांबल्याचे किंवा कमी झाल्याचे काही कुठे दिसत नाही. उलट नव्या ग्रुपचा शोधून काढून नेते कार्यकर्ते अधिकारी आपली घरे भरताना दिसतात ज्यांचे दोन वेळ जेवणाची पंचायत होते ते मागडे विदेशी गाड्यांमधून फिरतात हा आपल्या तथाकथित लोकशाहीचा विजय आहे.प्रा.सिली यांनी म्हटल्याप्रमाणे (Democracy is a government in which everyone has a share.)लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की ज्यामध्ये संपूर्ण किंवा बहुतांशी लोक आपण निवडून दिलेला प्रतिनिधी मार्फत शासकीय सत्ता उपभोगतात एकंदरीत लोकशाही सज्ञ विषयी असा निष्कर्ष काढता येईल की लोकशाही म्हणजे अशी शासन व्यवस्था की ज्यामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुता तत्त्वांचा आधार घेऊन व्यक्ती स्वातंत्र्य आणि व्यक्ती विकास यांना महत्त्व दिलेले असते लोकशाहीचा कारभार लोकांचा संमतीतून आणि टीकेतून चालतो लोकशाही एक राजकीय जीवन प्रणाली आहे की जेथे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासातून समाजाचा विकास अशी लोकशाहीची धारणा असते स्वातंत्र्य समता बंधुत्व सहकार्य लोक मताचा पाठिंबा सामाजिक न्याय कल्याणकारी राज्य ही तत्वे गृहीत धरून लोकशाहीचा कारभार चालवला जातो.आज भारतीय लोकशाही एका स्थित्यंतरातून मार्गक्रमण करीत असताना तिच्या यशापयशाचा व तिच्यासमोरील आव्हानांचा साक्षेपाने धांडोळा घेऊन तिच्या निकोपतेसाठी उपाययोजना सुचविणे राज्यशास्त्राच्या अभ्यासकांचे प्रथम कर्तव्य आहे.

**उद्दिष्टे-**

1. भारतीय लोकशाहीचे स्वरूप समजून घेणे

2. लोकशाहीची संकल्पना समजून घेणे

3. लोकशाही प्रक्रियेतील स्थित्यंतरांचा आढावा घेणे

4. लोकशाही पुढील आव्हानांचा आढावा घेणे.

**लोकशाही समोरील आव्हाने.(challenges before democracy)**

आज जगातील दोन तृतीयांश देशात लोकशाही शासन पद्धती स्वीकारलेली आहे.बहुतेक सर्व लोकशाही राष्ट्रात प्रादेशिक प्रातिनिधित्वाची पद्धती स्वीकारलेली आहे संसदीय अध्यक्ष नियंत्रित मार्गदर्शक अशा विविध स्वरूपाच्या लोकशाही पद्धतीने निर्माण झालेल्या आहेत तिसऱ्या जगातील बहुसंख्य राष्ट्रात लोकशाहीत शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे परंतु स्वातंत्र्य, समता, न्याय अशा लोकशाही तत्वांची तेथे उपेक्षा झालेली आहे. जागतिक आर्थिक व अनेक स्पर्धा भांडवलशाही देशाचे आर्थिक मक्तेदारी वाढता दहशतवाद आक्रमक राष्ट्रवाद सामाजिक अस्थिरता सांस्कृतिक असमतोल अशा विविध समस्यांनी तिसऱ्या जगातील लोकशाही राष्ट्रीय ग्रासलेले आहेत त्यामुळे लोकशाही शासन पद्धती अस्थिर व यशस्वी झालेली आहे प्रादेशिक असमतोल प्रादेशिकता धर्माधर्मा जातीयता ,जमातवाद,भाषावाद ,अज्ञान,दारिद्र्य ,बेकरी,अशी आव्हाने लोकशाही समोर उभी राहिलेली आहेत.

**1) सामाजिक असमानता.(social inequality)**

अ) धर्मांधता:- लोकशाही समाज व्यवस्थेत सामाजिक विषमता आढळते धर्म, वंश ,पंत ,व्यवसाय ,दर्जा इत्यादी कारणांनी समाजात विषमता निर्माण होत असते. इंग्लंड भारत अमेरिका लोकशाही देशात धर्मांधता ,वर्णभेद, जातीयतात जमातवाद अशा सामाजिक विषमता आढळून येतात.उदाहरणार्थ अमेरिकेत काळा गोरा वर्णभेद इंग्लंडमध्ये प्रोटेस्टंट आणि कॅथॉलिक असे ख्रिस्ती पंत पाकिस्तान अफगाणिस्तान या देशात शिया आणि सुन्नी हे इस्लामी पंत आढळतात .भारतात विविध धर्माचे लोक राहतात भारतात हिंदू, मुस्लिम,

ख्रिश्चन ,फारसी, जैन ,बौद्धिक इत्यादी धर्माचे लोक राहतात .भारतात हिंदू मुस्लिम संघर्षातून देशाची फाळणी झाली.धर्मांधतेमुळे लोक आपल्या धर्माचे संरक्षण, पालन करतात आणि अन्य धर्मांना विरोध करतात.

ब) जातीय राजकारण.

जातीयतेमुळे सामाजिक विषमता निर्माण होते. उदाहरणार्थ भारतीय लोकशाहीला जातीयतेची कीड लागलेली आहे भारतीय समाज वर्णव्यवस्थेवर आधारलेला आहे .भारतात ब्राह्मण ,क्षत्रिय ,वैश्य व शूद्र या चार वर्णात 3000 जाती उपजाती आहे जन्मावरून जात ठरते आणि आपली जात श्रेष्ठ असा अहवानगंड प्रत्येक जातीच्या ठिकाणी असल्यामुळे जाती-जातीतसंघर्ष निर्माण होतात.भारतीय लोकशाहीवर आणि राजकारणावर जातियतेचा विशेष प्रभाव पडलेला दिसतो. भारतातील राजकीय पक्ष राजकारणात जातीयतेचा फायदा उठवताना दिसतात विशिष्ट जाती महत्त्व या विषयी संगणमत करून राजकीय पक्ष त्यांचा पाठिंबा मिळवतात .भारतातील विविध जातींचा विविध घटक राज्यात प्रभाव पुढीलप्रमाणे आढळतो

1 कर्नाटक- लिंगायत ओक्कलिगा

2 आंध्र प्रदेश - रेड्डी ,कम्मा

3 महाराष्ट्र - ब्राह्मण ,मराठा ,लिंगायत मागासवर्गीय जाती जातीयतेचे राजकारण राष्ट्रीय एकात्मता आणि लोकशाही यांना घातक ठरू लागले आहे. जातीयतेच्या राजकारणामुळे जातीय दंगली होतात आणि त्यातून राजकीय हिंसाचार घडतात .भारतीय समाजात जाती उपजातींचे अनेक तटबंद असल्यामुळे लोकशाही स्थिर व यशस्वी होऊ शकलेली नाही.

**2) प्रादेशिकता ( regionalism)**

लोकशाही राष्ट्रात प्रादेशिकअसमतोल बिघडल्यामुळे लोकशाही धोक्यात येते वेळप्रसंगी प्रादेशिक निष्ठा आणि प्रांता अभिमान वाढल्यामुळे राष्ट्राचे विघटन होऊ शकते .उदाहरणार्थ प्रादेशिकतेमुळे पाकिस्तानचे विघटन होऊन बांगलादेशची निर्मिती झाली .भारतात प्रादेशिकता हा लोकशाही मार्गातील मोठा अडसर मानला जातो कारण भारतीय जनतेत प्रांत अभिमान आणि प्रादेशिक अस्मिता अधिक प्रमाणात आढळते .भाषावार प्रांत रचनेमुळे क्रांतीयता फुटीरवृत्ती संपुष्टात येईल असे वाटत होते. परंतु प्रत्यक्षात सीमावादासारखे नवे प्रश्न निर्माण झाले .महाराष्ट्र गुजरात, पंजाब, हरियाणाअशी सीमावादातून ही नवी स्वतंत्र चार राज्य उदयाला आली.प्रादेशिक निष्ठेमुळेच आसाम मध्ये मेघालय ,नागालँड, मणिपूर ,मिझोराम ,त्रिपुरा अरुणाचल प्रदेश ही स्वतंत्र नवी राज्य निर्माण झाले.प्रादेशिक असमतोलातून उत्तरांचल ,झारखंड आणि छत्तीसगड ही राज्य उदयाला आलेली आहेत.

**3) आर्थिक असमानता आणि दारिद्र्य (economical inequality and poverty)**

आर्थिक असमानता ,आर्थिक विषमता ,दारिद्र्य, बेकारी उपासमार इत्यादी आर्थिक असमानता कारणांमुळे लोकशाही शासन पद्धती अस्थिर व यशस्वी होत नाही ज्या देशात आर्थिक समानता प्रस्थापित होते तो देशच खऱ्या अर्थाने लोकशाही प्रधान बनतो भारतीय लोकशाही यशस्वी करावयाचे असेल तर प्रथम आपणाला राजकीय लोकशाहीबरोबरच देशात आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित करावी लागेल असा इशारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता. दारिद्र्य घटकाचा लोकशाही व्यवस्थेवर विदारक परिणाम होतो .कारण दारिद्र्यातूनच बेकारी, उपासमार ,आणि मानाचा कनिष्ठ दर्जा असे प्रश्न निर्माण होतात भारत विकसनशील राष्ट्र आहे अप्रगत मागासलेल्या दारिद्र्य राष्ट्रात लोकशाहीचे चित्र विदारक भयंकर आणि निराशा जनक आहे .सामान्य गरीब जनता निवडणूक लढवू शकत नाही निवडणूक लढवणे हा श्रीमंताचा खेळ बनलेला आहे निवडणुकीत केवळ मतदान करणे एवढेच गरीब मतदारांच्या हातात राहिलेले आहे.

**4) भाषेची समस्या (language problem)**

लोकशाही शासन पद्धती स्थिर व यशस्वी होण्यासाठी लोकशाहीचा कारभार एकाच भाषेतून चालवणे अधिक श्रेयसकर ठरते राष्ट्रहिताच्या आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने राष्ट्रात एकच भाषा बोलणारे लोक असतील तर अधिक फायद्याचे ठरते भारतात 22 प्रमुख भाषा आहेत भारतीय लोकशाहीचा कारभार हिंदी आणि इंग्रजी भाषेतून चालतो.हिंदी ही राष्ट्रभाषा मानली असली तरी दक्षिणेकडील राज्य हिंदी भाषेचा प्रखर विरोध करतात तमिळनाडू कर्नाटक ,आंध्र प्रदेश ,पश्चिम बंगाल ,केरळ या राज्यांनी हिंदी राष्ट्रभाषेला कडाडून विरोध केलेला आहे.हिंदी भाषेचा सातत्याने राज्य प्रशासनात वापर आणि प्रादेशिक भाषांचा स्वीकार यामुळे भविष्यकाळात इंग्रजी भाषेचे प्रभुत्व हळूहळू कमी होईल आणि तिची जागा हिंदी भाषा घेईल असे वाटते परंतु यासाठी दक्षिणेकडील राज्यांनी सहकार्य देण्याची खरी गरज आहे.

**5) निरक्षरता (illiteracy)**

2011 च्या जनगणनेनुसार भारतातील साक्षरता आणि निरक्षरता यांचे प्रमाण अनुक्रमे 74.80% आणि 25.60% असे आहे भारताचे एकूण लोकसंख्येत निरक्षर लोकांची संख्या सुमारे 28.7 कोटी आहे साक्षरतेच्या बाबतीत केरळ राज्याचा प्रथम क्रमांक लागतो.तेथे 93.91% लोक साक्षर आहेत. लोकशाही यशस्वी करण्यासाठी राज्यात सुरक्षित सुजाण व सुसंस्कृत नागरिक असावे लागतात. निरक्षरतेमुळे समाजात सुशिक्षित आशिक्षित अशी विषमता निर्माण होते. अशिक्षित नागरिकांना व्यक्ती स्वातंत्र्य, शासन पद्धती, मतदान पद्धती या गोष्टी समजत नसल्यामुळे ही विषमतेची दरी आणखीन रुंदावत जाते तेव्हा निरक्षरता निर्मूलन होणे नितांत गरजेचे ठरते निरक्षरता निर्मूलनाचे समाज शिक्षणाचे मार्ग

1) प्राथमिक शिक्षण भारतीय राज्यघटनेचा कलम 21 अनुसार 14 वर्षापर्यंत सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देण्यासाठी 86 वी घटना दुरुस्ती करण्यात आली.

2) अनौपचारिक शिक्षण हा कार्यक्रम १९७९-८० सुरू केला 6 ते 14 वयोगटातील जी मुले योग्य वेळी शाळेत जाऊ शकले नाहीत किंवा ज्यांनीमध्ये शाळा सोडली आहे अशा मुलांच्या शिक्षणाची सोय करण्यात आली.

**6) बेकारी:-(unemployment)**

भारतातील लोकशाही पुढील एक ज्वलंत प्रश्न म्हणजे बेकारी निवारण होय .बेकारीची उग्र समस्या देशासमोर उभी आहे. भारतातील सुशिक्षित आणि अशिक्षित बेकारी असे दोन प्रकार आढळतात बेकारी म्हणजे रोजगार व्यवसाय मिळवण्याची इच्छा असताना तो रोजगार किंवा व्यवसाय न मिळणे होय. काम करण्याची क्षमता असणाऱ्या व्यक्तीला रोजगार न मिळणे यास बेकारी असे म्हणतात आधुनिक यंत्रे मशनरी, उपकरणे, संगणक, इंटरनेट सारखे माध्यमे दळणवळणाचे आधुनिक साधने यामुळे कामकरी हस्तकला मजूर यांच्यावर बेकारीची वेळ आलेली आहे.

**7) झुंडशाहीला प्रोत्साहन:-**

लोकशाहीला काळीमा फासणारा आणखीन एक प्रकार म्हणजे राम मंदिर ,बाबरी मस्जिद प्रकरण या तथागतिक अस्मितेच्या नावाखाली बाबरी मस्जिद पाडण्यात आल्या आणि झुंडशाहीचा विजय झाला बाबरी पाडण्याच्या प्रकरणात आरोपी असणारे काही लोक मंत्री झालेत खासदार झाले तर एक तर राज्यपाल हे झाले तब्बल 28 वर्षात त्यांच्याविरुद्धचा फौजदारी खटला निकाली निघाला नाही .अजूनही प्रलंबित आहे तिकडे त्यात जमिनीचा वाद सुरू होता तो नुकताच सर्वोच्च न्यायालयाने सोडवला सर्वोच्च न्यायालयाचा आदेश योग्य की अयोग्य हा वेगळाच विषय आहे पण तो अंतिम असल्यामुळे मान्य करणे आपल्याला क्रमप्राप्तच आहे तसे अनेक निर्णय पाळले जात नाहीत किंवा ते बदलण्यासाठी सरकारतर्फे नवीन कायदे केले जातात असं वादातल्या जमिनीवर रामाचे मंदिर बांधण्यासाठी केंद्र सरकारला एक ट्रस्ट स्थापन करायला सांगण्यात आले त्या ट्रस्टवर केंद्र सरकारतर्फे चक्क दोन आरोपींची (नृत्यगोपाल दास आणि चंपतराय बंसल )नियुक्ती करण्यात आली. असे सगळे प्रकार आहेत श्रद्धेच्या अस्मितेच्या

नावाखालील लोकशाही कायदे न्यायपालिका अशी गुंडाळी जाते हे प्रकरणात दिसते हे सर्वात मोठे आव्हान आहे बहुमताचे राजकारण आम्ही 80 टक्के आहोत बाकीच्यांनी आम्ही म्हणून तसे राहायचे आम्ही म्हणू ते खायचे पाहिजे असे ठासून सांगितले जायला लागले 2014 सालापासून ते प्रकरण फारच वाढले त्यापूर्वी याबाबत काही विशिष्ट लोकांकडून फक्त कुजबूज केली जायची आता त्यात बाबत राजरोसपणे बोलले लिहिले जाते समाज माध्यमांवर तर इतकी गरड ओकली जाते की हे सर्व आपल्याला नक्की कुठे घेऊन जाणार आहे ते कळत नाही.त्यातूनच झुंडबळीसारखे प्रकार उद्भवू लागले आहेत. झुंडीला राजमान्यता मिळू लागल्यावर तिचा उपद्रव काही विचारायलाच नको.

**8) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि परिवार:-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या जगातला सर्वात मोठ्या संघटनेच्या उल्लेखाशिवाय आपल्या लोकशाही पुढील आव्हाने पूर्ण होणार नाहीत. किंबहुना ही संघटना हेच भारतीय लोकशाही पुढील सर्वात मोठे आव्हान ठरू शकते या संघटनेवर भारत सरकारने तीनदा बंदी घातली पहिल्यांदा गांधी हत्यानंतर दुसऱ्यांना आणीबाणीच्या कालखंडात आणि तिसऱ्यांदा बाबरी मस्जिद पाडल्यानंतर दिवसेंदिवस ही संघटना वाढत गेली. आणि तिच्या छताखाली असणाऱ्या संघटना ही वाढत गेल्या विशेषता जशी सत्ता मिळत गेली तस तशी वाढ होत गेली संघ आणि संघ परिवारातील संघटना 2014 पूर्वी भारत सरकारवर महागाई, बेरोजगारी ,भ्रष्टाचार ,शेतकरी आत्महत्या वगैरे अनेक प्रश्नांवर आवाज उठवताना आंदोलने करताना आपण बघितले आहेत पण आज हे सर्व प्रश्न भारताला भेडसावत असताना आणि त्यात प्रचंड वाढ झाली असताना संपूर्ण परिवार गप्पा आहे 2014 सालानंतर दलित मुस्लिम समुदायातील लोकांवरील हल्ल्यात झालेली वाढ ही हा परिवार शांतपणे बघत आहे .उगीच कोणाला काही वाटू नये म्हणून मोघम प्रतिक्रिया त्यांच्या निर्णयाने त्यांना मार्फत दिला जातो बाकी समाजात विष कसे कालवली जाईल दरी कशी निर्माण होईल यालाच खतपाणी घालण्याचा प्रयत्न केला जातो. आणि हा प्रकार कुठलाही सरकारी यंत्रणा थांबू शकत नाही. साक्षी महाजन, योगी आदित्यनाथ, प्रज्ञा ठाकूर साध्वी प्राची वगैरे सारखे लोक राजकारणात मोठे करण्यामागे काय छुपा अजेंडा आहे हे सुज्ञ लोक जाणतातच करून सावरून नामनिराळे राहणार यात तर या परिवारातील लोकांचा हातकंडा आहे.

वरील प्रकारे अशी अनेक आव्हाने लोकशाही समोर आहेत.

**निष्कर्ष -** प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे भारतीय राजकारणातील लोकशाहीचे स्वरूप स्पष्ट करून त्यावर जात धर्म वंश पंथ भ्रष्टाचार यासारख्या अनिष्ट रूढी प्रथा परंपरांचा होणारा परिणाम व त्यातून आजच्या लोकशाही पुढे निर्माण झालेल्या असंख्य आव्हानांचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.भारतातील भारतीय राजकारणातील सामाजिक विषमता दारिद्र्य, अंधश्रद्धा, भ्रष्टाचार, धार्मिकतेची राजकारण खाजगीकरणातून निर्माण झालेली बेकारीची समस्या, राजकारणातील वाढती गुन्हेगारी यासारखी आव्हाने भारतीय लोकशाही पुढे उभी आहे त्यातून भारतीय लोकशाहीला विशुद्ध स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसते. त्या आव्हानांना तोंड देण्यासाठी भारतीय नागरिकांनी जागरूक सतर्क असणे गरजेचे आहे .आणि लोकशाही प्रति लोकशाहीच्या मूल्यांप्रति आपल्यामध्ये जागरूकता निर्माण होण्यासाठी जनतेनेच पुढाकार घेणे गरजेचे आहे.

**संदर्भ-**

1.इयत्ता दहावी इतिहास व राज्यशास्त्र

2.https://ejanshakti.com/

3.प्राचार्य कांबळे आणि एकनाथ खांदवे- भारतीय लोकशाही पुढील आव्हाने- डायमंड पब्लिकेशन

4.भास्कर लक्ष्मण भोळे -गणराज्याचे शासन आणि राजकारण पिंपळापुरे पब्लिकेशन

5.बी.बी पाटील ,उर्मिला चव्हाण- भारतीय राज्यघटना- फडके प्रकाशन

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

**श्री. संजय बाळगोंडा खोत**
संशोधक विद्यार्थी,
राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**सारांश**

मध्ययुगातील अंधकारमय युगाच्या अस्तानंतर जगभरातील समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात प्रबोधन युग अवतरले. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात आमुलाग्र स्वरूपाचे क्रांतिकारी परिवर्तन होवू लागले. मानवी समूहाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी नवे सामाजिक शैक्षणिक, संस्कृतिक व राजकीय प्रारूप सूर झाले. राजेशाही, सरंजामशाही, अभिजनशाही, हुकुमशाही या शासन प्रणालीच्या मर्यादा व उणिवा उघड झाल्या व लोकशाही या शासनप्रणालीचे महत्त्व व फायदे प्रकर्षाने समोर आले. १८ व्या शतकानंतर लोकशाही ही केवळ शासनप्रणाली नसून जीवनपद्धती म्हणून समोर आली. जगभरातील जवळपास अपवाद वगळता सर्वच राष्ट्रांनी लोकशाही शासन-प्रणालीचा अधिकृत स्वीकार केला. भारत हा खंडप्राय व विस्तृत देश प्राचीन काळापासून भारतात जनपदे- महाजन पदे, पंचायतराज व ग्रामस्वराज या रुपात लहान आकाराची लोकशाही आस्तित्वात होती. ब्रिटीश वसाहतवादाच्या जोखाड्यातून स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर २६ जानेवारी १९५० साली भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून उदयास आली. आज भारतीय लोकशाहीने अनेक संकटे, आव्हाने, अडथळे पार करत आपली वाटचाल सुरु ठेवली. आज भारतीय लोकशाही ७३ वर्षाची होत आली आहे. आज भारतासारख्या बलाढ्य लोकशाहीसमोर कालपरत्वे व बदलत्या अर्थकरणामुळे जुन्या समस्या आव्हाने नव्या रुपात समोर येत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधातून सद्यकालीन पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाहीला आव्हान देणाऱ्या काही प्रमुख घटकांचा अभ्यास करून त्याबाबत संशोधक या नात्याने दृष्टीकोन व्यक्त केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन हे स्वज्ञान व स्वअभ्यासावर आधारित आहे.

**पारिभाषिक शब्द** : शासनप्रणाली, घटनात्मक पेचप्रसंग सर्वोच्च न्यायालयाचे न्याय निवाडे, जमातवाद, प्रादेशिक अस्मिता, विकासाचा अनुशेष, माहिती अधिकार, सुशासन, नागरिक प्रत्याभरण, प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे, नागरिकत्व, अपरिपक्व, व्यक्तिस्तोम, पक्षीय राजकारण, घराणेशाही, भ्रष्टाचार

**प्रस्तावना:**

मध्ययुगातील अंधकारमय युगाच्या अस्तानंतर जगभरातील समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात प्रबोधन युग अवतरले. मानवी जीवनाच्या विविध क्षेत्रात आमुलाग्र स्वरूपाचे क्रांतिकारी परिवर्तन होवू लागले. मानवी समूहाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी नवे सामाजिक शैक्षणिक, संस्कृतिक व राजकीय प्रारूप सूर झाले. राजेशाही, सरंजामशाही, अभिजनशाही, हुकुमशाही या शासन प्रणालीच्या मर्यादा व उणिवा उघड झाल्या व लोकशाही या शासनप्रणालीचे महत्त्व व फायदे प्रकर्षाने समोर आले. १८ व्या शतकानंतर लोकशाही ही केवळ शासनप्रणाली नसून जीवनपद्धती म्हणून समोर आली. जगभरातील जवळपास अपवाद वगळता सर्वच राष्ट्रांनी लोकशाही शासन-प्रणालीचा अधिकृत स्वीकार केला. भारत हा खंडप्राय व विस्तृत देश प्राचीन काळापासून भारतात जनपदे- महाजन पदे, पंचायतराज व ग्रामस्वराज या रुपात लहान आकाराची लोकशाही आस्तित्वात

होती. ब्रिटीश वसाहतवादाच्या जोखाड्यातून स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यानंतर २६ जानेवारी १९५० साली भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून उदयास आली. आज भारतीय लोकशाहीने अनेक संकटे, आव्हाने, अडथळे पार करत आपली वाटचाल सुरु ठेवली. आज भारतीय लोकशाही ७३ वर्षाची होत आली आहे. आज भारतासारख्या बलाढ्य लोकशाहीसमोर कालपरत्वे व बदलत्या अर्थकरणामुळे जुन्या समस्या आव्हाने नव्या रुपात समोर येत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधातून सद्यकालीन पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाहीला आव्हान देणाऱ्या काही प्रमुख घटकांचा अभ्यास करून त्याबाबत संशोधक या नात्याने दृष्टीकोन व्यक्त केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन हे स्वज्ञान व स्वअभ्यासावर आधारित आहे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतींचा वापर केला आहे. यामध्ये संकलित माहिती, वृत्तपत्रीय व मासिकांतील लेखन संदर्भग्रंथातील लेखकांची अभ्यासपूर्ण मांडणी इ. माध्यमातून माहिती संकलन केले आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. भारतीय लोकशाहीच्या वाटचालीचा अभ्यास करणे.

२. भारतीय लोकशाहीची सद्यकालीन स्थितीचा अभ्यास करणे.

३. भारतीय लोकशाही समोर निर्माण झालेल्या आव्हाणांची मीमांसा करणे.

४. भारतीय लोकशाहीच्या भवितव्यासंदर्भात असणारी संधी व धोके यांचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

१. भारतीय लोकशाहीला समृद्ध असा ऐतिहासिक वारसा लाभला आहे.

२. भारतीय लोकशाही उत्क्रांत होत आली आहे.

३. भारतीय लोकशाही सर्व समावेशक व लवचिक आहे.

४. भारतीय लोकशाहीसमोर संधी सोबत आव्हाने व अडथळे निर्माण होत आहेत.

**आशय स्पष्टीकरण:**

जगातील सर्वात मोठी व जुनी लोकशाही असणारे भारत हे एक विविधतेत एकता दर्शवणारे राष्ट्र होय. विशाल व महाकाय विस्तार असणारे भारत हे विकसनशील राष्ट्र होय. परकीय आक्रमणे पचवून सर्वांना सामावून घेणारी ही भूमी बहुभाषिक, बहुधार्मिक, बहुप्रांतीय असे संमिश्र व गुंतागुंतीचे स्वरूप भारतीय लोकशाहीला लाभले आहे. भारतीय लोकशाही भारतीय संविधानाने घटनात्मक मार्गाने प्रस्थापित केली आहे. भारतीय लोकशाही सर्वसमावेशक, सहिष्णू, सर्वधर्मसमभावी व धर्मनिरपेक्ष आहे. भारतीय लोकशाही जगभरातील प्रगत-पुढारलेल्या राष्ट्रांसाठी एक आश्चर्य व चमत्कार आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय बहुपक्षीय संसदीय लोकशाही कितपत यशस्वी होईल, किंवा भारतीय लोकशाही रुजणार का? अशा शंका व सांशकता व्यक्त केल्या गेल्या. परंतु सामान्य व श्रमिक भारतीय नागरिकांनी हे सर्व अंदाज व पूर्वग्रहदुषित तर्क साफ चुकीचे ठरवले.

आज भारतात गुण्या-गोविंदाने नांदत असलेली व परिपूर्ण परिपक्व होण्याच्या मार्गावर असलेली भारताची जागतिक प्रतिष्ठा व आदर युक्त भावनेशी जोडलेली आपली लोकशाही पुढील बहुआयामी आव्हानांना सामोरी जात आहे.

**१) परिपक्व नागरिकशास्त्राचा अपुरेपणा:**

जगातील कोणत्याही लोकशाहीचा कणा असतो तो म्हणजे परिपक्व नागरिकशास्त्र Civics ही लोकशाही यशस्वी होण्याची पूर्वअट आहे. परंतु भारतातील निरनिराळ्या सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कारणांनी नागरिकांमध्ये नागरिक या नात्याने असणाऱ्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये व बांधिलकीचा खूप मोठा अपुरेपणा दिसून येतो. लोकशाही आणि नागरिकशास्त्र या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. नागरिकांच्या सजगता समंजसपणा व सक्रिय सहभागावरच लोकशाहीची भरभराहट होते. संमती आणि बहुमत या दोन बाबी लोकशाहीच्या भक्कम भिंती आहेत.

**२) धार्मिक व जातीय दुही -**

धर्म आणि जात या भारतीय समाजजीवनाच्या अतुट बाबी आहेत. धर्म आणि जाती या लोक समूहांना स्वतंत्र ओळख करून देतात. धर्म आणि जात या दोन बाबी खाजगी व मर्यादित असेपर्यंत बंधुभाव, परस्पर आदर व सौहर्द टिकून राहतो. परंतु हेच दोन घटक जेव्हा स्फोटक व संवेदनशील बनतात तेव्हा तो भारतासारख्या संमिश्र व व्यापक लोकशाहीला सर्वात मोठा धोका असतो. धर्म आणि जातीवर आधारित फुट अथवा दुही सामाजिक सलोखा बिघडवून टाकते. संपूर्ण देशभरात याचे घातक परिणाम होत असल्याचे दिसत आहे.

**३) दारिद्र्य बेकारी आणि विषमता:**

भारतासारख्या विशाल देशातील मोठी जनसंख्या जर दारिद्र्य- विषमता व बेरोजगारीने वैफल्यग्रस्त होण्याच्या मार्गावर असेल तर या जनसामान्यांचा लोकशाही शासनप्रणालीवरील विश्वास गमावला जातो. जर ही शासनप्रणाली सर्वसामान्यांना रोजगार व राहणीमानाचे संरक्षण देत नसेल किंवा अपुरी पडत असेल तर लोकशाही शासनप्रणालीला सामान्य जनसमुहाचा समर्थन व पाठबळ मिळत नाही. किंबहुना दारिद्र्य आणि बेकारी ही दोन दुष्टचक्रे लोकशाहीला धोकादायक व हिंसक वळण लावतात. यातूनच भरडलेला एक मोठा हतबल जनसमूह लोकशाही शासनप्रणालीला दोष देत तिला कुचकामी ठरवतो. अधिमान्यता गमावण्यासाठी हे कारण पुरेसे असू शकते. गरीब अधिक गरीब व श्रीमंत अधिक श्रीमंत होत टोकाची विषमता जर सर्वव्यापी होत असेल लोकशाहीची उपयुक्तता व व्यवहार्यता संपुष्टात येत आहे.

**४) मुक्त अभिव्यक्ती व स्वातंत्र्याचा स्वैराचार:**

लोकशाही शासन प्रणालीत संवाद–सुसंवाद–वाद–वादविवाद–मतभेद–मतैक्य या प्रक्रिया अत्यावश्यक आहेत. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा तर भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे. आपले संविधान प्रत्येक भारतीयाला त्यांच्या क्षमता–आवड व गुणांप्रमाणे जगण्याचे सर्वाधिकार बहाल करते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व त्यातून राज्याचा विकास होतो. उदारमतवादाचा गाभा अभिव्यक्ती आहे. परंतु या अधिकारांचा मनमानी, मोकाट व मर्यादामुक्त वापर होवू नये. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, सार्वजनिक जीवनात आचारसंहिता व शिष्टाचाराचे पालन सक्तीने व्हावे बहुसंख्याक विरुद्ध अल्पसंख्याक हा वाद विकोपाला जाण्याचे मुख्य कारण हे अभिव्यक्तीचा गैरवापर हेच आहे. आज Electronic Media व समाजमाध्यमे संदेशवहनाऐवजी

अफवा, गैरसमज व वावड्या प्रसारित करण्याचे कार्य मोठ्या प्रमाणावर होत आहे. यातून दोन समाजात तेढ, द्वेष व विष पसरवण्याचे काम ही मंडळी करतात. अभिव्यक्तीमधून सौहार्द निर्माण व्हावा. भारतीय लोकशाही समोर आज विषारी अभिव्यक्ती ही सर्वात घातक समस्या आहे.

**५) मतपेढी व निवडणुकांचे राजकारण:**

भारतात बहुपक्षीय संसदीय लोकशाही प्रणालीत राष्ट्रीय पक्षांपेक्षा प्रादेशिक पक्षाचे वर्चस्व व प्राबल्य वाढत चालले आहे. प्रत्येक राज्यांन प्रादेशिक पक्षांचे प्रभावक्षेत्र व उपद्रव मुक्त वाढत चालले आहे. यातून जात, धर्म, भाषा, वंश, प्रादेशिक अस्मितांचे म्हणजे पर्यायाने विशिष्ट्य समान घटकांपुरते मर्यादित असे मतपेढीचे राजकारण वाढत चालले आहे. आज भारताला एकूण मतदार ९४ कोटींहून अधिक आहेत.

डावे पक्ष वगळता इतर सर्व सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतपेढीचे राजकारण घडवून आणतात. यामधून कधी हिंदू तर कधी मुस्लीम तर कधी मागासवर्गीय तर कधी दलित मतपेढीचे राजकारण भारतीय लोकशाहीला कमकुवत व नामधारी बनवत आहेत. प्रगल्भ नागरिकांची निर्मिती व्हायला हवी. निवडणुका आज एक व्यावसायिक व धंदेवाईक अर्थकारण बनलेले आहे. विधानसभा, लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका या आज सामान्य उमेदवारांच्या आवाक्याच्या खूप बाहेर आहेत. चा वारेमाप वापर निवडणूक काळात होत आहे. हे भारतीय लोकशाहीला गंभीर वळण आहे.

**६) मतदानाची घटती टक्केवारी**

मतदान हे लोकशाही शासन व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य व जबाबदारी आहे. परंतू भारतामध्ये मागील १६ लोकसभांच्या सार्वत्रिक निवडणुकांमधील मतदानाची एकूण टक्केवारी ही अपवाद वगळता ६०% च्या खालीच राहिली आहे. म्हणजेच आजही स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव सुरु असताना १०० पैकी ४० नागरिक मतदानाबाबत उदासिन व निष्काळजी असल्याचे दिसून येते. शहरी मतदार फारच अनास्था दर्शवत आहे. मतदानासाठी शासकीय, अशासकीय व खाजगी पातळीवरून प्रबोधन सुरु असताना, नवमतदारांची संख्या वाढत असताना मतदानाची एकूण आकडेवारी वाढायला हवी, मतदान सक्तीचे करायला हवे, मतदानाचे भारतीय लोकशाही अधिक प्रगल्भ व परिपक्व होणारे आहे.

**७) फुटीरतावाद:**

भारतीय लोकशाहीला संघराज्यीय कवच लाभले आहे. २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश मिळून हा महाकाय देश बनतो आहे. या देसःत बंधूभाव, एकोपा आणि सलोखा प्राचीन काळापासून नांदत आला आहे. परंतू स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानाच्या विलीनीकरणाचे पेचप्रसंग निर्माण झाले. १९६० नंतर पूर्वोत्तर भारताचे विभाजन सुरु झाले. मोठ्या राज्यातून छोटी राज्ये स्वतंत्र झाली.

पंजाब, नागालँड, आसाम, त्रिपुरा, तामिळनाडू, प. बंगाल, मिझोरम, अरुणाचल प्रदेश या राज्यात वंश, भाषा, धर्म आणि प्रदेश अस्मिता या कारणांवरून स्वतंत्र देशाची मागणी उभी राहिली. याच फुटीरतावादापासून मोठ्या प्रमाणावर हिंसाचार व जीवितहानी झाली. भारतीय लोकशाही समोर हा फुटीरतावाद भस्मासुरा सारखा उभा आहे.

**८) परकीय शक्तींचा हस्तक्षेप:**

भारतीय संविधान, भारतीय संसद, भारतीय लोकशाही व भारतीय विधिमंडळ आपआपल्या कार्यक्षेत्रात सर्वश्रेष्ठ आहेत. सार्वभौम आहेत. परंतु आज भारताची महासत्ता होण्याची प्रक्रिया व वाटचाल खंडित व्हावी, भारत स्वयंपूर्ण व स्वावलंबी होवू नये. यासाठी जगातील काही गुप्तहेर संस्था व बलशाली पण उपद्रवी राष्ट्रे भारतीय राजकारण-अर्थकारणात हस्तक्षेप करत आहेत. मोठ्या बलाढ्य कंपन्या भारतीय भांडवल बाजारात व अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करत आहेत. त्यांची मक्तेदारी आणि एकाधिकारशाही टिकावी. यासाठी मोठे उद्योजक, व्यापारी कंपन्या व राष्ट्र प्रमुख प्रयत्नशील असतात. जनसामान्यांची दिशाभूल करत धूळफेक करणे व आंदोलने करणे.

हा परकीय शक्तींचा हस्तक्षेप भारतीय लोकशाहीचे घातक आहे.

वरीलप्रमाणे सद्यकालीन पार्श्वभूमीवर भारतीय लोकशाही समोरील संधी, आव्हाने आणि अडथळे अभ्यासता येतील. सद्याचे युग हे स्पर्धेचे व माहिती-तंत्रज्ञानाचे आहे. व्यापार आणि वाणिज्य याला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारीकरणाचा विळाखा दिवसेंदिवस घट्ट होत चालला आहे. सामाजिक न्याय आणि समाज कल्याण या संकल्पना केवळ कागदी व नाममात्र बनत चालल्या आहेत. लोकशाही समोर सर्वपक्षीय राजकारणी नेतृत्वाने पक्षीय स्वार्थ, लाभ व हितसंबंधातून लोकशाही केवळ आभासी स्वरुपाची बनवली आहे. भारतीय लोकशाही नवे रूप, नवे वळण घेत कूस बदलत आहे. भारतीय लोकशाहीने अनेक संकटे व बिकट प्रसंग पचवत आपली वाटचाल सुरु ठेवली आहे. भारतीय लोकशाही ही जिवंत व भारतीय समाजाशी एकरूप झालेली आहे. भारतासारख्या खंडप्राय व बहुल सांस्कृतिक देशांमध्ये सर्वसमावेशक व सर्वव्यापी लोकशाही ही जीवनावश्यक गरज आहे.

भारतीय लोकशाहीचे भवितव्य व बळकटी हि भारतीय जनतेच्या हातात आहे.

**संदर्भ-**

१) भारतीय लोकशाहीची वाटचाल – डॉ. श्रीकांत देशमुख, अर्थव प्रकाशन, नागपूर

२) भारतीय लोकशाही – अर्थ आणि व्यवहार राजेंद्र व्होरा, सुहास पळशीकर, डायमंड प्रकाशन

३) भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने – प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, डायमंड प्रकाशन

४) भारतीय लोकशाही : शोध आणि आव्हाने – अरुण सारथी, अर्थव प्रकाशन

# भारतीय लोकशाही

**डॉ. शितल चंद्रकांत पाटील**
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय
रामानंदनगर (बुर्ली)
Email– shitalpatil01989@gmail.com

**सारांश:** भारताला स्वातंत्र्य मिळावे याकरिता दीर्घकाळ लढा सुरु होता. जहाल गट, मवाळ गट आणि क्रांतिकारक गट आपल्यापरीने भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी लढा देत राहिले. ब्रिटिशाकडून स्वातंत्र्य प्राप्त करणे हे साध्य समोर ठेऊन सर्वच स्तरावर प्रयत्न सुरु होते. परकीय राजवटीपासून मुक्तता याबरोबर सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभाग आणि समान अधिकार ही तत्वेसुद्धा स्वातंत्र्य लढ्याने पुरस्कारलेली होती. स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारे बहुतेक नेते इंग्रजी शिक्षणाबरोबर ब्रिटीश पद्धतीच्या संसदीय लोकशाहीने प्रभावित झालेले होते. सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होता यावे व स्वयंशासनाचा अधिकार असावा हीच काँग्रेसची भूमिका होती. अशा या परिस्थितीत लोकशाही आणि संसदीय लोकशाही स्वीकारणे हाच पर्याय होता.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, भारतीय लोकशाही, नोकरशाही, राज्य, राजकीय पक्ष

**प्रस्तावना** –

भारताला स्वातंत्र्य मिळावे याकरिता दीर्घकाळ लढा सुरु होता. जहाल गट, मवाळ गट आणि क्रांतिकारक गट आपल्यापरीने भारताला स्वातंत्र्य मिळावे यासाठी लढा देत राहिले. ब्रिटिशाकडून स्वातंत्र्य प्राप्त करणे हे साध्य समोर ठेऊन सर्वच स्तरावर प्रयत्न सुरु होते. परकीय राजवटीपासून मुक्तता याबरोबर सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभाग आणि समान अधिकार ही तत्वेसुद्धा स्वातंत्र्य लढ्याने पुरस्कारलेली होती. स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणारे बहुतेक नेते इंग्रजी शिक्षणाबरोबर ब्रिटीश पद्धतीच्या संसदीय लोकशाहीने प्रभावित झालेले होते. सर्व नागरिकांना राज्यकारभारात सहभागी होता यावे व स्वयंशासनाचा अधिकार असावा हीच काँग्रेसची भूमिका होती. अशा या परिस्थितीत लोकशाही आणि संसदीय लोकशाही स्वीकारणे हाच पर्याय होता.

**लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार** –

भारतीय घटनेच्या प्रास्ताविकेत भारत हे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक असेल असे म्हटले आहे . पुढे त्यामध्ये ४२ व्या घटनादुरुस्तीने समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष हे शब्द वाढवण्यात आले. राज्यघटनेत लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार दोन महत्वाच्या मार्गांनी करण्यात आला. लोकांच्या प्रतिनिधीच्या हाती सत्ता असली पाहिजे हे लोकशाहीचे पहिले तत्व राज्यघटनेत स्वीकारले आहे . लोकशाहीचे दुसरे तत्व म्हणजे आपल्या मतांची अभिव्यक्ती करण्याचे आणि आपल्या इच्छेनुसार संघटना करण्याचे व एकत्र येण्याचे प्रत्येक नागरिकाला असलेले स्वातंत्र्य होय. लोकशाहीचे तिसरे तत्व म्हणजे कायद्यासमोर सर्वांना समान संधी राज्यघटनेतील कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्वांना समान लेखले आहे. कलम १५ नुसार धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यावरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही. वरीलप्रमाणे लोकप्रतिनिधी निवडण्याचा नागरिकांना समान अधिकार, कायद्यासमोर समानता

व भेदभावाला बंदी, सर्वांना समान संधी आणि नागरिकांना अभिव्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य हि लोकशाही ची तिन्ही तत्वे भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेली आहेत.

**बहुमताचा कारभार म्हणजे लोकशाही नव्हे** –

बहुमताला प्रतिनिधित्व ही खरी लोकशाही नव्हे, तर सर्वांना प्रतिनिधित्व असेल तर ती खरी लोकशाही मानली पाहिजे असे जॉन स्तुअर्त मिल यांनी म्हंटले आहे. बहुमत असलेल्यानाच अधिकार व अल्पमतातील लोकांच्या अधिकाराचा अनादर ही लोकशाही नव्हे समाजातील प्रत्येक व्यक्तीला असलेले स्वातंत्र्य व त्यांचे रक्षण करण्याची राज्याची जबाबदारी ही लोकशाही व्यवस्थेचा एक भाग आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व आहे. महत्व आहे . त्या व्यक्तीला जगण्याचा, विचार प्रकट करण्याचा, विश्वास ठेवण्याचा , आपल्या पद्धतीने जगण्याचा अधिकार असला पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य असले पाहिजे व त्याचे रक्षण करण्याची राज्याची जबाबदारी असली पाहिजे.

**राजकीय पक्ष** –

देशाचा किंवा एखाद्या प्रांताचा राज्यकारभार स्थिरपणे चालवायचा असेल तर त्या काळात विशिष्ट राजकीय धोरणे राबविणारा संघटीत पक्ष असावा लागतो त्या पक्षाने बहुमत विधीमंडळात असावे लागते. एक पक्ष सत्ताधारी असावा आणि दुसरा पक्ष हा तेवढाच तुल्यबळ विरोधी पक्ष असावा. प्रत्येक राजकीय पक्षाचे विशिष्ट तत्वज्ञान असते, कार्यक्रम असतो. याआधारे निवडून आल्यावर राज्यकारभार केला जातो असे गृहीत धरले जाते. परंतु सद्यस्थितीमध्ये राजकीय पक्ष्याच्या जाहीरनाम्याना फारसे महत्व उरलेले नाही. केवळ एक ओपचारीकता म्हणून जाहीरनामे प्रसिद्ध केले जातात. तरीही राजकीय पक्ष लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे.

**नोकरशाही** –

नोकरशाही हा लोकशाही व्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. राजकिय पक्ष हा पाच वर्षाकरिता सत्तेमध्ये येतो मात्र नोकरशाही हा घटक स्थिर असतो. प्रशासकीय व्यवस्थेचे धोरण निर्धारण करणारा घटक म्हणून नोकरशाहीकडे पहिले जाते. प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम व सचोटीची असेल तर राज्याची उद्दिष्ट्ये साध्य होतात. राज्यकर्ते हे येतात आणि जातात परंतु घटनात्मक व्यवस्था दीर्घकाळ राबवण्याचे काम नोकरवर्गाला करावे लागते. नोकरवर्गाला घटनेशी एकनिष्ट राहून प्रामाणिकपणे काम करणे ही त्याची नैतिक जबाबदारी हा एक लोकशाहीचा महत्वाचा आधार आहे.

**लोकशाही जीवनपद्धतीचा अंगीकार** –

लोकशाहीचे खरे अस्तित्व हे लोकांनी लोकशाहीची मुल्ये किती प्रमाणात स्वीकारली यावर अवलंबून असते. लोकशाहीमध्ये सर्वच कामे राजकीय सत्तेने करावी अशी जनतेची अपेक्षा असते. पदोपदी सरकारी मदत मिळावी असे सर्वांना वाटते. समाजामध्ये शिक्षणाचे अपुरे प्रमाण, माहितीच्या साधनांचा गैरवापर आणि लोकशिक्षणावर राजकारण्याची कमी होत जाणारी श्रद्धा या तिन्ही गोष्टीमुळे लोकशाहीचा महत्वाचा आधार असलेली जनतेची सजगताच मुळी कमी होते आहे.

आज भारतासमोर अनेक प्रश्न आहेत वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, श्रमसंस्कृतीचा अभाव, भूकबळी अशा कित्येक समस्या आहेत. या सर्व समस्या बाजूला ठेवून भलतेच प्रश्न राजकारण्याकडून उस्थित केले जातात. धर्माच्या, जातीच्या आधारावर

प्रश्न उपस्थित केले जातात. निवडणुकीपुरते विशिष्ट मुद्दे समोर करून निवडणुका जिंकल्या जातात. यामुळे लोकशाही तत्वाला बाधा निर्माण होते आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय लोकशाहीला संपूर्ण जगामध्ये एक आदर्श लोकशाही म्हणून ओळखले जाते. आज भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने उभी आहेत. परंतु विविध संरचानाच्या माध्यमातून लोकशाही बळकटी कारणासाठी प्रयत्न सुरु आहेत. कोणत्याही एका संरचनेला अधिक महत्व न देता सत्ता संतुलन राखण्याचे काम व्यवस्थेतल्या इतर संरचनाकडून होत असते म्हणूनच भारतीय लोकशाही आज अबाधित आहे. आज खर्या अर्थाने देशाचा विकास व्हायचा असेल तर लोकशाही बळकट होणे गरजेचे आहे. लोकशाही अधिक सक्षम झाली तरच देशातील प्रत्येक नागरिकांना न्याय मिळणार आहे.

**संदर्भ :**


१. तळवलकर गोविंद – सत्तातर , खंड १ व २ , मौज प्रकाशन गृह ,मुंबई १९९७

२. धर्माधिकारी दादा – आपल्या गणराज्याची घडण, परधर्म प्रकाशन

३. भारतीय लोकशाही : अंतरंग – विचार मंथन संशोधन पत्रिका, जानेवारी २०१३

४. चपळगावकर नरेंद्र – राज्यघटनेचे अर्धशतक, मौज प्रकाशन गृह मुंबई २००२

५. पळशीकर सुहास – समकालीन भारतीय राजकारण – काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन पुणे, २००४

# भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

**डॉ सचिन श्रीरंग चव्हाण**
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स,
इचलकरंजी
मोबा. नं – ९०४९६०३४२१

**सारांश:**

लोकशाही शासनव्यवस्थेकडे जगाच्या पातळीवर एक आदर्श राज्यव्यवस्था म्हणून पहिले जाते. भारतावर इंग्रजांनी दिडशे वर्ष राज्य केले. ब्रिटीशांनी भारतात संसदीय लोकशाही संस्थांची निर्मिती करून भारतास त्यास अनुकूल संस्कृती रुजवण्याचे काम केले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षाचा काळ उलटला आहे. आजही भारतातील लोकशाही मोठा दिमाखात उभी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एवढ्या मोठा लोकसंख्येच्या देशाला एकसंध ठेवणे हे मोठे आव्हान होते. नवीन राज्यघटना निर्माण करून ती स्थिरस्थावर करणे व यातून असंख्य लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे हे मोठे आव्हान भारतीय घटनाकारांसमोर होते. खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाने लोकशाही रुजवण्याचे काम केले परंतु आज याच लोकशाही समोर अनेक आव्हाने उभी आहेत. स्वातंत्रोत्तर काळात भारतीय लोकशाहीने सामजिक, संस्कृती , राजकीय, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मानवी समाज जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये भारतीय लोकशाहीने आत्मनिर्भरता प्राप्त केली आहे असे असले तरी भारतीय लोकशाहीसमोर सातत्याने आव्हाने उभी राहिलेली आहेत.

**पारिभाषिक शब्द:** भारतीय लोकशाही, आव्हाने, प्रांतवाद, नक्षलवाद, दहशतवाद

प्रस्तावना –

लोकशाही शासनव्यवस्थेकडे जगाच्या पातळीवर एक आदर्श राज्यव्यवस्था म्हणून पहिले जाते. भारतावर इंग्रजांनी दिडशे वर्ष राज्य केले. ब्रिटीशांनी भारतात संसदीय लोकशाही संस्थांची निर्मिती करून भारतास त्यास अनुकूल संस्कृती रुजवण्याचे काम केले. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षाचा काळ उलटला आहे. आजही भारतातील लोकशाही मोठा दिमाखात उभी आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एवढ्या मोठा लोकसंख्येच्या देशाला एकसंध ठेवणे हे मोठे आव्हान होते. नवीन राज्यघटना निर्माण करून ती स्थिरस्थावर करणे व यातून असंख्य लोकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे हे मोठे आव्हान भारतीय घटनाकारांसमोर होते. खऱ्या अर्थाने भारतीय संविधानाने लोकशाही रुजवण्याचे काम केले परंतु आज याच लोकशाही समोर अनेक आव्हाने उभी आहेत.

स्वातंत्रोत्तर काळात भारतीय लोकशाहीने सामजिक, संस्कृती , राजकीय, आर्थिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मानवी समाज जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये भारतीय लोकशाहीने आत्मनिर्भरता प्राप्त केली आहे असे असले तरी भारतीय लोकशाहीसमोर सातत्याने आव्हाने उभी राहिलेली आहेत.

भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

१. धार्मिक कट्टरता –

भारतात विविध धर्माचे लोक राहतात. परंतु अलीकडील काळात धार्मिक कट्टरता मोठ्याप्रमाणात वाढली आहे. धार्मिक कट्टरतेमुळे धर्मा – धर्मात तेढ निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. प्रत्येक धर्मातील अनुयायांना आपला धर्म संकटात आहे असे वाटते यातून भडक घोषणा, नारेबाजी केली जाते आणि समाजातील स्वास्थ्य दुषित केले जाते. अलीकडील काळात घडलेल्या घटना याचा प्रत्यय देतात. यामध्ये दिल्ली दंगल २०२०, 'जेएनयू' मधील आंदोलन, उतर प्रदेश हिंसा, बंगळूर हिंसा या सर्व घटना धार्मिक कट्टरतेमुळे झालेल्या आहेत. म्हणूनच धार्मिक कट्टरता हे भारतीय लोकशाही नव्हे तर जागतिक लोकशाही समोर गंभीर आव्हान उभे राहिलेले आहे.

२. प्रांतवाद –

भारत हा विशाल खंडप्राय देश आहे. या बलाढ्य देशात प्रादेशिक असमतोल आहे. भारतात असे काही प्रांत आहेत जे सातत्याने त्यांच्यामध्ये प्रांतावरून वाद उत्पन्न होतात . उत्तर भारत आणि दक्षिण भारत हा वाद कायमचा आहे. उत्तर प्रदेश, बिहार या प्रांतातील लोकांना रोजगारासाठी महाराष्ट्र व गुजरात अशा इतर राज्यात जावे लागते परंतु प्रांतवादामुळे यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. गुजरात व महराष्ट्रात असे विशिष्ट अजेंडा असलेले पक्ष आहेत जे बाहेरून नागरिक आपल्या राज्यात आले की त्यांना स्वगृही परत जाण्यास भाग पाडतात. यामुळे प्रांतवाद वाढीस लागतो. नुकतेच कर्नाटकमध्ये शिवाजी महराजांचा पुतळा प्रांतवादामुळे विद्रूप केला. असे प्रकार सातत्याने समाजात वाढत आहेत. हे लोकशाहीला घातकच आहे.

३. नक्षलवाद –

नक्षलवाद हि प्रादेशिक समस्या न राहता ती जागतिक समस्या बनलेली आहे. हाच नक्षलवाद आज भारताच्या अखंडतेवर घाला घालू पाहत आहे. सुरवातीला भारताच्या काही विशिष्ट घटकराज्यापुरता सीमित असलेला नक्षलवाद आज भारताच्या अखंडतेला आणि भारताच्या एकात्मतेला आव्हान देतो आहे. नक्षलवादाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असलेली पहावयास मिळते. मुस्लीम तालिबानी, तमिळ वाघ, हिंदू अतिरेकी व खलिस्तानी दहशतवादी या ज्या संघटना आहेत त्यांचे उद्दिष्ट हे धर्माच्या आधारावर समाजाचे विघटन करणारे आहे हेच लोकशाहीला घटक आहे.

४. दहशतवाद –

दहशतवाद हि समस्या हळूहळू व्यापक होत चालली आहे. दहशतवादाचा कमी अधिक फटका सर्वच राष्ट्रांना बसतो आहे. भारताला दहशतवादामुळे मोठ्याप्रमाणात मानवी व आर्थिक हानीला सामोरे जावे लागते आहे. जम्मू काश्मीर व भारताच्या इतर भागात सातत्याने दहशतवादी कारवाया होत आहेत. भारताची आर्थिक व्यवस्था खिळखिळी करणे, नागरिकांमध्ये दहशत बसविणे, प्रादेशिक एकात्मतेला आव्हान देणे, हिंदू – मुस्लीम जातीय दंगली भडकावून देणे, भारताला अस्थिर करणे असे अनेक उद्देश यापाठीमागे आहेत. म्हणूनच दहशतवाद हे लोकशाहीला मोठे आव्हानच आहे.

५. भ्रष्टाचार –

भारतामध्ये भ्रष्टाचाराने आज सर्वच क्षेत्रात हस्तक्षेप केला आहे. अगदी ग्रामपंचायतीपासून ते दिल्लीपर्यंत भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. शासन आणि लोकप्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर भ्रष्टाचाराचा अनुभव येतो आहे. भ्रष्टाचाराची अशी काही नेमकी

उदाहरणे पहिली तर भ्रष्टाचाराने किती आक्राळ विक्राळ रूप धरण केले आहे हे समजून येईल. संरक्षण खात्यातील शस्त्रास्त्रे खरेदी प्रकरण, बोफोर्स प्रकरण, भूखंड विक्रीप्रकरण, हवालाकांड, टुजी स्पेक्ट्रमघोटाळा, कोळसा खाण वाटप इत्यादी उदाहरणावरून भ्रष्टाचाराने आपल्या राष्ट्रापुढे व समाजापुढे किती गंभीर आव्हान उभे केल आहे. आपल्या देशाच्या लोकशाही व्यवस्थेला भ्रष्टाचारामुळे मोठा धोका उत्पन्न झाला आहे.

६. वाढती लोकसंख्या-

वाढती लोकसंख्या हे भारतीय लोकशाही समोरील एक मोठे आव्हान आहे. भारताची लोकसंख्या निरंतर वाढत चालली आहे. शासनाने लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. तरीही लोकसंख्या वाढीचा वेग आटोक्यात आलेला नाही. आज जागतिक स्तरावर भारत लोकसंखेच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. एकूण जगाच्या लोकसंख्येत भारताचा वाटा १७ टक्के आहे तर जमीन मात्र २.५ टक्के आहे. यावरु असे लक्षात येते की वाढत्या लोकसंख्येमुळे समाजात इतर समस्या निर्माण होत आहे. बेरोजगारी, भूकबळी अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत.

७. बेरोजगारी –

वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारी हे एक लोकशाही समोर आव्हान निर्माण झाले आहे. प्रचंड लोकसंख्येमुळे प्रत्येकाच्या हाताला काम देणे शासनाला शक्य नाही. २०१६ मध्ये उच्चशिक्षित बेरोजगारी ४१.१ टक्के होती. ती २०१७ मध्ये ४२टक्के, तर २०१८ मध्ये त्यात वाढ झाली व ती ५५ टक्के एवढी झाली. एका अभ्यासानुसार २०१९ मध्ये २५ ते ३० वर्षातील असंख्य उच्चशिक्षित युवकांना कामच मिळाले नाही. याचे प्रमाण ४७ टक्के एवढे होते व २०२० मध्ये तर कोरोना ने कहरच केला त्यामुळे असंख्य लोकांना बेरोजगार रहावे लागले आहे. हि समस्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

८. दारिद्र्य –

लोकशाही समोर आणखी एक आव्हान म्हणजे दारिद्र्य होय. आर्थिक विषमतेमुळे समाजात श्रीमंत व गरीब अशी विषमतेची मोठी दरी निर्माण झाली आहे. भारतामध्ये सर्वात वरच्या ठरतील २० टक्के लोकसंख्येकडे ४७ टक्के संपती आहे याउलट तळाच्या २० टक्के लोकसंख्येकडे फक्त ८ टक्के एवढिक संपत्ती आहे. जे लोक दरिद्री आहेत ते अशिक्षित आहेत व निरक्षरही आहेत याचा परिणाम राष्ट्राच्या आर्थिक विकासावर होतो. अर्थात लोकशाही मध्ये जे सामाजिक न्यायचे तत्व आहे ते येथे प्रस्थापित होत नाही.

**निष्कर्ष** –

भारतीय लोकशाही ला जगातील आदर्श लोकशाही म्हणून ओळखले जाते. गेल्या ७५ वर्षाच्या कालखंडात भारतीय राजकारणात अनेक छोटे - मोठे बदल होत आलेले आहेत. लोकशाहीमध्ये सर्व नागरिकांचा राजकीय सहभाग अपेक्षित असतो. लोकशाहीमध्येच सर्वाना समान लेखले जाते, सर्वाना समान न्याय दिला जातो. परंतु आज लोकशाहीसमोर जी आव्हाने निर्माण झालेली आहेत त्यामुळे समाज जाती – जातीत विभागला जात आहे. निवडणुकित मताचे मूल्य ठरवले जात आहे. बनावट मतदान, निवडनुकी प्रती लोकांची उदासीनता, भ्रष्टाचार अशा एक ना अनेक लोकशाही विरोधी मुल्यांचा वावर आज समाजात आहे म्हणूनच खर्या अर्थाने लोकशाही धोक्यात आली आली आहे.

**संदर्भ :**


१. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण – डॉ. भा . ल. भोळे पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर

२. आधुनिक भारतातील राजकीय विचार - भा . ल. भोळे, पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर

३. भारतीय राज्य व शासन व्यवस्था – लोटे. रा. ज पिंपळापूरे पब्लिशर्स, नागपूर

४. लोकशाही एक चिंतन – सुरवाडे दिलीप (संपादक), लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद

# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**विलास साळुंखे**
राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**डॉ. अरुण चव्हाण,**
भोगावती महाविद्यालय, कुरुकली
ता. करवीर, जि. कोल्हापूर.

**गोषवारा:-**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये संसदीय लोकशाही शासन पद्धतीचा स्विकार करण्यात आला.ब्रिटिश राजवटीमध्ये केलेले कायदे हे लोकशाही शासन प्रणालीला पोषक होते. यामध्ये १८५८ चा कायदा, १९०९ चा कायदा, १९१९ चा कायदा, १९३५ चा कायदा,१९४७ चा कायदा यांचा समावेश होतो. भारतासाठी राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली आणि त्यानुसार राज्यघटना समितीची निर्मिती करण्यात आली.

**पारिभाषिक शब्द:** धार्मिकता,बेरोजगारी, भाषावाद,जागरूक मतदार इ.

**प्रस्तावना-**

इंग्लंडला लोकशाही शासनपद्धतीची जननी असे म्हणतात. आज जगभर लोकशाही शासनपद्धतीकडे एक आदर्श शासन व्यवस्था म्हणून पाहिले जाते. जागतिक राज्यांचा अभ्यास करता लोकशाही शासनाचा स्वीकार करणाऱ्या राज्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आढळते. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये जनतेचे शासन कार्यरत असते. त्या शासनाची निवड जनतेमधून निवडणुकांच्या माध्यमातून झालेली असते.

लोकशाहीमध्ये व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तिविकास जोपासण्यासाठी जनतेच्या सार्वभौमत्वाला प्राधान्य देण्यात आलेले दिसते.यामध्ये प्रत्येक प्रौढ व्यक्ती प्रत्यक्ष- अप्रत्यक्षपणे राज्यकारभारात सहभागी होतो.यामुळे राजकीय, सामाजिक, आर्थिक, समता निर्माण होऊन व्यक्तीचा सर्वांगीण विकास करणे हे उद्दिष्ट साध्य होते. इंग्लंड,अमेरिका ,भारत, स्विझर्लंड, जर्मनी, जपान, फ्रान्स यासह जगातील दोन तृतीयांश देशात लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे.लोकशाही शासन पद्धत ही इतर शासन पद्धतीपेक्षा श्रेष्ठ दर्जाची शासन पद्धत आहे.

**उद्दिष्टे :-**

१. लोकशाहीचा म्हणजे काय याचा अभ्यास करणे.
२. भारतीय लोकशाहीचा अभ्यास करणे.
३. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने यांचा अभ्यास करणे.

**विषय विश्लेषण :-**

**लोकशाहीचा अर्थ-**

लोकशाही (Democracy) म्हणजे लोकांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पद्धतीने चालवलेले शासन होय. लोकशाही (Democracy) हा शब्द लोक (Demos) आणि सत्ता (Krates) या दोन ग्रीक शब्दापासून तयार झाला आहे. प्राचीन ग्रीक नगर राज्यात जनता राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभाग घेत होती. त्यावेळी जनतेची प्रत्यक्ष सत्ता होती. मात्र आधुनिक काळात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष लोकशाहीत जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीमार्फत राज्यकारभार चालविला जातो.

**व्याख्या -**

लोकशाही ही संकल्पना स्पष्ट करताना विविध विचारांतांनी केलेल्या व्याख्या-

**१. अब्राहम लिंकन-**

"लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांसाठी, लोकांनी चालवलेले शासन होय".

**२. जे.एस. मिल-**

"लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की, ज्यामध्ये संपूर्ण किंवा बहुतांशी लोक आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधी मार्फत शासकीय सत्ता उपभोगतात".

**३. प्रा. हेरॉल्ड लास्की -**

"लोकशाही हे केवळ शासनाचे स्वरूप नाही तर ते समाजाचे राज्याचे तसेच आर्थिक व नैतिक व्यवस्थेचे एक स्वरूप आहे".

**४. महात्मा गांधी-**

"लोकशाही हा एक जीवन मार्ग होय".

**लोकशाहीचे प्रकार-**

लोकशाहीचे दोन प्रकार आहेत.

**१. प्रत्यक्ष लोकशाही-**

यामध्ये राज्यातील नागरिकांना राज्यकारभारात प्रत्यक्ष सहभागी होता येते. प्राचीन ग्रीक नगरराज्यांची लोकसंख्या मर्यादित होती. अथेन्स नगर राज्यात प्रत्येक प्रौढ ग्रीक नागरिकाला राज्यकारभारात भाग घेता येत होता. स्त्रिया, गुलाम ,परकीय यांना राज्यकारभारात भाग घेता येत नसे. यावेळी कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नव्हता. कायद्यासमोर सर्व समान होते.राज्यातील सर्व नागरिक एकत्र बसून राज्यकारभाराचे धोरण निश्चित करत. कायद्याची निर्मिती, अंमलबजावणी, न्यायदान ही सर्व कामे नागरिकांकडून प्रत्यक्षात केली जात होती. प्रत्यक्ष लोकशाहीचे फायदे राज्यातील काही थोड्या लोकांनाच मिळतात जास्त लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये ही शासन पद्धत उपयुक्त पडत नाही.

**२. अप्रत्यक्ष लोकशाही -**

राज्यांची वाढती लोकसंख्या व क्षेत्रफळ याचा विचार करता मोठ्या देशात प्रत्यक्ष लोकशाही ऐवजी अप्रत्यक्ष लोकशाही शासन पद्धत स्वीकारण्यात आली आहे. याला प्रातिनिधिक लोकशाही असे सुद्धा संबोधले जाते. जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीमार्फत राज्यकारभार चालविला जातो. विसाव्या शतकात सर्व लोकशाही राष्ट्रात प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. त्यानुसार मतदारसंघ निर्माण केले जातात व त्यामधून बहुमताने लोकप्रतिनिधींची निवड जनता करीत असते.निवडलेले प्रतिनिधी राज्यकारभाराचा कार्यकाल पूर्ण होईपर्यंत काम करीत असतात.

**भारतीय लोकशाही -**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये संसदीय लोकशाही शासन पद्धतीचा स्विकार करण्यात आला.ब्रिटिश राजवटीमध्ये केलेले कायदे हे लोकशाही शासन प्रणालीला पोषक होते. यामध्ये १८५८ चा कायदा, १९०९ चा कायदा, १९१९ चा कायदा, १९३५ चा कायदा,१९४७ चा कायदा यांचा समावेश होतो. भारतासाठी राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली आणि त्यानुसार राज्यघटना समितीची निर्मिती करण्यात आली.

२ वर्षे ११ महिने १८ दिवस अविरतपणे कार्य करून भारतासाठी एक राज्यघटना निर्माण करण्याचे काम पूर्णत्वाकडे आले. २६ जानेवारी १९५० पासून देशासाठी तयार केलेल्या राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाली. सामाजिक लोकशाहीचा पाया खंबीर केला तरच राजकीय लोकशाही टिकेल. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तीन जीवन तत्वातील एक तत्व गळाले तर सर्व लोकशाहीचा हेतूच विफल झाल्यासारखे होते. राजकारणातील विशिष्ट लोकांचा दरारा व मक्तेदारी तसेच सामाजिक विषमता हे दृश्य पालटले पाहिजे असे झाले नाही तर विषमतेची झळ लागलेला वर्ग राजकीय लोकशाहीचे कवच फोडून टाकल्याशिवाय स्वस्त बसणार नाही.असा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीत दिला होता.

भारतीय राज्यघटनेत आर्थिक लोकशाहीची कल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली. सामाजिक व आर्थिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही.कारण त्या आडव्या उभ्या धाग्यांनीच लोकशाहीचे वस्त्र विणले जात असते. असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले.

घटनात्मक तरतुदीनुसार भारतातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन भारतात संसदीय लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला. त्यासाठी देशात बहुपक्ष पद्धतीचा स्वीकार केला. या तरतुदीनुसार भारतामध्ये १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका पासून लोकशाही मार्गाने निवडणुका होऊन जनतेने निवडून दिलेल्या सरकारच्या माध्यमातून राज्यकारभार सुरू आहे. केंद्रात कोणत्या पक्षाचे सरकार असावे हे भारतीय जनता ठरवत असते.

आज भारतामध्ये राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, कम्युनिस्ट, समाजवादी पार्टी,जनता दल यासह अनेक राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष लोकशाही मार्गाने सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करताना दिसतात. लोकसभा या कनिष्ठ सभागृहात ज्या राजकीय पक्षाला किंवा आघाडीला बहुमत प्राप्त होते त्या पक्षाचा नेता पंतप्रधान म्हणून कार्य करतो. व तो आपले मंत्रिमंडळ निर्माण करतो. भारतीय राज्यघटनेच्या ७४ व ७५ व्या कलमात पंतप्रधान व मंत्रिमंडळ याविषयी तरतूद केलेली आहे. पंतप्रधान

आपल्या सर्व मंत्र्यांसह संयुक्तरित्या लोकसभेला जबाबदार असतो. भारतात पंतप्रधान हा वास्तवादी प्रमुख आणि राष्ट्रपती हा नामधारी प्रमुख आहे. भारताची संसद ही सार्वभौम आहे.

**भारतीय लोकशाही पुढील आव्हाने-**

भारताला स्वातंत्र्य मिळवून ७५ वर्षे पूर्ण झाली. सुरुवातीला देशात एकात्मता निर्माण करून देशाचे ऐक्य टिकवणे अवघड आहे व अल्पावधीतच देशाचे विघटन होईल अशी भीती अनेकांनी व्यक्त केली होती. मात्र ही भीती खोटे ठरवण्याचे काम भारतातील जनतेने आणि येथील लोकशाहीने केले आहे. स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीचा विकास होत असताना सामाजिक,आर्थिक, राजकीय इ. क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

आधुनिकतेची कास धरत असताना विकासाचे अनेक टप्पे पार करून भारतीय लोकशाहीने आपल्या अस्तित्व टिकवून ठेवले आहे. या भारतीय लोकशाही समोर काही आव्हाने सुद्धा असलेली दिसून येतात.

**१. धर्मांधता -**

भारतातील धार्मिक विविधता लक्षात घेऊन एकसंघ समाजाच्या उभारणीसाठी व सांप्रदायिक सहजीवनाची प्रेरणा वाढीस लागावी या हेतूने घटनाकारांनी धर्मातीत राज्याचा स्वीकार केला.राज्य घटनेच्या कलम २५ ते २८ मध्ये भारतीय नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क देण्यात आला आहे. धर्मामध्ये राज्य हस्तक्षेप करणार नाही, धर्म ही व्यक्तिगत बाब आहे,सर्वधर्म समभाव, प्रत्येकाला व्यक्तिगत जीवनात धार्मिक स्वातंत्र्य आहे अशी व्यवस्था निर्माण करण्यात आली. अलीकडच्या काळात देशात धार्मिक कट्टरता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे संघर्षाची चिन्हे वाढताना दिसतात. प्रत्येकाला आपला धर्म संकटात आल्यासारखे वाटते. त्यातून परस्पर धर्माविरोधी भूमिका घेतली जाते. भारतात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन,बौद्ध, फारशी, शिख इ. धर्माचे लोक राहतात. भिन्नधर्मी लोकांच्यात परस्पर सहकार्याची भावना दिसत नाही.

**भारतामध्ये धार्मिक विषमतेतून अनेक दंगली घडलेल्या आहेत.**

१. १९५० -मध्ये दिल्ली, कलकत्ता, अलीगड, मुंबई येथे जातीय दंगली झाल्या होत्या.
२. १९६९- मध्ये गो-हत्या या कारणावरून गुजरात मधील अहमदाबाद येथे दंगल झाली होती.
३. १९७०-मध्ये भिवंडी शहरांमध्ये दंगल झाली होती.
४. १९७९- मध्ये रामनवमीच्या मिरवणुकीवरून जमशेदपूर येथे दंगल घडविण्यात आली होती.
५. १९८४-मध्ये पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्ली येथे दंगल उफाळली होती.
६. १९९२-९३- मध्ये बाबरी मशीद पाडल्यानंतर मुंबई, गुजरात येथे दंगली झाल्या होत्या.
७. २००२- मध्ये गोध्रा येथे हिंसाचार काढून आला होता.

भारतात धर्म आणि निवडणुका यांचा जवळचा संबंध असलेला दिसून येतो. राजकीय पक्ष मते मिळवण्यासाठी धर्माचा वापर करताना दिसतात. निवडणुकांमध्ये धर्माची भूमिका महत्वपूर्ण असल्याचे जाणवते.समान नागरी कायदा, तिहेरी तलाक, 370 कलम रद्द,राम मंदिर, बाबरी मशीद, धार्मिक आरक्षण हे जमातवादी राजकारणाला खतपाणी घालण्याचे काम करताना दिसतात.

**२. जातीय राजकारण -**

भारतीय लोकशाहीला जातीयतेची कीड लागली आहे. भारतामध्ये जात हा अत्यंत महत्त्वपूर्ण घटक ठरत आहे. भारतीय लोकशाहीत निवडणुकांमध्ये उमेदवारांच्या निवडीपासून ते मंत्रिमंडळात समावेश करण्यापर्यंत जात हा घटक महत्त्वाचा ठरत आहे.मुख्यमंत्री ते पंतप्रधान निवडीवर या घटकाचा प्रभाव पडताना दिसतो. तसेच मतदारांचे वर्तन सुद्धा जात या घटकाने प्रभावित केलेले आपणाला दिसते. विविध राजकीय पक्षांची एक 'व्होट बँक' म्हणून जात या घटकाकडे पाहिले जाते. भारतात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य,शूद्र या चार वर्णात 3000 जाती- उपजाती आढळतात. जन्मावरून जात ठरत असून आपलीच जात सर्वश्रेष्ठ असा अहमगंड मनात तयार होतो. जाती-जातीमध्ये श्रेष्ठत्वासाठी वर्चस्व साठी संघर्ष दिसून येतो.

भारतातील घटक राज्यात विविध जातींची जातींचा प्रभाव आहे.

महाराष्ट्र- मराठा,ब्राह्मण,लिंगायत,मागासवर्गीय जाती कर्नाटक-लिंगायत, ओक्कलीगा

केरळ-नायर, इझवा

आंध्र प्रदेश- रेड्डी, कम्मा

तामिळनाडू - मुडलियार,गौडर, पद्याची

बिहार- रजपूत, ब्राह्मण, कायस्थ व आदिवासी

**३. दारिद्र्य -**

दारिद्र्य या घटकाचा लोकशाहीवर विदारक परिणाम होत आहे. दारिद्र्य या घटकामुळे बेकारी, उपासमार, राहणीमानाचा कनिष्ठ दर्जा असे अनेक प्रश्न निर्माण होतात. भारतात लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर प्रथम आपणाला राजकीय लोकशाहीबरोबरच आर्थिक व सामाजिक लोकशाही प्रस्थापित करावे लागेल असा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला होता. भारतातील आर्थिक विषमतेमुळे गरीब आणि श्रीमंत अशी विषमतेची दरी निर्माण होत आहे. देशात २०% लोकांकडे ४७% संपत्ती केंद्रित आहे. तर तळाच्या २०% लोकांकडे फक्त ८% संपत्ती आहे. दारिद्र्य असलेल्या लोकांच्यात निरक्षरता किंवा अल्पशिक्षितपणा जास्त दिसतो.

भारतीय राजकारणावर दारिद्र्य या घटकाने प्रभाव पडला आहे. निवडणुकीच्या काळात संपत्ती वाटून, जेवणावेळी घालून, विविध वस्तूंचे वाटप करून मतांची क्रय-विक्री होते व निवडणुका संपन्न होतात. ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परिषद, विधानसभा, विधान परिषद,लोकसभा, राज्यसभा इ. निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात पैशाचा घोडेबाजार सुरू असतो. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी शासनाने विविध कार्यक्रम व योजना तयार करून त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

**४. भाषावाद -**

भाषा म्हणजे एका व्यक्तीच्या भावना दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचे एक प्रभावी माध्यम होय. आज हाच भाषावाद भारतीय लोकशाही समोर आव्हान ठरत आहे.भारत हा बहुभाषिक देश आहे. राष्ट्रभाषा हिंदी की इंग्रजी यावरून वाद सुरू आहे.देशात एकूण २२ प्रमुख भाषा आहेत. तसेच भाषावार प्रांतरचनेनुसार काही घटक राज्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

हिंदी ही राष्ट्रभाषा मानली असली तरी दक्षिणेकडील तामिळनाडू,कर्नाटक, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ या राज्यांचा हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून स्वीकार करण्यास विरोध आहे.स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षे पूर्ण झाली तरी भाषेचा वाद मिटला नाही. आज

त्रिभाषा सूत्रानुसार सर्व व्यवहाराची प्रादेशिक भाषा, हिंदी व इंग्रजी भाषा मान्य केली आहे. भाषेबाबत उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांच्यात सुरू असलेल्या वादात भारतीय जनतेचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहे .भाषावादावरून घटक राज्यात सीमावाद निर्माण होत आहे.मुंबईमध्ये मराठीच्या सक्तीसाठी राजकीय पक्षांनी तोडफोड केली होती.

**५. निरक्षरता -**

लोकशाही यशस्वी होण्यासाठी राज्यात सुशिक्षित सुजाण व सुसंस्कृत नागरिक असावे लागतात. इंग्लंड, स्विझर्लंड, फ्रान्स इ. प्रगत देशात साक्षरतेचे प्रमाण १००% असल्यामुळे तेथे लोकशाही पद्धत यशस्वी व स्थिर झाली आहे.भारतात २०११ च्या जनगणनेनुसार ७४.४०% टक्के लोक साक्षर आहेत तर २५.६०% लोक निरक्षर आहेत. सर्वाधिक साक्षरता केरळ (९२.९१%) मध्ये तर सर्वाधिक निरक्षरता बिहार (३४.२०%) मध्ये आढळते.

निरक्षर, अज्ञानी मतदारांचा गैरफायदा धनिक, सुशिक्षित, राजकीय लोक उठवत आहेत. साक्षर-निरक्षर अशी विषमता समाजामध्ये निर्माण होत आहे. निरक्षरांचे राजकीय शोषण मोठ्या प्रमाणात होत आहे. भारतीय समाजाच्या वर्ग व्यवस्थेत निरीक्षरांना श्रमाची, कष्टाची कामे कमी मोबदल्यात करावी लागत आहेत. त्यांना राहणीमानाचा दर्जा, आरोग्य, आर्थिक, सांस्कृतिक संपन्नता या गोष्टी समजत नाहीत. भारतात शासनाने निरक्षरता निर्मूलनासाठी अनेक उपाययोजना सुरू केल्या आहेत. यास काही प्रमाणात यश मिळाल्याचे दिसून येते.

**६. बेकारी -**

जगात सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताची ओळख आहे.लोकसंख्येच्या बाबतीत भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे देशात बेकारीची समस्या अधिक तीव्र होताना दिसत आहे. यामध्ये सुशिक्षित आणि अशिक्षित बेकार आढळतात. सातत्याने लोकसंख्येत होणारी वाढ, निरक्षरता, भांडवलांची कमतरता,मंदी ,उत्पादनात सतत होणारी घट, विविध कारणामुळे उद्योग बंद होणे इ. कारणामुळे बेकारी मध्ये वाढ होत आहे,

भारतात २०१६ मध्ये उच्चशिक्षित बेरोजगारी ४१.०१% होती. २०१७ मध्ये ४२ % तर २०१८ मध्ये ५५% एवढी वाढ झाली. २०२० मध्ये कोरोना रोगाचा प्रादुर्भाव सर्व जगभर होता.याचा फटका मोठ्या प्रमाणात बसला.भारतात यामुळे तरुणांच्या हाताला काम मिळाले नाही. सुस्थितीत असणारे अनेक उद्योग बंद पडले.अनेकांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या. कोरोना काळात बंद पडलेले अनेक उद्योग अजूनही सुरू झालेले नाहीत. उद्योगाबरोबर शेती व्यवसाय विकसित झाला नाही. अलीकडच्या काळात खाजगीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, यांत्रिकीकरण, संगणकाचा वापर, दळणवळणाची सोय इ. कारणामुळे बेकारीत मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसते.

**७. प्रांतवाद - प्रादेशिक असमतोल**

भारतासारख्या विशाल देशात प्रांतवाद मोठ्या प्रमाणात आढळतो. प्रादेशिक समतोल राखावा यासाठी घटक राज्यांचे निर्मिती स्वातंत्र्यानंतर करण्यात आली. मात्र त्यातून उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय असा वाद निर्माण झाला आहे. उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश या भागातील अनेकांना रोजगारासाठी महाराष्ट्र (मुंबई, पुणे, ठाणे) आणि गुजरात (अहमदाबाद, सुरत) मध्ये आल्यावर मोठ्या प्रमाणात समस्यांना सामोरे जावे लागते. महाराष्ट्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना उत्तर भारतीयांनी

त्यांच्या भागात परत जावे,स्थानिकांना नोकऱ्या व उद्योगांमध्ये प्राधान्य मिळावे यासाठी प्रयत्न करताना दिसतात. आपण प्रथम भारतीय आहोत ही भावना निर्माण होणे सर्वांच्यात आवश्यक आहे.

प्रादेशिक असमतोल निर्माण होण्यासाठी नैसर्गिक साधन संपत्ती, जमीन, पर्जन्य, नद्या, भांडवल, इ. घटकांचा प्रभाव पडतो. मुंबई, पुणे, कलकत्ता, दिल्ली, अहमदाबाद, चंदिगड यासह अन्य शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उभा राहिले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाकडून शहराकडे मोठ्या प्रमाणात नोकरीसाठी स्थलांतर होताना दिसते. शहरी भागाच्या विकास झाला मात्र ग्रामीण भाग विकासापासून वंचित राहिला आहे.अनेक सोईसुविधा मिळत नाहीत. त्यामुळे प्रादेशिक विषमता निर्माण झाली. लोकप्रतिनिधींच्याकडे आपल्या भागाचा, प्रदेशाचा विकास घडवून आणण्याची राजकीय इच्छाशक्ती दिसत नाही. यामुळे प्रादेशिक विषमता वाढतच आहे.

**८. राजकारणाचे गुन्हेगारीकरण -**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरुवातीच्या काळामध्ये भारतात मोठ्या प्रमाणात वैचारिक राजकारण सुरू होते. हळूहळू वैचारिक राजकारणाचा लोप झालेला दिसून येतो. निवडणुकीत विचारांपेक्षा अन्य मुद्यांना महत्त्व प्राप्त झालेले आहे.सत्तेसाठी राजकीय पक्ष तत्व, संकेत, बाजूला सारून बेरजेचे राजकारण करीत आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या उमेदवारांना पक्ष संघटनेत सहभागी करून घेवून त्यांना उमेदवारी दिली जाते. गुन्हेगारांना राजकीय संरक्षण दिले जाते. निवडणूक काळात गुन्हेगारांचा वापर करून हिंसाचार घडवून आणला जातो. राज्यकर्ते आणि गुन्हेगार यांचे परस्पर संबंध निर्माण झाल्यामुळे लोकशाही समोर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सत्ता, पैसा आणि गुंडगिरी यांची झालेली युती लोकशाहीला घातक ठरत आहे. पैसा आणि शक्तीच्या बळावर आपण निवडणुका सहज जिंकू शकतो अशी धारणा राज्यकर्त्यांमध्ये निर्माण झालेली दिसून येते. राजकारण हा चारित्र्यसंपन्न, बुद्धिमान, सज्जन, तत्वनिष्ठ ,वैचारिक लोकांचा प्रांत आहे, गुंडांचा नाही अशी प्रवृत्ती वाढीस लावणे आवश्यक आहे.देशातील अनेक भागात बंदुकीच्या टोकावर, गुंडांकडून दबाव टाकून निवडणूक काळात मते मिळविण्याचे प्रकार घडत आहेत.उमेदवारांच्या प्रचारासाठी गुंडांचा वापर केला जात आहे. प्रचार सभांमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रांचा वापर करून मतदारांना भयभित करण्याचे प्रकार घडत आहेत.राजकारणात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारांचा वावर सुरू आहे.राजकीय व्यवस्थेवर त्यांचा दबाव असलेला दिसतो. हे राजकीय गुन्हेगारीकरण रोखण्याचे एक मोठे आव्हान लोकशाही समोर आहे.

**९. नक्षलवाद-**

नक्षलवादाचे एक मोठे आव्हान भारतीय लोकशाही समोर उभे आहे. नक्षलवादामुळे भारताची एकता आणि अखंडता धोक्यात आली आहे. शेतकरी व आदिवासी यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी नक्षलवाद सुरू झाला. हे नक्षलवादी सरकार विरोधात हिंसक विरोध करतात. सैन्य, पोलीस दलावर सशस्त्र हल्ले करतात. कव्हाही चटर्जी यांना भारतीय नक्षलवाद विचारसरणीचे जनक मानले जाते.

नक्षलवादाकडे दुर्लक्ष केल्यामुळे चीन भारताविरोधी कारवाई करताना दिसतो. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नक्षलवाद्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ती आज राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाईल अशी समस्या बनली आहे. दिवसेंदिवस त्यांचे कार्यक्षेत्र वाढताना दिसते. सध्या नक्षलवादाने धारण केलेले उग्र रूप आणि त्यामधून माओवाद्यांचा झालेला शिरकाव भारतीयांना अनाकलनीय आहे.

स्वातंत्र्यानंतर आपल्या न्याय हक्कासाठी उभी राहिलेली नक्षलवादी चळवळ होय. त्यांच्या मागण्याकडे सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे ती वाढत गेली. त्यांच्या अतिरेकी स्वरूपाच्या मागण्या व कार्यशैलीमुळे आज नक्षलवादाचे खूप वाईट दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. अर्थव्यवस्था, सुरक्षा, परराष्ट्र धोरण, कायद्याचे राज्य यासह अनेक क्षेत्रावर याचा परिणाम होत आहे. पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, आंध्र प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र, छत्तीसगड, उत्तर प्रदेश, आणि मध्य प्रदेश या घटक राज्यात नक्षलवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात दिसतो.

**भारतातील काही नक्षलवादी घटना**

छत्तीसगडमध्ये सुकमा येथे नक्षलवादी हल्ला झाला. यामध्ये २५ जवान शहीद झाले.

दंतेवाडा नक्षलवादी हल्ल्यात ७६ जवान शहीद झाले.

१३ फेब्रुवारी २०१० मध्ये ईस्ट फ्रंटीयर रायफल कॅम्पवर नक्षरवादी हल्ला झाला यामध्ये २० जवान शहीद झाले. १ मार्च २०१७ मध्ये सुकमा या ठिकाणी नक्षलवादी हल्ला झाला. यामध्ये ११ जवान शहीद झाले. ११ मार्च २०१४ मध्ये झिराम खोऱ्याजवळ नक्षलवादी हल्ला होऊन त्यामध्ये १५ जवान शहीद झाले.

नक्षलवादी रेल्वे, सुरक्षा दलाच्या छावण्या, पूल, शाळा, पोलीस स्टेशन ,रुग्णालय येथे सशस्त्र हल्ले करून मोठ्या प्रमाणात जीवित हानी करताना दिसतात. नक्षलवाद्याची समस्या सोडवण्यासाठी सरकारने १४ कलमी योजना तयार केली आहे. नक्षलग्रस्त भागात सामाजिक आणि आर्थिक विकासावर भर दिला आहे.

**१०. भ्रष्टाचार-**

भ्रष्टाचार ही भारताच्या राजकीय, धार्मिक,सामाजिक क्षेत्रात एक गंभीर समस्या बनली आहे. भ्रष्टाचाराच्या समस्येमुळे सर्व क्षेत्रातील प्रगती रखडली आहे. आज पर्यंत भारताचे विकसित देशात रूपांतर झाले नाही तर विकसनशील देश म्हणून ओळख निर्माण झाली याचे कारण भारतामध्ये वाढत चाललेला भ्रष्टाचार हे मानावे लागेल.

भारतात चारा घोटाळा, दूरसंचार घोटाळा कोळसा घोटाळा, शेअर बाजार घोटाळा, शस्त्रास्त्र खरेदी घोटाळा, भूखंड खरेदी घोटाळा,कोळसा खान घोटाळा, राफेल घोटाळा असे अनेक घोटाळे झालेले दिसून येतात. पोलीस यंत्रणा, शिक्षण संस्था, दिल्लीपासून ग्रामपंचायत स्तरावर, प्रशासकीय क्षेत्रात, महामंडळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार दिसत आहे. जनतेच्या विकासासाठी मंजूर केलेला पैसा जनतेसाठी न वापरता भ्रष्ट मार्गाचा वापर करून तो मिळवला जातो. भ्रष्टाचारा विरोधात कडक कायदे नसल्यामुळे तो फोफावत आहे.

आज सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार हा एक शिष्टाचार झाला आहे. यामधून असुरक्षितता, गुंडगिरी, तस्करी, काळाबाजार इ. प्रश्न समाजासमोर उभे राहिले आहेत.प्रामाणिकपणे प्रशासनात काम करणाऱ्यांना असुरक्षितता वाढली आहे. कारण भारतात राजकारण आणि भ्रष्टाचार यांचे गटबंधन निर्माण झाले आहे. निवडणुकीत पैसा व अन्य घटकांचा वापर करून सत्ता प्राप्त केलेले राजकीय नेतृत्व भ्रष्टाचाराच्या मोहाला बळी पडतात. यातून बोफोर्स प्रकरण, भूखंड विक्री प्रकरण, हवाला प्रकरण, टू जी स्पेक्ट्रम घोटाळा अशी प्रकरणी घडली आहेत. राज्यकर्त्यांकडून भ्रष्टाचार संपवण्याच्या फक्त घोषणाच होतात मात्र कार्यवाही होताना दिसत नाही.

**११. आरक्षण -**

भारतात स्वातंत्र्यानंतर आरक्षण या मुद्द्यावर मोठ्या प्रमाणात वादविवाद सुरू आहेत. आरक्षणाचा वापर राजकीय पक्षांनी स्वतःच्या फायद्यासाठी करून घेतलेला दिसतो. भारतीय राज्यघटनेत मागासलेल्या समाजासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे.तसेच राजकीय क्षेत्रात सुद्धा आरक्षणाची तरतूद केली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात आरक्षणाबाबत कालेलकर आयोग व मंडल आयोग निर्माण केले. भारतात बहुजन समाजाची संख्या ७५% आहे यापैकी इतर मागासवर्गीय समाज ५२% तर मागासवर्गीय समाज २२.५% आहे. हा मागासवर्गीय वर्ग ज्ञान, संपत्ती, अधिकार यापासून वंचित आहे.

स्वातंत्र्यानंतर विषमता असणाऱ्या समाजात समानता प्रस्थापित करण्यासाठी घटनेत आरक्षणाची तरतूद करण्यात आली. दलित व मागासवर्गीयांना शिक्षण व नोकऱ्यांमध्ये संधी मिळावी यासाठी आरक्षण दिले. आरक्षण हे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या मागे पडलेल्या समाजाला सर्वांच्या बरोबरीने येण्यासाठी निर्माण केलेली एक संधी आहे. मागील काही वर्षांमध्ये देशात आरक्षणाबाबत अनेक मोर्चे आंदोलने झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात मराठा समाजाला, धनगर समाजाला,लिंगायत समाजाला, ब्रांम्हण समाजासह अन्य समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मुकमोर्चे काढण्यात आले होते.

**निष्कर्ष-**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय लोकशाहीचा विकास होत आहे. घटनाकारांनी तयार केलेल्या राज्यघटनेतील तरतुदीनुसार भारतीय लोकशाही प्रबळ होत आहे. परंतु या लोकशाही समोर अनेक आव्हाने निर्माण होत आहेत. या आव्हानांना तोंड देण्याचे काम भारतीय सरकारकडून केले जात आहे.याला जनतेची साथ आवश्यक आहे.आव्हानांची तीव्रता कमी करून देशाच्या प्रगतीच्या वाटा पुढे घेऊन जाण्याचे काम वेळोवेळी सत्तेत आलेल्या सरकारकडून केले जात आहे. लोकशाही समोरील आव्हाने कमी करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न सुरू असून त्यासाठी आवश्यक तरतुदी केल्या जात आहेत.भारतातील पक्षीय राजकारण, सत्तालालसा, व्यक्तिद्वेश, धर्मांधता, सत्तेचा गैरवापर यामुळे काही समस्या जटिल होत चालल्या आहेत.

लोकांमध्ये राष्ट्रवाद, राष्ट्रप्रेम निर्माण करून जनतेचा विकास साधण्याचे काम अविरतपणे सुरू आहे. लवकरच भारत जागतिक महासत्ता होईल असा आशावाद निर्माण होत आहे.राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे स्वतःचे एक स्थान निर्माण झालेले आपणाला पाहायला मिळते.

**उपायोजना**

१. धर्माधर्मातील तेढ कमी करून सर्वधर्मसमभाव निर्मितीसाठी प्रयत्न करणे. त्यासाठी प्रत्येकाने आपापल्या धार्मिक अधिकारांचा योग्य पद्धतीने वापर करावा व अन्य धर्मीयाच्या अधिकारावर आक्रमण करू नये.
२. राजकीय क्षेत्रात जातीयतेला जास्त महत्व न देता वैचारिक पद्धतीने सर्वसमावेशक राजकारणास प्राधान्य द्यावे. जातीय तेढ निर्माण होणार नाही अशी व्यवस्था निर्माण करावी.
३. भारतातील दारिद्र्य निर्मूलनासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करून गरीब -श्रीमंत अंतर कमी करण्यासाठी उपाय योजना करावी. समाजवादी विचारांचा वापर करावा.

४. हिंदी की इंग्रजी यामध्ये सुरू असलेला भाषावाद संपुष्टात आणून सर्व सहमतीने राष्ट्रभाषा म्हणून हिंदी भाषे साठी प्रयत्न करावेत. तसेच अन्य प्रादेशिक भाषांचे महत्त्व कमी करू नये.

५. देशातील निरक्षरता कमी करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे. प्राथमिक शिक्षणा प्रमाणे उच्च शिक्षण सक्तीचे व मोफत करावे. ग्रामीण भागात शैक्षणिक सोईसुविधा देण्याकडे लक्ष द्यावे. उपस्थिती वाढवण्यासाठी प्रयत्न करावे.

६. भारतात बेकारीचे प्रमाण मोठे आहे हे कमी करण्यासाठी उद्योग उभारणे, तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करावी. व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य देवून तरुणांना उद्योगासाठी प्रेरित करावे.

७. राष्ट्रप्रेम निर्माण करून आम्ही सारे एक आहोत,भारतीय प्रथम आहोत ही भावना वाढीस लावावी. यासाठी प्रयत्न करावे.

८. भारतातील प्रादेशिकता वाद कमी करण्यासाठी सर्व राज्यांचा समान विकास करावा.प्रादेशिक समतोल राखण्यासाठी प्रयत्न करावेत. राज्या- राज्यांमध्ये निधी वाटप करताना भेदभाव करू नये. केंद्र आणि घटकराज्य यांच्यातील संबंधाबाबत पुनर्विचार करावा. दोहोंमध्ये सलोखा निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न करावे.

९. राजकारणातील गुन्हेगारीकरण रोखण्यासाठी प्रयत्न करावेत. कडक कायद्यांची अंमलबजावणी करावी. गुन्हेगारांना राजकीय आश्रय देवू नये.

58.6 percent of respondents did not have voter ids. The native place (rural/urban) or gender does not make any difference in terms of possession of voter id. But the stream of education (BA or BBA) does register a difference where BA stream students have more number of students with voter id where the students of professional stream of BBA have less percentage of the same.


(The study registers the importance of Humanities.)





Eight out of 24, that is one third of those who had voter id, had voted in any election. Seven out of those eight were male and only one female.





This shows the relevance of local politics, local leaders and their work and campaigning in bringing them in the fold of politics. Large number of people are locally politically enamoured, whether they are ideologically inclined to a political thought or not. This has a specific learning for the structure and for the ideological structure of politics.





Seventy -five percent of the respondents said that they would vote as per their own thinking after receiving advice from other. This reutters what other studies of voting behaviour happened in India have found. The next largest chunk replied that they would take advice from male members of the family.





Half of the respondents say that read newspaper daily. Only a small percentage said they never read newspaper.





The largest number of respondents use WhatsApp more that any other social media.




The largest number of respondents use WhatsApp more than any other social media. 86% that is a large majority say that they consume and/or pass on political news on social media. This underlines the importance of social media in shaping the political discourse among the young.





A substantial percentage (43.9) of total respondents said they pass on the political news read or watched on social media.





For 54.9% respondents the candidate's work in the constituency is the major factor that influences or would influence their decision of whom to vote. This again show a mark of the importance of local politics for these voters or would-be voters.





The fact of 72.7% identifying with 'development' as the most important issue and only 10.9% considering it employment indicates the hold of perception versus the immediate concern among the young voters.




64.9 % voters know about the NOTA option on the ballot. This question was asked to assess the awareness or information on voting scenario, the number indicates a good awareness among the responding students.





The responses contradict with the earlier ones where the work of candidate was voted the first place among deciding factors. For 61.1% respondents, the party leadership is very important compared to party or candidate. This underlines the importance of or hold of the idea of leader vis-à-vis ideology for this category of voters.




The responses to this question are interesting. 68.5 % think the personality of the candidate matters the most to them. No respondent chose caste or religion of the candidate as the answer. A large chunk has chosen 'none above' as their response. This might not be the real picture. This shows a peculiar difference the young age of the respondents might make.

खलीलपैकी कोणत्या शासनाला तुम्ही अधिक महत्त्व देता?


55 responses





A percentage of 58.2 think the Central government is the most important layer of government. Twenty-five percent think it is the local government and 16.4% think it the State government. This contradicts the fact that the maximum number who have voted have voted in the election of local-self-government. This difference or dissociation can be attributed either to the constitutional knowledge or to the perception created by the advertisement and nature of political discourse. The former attribution would not be in sync with the responses received for the many of the rest of the answers. Hence it shows the penetration of the established political discourse where the national leadership holds place of prominence.

खालीलपैकी कोणती गोष्ट तुम्ही केली आहे का?

54 responses




Though 37 percent say they have done no political act mentioned, the respondent students cannot be called politically *apathetic*. 16.7 percent have participated on electoral campaigning, listened to political campaigning speeches, read political news/information, told others positively about party or candidates. A further 18.2% have done either two of the above-mentioned things. 7.4 % have participated on electoral campaigning.




Forty-seven percent respondents indicated making a prescribed educational qualification an eligibility requirement of candidates as their choice for the most urgent electoral reform. The second largest chunk chose making voting mandatory as the most needed electoral reform. The least percentage (9.4%) of respondents chose bringing political parties in the purview of right to information as the most urgently needed reform. This pattern of thinking is in line with the popular beliefs regarding the causes of ills in the political system; these beliefs don't align with the academic and deeper analysis of the ills of our politics. The former political opinions are suitable to the interests of the establishment, less threatening to the sustenance of the core problems.

**Conclusion:** This small study brings out some important patterns and learnings about attitude toward political discourse and voting among college students in the institution. It shows a clear hold of dominant narratives on them – the narrative of undefined 'development', the narrative of significance of leadership as opposed to political values, the narrative of supreme place of Central government in democracy. This learning coincides with the observation presented in Kumar (2024) that the youth favour the ruling party at the national level.

The study also underlines the importance of having Social Sciences as prominent stream of study in education system of the country. The students studying in BA show better awareness of their voting rights.

The study has reasserted the influence of social media as a source of formation of political opinions among students. Social media is a not a valid source of knowledge and hence this conclusion of the study comes as a challenge to the democracy where knowledge is a necessary condition for forming free opinions.

The voting attitudes and patterns among the youth and the sources of their political socialization need to be studied and taken seriously as they from the basis of the present and future of our democracy.

**References:**

1) Kumar Sanjay. 2014. The Youth Vote Made a Difference for the Victory of the BJP. *Research Journal Social Sciences.*Vol.22, No.2.
2) Tiwari Soumya. 2019. Data Check: 45 Million new young voters could play a key role in 2019 elections. *Scroll.in*. https://scroll.in/article/913411/data-check-45-million-new-young-voters-could-play-a-key-role-in-2019-elections

# भारतीय लोकशाहीची अमृतमहोत्सवी वाटचाल व त्यापुढील आव्हाने

**डॉ. संजय सागरू सपकाळ,**
राज्यशास्त्र विभाग,
श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय
आटपाडी, जि. सांगली,
मेल : sanjaysapkal71@gmail.com

**सारांश:** आज देशभर प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ख्याती आहे. परंतु लोकशाही म्हणजे नेमकं काय? तर लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व नि:पक्षपाती निवडणूकांद्वारे लोकांनी निवडणून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य, लोकशाही हा डेमॉक्रसी या इंग्रजी संज्ञेचा मराठी प्रतिशब्द डिमॉस (Demos) म्हणजे सामान्य लोक आणि क्रसी (Cracy) म्हणजे सत्ता अथेन्समध्ये लोकशाही राज्यपद्धतीचे बीज आढळते. ग्रीकांप्रमाणेच प्राचीन रोमनांनी प्रजासत्ताकाद्वारे रोममध्ये लोकशाहीचा प्रयोग केला. लोकशाहीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रमुख प्रकार सामान्यत: मानले जातात.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, अमृतमहोत्सवी वाटचाल, प्रतिनिधित्व, तुलनात्मक राजकारण

**प्रस्तावना :**

आज देशभर प्रजासत्ताक दिन साजरा केला जातो आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून भारताची ख्याती आहे. परंतु लोकशाही म्हणजे नेमकं काय? तर लोकशाही म्हणजे प्रौढ मताधिकाराच्या आधारे खुल्या व नि:पक्षपाती निवडणूकांद्वारे लोकांनी निवडणून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालणारे राज्य, लोकशाही हा डेमॉक्रसी या इंग्रजी संज्ञेचा मराठी प्रतिशब्द डिमॉस (Demos) म्हणजे सामान्य लोक आणि क्रसी (Cracy) म्हणजे सत्ता अथेन्समध्ये लोकशाही राज्यपद्धतीचे बीज आढळते. ग्रीकांप्रमाणेच प्राचीन रोमनांनी प्रजासत्ताकाद्वारे रोममध्ये लोकशाहीचा प्रयोग केला. लोकशाहीचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष लोकशाही असे दोन प्रमुख प्रकार सामान्यत: मानले जातात.

आधुनिक काळात ‘लोकशाही’ हा शब्दप्रयोग सामान्यपणे अप्रत्यक्ष लोकशाही या अर्थाने केला जातो. पण स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रेलिया या दोन देशातून मात्र प्रत्यक्ष लोकशाही अस्तित्वात आहे. स्वित्झर्लंडमध्ये वर्षातून काही दिवस सर्व नागरिक एकत्र जमतात. यावेळी सर्वच विधेयके चर्चेसाठी जनतेपुढे ठेवण्यात येतात आणि बहुमताने निर्णय घेतात. ही पद्धत ऑस्ट्रेलियाच्या संविधानातही नमुद केलेली आहे. परंतु तिचा प्रामुख्याने उपयोग संविधान दुरुस्तीच्या संदर्भातच करण्यात येतो. प्रतिनिधिक लोकशाहीचे संसदीय व अध्यक्षीय लोकशाही असलेले दोन प्रमुख प्रकार आढळतात. संसदीय लोकशाहीमध्ये मंत्रीमंडळ आणि संसद परस्परांवर अवलंबून असतात आणि मंत्रिमंडळ हे संसदेला जबाबदार असते. बहुमतातील पक्षाचा नेता हा पंतप्रधान असतो. भारतासह ग्रेट ब्रिटन, कॅनडा, ऑस्ट्रेलियात ही पद्धत रूढ आहे. अध्यक्षीय

शासन पद्धतीत मंत्रीमंडळ संसदेपासून अलिप्त असते आणि अध्यक्ष जनतेकडून सरळ निवड होते. ही पद्धत प्रामुख्याने अमेरिकत आढळते.

आधुनिक लोकशाहीत नागरिकांकडे फक्त मतदारांचीच भूमिका असते. दोन निवडणूकांमधील कालावधीत नागरिकांकडे काहीच काम नसते. त्यामुळे कार्य पद्धतीत नागरिकांचा सक्रीय सहभाग नसतो. आणि काही निवडक लोकच प्रत्यक्षात राज्यकारभार करीत असतात. व त्यांचे समाजावर वर्चस्व असते. अशी लोकशाहीवर टिका करण्यात येते. बहुपक्षीय पद्धती असलेल्या बहुतेक सर्व देशात बहुमतातील पक्ष, सत्ता, हस्तगत करतो परंतु निवडणूकीत अनेकदा इतर सर्व विरोधी पक्षांच्या तुलनेत संख्यात्मकदृष्ट्या त्या पक्षास प्रत्यक्षात कमी मत मिळालेली असतात. त्यामुळे 'बहुमताच राज्य' ही लोकशाहीतील मूळ कल्पनाच व्यवहारात नाकारली जाते. लोकशाहीतील जे मूलतत्वे स्वातंत्र, समता, न्याय, बंधुत्व या तत्त्वावर भारतीय लोकशाही टिकून आहे असे म्हणता येईल परंतु ज्या वेळेस विचार करतो की भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने उभी आहेत. खऱ्या अर्थाने १९४७ ला आपण स्वतंत्र झालो, तेव्हापासून जर आपण ७५ वर्षाचे सिंहावलोकन करून पाहिले तर फार मोठा सकारात्मक आणि नकारात्मक बदल झालेले आपणास दिसून येईल.

भारतीय लोकशाही व्यवस्थेत होत असलेला हा बदल अतिशय चिंताजनक आहे. लोकशाहीची वाढ ही तिच्या अंगभूत सक्रियतेतून होणे अपेक्षित असते. पण आज लोकशाहीला कृत्रिम ठरवण्याचा प्रयत्न होतो आहे. भारतीय राज्यघटना आणि राजकारण यांचा लोकशाही केंद्रबिंदू आहे. आज लोकशाही मार्गाने निवडणूका होत असल्या तरी कारभार मात्र हुकूमशाही आणि एकाधिकारशाहीची जोपासना करताना दिसत आहे. भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य, सार्वभौमत्व, संघराज्यीय एकात्मता, धर्मनिरपेक्ष, समाजवाद, लोकशाही ही मूलतत्वे म्हणून समाविष्ट केली आहेत. मात्र या प्रत्येक मूल्याचे बाहेरून गुणगाण गात त्याला आतून तडे देण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून होताना दिसत आहे.

स्वातंत्र्याचा अर्थ स्वतंत्र असा घेतला जातो आहे. आपले म्हणणे पुढे रेटत दुसऱ्याच्या अधिकाराचा संकोच केला जात आहे. सार्वभौमत्वामध्ये अंतिम सत्ता लोकांची असते. मात्र आज लोकांना फक्त गृहित धरले जात आहे. संघराज्यीय एकात्मता हे तत्व केंद्र राज्य संबधाच्या तणावातून आज अडचणीत आणले जात आहे. धर्मनिरपेक्षतेऐवजी धर्मराष्ट्राचा डंका पिटला जात आहे. मानवी कारुण्यावर नव्हे तर आर्थिक समतेवर आधारित समाजवादाच्या संकल्पनेऐवजी कमालीच्या विषमतावादी भांडवलशाहीचा पुरस्कार केला जात आहे. लोकशाही अत्यंत पद्धतशीरपणे हुकूमशाहीच्या मार्गाने नेली जात आहे. ही आव्हाने भारतीय राज्यघटनेसमोरील पर्यायाने या देशाच्या लोकांसमोर उभी आहेत. याचाच अर्थ ही सर्व आव्हाने भारतीय लोकशाही समोरील आहेत. याची चर्चा होणे आवश्यक वाटते.

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे. याची मांडणी ऐतिहासिक पद्धतीने केली आहे. त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रातील लेख, साप्ताहिक, इंटरनेट याचा वापर शोधनिबंधासाठी करण्यात आला आहे.

**धर्मसंस्था व सांप्रदायिक तत्वप्रणालींचा प्रभाव :**

संविधानाच्या भवितव्यापेक्षा भारत देशाच्या वाटचालीविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी मांडणी केली आहे ती आजवरच्या वाटचालीवरून खरी ठरते असे स्पष्ट दिसते आहे. पंच्याहत्तरवर्षानंतरचा भारत कसा असेल आणि त्यावेळी भारतीय संविधानाची भूमिका कोणती राहील याची जी चिंताग्रस्त होऊन मांडणी केली होती ती आज तंतोतंत खरी ठरली आहे. त्यांनी त्यांच्या भाषणात म्हटले होते. "इतिहासाची पुनरावृत्ती होईल काय? याच विचाराने मी चिंताग्रस्त झालो आहे. जातीच्या व संप्रदायांचा स्वरूपातील आपल्या जुन्या शत्रुबरोबर आता भिन्न आणि परस्परांविरोधी विचारप्रणाली असणाऱ्या बऱ्याच राजकीय पक्षांची भर पडणार आहे. ह्या वास्तवाच्या जाणीवेने मी अधिकच चिंतातूर झालो आहे. भारतीय लोक आपल्या तत्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की, देशापेक्षा तत्वप्रणालीला मोठे मानतील? मला माहित नाही, परंतु एवढे निश्चित की, जर पक्षांनी स्वत:च्या तत्त्वप्रणालीला देशापेक्षा मोठे मानले तर आपले स्वातंत्र दुसऱ्यांदा धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. आणि कदाचित कायमचे गमावले जाईल. या संभाव्यतेविरुद्ध लढण्यासाठी आपण कटिबद्ध व्हायला हवे. आपल्या रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपण निर्धार केला पाहिजे."

भारताच्या लोकशाहीवादी राष्ट्र म्हणून वाटचालीत जातीव्यवस्था, सांप्रदायिकता आणि विविध पक्षांची तत्वप्रणाली ही अडसर असू शकते असा स्पष्ट इशारा डॉ. आंबेडकर यांनी आपल्या अखेरच्या भाषणात दिला होता. भारतीय लोक आपल्या तत्वप्रणालीपेक्षा देशाला मोठे मानतील की देशापेक्षा तत्वप्रणालीला मोठे मानतील? हा त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न आजची देशाची राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती पाहता तंतोतंत पटतो आहे. काही राजकीय पक्ष आपली तत्वप्रणाली मोठी मानून त्या दिशेने देशाची वाटचाल राहील, असा संकेत देत आहेत. तसा व्यवहार करीत आहेत. परिणामी देशाच्या आर्थिक प्रगतीत अनेक समाजघटकांना सामावून घेण्यात येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

**जातसंघटनांचा प्रभाव :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "अमेरिकेत जाती नाहीत. भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत. त्या समाज जीवनात विभागणी करतात. त्या राष्ट्रविरोधी आहेत, कारण त्या जाती-जातीमध्ये तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हांला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल, तर या सर्व अडथळयांवर आम्ही मात केलीच पाहिजे." जाती संस्था ही आपल्या लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे कि विस्ताराचे साधन? हा प्रश्न कायम अनुत्तरीत राहिला आहे. 'जी जात नाही ती जात' असे उपहासाने म्हटले जाते. जात व राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जातीच्या नावावर राजकारण चालते व राजकारणात जात हाच श्वासबिंदू म्हणून कार्य करतो. सद्यस्थितीत प्रत्येक समाज घटकास आपले सामाजिक, राजकीय अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी आरक्षणाचा आधार हवा आहे. महाराष्ट्रात मराठा, धनगर, राजस्थान गुजर, हरियाणात जाट, तेलंगणात कापू या समाजाची आरक्षणाची जनआंदोलने लोकशाहीच्या स्थैर्यास बाधा आणतात.

**व्यक्तीपूजा व राजकीय घराणेशाही:**

"लोकांनी आपले स्वातंत्र्य किती ही मोठा माणूस असला तरी त्यांच्या चरणी अर्पण करता कामा नये. तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये की, जेणेकरून त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उध्वस्त करण्यासाठी उपयोग करील".

विख्यात तत्वचिंतक स्टूअर्ट मिल यांचे हे उद्गार उदधृत करून डॉ.आंबेडकर यांनी विभूतिपूजा ही लोकशाहीला घातक ठरू शकते हे स्पष्ट केले आहे. भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल, त्याला इतर देशांपेक्षा भारतातील राजकारणात अधिक महत्व दिले जाते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल, परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तीपूजा हा अध:पतनाचा हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो. हा इशारा नेहमीच धोका दाखविणारा आहे. भारतीय राजकारणात देश किंवा विविध प्रदेशांच्या पातळीवर अनेक विभूती अशा होऊन गेल्या की, त्यांना लोकांनी दैवत्वच बहाल केले होते. काही नेत्यांची मंदिरे बांधण्यापर्यंत मजल गेली आहे हे आताचे वास्तव पहाताना स्वातंत्र्य हिरावून घेतले जाणारे धोके स्पष्ट शब्दात डॉ. आंबेडकरांनी मांडले आहेत. आज पंच्चाहत्तर वर्षानंतरही त्यांच्या भाषणातील मुद्दे आजच्या परिस्थितीला तंतोतंत लागू पडतात.

भारत हा तरुण रक्ताचा कार्यक्षम देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण तुर्क भारतात आहेत. मात्र वयाने तरुण असलेल्या आपल्या देशात तरुणाई अपवादानेच राजकारणात आढळते. याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय राजकारणातील घराणेशाही यामुळे तळागाळातील सर्वसामान्य कार्यकर्ता हा शेवटपर्यंत कार्यकर्ताच राहतो. प्रस्थापित नेत्यांची मुले, सुना,मुलगी, पत्नी भाचा, पुतण्या अधिकार पदावर रूढ होऊन राजकीय संस्थानिकांचा जन्म होतो. महाराष्ट्रात अर्थात अनेक राजकीय संस्थाने प्रत्येक जिल्ह्यात आढळतात. त्यामुळे तरुण कार्यकर्ता राजकारणाकडे पाठ फिरवतो. तथापी एका ग्रामपंचायतीपासून ते संसदेपर्यंत आपणास प्रस्थापित नजरेस येतात.

**लोकशाहीची हुकूमशाहीकडे वाटचाल :**

लोकशाहीचे गुणगान गात आज लोकशाहीची परवड चालू आहे. त्याचे एक कारण सत्ताधाऱ्यांची मनमानी हे जसे आहे तसेच निवडणूक कायद्यातील उणिवा हे ही आहे. अर्थात हे सारे असले तरीही आपण स्वीकारलेली संसदीय लोकशाही पद्धत हीच सर्वाधिक लोकाभिमुख आहे यात शंका नाही. कारण ती सत्तेचा गैर वापर करणाऱ्यांचा माज उतरवते हा इतिहास आहे. महात्मा गांधीनी एकदा म्हटल होत, "हुकूमशाहीत दमनाची भीती असते तर लोकशाहीत प्रलोभनाची भीती असते." आज लोकशाहीला दमन आणि प्रलोभन या दोन्हींचाही धोका जाणवतो आहे.

वास्तविक आपण राजेशाही, साम्राज्यशाही घालवून लोक शक्तीच्या बळावर लोकशाही प्रस्थापित केली आहे. म्हणून हे राष्ट्र प्रजासत्ताक नव्हे तर लोकसत्ताक आहे.जिथे राजा तिथे प्रजा असते. लोकशाहीमध्ये लोकांची सत्ता असते. सत्तेचे अंतिम मालक लोक असतात. निवडूण गेलेली मंडळी कारभारी असतात. हे गृहित आहे. कारभारी चुकले तर त्याला मालक जाब विचारू शकतो. मात्र आज निवडून दिलेली कारभारी मंडळी मालकाप्रमाणे, राजाप्रमाणे, हुकूमशहा प्रमाणे वागू लागले आहेत. हे लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे.

**मतदारांची निष्क्रियता :**

संसदीय लोकशाहीमध्ये लोकांनी मतदान करायचे नसते. तर 'मताधिकार' बजावायचा असतो. मत ही दान द्यायची वस्तू नाही, तो आपला अधिकार आहे. आज स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात झालेल्या पाच राज्यांच्या निवडणूकीतही

सरासरी साठ टक्के लोकांनी मताधिकार बजावला जातो. तर सहकारी संस्थांच्या निवडणूकात नव्वद ते शंभर टक्के मताधिकार बजावला जातो. पण विधानसभा-लोकसभा निवडणूकीत ते का होत नाही. याची कारणे शोधून त्या कारणाचे निराकरण करणे हे लोकशाही समोरील आव्हाने आहेत. येथे दुर्जनाच्या क्रियाशीलतेपेक्षा सज्जनांची निष्क्रियता आज मोठी आहे. निवडणूक उमेदवार केंद्रित नव्हे तर मतदार केंद्रित झाला पाहिजे. राजकीय पक्षांचे जाहीरनामे ठीकच पण मतदारांचा जाहिरनामा हवा, त्यावर चर्चा झाली पाहिजे मतदार जेवढा जागरूक तेवढी लोकशाही सक्षम होऊ शकते.

**मतदाराला ग्राहक बनवणे व राजकारणाचे गुन्हेगारीकरण :**

लोकशाही मार्गाने होणाऱ्या निवडणूकीत सुद्धा निवडणूक आणि खर्च यांचे प्रचंड प्रमाण वाढले आहे. परिणामी काळा पैसा व गुन्हेगारी यांच साटलोट दिसत आहे. अनेक विधानसभा निवडणूकीत मतदारांना वस्तूंच्या मोफततेची आमिषे तर दाखवण्यात आलीच मात्र मतदारनिहाय पाचआकडी व कार्यकर्ता निहाय सहाआकडी रकमा वाटल्या गेल्याच्या सूरस कथा रंगत आहेत.

पूर्वी उमेदवारांना गुन्हेगार सहकार्य करायचे मात्र आता गुन्हेगार असलेल्या उमेदवारांचे प्रमाण धक्कादायक पद्धतीने वाढत आहे. कुसुमाग्रजांनी एका कवितेत "थैलित लोकशाही जेव्हा शिरे धनाच्या तेव्हा महासतीची वारांगनाच होई," अस म्हटल होत. सर्वसामान्य लोक खंक होत आहेत. आणि सत्तेचे भोई असलेले उद्योगपती गुणाकाराच्या श्रेणीने अतिश्रीमंत होत आहेत. देशातील नवकोट नारायणांची संख्या वाढत आहे. पण सरकारी धोरण आणि विविध मनमानी सरकारी निर्णयाने पाताळात किती जण गाढले गेले? किती लोक बेरोजगार झाले? कितींनी आत्महत्या केल्या? किती जणांचे प्राण गेले? याची यादी करता येत नाही हे भयावह वास्तवही लोकशाहीसमोरील आव्हान आहे.

**सत्तेचे केंद्रीकरणाकडे वाटचाल :**

तत्वाविना राजकारण, श्रमाविना संपत्ती, नीतीविना व्यापार, चारित्र्याविना शिक्षण, विवेकाविना विकास मानवतेविना विज्ञान आणि त्यागाविना पूजन हे राष्ट्रपिता महात्मा गांधीनी सार्वजनिक जीवनातील सप्तदोष सांगितले होते. ते आज प्रस्तापित झालेले दिसत आहेत. परिणामी हुकूमशाही प्रवृत्ती फोफावली आहे. लोकशाहीत जनतेच्या समंतीवर आधारित राज्यव्यवस्था, विचार-उच्चार-संचार-संघटन-अभिव्यक्ती आदि स्वातंत्र्य गृहित धरले आहे. त्याचबरोबर सत्तेचे विकेंद्रीकरण हेही आदर्श लोकशाहीचे द्योतक असते पण अलीकडे सत्तेचे कमालीचे केंद्रीकरण होताना दिसत आहे, हे ही लोकशाही समोरील मोठे आव्हान आहे.

**केंद्राचे दबावाचे राजकारण :**

भारतीय शासन पद्धती ही संघराज्य संसदीय स्वरुपाची असून घटक राज्य व केंद्रशासित प्रदेशाचे अंतिम प्रशासन चालवण्याचा अधिकार केंद्रास आहे. आपल्या व्यापक अधिकारातून केंद्र कलम १५३ अन्वये राज्यपाल घटनात्मक पदाची आपल्या शिफारशीने राष्ट्रपतीद्वारे नियुक्ती करून घटक राज्यावर अंतरिम अंकुश ठेवतात. राज्यपाल हे आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडताना त्यांच्यावरील केंद्राचा दबाव अधोरेखित होतो. केंद्रात ज्या विचाराचे शासन, घटक राज्यात देखील

त्याच विचाराचे शासन असावे. हा अट्टाहास राज्यपालांकडून पूर्ण करून घेतला जातो. यासाठी आपल्या महाराष्ट्राचे उदाहरण देता येईल. मध्यरात्री राष्ट्रपती राजवट हटवून भल्या पहाटे मुख्यमंत्री पदाची दिलेली शपत ही लोकशाहीला काळीमा फासणारी घटना आहे. व यात राज्यापालांची घटनाबाह्य भूमिका आपणास ठळकपणे जाणवते. ही बाब एक सजग नागरीक म्हणून आपणास अस्वस्थ करते.

**समारोप :**

लोकशाही समोरील आव्हानांचा विचार करत असताना भारतीय समाजात आज दोन गोष्टींची कमतरता दिसून येत आहे. त्यातील एक म्हणजे समता होय. सामाजिक क्षितीजावर आज स्तरात्मक असमानता आहे. त्यात काहीजण वरिष्ठ पातळीवर आणि उरलेले बहुतांश कनिष्ट पातळीवर आहेत. आर्थिक क्षितीजावर मूठभर लोक श्रीमंत आहेत. तर बहुसंख्य अतिशय दारिद्रयाने पिचलेले आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी या राज्यघटनेची अंमलबजावणी करतानाच आपण एका विरोधाभासाच्या नव्या युगात प्रवेश करणार आहोत.

राजकीय क्षेत्रात सर्वत्र समता असेल तर सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात असमानता असेल अशा विरोधात्मक परिस्थितीत आपण किती काळ राहू शकणार आहोत? किती काळ आपण सामाजिक व आर्थिक समता नाकारू शकणार आहोत? जर आपण हे फार काळ चालू देणार असला, तर राजकीय लोकशाहीला विनाशाकडे नेणार आहोत. जर आपण लवकरात लवकर विरोधाभासाचे वातावरण दूर करू शकलो नाही, तर घटना समितीने परिश्रमपूर्वक तयार केलेली राजकीय लोकशाहीची इमारत जे विषमतेचे बळी ठरतील. त्यांच्याकडून उखडली गेल्याशिवाय राहणार नाही. आज ७५ वर्षानंतर डॉ.आंबेडकरांनी या द्रष्टेपणाने केलेल्या इशाऱ्याकडे आपण गांभीर्याने पहिले पाहिजे. स्वातंत्र्य व समता मिळवण्यासाठी वाटचाल करावी हे घटनेने सांगितले आहे. पण ते अपोआप मिळत नसते तर ते मिळवण्याची आणि सांभाळण्याची जबाबदारी लोकांवरच आहे. आव्हानांच्या विळख्यात गुदमरणाऱ्या लोकशाहीला लोकच मोकळा श्वास देऊ शकतात. तो देण्याची जबाबदरी स्वीकारणे हे या देशाचा नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे.

**संदर्भ:**

१) भोळे भा.ल., (२०१४), 'भारताचे शासन व राजकारण', पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. देशमुख अलका, (२०१४), 'भारतीय लोकशाहीची प्रक्रिया'.

३) डॉ. कांबळे बाळ, (२०१०), 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

४) डॉ. बिरमल नितीन व डॉ. पवार वैशाली, (२०१३), 'भारतीय शासन व राजकारण', डायमंड पब्लिकेशन, पुणे.

५) डॉ. विघे प्रशांत व डॉ. तेलगोटे धर्मेंद्र, (२०१९), 'लोकशाही निवडणूक प्रक्रिया आणि सुशासन', श्री. साई प्रकाशन, नागपूर.

६) दै. लोकमत, २६ जानेवारी २०२०, भोसले वसंत 'जागर'.

७) द.वायर मराठी, कुलकर्णी प्रसाद, २१ मार्च २०२२, 'आव्हानांच्या विळख्यातील लोकशाही'.

८) जनशक्ती, २५ जानेवारी २०१९, 'लोकशाही समोरील आव्हाने'.

९) कुलकर्णी प्रसाद, जानेवारी २०२३, 'प्रसार माध्यमे आणि पर्यायी माध्यमे आणि लोकशाही', प्रबोधन प्रकाशन ज्योती, इंचलकरंजी.

१०) 'योजना मासिक', एप्रिल २०२०, लातूर सप्तरंग, २८ डिसेंबर २०२२.

११) दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. महाराष्ट्र टाइम्स, दै. तरुण भारत, बीबी सी मराठी, वार्ता वाहीनी, दै. पुढारी, दै. सकाळ १ ऑगस्ट २०१८ 'लोकशाही आणि निवडणूका', वर्धापन दिन विशेष.

# भारतीय लोकशाही पुढील आव्हान: विरोधी पक्षाचा शक्तिपात

**सौ. प्रकृती श्रीकांत कारेगावकर**

संशोधक विद्यार्थी

**सारांश:** भारतीय लोकशाही 75 रीत परिपक्व होत असताना विरोधी पक्षाचा शक्तिपात व्हावा, ही बाब लोकशाहीसाठी गंभीर आहे. भविष्यात असेच चालत राहिले तर हे लोकशाही समोरील फार मोठे आव्हान ठरणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात राजकीय पक्षांची वाटचाल सुरू आहे. स्वातंत्र्यापूर्वी येथील राजकीय पक्षांचा उद्देश स्वतंत्र प्राप्त करणे किंवा ते कोणत्या मार्गाने प्राप्त करता येईल हा होता. स्वातंत्र्यानंतर या विचारात अमुलाग्र सुधारणा होणे गरजेचे होते. मुख्यत्वे करून काँग्रेस पक्षाने यात पुढाकार घेणे आवश्यक होते.पण तसे झाले नाही. काँग्रेस पक्ष आपल्या गत इतिहासावर व व्यवस्थापन कौशल्या च्या बळावर देशाची सत्ता आपल्या हाती ठेवू शकला. त्याचा परिणाम विरोधी पक्ष काही काळ अस्तित्वातच येऊ शकला नाही. तेव्हापासूनच विरोधी पक्षांचा शक्तिपात सुरु झाला. नेहरूंच्या वलयांकित व्यक्तिमत्वामुळे एक हाती सत्ता येत गेली. त्यामुळे काँग्रेस पक्ष फोफावण्यास मदत झाली. पक्षात एक प्रकारची काँग्रेस संस्कृती निर्माण झाली. ती श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्यापर्यंत कायम राहिले. सक्षम विरोधी पक्ष मात्र उदयास येऊ शकला नाही. ती उणीव कायम राहत गेली. भारतात 1992 पर्यंत विरोधी पक्ष अस्तित्वात असला तरी तो संघटित राहू शकला नाही. त्याचे परिणाम भारतीय लोकशाहीवर झाले.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, विरोधी पक्ष, लोकशाही तुलना,

प्रस्तावना:-

भारतीय लोकशाही 75 रीत परिपक्व होत असताना विरोधी पक्षाचा शक्तिपात व्हावा, ही बाब लोकशाहीसाठी गंभीर आहे. भविष्यात असेच चालत राहिले तर हे लोकशाही समोरील फार मोठे आव्हान ठरणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतात राजकीय पक्षांची वाटचाल सुरू आहे. स्वातंत्र्यापूर्वी येथील राजकीय पक्षांचा उद्देश स्वतंत्र प्राप्त करणे किंवा ते कोणत्या मार्गाने प्राप्त करता येईल हा होता. स्वातंत्र्यानंतर या विचारात अमुलाग्र सुधारणा होणे गरजेचे होते. मुख्यत्वे करून काँग्रेस पक्षाने यात पुढाकार घेणे आवश्यक होते.पण तसे झाले नाही. काँग्रेस पक्ष आपल्या गत इतिहासावर व व्यवस्थापन कौशल्या च्या बळावर देशाची सत्ता आपल्या हाती ठेवू शकला. त्याचा परिणाम विरोधी पक्ष काही काळ अस्तित्वातच येऊ शकला नाही. तेव्हापासूनच विरोधी पक्षांचा शक्तिपात सुरु झाला. नेहरूंच्या वलयांकित व्यक्तिमत्वामुळे एक हाती सत्ता येत गेली. त्यामुळे काँग्रेस पक्ष फोफावण्यास मदत झाली. पक्षात एक प्रकारची काँग्रेस संस्कृती निर्माण झाली. ती श्रीमती इंदिरा गांधी व राजीव गांधी यांच्यापर्यंत कायम राहिले. सक्षम विरोधी पक्ष मात्र उदयास येऊ शकला नाही. ती उणीव कायम राहत गेली. भारतात 1992 पर्यंत विरोधी पक्ष अस्तित्वात असला तरी तो संघटित राहू शकला नाही. त्याचे परिणाम भारतीय लोकशाहीवर झाले. वेगवेगळया विचारांमध्ये तो विखुरला गेला. त्यामुळे भारतीय लोकशाही वयाच्या पन्नाशी पर्यंत विरोधी पक्षाविनाच अडखळत असतानाचे चित्र दिसून येते. पुढे मनमोहन सिंग यांचा कालखंड संक्रमणाचा ठरला आहे. याच काळात विरोधी भूमिकाची पार्श्वभूमी तयार झाली आणि भावनिक आणि सांस्कृतिक आधारावर जनमत एकवटण्यास काँग्रेस पक्षाच्या धोरणाच्या परिणामाच्या माध्यमातून सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या प्रश्नांची उपेक्षा केली. अशी लोकांची भावना झाली. काँग्रेसने वाढत्या लोकशाहीला व विकेंद्रीकरणाला साजेसी दृष्टिकोनात्मक बदल करण्याऐवजी फक्त निवडणुकांसाठी सौदेबाजीचे राजकारण करण्यातच या पक्षाचे नेते व्यस्त राहिल्यामुळे आपली ऐतिहासिक भूमिका बजावू शकला नाही. त्यामुळे काँग्रेस पक्षाला प्रादेशिक स्तरावर विरोध करणारे पक्ष उद्यास आले पण त्यांचा शक्तिपात करण्यास विचारधारेच्या आधारावर काँग्रेस पक्ष यशस्वी झाली. येथेच भारतीय लोकशाहीची पीछेहाट झाली. त्यामुळे लोकशाही समोरील आजही हेच खरे आव्हान आहे असे म्हणता येईल.

1992 नंतर भारतातील लोकशाही नवीन वाटचाल सुरू झाली. सांस्कृतिक आणि भावनिक राजकीय प्रश्नांनी राजकारणात खरा प्रवेश केला. विरोधकांचे विचार लोकांना पटू लागले. लोकशाहीमध्ये आपल्यावर अन्याय होतो आहे अशी भावना लोकात निर्माण होऊ लागली. त्याचा परिणाम वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या विचारांची सरकारी अस्तित्वात येऊ लागली. काँग्रेस पक्ष लोकांना गृहीत धरू लागला. भ्रमात राहिला. काही काळ तर लोकांना गृहीतच धरू लागला. तोपर्यंत वेळ निघून गेली होती. श्री मनमोहन सिंग यांच्या दोन टर्मची कारकीर्द संपत असतानाच ज्येष्ठ समाजसेवक श्री अण्णा हजारे यांचे आंदोलन समाज माध्यमाच्या माध्यमातून लोकांपर्यंत

पोहोचले होते. तिकडे गुजरात सारख्या राज्यात भारतीय लोकशाहीचे नवीन मॉडेल तयार होत होते. 2014 च्या सार्वत्रिक निवडणुकात श्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या वलयांकित व्यक्तिमत्त्वाने विरोधी पक्षाचा शक्तिपात घडवून आणला. तो 2019 च्या निवडणुकातही टिकून राहिला. आजतागात विरोधी पक्षांची या परिस्थितीमधून सुटका झालेली नाही.

उपरोक्त सर्व विवेचनाचा आशय हा आहे की भारतीय लोकशाही समृद्ध होण्यासाठी ज्या विरोधी पक्षाची निकोप वाढ व्हावी लागते ती वाढ होऊ शकली नाही. पाश्चात्त्य लोकशाहीत मात्र याबाबत संतुलन राखल्या गेलेल्यांचे जाणवते. त्यासाठीच प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय लोकशाही पुढील आव्हान : विरोधी पक्षांचा शक्तपात हा विषय घेऊन मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका किती महत्त्वाची असते हे पाहणे गरजेचे आहे. जगात लोकशाहीचा विकास विरोधी पक्षांच्या अस्तित्वामुळे झालेला आहे. ते पाहावे लागेल. त्यामुळे जगात कल्याणकारी राज्य उदयास उदयास येण्यास मदत झाली. त्यासाठी पुढील लोकशाही मधील विरोधी पक्षाची भूमिका लक्षात घेणे गरजेचे आहे.

लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची भूमिका :-

संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाला अतिशय महत्त्व असते. कारण संसदीय लोकशाहीत आजचा विरोधी पक्ष उद्याचा सत्ताधारी पक्ष असतो असे मानले जाते. त्यामुळेच लोकशाही व्यवस्थेचे वैशिष्ट्ये विरोधी पक्ष मानले जाते. साधारणतः लोकशाहीत विरोधी पक्ष जी कार्य पार पाडत असतात ते पुढीलप्रमाणे आहेत : 1) सत्ताधारी पक्षाबरोबर सतत स्पर्धा करणे. 2) सत्तारूढ पक्षाच्या सतत चुका शोधणे त्यांना जनतेसमोर उजागर करणे. 3) सत्तारूढ पक्षाच्या ध्येय आणि धोरणावर सतत टीका करणे. 4) संसदेमध्ये सतत सरकारी पक्षाला प्रश्न विचारणे त्या माध्यमातून मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करणे. 5) प्रसारमाध्यमासमोर सत्ताधारी पक्षाच्या जास्तीत जास्त उनिवा उजागर करणे. अशा काही बाबींच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांच्या विरोधी जनमत तयार होत असते. त्यामुळे नंतरच्या कालखंडात विरोधी विचारांचे सरकार येऊ शकते. त्यातूनच धोरणात्मक बदलही होत असतात. परंतु विरोधी पक्ष संघटित रित्या अस्तित्वात नसेल तर देशात एक पक्षीय हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका असतो. प्रस्तुत शोधनिबंधाच्या सुरुवातीच्या भागात आपण त्याबाबत काँग्रेस पक्षाच्या वलयांकित नेतृत्वाच्या संदर्भात भूमिका पाहिली आणि पुढील कालखंडातील श्री नरेंद्र मोदी यांच्या वलयांकित नेतृत्वाची ही भूमिका पाहिली आहे. यानंतर आपल्याला लोकशाही आणि राजकीय पक्ष यांच्याबद्दल थोडक्यात माहिती पाहून आपल्या शोधनिबंधाच्या मुख्य निष्कर्षाकडे वळावयाचे आहे.

लोकशाही:-

आधुनिक काळात लोकशाही हा शासनाचा प्रकार लोकप्रिय मानला जातो. महात्मा गांधी यांनी तर लोकशाहीला जीवन पद्धती असे संबोधले आहे. ते खरेही आहे. या शासन प्रकारात सत्ताही जनतेच्या हातात असते. लोक मतदानाच्या माध्यमातून व्यक्त करत असतात. शांतता हा लोकशाहीचा स्थायीभाव असतो. संघर्ष आणि हिंसेला थारा नसतो. लोकशाहीचे वेगवेगळे प्रकार असले तरी आधुनिक काळात लोकशाहीच्या प्रातिनिधिक स्वरूपाला महत्त्व असल्याचे दिसून येते. त्यामुळेच अब्राहम लिंकन यांची लोकशाहीची व्याख्या सर्वसामान्यांना सुद्धा अवगत झालेली आहे. ती म्हणजे "लोकांनी लोकांकडून आणि लोकांसाठी चालवलेले शासन" या व्याख्येत प्रत्येक शब्दात 'लोक' या शब्दावर जास्तीचा भर असल्याचे दिसून येते. पाश्चात्य लोकशाहीने जगाला काही चांगल्या गोष्टी शिकवण्याचा प्रयत्न केला आहे त्यात जनतेच्या विकासाचे मुद्दे महत्त्वाचे आहेत. ते म्हणजे :

1. शासन व्यवस्थेत लोकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे.

2. लोकांना त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे स्वातंत्र्य उपभोगू देणे.

3. नियमित निवडणुका घेऊन शासनाबद्दल जनतेचा कौल घेणे.

4. लोकांना प्रौढ मता अधिकारांच्या माध्यमातून त्यांच्या व्यक्ती स्वातंत्र्याची जोपासना करणे आणि सर्वातात महत्त्वाचे म्हणजे.

5. विरोधी पक्षाचे अस्तित्व मान्य करणे. या ठिकाणी आपल्याला लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाला किती महत्त्व दिलेले आहे हे दिसून येईल.

याबाबत तर इंग्लंडमध्ये "राणीचा विरोधी पक्ष" असे संबोधनच प्रचलित झाल्याची दिसून येते. थोडक्यात लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष हा जनतेचा प्रतोद असतो लोक विरोधी पक्षाकडे आशेने पाहत असतात परंतु भारतीय लोकशाहीचा इतिहास लक्षात घेता असे दिसून येते कीस्वातंत्र्यानंतर प्रत्येक शासनाच्या कालखंडात काही वलयांकित नेत्यांच्या छबीमुळे शक्तिपात झाल्याचे दिसून येते. जे की आपल्या भारतीय लोकशाही समोरील फार मोठी आव्हान आहे. अशा लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाची कुचम्बना होऊन त्यांचा शक्तिपात होणार असेल तर जनतेच्या प्रश्नांची माहिती लोकांसमोर कशी येईल. त्यांचे प्रश्न कसे सुटतील? लोकशाहीत कोणत्याही शासन व्यवस्थेचा उद्देश विकास करणे हा जरी असला तरी त्यात त्यांच्या पक्षाचा विचारसरणीनुसार त्यांचे कार्य चालू असते. त्यामुळे त्याचा परिगाम होण्याचा मोठा धोका सर्वसामान्य जनतेला सहन करावा लागतो. हे सर्व टाळण्यासाठी जनतेमध्ये लोकशिक्षण घेणे गरजेचे आहे. सुदृढ लोकशाहीसाठी ते सर्व आवश्यक आहे. त्यामुळे लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचा शक्तिपात होता कामा नये. तसे झाल्यास ते येणाऱ्या कालखंडात भारतीय लोकशाही समोरील आव्हान ठरणार आहे. हा थोडक्यात निष्कर्ष आहे.

**संदर्भसूची :-**

१) भोळे भास्कर लक्ष्मण : भारतातील राजकीय व्यवस्था, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स नागपूर- १९९०.

२) देव विजय : राजकीय विश्लेषण कोष, दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे-३० - १९९७.

३) जोशी बी. आर. : सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांतांचा कोष, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००७

४) एम. लक्ष्मीकांत : इंडियन पॉलिटी, के. सागर पब्लिकेशन सदाशिवपेठ पुणे, २०१७.

५) सुहास पळशीकर, : महाराष्ट्रातील सत्ता संघर्ष, सुहास कुलकर्णी, राजकीय पक्षाची वाटचाल, समकालीन प्रकाशन पुणे - २०११.

६) शिंदे राजेंद्र (संपादक) : भारतीय राजकारणातील बदलते प्रवाह क्रिएटिव्ह पब्लिकेशन - २०२०.

७) पहा : युट्युब चॅनेल : स्पर्धापरीक्षा राज्यशास्त्र - dwarkaprasad wayal

# उत्तर गांधीवादी विचारवंत आचार्य दादा धर्माधिकारी यांचा लोकशाही विषयक विचार

**प्रा. डॉ. विद्याताई निवासराव जगताप**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी
ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर

**सारांश:** आजचे राजकारण आणि समाज अराजकतेच्या उंबरठ्यावर उभे आहे. आजच्या पक्षीय राजकारणाचा घसरलेला दर्जा बोकाळलेला भ्रष्टाचार,नोकरशाहीत व अभद्र घटकांचे साठेलोटे राजकारणाचे गुन्हे- गारीकरण, धर्माचा राजकारणात अनावशक हस्तक्षेप आणि लोकशाहीचे अपयश असे अनेक दोष दिसत आहेत. शासन संस्था आणि धर्म संस्था या दोन्ही संस्था लोकशाहीच्या उद्देशानाने निर्माण झाल्या होत्या. त्या आजही अस्तित्वात आहेत. आहेत परंतु लोक कल्याणाचा त्यांचा असणारा हेतू बाजूला सारून त्या कार्य करत आहेत. त्यामुळे फायद्या ऐवजी नुकसानच जास्त आहे. सेवेच्या नावाखाली जे शासन चालते त्यापासून सामाजाची सुटका करणे गरजेचे आहे. आजच्या विज्ञान युगात राजकारण हि कालबाह्य गोष्ट मानली जात आहे. या सर्वांपासून सामाजाची सुटका करण्यासाठी गांधी विचार प्रणाली अवलंबल्या शिवाय पर्याय नाही. म्हणून याचा गांभीर्याने विचार करणे गरजेचे आहे. महात्मा गांधींनी राजकारणाची सुरवात मानवतेसाठी केली होती. मानवा –मानवातील असह्य विषमतेचा त्यांना प्रत्याय आला होता. दक्षिण आफ्रिकेत त्यांना वंश भेदातून रेल्वेच्या डब्यातून बाहेर काढण्यात आले होते. तेव्हा पासून मानवतेशी जुलूम करणाऱ्या गोऱ्या साम्राज्य विरुद्ध त्यांनी सत्याग्रही पाउल उचलले होते. गांधीजीना भारतात खरे स्वराज्य स्थापन करावायाचे होते. इंग्रजांनी स्थापन केलेली आधुनिक संस्कृती, आधुनिक संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार करणे गांधीजींना मान्य नव्हते. भारतीयांनी याचे अनुकरण केल्यास भारतात ब्रिटीश गोऱ्या साम्राज्याच्या ठिकाणी काळा भारतीय असेल हे परिवर्तन त्यांना योग्य वाटत नव्हते. त्यासाठीच त्यांनी सर्वोदय आणि ग्रामस्वराज्याची संकल्पना मांडली. महात्मा गांधीनी सर्व कल्याणकारी व्यवस्था निर्माण करण्यासाठी लोक-जागर, लोक शक्ती , लोक-नीती हि तीन साधने सांगितली होती. यातील लोकनीती हा आजच्या राजनीतीला योग्य पर्याय असल्याचे त्यांनी म्हटले आहे. गांधीजींच्या या राजनीतीला पर्यायी विचारांचा म्हणजेच लोकांनीतीचा अंगीकार करून "लोकानीती म्हणजे जनतेची नीती" या विचारांचा विकास केला. विनोबा भावे यांच्या नंतर उत्तर गांधीवादी विचारवंत आचार्य दादा धर्माधिकारी यांनी मुळच्या लोकांनीतीच्या विचारांना आत्मसात करून त्यात नवीन विचारांची भर घातली. त्यांना जनतेच्या राजकारणाचा आणि समाजकारणाचा अधिक अनुभव होता. कारण ते राजनीती मध्ये अधिक सहभागी झाले होते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये त्यांच्या विचारांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, दादा धर्माधिकारी, लोकशाही, गांधीवाद

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ब्रिटिश राज्यसत्तेची साम्राज्यवादी परंपरेचा वारसा अमान्य करून भारतीय राज्यकर्त्यांनी जनतेच्या कल्याणासाठी योग्य दिशा शोधावी असे महात्मा गांधीजी यांना वाटत होते. परंतु तसे झाले नाही. साम्राज्यशाहीचाच वसा आणि वारसा घेवून नवीन राज्यसत्ता स्थापन करण्यात आली. सर्वंकष अनिर्बंध सत्ता उपभोगणाऱ्या राजेशाही, सरंजामशाही हुकूमशाही जावून त्याची जागा जरी प्रातिनिधिक संसदीय लोकशाही आणि कल्याणकारी राज्यसत्तेने घेतली असली तरी प्रत्यक्षात स्वरूप केंद्रीभूत चंगळवादावर आधारित असल्यामुळे सर्वच क्षेत्रातील विषमतेला अधिक प्रमाणात खतपाणी घातले गेले. तसेच

वर्गाकडून केला जाणारा दमनकारी तंत्रांचा वापर त्याचबरोबर वाढती बेबंदशाही भ्रष्टाचार, नोकरशाही आणि राजकारणाचे अभ्रद घटकांशी असणारे साटेलोटे या सर्व विकृतीचा विचार करून त्यावर उपाययोजना करण्याची गरज निर्माण झालेली दिसते.

महात्मा गांधी १९०९ मध्ये लिहलेल्या 'हिंद स्वराज्य' या पुस्तकात राज्यव्यवस्थेसंबधीचे विचार मांडले होते. त्यांनी शासन व्यवस्थेचे विचार काही प्रमाणात मान्य करून स्वावलंबी, स्वाश्रयी आत्मनिर्भर अशा ग्राम-राज्यची कल्पना मांडली होती. त्यांना समतेवर आधारित लोकशक्ती निर्माण करायची होती. महात्मा गांधीच्या याच विचारांना प्रमाण मानून विनोबा भावे यांनी राजनीतीला लोकनीतीत परावर्तित करण्याचा प्रयत्न केला. तसेच उत्तरगांधीवादी विचारवंत आचार्य दादा धर्माधिकारी यांनी प्रचलित राज्य व्यवस्थेवर आक्षेप घेतले आणि गांधी-विनोबा यांच्या लोकनीतीच्या विचारांचा जागर केला.

दादा धर्माधिकारी यांनी जगातील लोकशाहीच्या उगमाचे व विकासाचे ऐतिहासिक विश्लेषण करताना भारतीय लोकशाहीचे महत्व, आजची स्थिती आणि भविष्य या स्तरावर विचार केला आहे. दादांनी लोकमान्य टिळकांपासून ते विनोबा भावे यांच्या पर्यंतच्या विचारांचा परामर्श घेवून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. भारतीय लोकशाहीच्या विविध अंगांचा अभ्यास करताना त्यांनी संप्रदायवाद, जातीवाद, भाषावाद प्रांतवाद या विनाशकारी घटकांनी देशाच्या एकात्मतेला कसे धोके निर्माण केले आहेत याचे मार्मिक विवेचन केले आहे.

उद्दिष्ट्य :

सद्य:कालिन परिस्थितीत राजकारणापासून नैतिक मूल्यांची फारकत होत असल्याने लोकशाहीचा दर्जा ढासळून चालला आहे. त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात राजकीय उलथापालथ होत आहेत. म्हणून लोकशाहीला भांडवलशाहीची असणारी पार्श्वभूमी बदलून राजकारणाला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त करणे गरजेचे आहे. यासाठी आचार्य दादा धर्माधिकारी यांचे लोकशाही विचाराने अभ्यासणे आणि समाजापर्यंत पोहचणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

गृहितक:

सद्य:कालिन राजकीय परिस्थितीचा विचार करताना समाजविघातक घटनांचा क्रम वाढलेला दिसतो तेव्हा जनतेच्या कल्याणासाठी परिस्थिती बदलणे गरजेचे आहे. यासाठी आचार्य दादा धर्माधिकारी यांचे लोकशाही विचार प्रेरक व दिशादर्शक ठरू शकतात.

दादा धर्माधिकारी यांचे लोकशाही संदर्भातील विचार

सर्वोच्च समाजामध्ये शेजाऱ्यावर प्रेम केले जाते. तसे लोकशाहीत शत्रूवर प्रेम करावे. म्हणजे लोकशाहीतील आजच्या विरोधक हा उद्याचा स्वपक्षीय बनू शकेल. त्यामुळे समाजात विरोध राहणार नाही. सत्तेसाठी प्रतिनिधीत्व राहणार नाही. जयपराजयाची वृत्ती गौण होईल, याविषयीची दादांची भूमिका महत्त्वाची आहे. ती म्हणजे, "उमेदवारी गेली दुसऱ्याला प्रतिपक्षी बनवण्याची प्रवृत्ती गेली म्हणजे आजच्या लोकशाहीला जे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यास राजनीती न म्हणता लोकनीती म्हणावे. (धर्माधिकारी (१९९८) २००) जयाच्याजवळ पैसा, संपत्ती आहे. तो लोकशाहीला विकत घेण्याचा प्रयत्न करतो. ज्याच्याजवळ सत्ता आहे तो लोकशाहीला आपल्या स्वार्थासाठी वळविण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा यापासून लोकशाहीला बाहेर काढण्यासाठी प्रतिनिधि ऐवजी नागरिकांची सत्ता आवश्यक आहे. लोकशाहीला लोकसत्ता आणि लोकशक्ती यांचा आधार देणे गरजेचे आहे. यातून गुणात्मक लोकशाही निर्माण होईल, तेव्हाच गांधीजींना अभिप्रेत असणारे रामराज्य येवू शकेल, असे दादांना वाटत होते.

सर्वोदयात लोकशाहीचा मुळ सिद्धांत हा आहे की, "कर्तव्य माणसाचे सत्ता भगवंताची –कर्तव्य मानवाचे सत्ता भगवंताची याचा अर्थ 'रामराज्य' असा आहे." (धर्माधिकारी (१९९८)२०५) सर्वोदयाच्या दृष्टीने दादा लोकशाहीचा पाया काय असावा हे सांगताना म्हणतात, "रामराज्य म्हणजे भगवंताचे अधिष्टान कर्तव्याचा विचार माणसाने करावा सत्ता भगवंताची असे सगळ्या

नागरिकांनी मिळून मानावे हा सर्वोदयाच्या दृष्टीने लोकशाहीचा पाया आहे." (धर्माधिकारी (१९९८)२०५) कर्तव्याच्या अवलंबामुळे समाजात कसलीही स्पर्धा, प्रतिस्पर्धा राहणार नाही. विरोधक जेव्हा एकत्र येतात. तेव्हा त्यांच्यात असणारे अधिकाराचे भांडण कर्तव्यात परिवर्तित होते. त्यामुळे त्यांच्यातील ईषा, द्वेष नाहीसा होतो. कर्तव्याची भावना त्यांच्यात अधिक जागृत होते. हाच बदल लोकशाहीचा पाया बदलण्यासाठी नागरिकांमध्ये कर्तव्याची भावना जागृत होणे गरजेचे आहे.

नागरिकांमध्ये कर्तव्याची जाणीव असली पाहिजे, हे स्पष्ट करताना, दादा, विनोबा भावेंच्या विचारांच्या दाखला देतात. विनोबा म्हणाले होते, "मानवाचे राज्य म्हणजे वेदांताचे राज्य हक्क बहूधा एकमेकांच्या विरुद्ध दंड थोपटून उभे ठाकतात. याउलट कर्तव्य परस्पर पोषक व परस्पर पूरक असतात. मानवी अधिकारांचा जन्म मानवी कर्तव्याच्या कुशीत होत असतो. म्हणून कर्तव्याचे पालन केले की, अधिकाराचाही संभाळ होतो." (धर्माधिकारी (१९९२) १५७) अखिल मानव्याची एकजूट ही कर्तव्याच्या भावनेतून केल्यास हेवेदावे जावून सहकार्य, स्नेह यांचा अंमल सुरु होईल, असा विनोबांचा विश्वास वाटत होता. हे सूत्र घेऊन दादा म्हणतात, आजच्या राजकारणात आजचा जो आपला शत्रू आहे तो उद्याचा शत्रू होण्याचा संभव आहे. म्हणून राजकारणात सावधनगिरी हे तत्त्व मुख्य मानले आहे. याउलट महात्मा गांधीचे राजकारणाचे सूत्र असे आहे की, आजचा आपला प्रतिस्पर्धी उद्याचा मित्र होण्याचा संभव आहे. तो मित्र कसा होईल याची काळजी आपण आजपासूनच केली पाहिजे. ते म्हणतात, "आजचा प्रतिपक्षी उद्याचा स्वपक्षीय बनला पाहिजे. शेजाऱ्यावर प्रेम करा, याचा अर्थ असा की, आपला शेजारीच शत्रू बनला पाहिजे. तो चूक आहे. त्याच्या बाबतीत शेजाऱ्याची भावना तुझ्या अंतकरणात उत्पन्न झाली पाहिजे." (धर्माधिकारी (१९९८)२०७) आज ज्याला आपण शत्रू मानत आहे तो उद्या आपला मित्र बनला पाहिजे म्हणजे कोणीही शत्रू शिल्लक राहणार नाही. त्यामुळे शत्रुत्व ही कायमचे नष्ट होईल.

आज लोकशाहीवरचा लोकांचा विश्वास कमी होत आहे. कारण राजकीय पक्षांची मक्तेदारी होय. हे पक्ष लोकांपेक्षा अधिक श्रेष्ठ बनत चालले आहेत. दादा म्हणतात, उमेदवारशाही लोकशाहीत जागा घेण्याचा प्रयत्न करत आहे. लोकांना उमेदवार नको आहेत तर चारित्र्यवाद प्रतिनिधी पाहिजे आहेत म्हणून जनतेचे प्रतिनिधी कसे असावेत याबाबत दादांनी विवेचन केले आहे. त्यांच्या मते, "ज्या व्यक्तीमध्ये सत्तेची लोभी वृत्ती आणि या सत्तेतून प्रभुत्व गाजविण्याची आकांक्षा, इच्छा असणार नाही, अशी व्यक्ती चांगला प्रतिनिधी होवू शकते." (धर्माधिकारी (२००५)७००) लोकशाहीत प्रतिनिधी हे सत्तेचा वापर जनतेच्या विकासासाठी न करता आपल्या स्वार्थासाठी करतात. दादांनी सत्ता आणि संपत्तीचे हाव नसणाऱ्या व्यक्तीचे चारित्र्य शुद्ध मानले आहे. अशा व्यक्तींचा सत्तेचा क्षेत्रात प्रवेश झाला तरी या नि:स्वार्थीपणे कार्य करतात म्हणून सत्तेपासून दूर असणाऱ्या व्यक्तींना प्रतिनिधीत्व मिळावे, असे दादांचे मत आहे.

सत्ताकांक्षा असणाऱ्या व्यक्तीचा सत्तेच्या क्षेत्रात प्रवेश झाल्यास ती सत्तेचा दुरुपयोग करू शकते याबाबत दादांचे असे मत आहे की, "प्रतिनिधी असा असावा की जो सत्ताकांक्षी नसावा. सत्तेचा लोभी नसावा असा व्यक्ती सत्तेवर गेल्यावर तो सत्तेचा दुरुपयोग करणार नाही. जसा पैशाचा दुरुपयोग होतो तसा सत्तेचाही दुरुपयोग होवू शकतो." (धर्माधिकारी (२००५) ७०१) प्रतिनिधींना बरेचसे मतस्वातंत्र्य असते. म्हणून प्रतिनिधी निवडण्याची उमेदवार पद्धतीबदल करून नागरिकांनी स्वच्छ वातावरणातून आपल्या प्रतिनिधी निवडला पाहिजे. "प्रतिनिधी जनतेचा सेवक असावा तो दलनिष्ट नसावा, लोकनिष्ट असावा जनतेची ताकद वाढविण्यासाठी तो प्रयत्नशील असावा. जननिष्ट प्रतिनिधी हाच सुयोग्य प्रतिनिधी होवू शकतो." (धर्माधिकारी (२००५) ७०२) प्रत्येकजण आपला गट, पक्ष मजबूत करण्याच्या उद्देशाने कार्य करतात. त्यांना जनतेच्या विकासाप्रती उत्तरदायित्व असत नाही. पक्षनिष्टा ठेवून काम करणारे प्रतिनिधी हे फक्त आपल्या गटाचेच हित विचारात घेवून काम करतात. त्यांना पक्षनिष्ठा महत्वाची वाटते. म्हणून पक्षनिष्ट प्रतिनिधी नसावेत, असा दादांचा विचार आहे.

ज्याप्रमाणे सत्तानिष्ट, दलनिष्ट प्रतिनिधी नसावेत त्याप्रमाणे संप्रदायनिष्ट प्रतिनिधीत्वाबद्दल ही दादांची भूमिका नकारात्मक आहे. कारण संप्रदाय हा जातीतून निर्माण होतो. आपल्या जातीच्या विकासाचा संकुचित विचार होवून प्रतिनिधी फक्त त्याचाच विचार करत त्यातून जातीचा राजकारणातील प्रवेश समाजात मतभेद निर्मितीसाठी कारणीभूत ठरतो. म्हणूनच दादांना जातीचे

राजकारण मान्य नव्हते. त्यांच्या प्रतिनिधीत्वाबाबतही हाच विचार आहे. "प्रतिनिधी जातिनिष्ट अथवा संप्रदायनिष्ट नसावा तर तो लोकनिष्ट आणि राष्ट्रनिष्ट असावा." (धर्माधिकारी (२००५)७०३) ही एक प्रतिनिधीत्वाची दादांनी सांगितलेली अट आहे. सर्व, जात, धर्म यांना मानणारा धर्मनिरपेक्ष विचारांचे प्रतिनिधी आज गरजेचे असल्याचे दादांचे मत आहे.

आज आपल्याला समाजात प्रत्येक क्षेत्रात विषमता आढळत आहे. ह्या विषमतेचे निराकरण करण्याची गरज सातत्याने जाणवत आहे. म्हणून प्रतिगामी विचारांना मागे टाकून आधुनिक विचारांना आत्मसात करणारे प्रतिनिधीत्व आवश्यक आहे. त्याशिवाय समाजातील आर्थिक विषमता नष्ट होऊन समतोल पातळी निर्माण होणार नाही. दादांच्या मते, "प्रतिनिधी श्रीमंती-गरीबी ह्या दोन्हींच्या विरोधी लढणारा,लोकशाही आणि समाजवादी विचारांचा संगम असणारा असावा." (धर्माधिकारी (२००५)७०३) आर्थिक विषमता ही वर्गवारी निर्माण करणारे पहिले कारण आहे. यातूनच इतर क्षेत्रातील भेदभावाची निर्मिती होवू शकते. म्हणून श्रीमंतीची श्रीमंती आणि गरीबांची गरीबी कमी करण्यासाठी प्रतिनिधींनी प्रयत्न करणे गरजेचे असते. गरीबांच्या गरीबीचे निराकरण झाल्याशिवाय त्यांचा विकास होवू शकत नाही. म्हणून प्रतिनिधींनी लोकसत्तेच्या विकासासाठी श्रीमंती आणि गरीबी यांचे निराकरण केले पाहिजे.

लोकनीतीत सर्व जनतेला एक समान मानले जात असल्याने अल्पसंख्यांक आणि बहुसंख्यांक असा भेद केला जात नाही. अल्पसंख्यांकांच्या विकासाबाबत दादा असे सांगतात की, "नागरिकांनी मतदारांनी एक संकल्प करणे गरजेचे आहे तो तेथील अल्पसंख्य जातीला प्रतिनिधीत्व दिले पाहिजे." (धर्माधिकारी (२००५) ७०४) म्हणजे अल्पसंख्यांकावर बहुसंख्याकांकडून होणारा अन्याय रोखला जावू शकतो आणि अल्पसंख्याकांचा विकास साधला जावू शकतो असा दादांचा विश्वास आहे.

मानवाला सत्तेची प्राप्ती झाली की, कर्तव्याचा विसर पडतो, तो आपल्या कर्तव्याकडे दुर्लक्ष करून स्वार्थासाठी अधिकाराचा उपयोग करतो. या गोष्टीचा विचार करून महात्मा गांधी यांनी जगाचा इतिहास लिहणाऱ्याचा एच.जी. वेल्स यांनी लिहिलेल्या मानवाच्या अधिकाराचा जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली नाही ते म्हणाले होते माणसाच्या अधिकाराची ही सनद आहे. मला त्यात गोडी नाही. जर तुला मानवाच्या कर्तव्याची सनद लिहता आली तर लिहा यावर मी जरूर स्वाक्षरी करू शकतो. त्यांनी मानवाच्या अधिकारांपेक्षा कर्तव्याला अग्रस्थान दिले आहे. कारण "अधिकाराने वाद माजतो. कर्तव्याने वाद नाहीसा होतो. नागरिकांमधील वाद नाहीसा करायचा असेल तर कर्तव्यावर जोर दिला पाहिजे. नागरिक-नागरिकांमध्ये परस्पर विश्वासाचे वातावरण निर्माण व्हावे, या दृष्टीने मनुष्याच्या कर्तव्याचा विचार करण्यात यावा." (धर्माधिकारी (१९९८)२०५) प्रत्येकाने आपल्या अधिकाराला गौण स्थान देवून दुसऱ्याच्या अधिकाराला अग्रस्थान द्यावे, त्यामुळे राजकारणातील मुत्सद्देगिरी हेवेदावे नष्ट होतील.

"कर्तव्याच्या भावनेच्या दोन बाजू आहेत. माझे कर्तव्य व दुसऱ्याच्या अधिकार यांची सांगड आहे. दुसऱ्याच्या अधिकाराचा विचार करणे म्हणजे आपल्या कर्तव्याचा विचार करणे होय." (धर्माधिकारी (१९९८)२०५-२०६) आजच्या लोकांची वृत्ती म्हणजे दुसऱ्याच्या अडचणींचा आपल्याला कसा फायदा करून घेता येईल, हे बघणे होय ही प्रवृत्ती नष्ट व्हावी, असे दादांचे मत आहे. आपल्यातच दुसऱ्याची सोय पाहण्याची वृत्ती प्रत्येकात आली पाहिजे, दुसऱ्याच्या अडचणीचा विचार कमी करायचा तर त्यांच्या फायद्याचा विचार अधिक करण्याची वृत्ती वाढली पाहिजे. अशीच मनोवृत्ती राजकीय क्षेत्रातही विकसित करणे गरजेचे आहे.

दादांना अभिप्रेत असणारी लोकशाही ही संख्यात्मक नसून गुणात्मक स्वरुपाची होती. सर्वांच्या हिताचा संकल्प असला तरच सार्वमताची लोकशाही स्थापन होते. जेथे अल्प संख्याकाचे संरक्षण होते ती लोकशाही प्रगतीशील मानली जाते. या संदर्भात दादा म्हणतात, "ज्या लोकशाहीत अल्पसंख्याक सुरक्षित राहतात ती सभ्य लोकशाही अल्पसंख्यांकांचे संरक्षण गरजावर, संख्येवर किंवा शारीरिक शक्तिवर अवलंबून राहू शकत नाही. तेव्हा लोकशाही अहिंसेच्या पायावर उभारण्याखेरीज गत्यंतर राहिलेले नाही. लोकसत्तेचे अधिष्ठान गरज नको, सैन्य नको, लोकशाहीचे पाऊल आता शस्त्र सत्तेकडून नागरिक सत्तेकडे, प्रशासनाकडून अनुशासनाकडे पडले पाहिजे." (धर्माधिकारी (१९९८) २१०) बहुसंख्यांकांची सत्ता मानवीय सत्तेला अनुकूल नाही. उलट

अल्पसंख्यांकांचे स्वातंत्र्य मानवीय प्रतिष्ठेलाअनुकूल आहे. अल्पसंख्यांकांचे स्वातंत्र्य सुरक्षित असणे हेच लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. असे दादांचे मत आहे.

आपल्या देशात लोकशाही यशस्वी होण्यासाठी दादा दोन तत्त्वे सांगतात, "लोकशाहीचा जो अधिष्ठाता आहे. जो विधाता आहे. तो मतदार जागृत ठेवला पाहिजे. म्हणून अभिक्रमाचे संविभाजन झाले पाहिजे. प्रभावाचे संविभाजन झाले पाहिजे, प्रतिष्ठेचे देखील संविभाजन झाले पाहिजे आणि निर्णायक सत्तेचे व निर्णय शक्तीचे देखील संविभाजन झाले पाहिजे." (धर्माधिकारी (१९९८)१०५) सर्व समस्यांचे निर्णय घेण्याची शक्ती या सर्वसामान्य मतदारांमध्ये आली पाहिजे. अशी ही निर्णायक शक्ती ग्रामसभेद्वारे नागरिकांच्यात निर्माण होवू शकते. आज ज्या पंचायती आहेत त्यामध्ये विकेंद्रीकरण करणाऱ्या निर्णयशक्तींचा विकास झालेला नाही. केवळ सत्तेचे औपचारिक विकेंद्रीकरण होणे म्हणजे निर्णय शक्तीचा विकास होणे नव्हे. "ग्रामस्वराज्य जेव्हा अस्तित्वात येवू शकते तेव्हा जबाबदारी, प्रभाव, निर्णयशक्ती यांचे संविभाजन होईल." (धर्माधिकारी (२००५, क) ३५५) औपचारिक निवडणुकामधून जी पंचायत बनते त्यापेक्षा निवडणूक न घेता बनविल्या जाणाऱ्या पंचायतीमध्ये स्वत: मतदारच सभासद असतात. येथे प्रतिनिधित्व नसते. ग्राम स्वराज्य हे विकेंद्रीकरण स्वयंपूर्णता व परस्परपूरकता या तत्त्वावर उभे राहिल्यास अखंडता व अविभाज्यता साध्य होईल, याशिवाय विधायक व जिंवत राजकीय, राष्ट्रीयत्व प्रत्यक्षात येवू शकणार नाही. अशा प्रकारच्या स्वायत्त ग्रामसभांची आजच्या परिस्थितीत लोकशाहीला गरज आहे. दादांच्या मते, "ग्रामदान ही एक अशी प्रक्रिया आहे की जी नागरिकांमधील परस्पर सबंध वाढवील. पारस्पारिकतेबरोबरच त्यांच्या शक्तीचाही विकास करू शकेल यामुळे लोकशाहीचा पाया अधिक खोल व बळकट होवू शकतो." (धर्माधिकारी (२००२,क) ३५८)

निष्कर्ष :

आजच्या लोकशाहीमधील चुकांमुळे सुधारणा करून त्यामध्ये बदल करण्यास दादा सुचवतात. मानवाच्या स्वातंत्र्याचा विचार करून राज्यसत्तेचे नियंत्रण कमीत कमी करून लोकांच्या मर्जीतून राजकारण करावे. असा लोकशाहीचा विचारामध्ये लोकनीती, लोकसत्ता आणि लोकराज्य यांचा समावेश केला आहे. यातून समाजातील सर्वच स्तरावरील लोक हा घटक प्रत्यक्ष राजकारणात सहभागी होवून लोकसत्ता = लोकशाही स्थापन होवू शकते.

**संदर्भ सूची :**

१) अग्रवाल, गंगा प्रसाद: (२००८) (साम्ययोग साधना है नव्या युगाच्या निर्मितीच्या दिशा: सर्वसेवा संघ प्रकाशन राजघाट वाराणसी.

२) गांधी, मो के : (१९५२) साप्ताहिक हरिजन

३) कुमारप्पा भारतन (संपा): (१९५५), सर्वोदय, (गांधीजी), नवजीवन प्रकाशन मंदिर अहमदाबाद.

४) भावे विनोबा : (१९८९), सर्वोदय विचार आणि स्वराज्यशास्त्र, परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

५) Gandhi M. K. : (1956) Ruskin "Unto This Last" a paraphrase translated from Gujarati Navjivan Prakashan, Ahmedabad.

६) देव शंकरराव, (अनु) (२००३), सर्वोदय (जॉन रस्कीन लिखित 'Unto This last') मंजूळ प्रकाशन पुणे.

# वैशिष्ट्यपूर्ण भारतीय लोकशाही राजकीय व्यवस्था

**डॉ.मिनाक्षी गंगाधर मिणचे**
सहा. प्रा. आक्काताई रामगोंडा पाटील
कन्या महाविद्यालय, इचलकरंजी
Email ID -kumarkamte6@gmail.com

**सारांश**

लोकशाही या मराठी शब्दाची उत्पत्ती 'Dmocracy'या इंग्रजी शब्दापासून झाली,असून'Dmocracy या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील 'Dmos'आणि' Kratos'या शब्दापासून झाली आहे. त्याचा क्रमशः अर्थ **लोक** आणि **राज्य** असा होतो म्हणूनच'Dmocracy' म्हणजे लोकांचे राज्य असा अर्थ यात अभिप्रेत आहे. अब्राहम लिंकन यांनी'' **लोकशाहीची, लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य अशी सुटसुटीत व्याख्या केली आहे''**. तर ब्राईस लोकशाहीची व्याख्या करताना मतदान पात्र असणाऱ्यांपैकी बहुसंख्यांकाच्या हाती लोकशाहीत सत्ता असते. या गोष्टीवर भर दिला.थोडक्यात ''लोकशाही म्हणजे अशी व्यवस्था की ज्यात सामाजिक आर्थिक आणि राजकीय किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात रक्ताचा एक थेंबही न साठता झालेले परिवर्तन म्हणजेच लोकशाही होय''एकंदरीतच लोकशाहीत लोक कल्याणाला महत्त्व दिले जाते .बहुसंख्यांक लोकांचे कल्याण याच हेतुने राज्य काम करते लोककल्याणांमध्ये व्यक्ती विकासाला महत्त्व दिले जाते, आणि लोकशाही शासन पद्धतीत व्यक्ती विकासाला प्राधान्य देऊन त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी ही भारतीय लोकशाही शासन पद्धतीने स्वीकारलेली आहे.

**पारिभाषिक शब्द** : भारतीय,लोकशाही ,राजकीय, व्यवस्था, शासन समाजव्यवस्था, संविधान व सार्वभौमत्व.

**प्रस्तावना** :'आज जगातील सर्वच प्रगत राष्ट्रांमध्ये लोकशाही शासनाचा अवलंब केलेला आहे. जगातले पहिले लोकशाही राज्य गौतम बुद्धांच्या काळात भारतामध्ये होते, ते म्हणजे वैशालीची गणराज्य, प्राचीन काळातील लोकशाहीचे ते एक आदर्श राज्य मानले गेले होते''. अथेनस्यच्या नगर राज्यापासून लोकशाहीची संकल्पना मांडली गेली असली तरी त्यावेळी ती फार संकुचित होती . त्यात तुलनेने अल्पसंख्यांक असलेल्या नागरिकांनाच फक्त राजकीय अधिकार होते ,स्त्रिया व गुलाम हया बहुसंख्याक व्यक्ती ही अधिकारापासून वंचित होत्या, त्यामुळे खरा लोकशाही विचार हा 17 व्या शतकापासून सुरू झाला असे मानले जाते. इंग्लंडमधील रक्तविहीन क्रांती( 1688) अमेरिकन राज्यक्रांती (1776) आणि नंतर फ्रेंचेची राज्यक्रांती (1789) या तीन महत्त्वपूर्ण प्रसंगांनी या विचाराला चालना दिली.

## लोकशाहीचा उदय आणि विकास

प्राचीन ग्रीक व रोमन नगर राज्यात लोकशाहीचा जन्म झाला असे जरी म्हटले जात असले तरी या लोकशाहीमध्ये स्त्रियांना, गुलामांना शासन कारभारात भाग घेण्याचा अधिकार नव्हता. युरोपियन राज्यामध्ये राजेशाही होती, तिथे प्रजेचा अनविन्त छळ झाला. त्यामुळे राजेशाहीला लोक कंटाळले व गुलामगिरी पेक्षा मरण बरे ह्याच भूमिकेतून लोकांनी राज्यसत्तेला प्रतिकार केला. प्रत्येक व्यक्तीला शासनामध्ये भाग घेण्याचा नैसर्गिक अधिकार आहे, या विचारसरणीला 17 व्या शतकात जोर चढू लागला.लॉक,रुसो इत्यादी विचारवंतांच्या लेखणीचा परिणाम लोकांच्या मनावर झाला, तसेच बहुमताचा निर्णय राज्याने मान्य करावा. असा संकेत रूढ झाला. शासन कार्याचे मूल्यमापन जनतेनेच केली पाहिजे व जनतेच्या पाठिंबावर शासन व्यवस्था अवलंबून असते ,अशी विचारप्रणाली रूढ झाली त्यामुळे राज्यसत्तेचे अस्तित्व डळमळीत होऊन लोकशाही प्रणाली विकसित झाली.

लोकशाही या मराठी शब्दाची उत्पत्ती ‘Dmocracy’या इंग्रजी शब्दापासून झाली,असून‘Dmocracy या इंग्रजी शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील ‘Dmos’आणि’ Kratos’या शब्दापासून झाली आहे. त्याचा क्रमशः अर्थ **लोक** आणि **राज्य** असा होतो म्हणूनच‘Dmocracy’ म्हणजे लोकांचे राज्य असा अर्थ यात अभिप्रेत आहे. अब्राहम लिंकन यांनी’’ **लोकशाहीची, लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालवलेले राज्य अशी सुटसुटीत व्याख्या केली आहे’’**. तर ब्राईस लोकशाहीची व्याख्या करताना मतदान पात्र असणाऱ्यांपैकी बहुसंख्यांकाच्या हाती लोकशाहीत सत्ता असते. या गोष्टीवर भर दिला.थोडक्यात ‘’लोकशाही म्हणजे अशी व्यवस्था की ज्यात सामाजिक आर्थिक आणि राजकीय किंवा इतर कोणत्याही क्षेत्रात रक्ताचा एक थेंबही न साठता झालेले परिवर्तन म्हणजेच लोकशाही होय’’अनेक विचारवतानी लोकशाहीची व्याख्या करताना तो एक शासन प्रकार असे तिचे वर्णन केले, असले तरी तत्त्वतः लोकशाही केवळ एक शासन प्रकार नाही, तर तो एक जीवन मार्ग आहे, एक समाज व्यवस्था आणि अर्थव्यवस्था आहे .असे मानले जाते.

**उद्दिष्टे**

**१.** लोकशाही ही संकल्पना समजावून घेणे.

२. लोकशाहीचा उदय व विकास जाणून घेणे.

३. भारतीय शासनाच्या वैशिष्ट्यांचे वेगळेपण समजावून घेणे.

४. भारताने स्वीकारलेल्या लोकशाही शासन पद्धतीचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

**१** लोकशाही या संकल्पनेनेच लोकांचे राज्य निर्माण करणे शक्य झाले आहे

२. भारतीय लोकशाही शासन पद्धतीने वेगळा वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवला आहे.

३. भारताने स्वीकारलेल्या लोकशाही शासनपद्धतीने लोकांच्या मतानुसार शासन निर्माण करणे शक्य झाले आहे.

**अभ्यास पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधनावर आधारित आहे.लोकशाही विषयक लिहिलेल्या पुस्तकांच्या आणि त्याच्यावर आधारित पुस्तकांचा तसेच संदर्भ ग्रंथ ,इंटरनेट यांचा वापर सदर शोध निबंधासाठी केलेला आहे.

**भारतीय लोकशाहीपद्धती व अमंलबजवणी**

भारतीय समाजीवनाच्या जीवन प्रवासाचा मार्ग म्हणून लोकशाही व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. भारतीय लोकशाहीचे संवर्धन योग्य दिशेने होण्यासाठी परिश्रमपूर्वक या लोकशाहीचे मुलाधार ठरविण्यात आले. त्याचे प्रकटीकरण भारताच्या संविधानात झालेली आहे. भारताचे संविधान भारतीय समाज व्यवस्थेच्या विविध अंगांना स्पर्श करून जाते, या संविधानाने भारतीय लोकांचे सार्वभौमत्व निर्विवादपणे मान्य केले आहे. भारताच्या संविधानाच्या प्रस्तावितकातच याची प्रचिती येते संविधानाच्या प्रस्ताविकेतच सुरुवातीला आम्ही भारताचे लोक भारतीय लोकशाही न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यावर आधारित संवर्धित करण्याचा प्रयत्न करू असा संकल्प करतो असे म्हटले आहे हे संविधान जरी संविधान सभेतील लोकांनी तयार केले असले तरीही जबाबदारी भारतीय लोकांच्या वतीने संविधान सभेने पार पाडलेली आहे ,अशी त्यांची भावना आहे. त्यामुळेच भारताचे संविधान भारतीय लोक अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः अर्पण करीत आहेत याची स्पष्ट नोंद संविधानाच्या प्रस्ताविकात केली आहे.भारतीय लोकशाही

मधील सत्ता भारतीय लोकांच्या जास्तीत जास्त कल्याणासाठी सहभागीत्वाच्या मार्गाने वापरली जाईल लोकांचा जास्तीत जास्त सहभाग धोरणांचे नियोजन व अंमलबजावणीत करावयाचा असेल तर सत्तेच्या विकेंद्रीकरणास प्राधान्य द्यावा लागेल. भारतीय संविधानामध्ये जनतेचा सहभाग जनप्रतिनिधींच्या माध्यमातून केंद्र आणि राज्यपातळीवर कशाप्रकारे घेता येतील याबाबत स्पष्ट तरतुदी केलेल्या दिसून येतात.

लोकशाही शासन व्यवस्था म्हणजे कोणत्याही प्रश्नावर चर्चेच्या माध्यमातून मार्ग शोधणे आणि त्यानुसार मार्गक्रमण करणारी शासन व्यवस्था असते (लोकसभा, विधानसभा) चर्चेमुळे संबंधित विषयाच्या सर्व बाजूंवर विचार विनिमय करता येतो चर्चा नवीन विचारांना जन्म देते, चर्चेमुळे एकसूरी विचार मांडले जात नाहीत किंवा त्यामध्ये एक सारखेपणा नसतो, कारण सहभागी होणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे असे काही विचार किंवा मते असतात, ज्याला लोकशाहीमध्ये लोकमत /जनमत असे म्हटले जाते. जो लोकशाहीचा मूलभूत आधार आहे. त्यामुळे अनेक प्रकारचे विचार /मते समोर येतात त्यामधून जे चांगले विचार आहेत आणि जे विचार लोकहितार्थ पोषक आहेत,त्यांचा स्वीकार करणे सहज शक्य होत असते त्यामुळे लोकशाहीत चर्चा विचारांची देवाण-घेवाण विचारांवर सहमती याला महत्त्व प्राप्त होते.

**भारतीय लोकशाहीची वैशिष्ट्ये**

''परंपरेने हा देश कधीच लोकशाही नव्हता. समता ,स्वातंत्र्य , भावंडभाव, नागरिकांचे हक्क, निवडणुकांमध्ये लोकांनी निवडलेली सरकारे, सरकारांना प्रतिकार करण्याचा लोकांचा हक्क इ. गोष्टी या देशांत पूर्वी अभावानेच होत्या. त्यामुळेच प्रतिनिधिक लोकशाही संस्था येथे प्रयत्नपूर्वक जोपासल्या जाव्यात असा आग्रह स्वतंत्र आंदोलनाच्या नेत्यांनी धरला होता. अशा या भारतीय लोकशाही व्यवस्थेची महत्वपूर्ण वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील

**1. आधुनिक राज्यव्यवस्थेचा स्वीकार**

भारतीय संविधानकर्त्यांना या देशात जनतेच्या सार्वभौमत्वावर आधारित आधुनिक लोकशाहीची उभारणी करावयाची होती. त्यामुळे ''आम्ही भारतीय लोक'' अशा शब्दांनी त्यांनी संविधानाचा प्रारंभ केला .इंग्रजी राजवट या देशात येथे असताना शतकभराच्या कालावधीत येथे उत्क्रांत झालेली राज्यव्यवस्था सुद्धा या देशाच्या परंपरांचा एकअविभाज्य भाग झाली होती, अशी संविधानकारांची भूमिका होती. ती चालत आलेली राज्यव्यवस्था बाजूला सारून अगदीच वेगळया प्रकारची राज्यव्यवस्था उभारण्याचा प्रयत्न जर त्यांनी केला असता तर त्यात सातत्यभंग होण्याचा म्हणजेच पर्यायने अराजक माजवण्याचा धोका निर्माण झाला असता. त्या दृष्टीने ब्रिटिश राजवटीच्या काळात जो संवैधानिक विकासक्रम येथे घडवुन आणला होता, तोच पुढे चालवत संविधानकरांनी येथे संसदीय व संघराज्यात्मक राज्य प्रणाली स्वीकारली. १९३५ च्या कायद्यातील जवळपास 2/3 तरतुदी त्यामुळेच भारतीय संविधानात त्यांनी जशाच्या तशा स्विकारल्या.

**2. लोकांचे सार्वभौमत्व**

भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेत भारत हे सार्वभौम लोकशाही गणराज्य असेल म्हणजे भारतीय जनता हीच येथील संपूर्ण राज्यसत्तेचा मूलस्तोत्र आहे. 1909 पासून 1935 पर्यंतचे सर्व सुधारणा कायदे परक्या देशाच्या संसदेने भारतासाठी केलेले होते. हे भारत गणराज्य झाले याचा अर्थ असा आहे की देशातील तमाम सरकारी अभिकरणाची सत्ता संविधानातून व्यक्त झालेल्या जनहितेतूनच निर्माण झाली आहे, आणि नियमित काळानंतर निवडणुकीच्या द्वारे त्या सत्तेचे नूतनीकरण केले जाणे आवश्यक आहे. कोणालाही वंशपरंपरेने सत्ता उपभोगता येणार नाही .देशातील सर्व सत्तास्थाने जात, धर्म, वंश व लिंग निरपेक्ष प्रत्यक्ष नागरिकांसाठी खुली असून लोकांचा दर्जा प्रजाजनांचा नसून स्वतंत्र नागरिकाचा आहे.

**3. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार**

आपली लोकशाही'' प्रतिनिधी लोकशाही'' आहे. आकारमान व लोकसंख्या या दृष्टीने भारत एक मोठे राष्ट्र आहे. येथे समान हितसंबंध असलेल्या लोकांचे अनेक गट आहेत, आणि त्यांचे परस्पर संबंध अत्यंत गुंतागुंतीचे आहेत .त्यामुळे आपल्याला राज्यकारभार पूर्ण सहमतीच्या आधारे किंवा एकमताने चालणे शक्य होत नाही. सर्व लोकांना सर्व प्रश्नाबाबत, सर्व वेळेला सहभाग घेणे शक्य नसते, म्हणून लोकांना आपल्या इच्छा, आकांक्षा आणि हितसंबंध हे आपल्या प्रतिनिधींच्या मार्फत व्यक्त कराव्या लागतात .आणि प्रतिनिधींची निवड करावी लागते आणि हे करण्यासाठीच मतदानाची घटनात्मक तरतूद केलेली आहे.

आपल्या संविधानाच्या15व्या प्रकरणातील अनुच्छेद 326 मध्ये मताधिकाराबाबत स्पष्ट तरतूद केलेली आहे. त्यानुसार केंद्र पातळीवर लोकसभेच्या आणि राज्यस्तरावर विधानसभेच्या निवडणुका सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वानुसार होतील, वयाची 18 वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही भारतीय नागरिकाला कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मताधिकार दिलेला आहे. ( 62 वी घटना दुरुस्ती) आपल्या संविधानाची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर विधिमंडळांनी केलेल्या कायद्यानुसार हे सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे तत्व अन्य स्तरावर कार्य करणाऱ्या लोकशाही स्वराज्य संस्थांमध्ये देखील स्वीकारले गेले. आज अगदी ग्राम स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक सुद्धा सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वावर घेतली जाते. अशा रीतीने लोकांना स्थानिक पातळीपासून ते राष्ट्रीय पातळीपर्यंत कार्य करणाऱ्या संस्थांचा कारभार आपल्या प्रतिनिधींच्या मार्फत चालवण्याची संधी मिळते.

''इंग्लंड ,अमेरिका आणि इतर अनेक प्रगत लोकशाही राष्ट्रांमध्ये जिथे मतांचा हक्क मिळवण्यासाठी लोकांना विशेषत: स्त्रियांना कित्येक वर्ष वाट पहावी लागली, आणि टप्प्याटप्प्याने व संतगतीने मताधिकाराची व्याप्ती वाढली. तिथे भारतात मात्र एकाच वेळी सर्व थरातल्या कोट्यावधी स्त्री पुरुष नागरिकांना एका फटक्यात तो हक्क मिळाला ही जागतिक इतिहासात महत्त्वाची घटना ठरते.

**4. संसदीय शासन पद्धती** ;

स्वतंत्र भारताची शासन पद्धती अमेरिकेप्रमाणे अध्यक्षीय असावी की इंग्लंड प्रमाणे संसदीय असावी याचा निर्णय घेताना संविधान सभेने भूतकाळ, वर्तमान काळ आणि भविष्यकाळ असा तीनही दृष्टीने विचार केला. विचारांअती त्यांनी संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केला. येथील लोकांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना संसदीय पद्धतीचा थोडाफार सराव झाला होता, ही भूतकालीन वस्तुस्थिती त्यांच्यासमोर होती.देशासमोरची मोठमोठाली आर्थिक व सामाजिक आव्हाने फिरवायची तर कार्यपालिका आणि विधिमंडळ यांनी सलोख्याने व सहकार्याने काम केले पाहिजे ही वर्तमानकालीन गरज त्यांना जाणवत होती. त्याचप्रमाणे येथील सरकार स्थिर राहावे आणि येथील नवजात लोकशाही टिकून राहावी ही त्यांची भविष्यकालीन अपेक्षा होती. या तीनही दृष्टीने संसदीय पद्धतीच योग्य वाटली.अध्यक्षीयपद्धत येथे अपरिचित असल्यामुळे लोकांना डोईजड व कटकटीची वाटेल, कार्यपालिका व विधिमंडळ यांच्यात बेबनाव झाले तर येथील विकासाला खेळ बसेल आणि परिणामी येथील राजकीय जीवनच पार विस्कळीत होऊन जाईल अशी भीती संविधानकारांना वाटत होती. त्यामुळेही त्यांनी संसदीय पद्धतीच्या बाजूने कौल दिला असावा.

भारत हा विविधता पूर्ण व बहुकेंद्रीय देश आहे येथे एकत्र राहणाऱ्या सर्व स्तरांना व गटांना राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची पुरेपूर संधी व प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता अध्यक्षीय पद्धतीपेक्षा संसदीय पद्धतीत जास्त आहे असे संविधानकारांची मत होते.

केंद्र आणि घटक राज्य अशा दोन्ही स्तरांवर संसदीय शासन प्रणाली संविधानाने निर्माण केल्या आहेत. दोन्ही स्तरांवरच्या कार्यपालिका त्या त्या स्तरावरील विधिमंडळाच्या लोकनिर्वाचित सभागृहाला सामुदायिकरित्या जबाबदार असतात, आणि तिचा विश्वास असेपर्यंतच सत्तेवर राहू शकतात. थोडक्यात संविधानकारानीं संसदीय प्रणाली बाबत इंग्लंडचा कित्ता गिरवला असून त्या देशातील अनेक अलिखित पायऱ्यांना त्यांनी लेखी स्वरूप दिले आहे.

**5. नागरिकांचे मूलभूत हक्क**

राष्ट्राच्या मानवी संसाधनाचा विकास करावयाचा असेल तर नागरिकांची प्रतिष्ठा जपली जायलाच हवी. नागरिकांना लोकशाही प्रक्रियांमध्ये सहभागी होता यावे, आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा जास्तीत जास्त विकास करून घेता यावा यासाठी त्याला मूलभूत हक्कांची आवश्यकता असते, या हक्कांमधून व्यक्तीची प्रतिष्ठा जशी प्रस्थापित होते. त्याचप्रमाणे राज्यसत्तेवरील मर्यादा ही स्पष्ट होतात. लोकशाही राज्यात व्यक्तीच्या हक्कांचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असतो लोकशाहीचे यशापयश हे लोकांना किती स्वातंत्र्य आहे यावर अवलंबून असते ही लोकशाही राज्याची खरी निशाणी असते.म्हणून प्रत्येक लोकशाही राज्यात व्यक्तीला स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल असे वातावरण निर्माण करणे आणि राज्याची शांतता व सुरक्षितता ही कायम टिकून राहील याकडे लक्ष देवून या दोन्ही गोष्टीत संतुलन साधने महत्त्वाचे असते आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी लोकांना हक्क द्यावे लागतात.

भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागात मूलभूत हक्कांच्या समावेश केलेला आहे त्याचे थोडक्यात वर्णन पुढील प्रमाणे

1. समानतेचा हक्क ( अनु 14 ते 18)
2. स्वातंत्र्याचा हक्क (19 ते 22)
3. शोषणाविरुद्धचा हक्क (23व 24)
4. धर्म स्वातंत्र्याचा हक्क आणि( 25 व28)
5. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क अनु( 29व 30)
6. सवैधानिक उपाययोजनांचा( अनु. 35)

पूर्वी संविधानात मालमत्तेच्या हक्काचा समावेश करण्यात आलेला होता परंतु 44 व्या घटना दुरुस्तीने तो वगळण्यात आला आहे

**6. संघराज्य पद्धती**

1947 मध्ये स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारत हा ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग होता त्यात कमी अधिक स्वायत्तता असलेली 500 हून अधिक संस्थाने होती भाषिक व,धार्मिक अशा वैविध्याने नटलेल्या या देशात स्वातंत्र्य देताना येथील प्रांतांना क्रमशः स्वायत्तता देण्याचे धोरण इंग्रजांनी आखले 1919 च्या मॉन्टेग्युचेम्सफोर्ट सुधारणा हा त्याचा एक भाग होता त्यात प्रांतांना काही प्रमाणात आपापल्या क्षेत्रात स्वायत्तपणे कारभार करण्याचे अधिकार देण्यात आले या धोरणाचाच एक भाग म्हणून 1935 मध्ये सर्व संस्थाने व ब्रिटिशाना खालील प्रांत यांचे मिळून एक संघराज्य निर्माण करण्याचे इंग्रज सरकारने ठरविले. त्यासाठी 1935 चा सुधारणा कायदा संमत करण्यात आला या कायद्याची अंमलबजावणी पूर्णपणे प्रत्यक्षात होऊ शकली नाही आपला वेगळा दर्जा सोडून संस्थानिक संघराज्यात सामील होण्यास राजी नव्हते त्यात 1939 मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने या प्रक्रियेस खेळ बसले 1947 मध्ये भारताची फाळणी झाल्यावर मात्र सर्व संस्थांचे विलीनीकरण करण्यात येऊन घटना समितीने भारतासाठी संघराज्य निर्माण करण्याचे ठरविले त्यानुसार त्यातील प्रांतांचे अ ब क ड असेच प्रकार पाडण्यात आले या निर्णयाला प्रांतांना त्यांच्या प्रकारानुसार कमी अधिक स्वायत्तता होते पुढे 1956 मध्ये भाषावार प्रांतरचना झाल्यावर ही प्रतवारी रद्द करण्यात आली काही केंद्रशासित प्रदेश वगळता सर्व प्रांतांना घटक राज्याचा दर्जा मिळाला अशाप्रकारे भारतीय संघराज्याची उत्क्रांती ही एकात्म राज्यातून संघराज्याकडे झाली आहे

भारताचा खंडप्राय आकार येथील प्रचंड लोकसंख्या भौगोलिक, भाषिक, धार्मिक ,वंशिका आणि इतर प्रकारच्या विविधता आणि पूर्वापार येथील सामाजिक व राजकीय जीवनात नांदत होती

**विकेंद्रीत लोकशाही**

भारतीय लोकशाहीच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी विकेंद्रीत लोकशाही हे ही एक महत्त्वपूर्ण असे वैशिष्ट्य आहे .विकेंद्रीत लोकशाही म्हणजे काही विशिष्ट कार्य पार पाडण्यासाठी मध्यवर्ती सत्तेने इतरत्र विभागलेल्या क्षेत्रीय संघटनांना कंसात स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक ते अधिकार प्रदान करणे होत व त्या माध्यमातूनच सत्तेचा ओघ तळपातळीपर्यंत पोहोचवला जावा हा हेतू यामागे आहे.

7. **स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि न्यायालयीन पुनर्विलोकन**

व्यक्तीच्या हक्कांना न्यायालयीन संरक्षण नसेल तर त्यांचा संविधानात समावेश करून काहीच साध्य होत नाही याची संविधान कारांना पुरेपूर कल्पना होते त्यामुळे त्यांनी व्यक्तींना आणि समूहांना आपल्या हक्काच्या संरक्षणासाठी न्यायालयाकडे धाव घेण्याचा हक्क आवर्जून दिला एवढेच नव्हे तर न्यायपालिका स्वतंत्र व निपक्षपाती राहील असा बंदोबस्त केला. मूलभूत हक्कांची संरक्षक आणि संघराज्याच्या समोर मोलाचे निरीक्षक ही भूमिका जशी भारताची न्यायव्यवस्था पार पडते.त्याचप्रमाणे विधिमंडळ आणि कार्यपालिका आपापल्या कक्षा तर ओलांडत नाहीत ना यावरही ती लक्ष ठेवते.कायद्याचे अधिराज्य अमलात आणणे आणि गरज पडेल तेव्हा संविधानाचा अर्थ लावणे, याही जबाबदाऱ्या न्यायव्यवस्थेला पार पाडाव्या लागतात.त्यासाठी तिला कार्यपालिकेच्या व विधिमंडळाच्या नियंत्रणापासून मुक्त ठेवणे संविधान कारांना गरजेचे वाटले, आणि त्यांनी त्यासाठी आवश्यक त्या तरतुदी केल्या. विधिमंडळांनी केलेला कायदा किंवा प्रशासनाचा निर्णय व कृती जर संविधानाचा भंग करणारी असेल ,तर न्यायालय तिला रद्दबाबत ठरवू शकते. संविधान दुरुस्तीलाही हा नियम लागू आहे.

8**. मार्गदर्शक तत्वांचा स्वीकार**

मूलभूत हक्क नागरिकांना उपभोगायला मिळायचे असतील तर त्यासाठी अनुकूल सामाजिक व आर्थिक परिस्थिती समाजात असावी हे उघडच आहे. अशी अनुरूप परिस्थिती आज सर्वांना उपलब्ध नाही, याची जाणीव संविधानकरांना होती,ती उपलब्ध नसण्याची काही नैसर्गिक कारणे आहेत तशीच काही सामाजिक कारणे ही आहेत हे त्यांना दिसत होती .भारत हे कल्याणकारी राज्य व्हावे येथे समाजवाद व सामाजिक न्यायावर आधारित समाज साकार व्हावा ,अशी त्यांची अपेक्षा होती .त्या दृष्टीने संधीचे समानता किंवा नकारात्मक स्वातंत्र्याचा हक्क संविधानात समाविष्ट असणे पुरेसे नाही तर ती संधी प्रत्येकाला पदरात पाडून घेता येईल असे सामाजिक, आर्थिक पर्यावरण समाजात असावयास पाहिजे त्यासाठी आणखीन काही सकारात्मक हक्क नागरिकांना दिले जाणे संविधान कर्त्याला आवश्यक वाटत होते .पण सगळे हक्क सगळ्या नागरिकांना पुरविणे राज्यसंस्थेच्या आर्थिक क्षमतेत बसणारे नव्हते ही अडचण होती म्हणून त्यांनी मार्गदर्शक तत्त्वांचा भाग संविधानात जोडून त्यात या सकारात्मक हक्कांचा अंतर्भाव केला. जर यातील हक्क नागरिकांना मिळाले नाही तर ते न्यायालयाकडे दाद मागू शकत नाहीत .पण तरीही राज्यकर्त्यांसमोर आदर्श म्हणून त्यातील तत्त्वे मोलाचीच असल्यामुळे राज्यकारभारत त्यांना महत्त्वाचे स्थान आहे हेही तितकीच खरे आहे.

अशाप्रकारे भारतीय लोकशाही पद्धतीची वैशिष्ट्ये असलेली आपणास दिसून येतात थोडक्यात सर्वसामान्यपणे लोकशाही म्हणजे लोकांचे राज्य असे म्हटले जाते पण आज जगातील लोकशाही राज्य पाहिली तर ती या कसोटीला उतरत नाहीत असे दिसून येते. मग ते अमेरिकेचे अध्यक्षीय पद्धतीचे, संघराज्य असो किंवा ब्रिटिश पद्धतीचे व भारतासारखे ससंदीय राज्य असो या सर्व पद्धतीमध्ये लोक राज्य करीत नाहीत, तर त्यांनी निवडून दिलेले प्रतिनिधी त्यांच्यावर राज्य करीत असतात म्हणजेच ते लोकशाहीच्या नावाने चालविलेले लोकप्रतिनिधींचे राज्य असते.

सत्तेसाठी राजकारण सगळीकडे चाललेली आहे परंतु व्यक्ती हा समाजाचा पाया आहे त्यासाठी व्यक्तीच्या आचारात विचारात बदल घडवून आणणे जिकिरीचेआहे. त्याखेरीज समाज परिवर्तन संभवत नाही.व्यक्तीला जागृत करणे तिला विवेकशील बनवणे हेच आजचे मुख्य काम आहे.

**निष्कर्ष**

**1** लोकांनी लोकांकरिता बनवलेले शासन ही लोकशाही आहे

2. सार्वभौम जनता हीच लोकशाहीचा उगम व विकास आहे

3. भारताने स्वीकारलेल्या लोकशाही शासन पद्धतीमुळे व्यक्ती विकासाला चालना मिळाली.

4. भारतीय लोकशाही शासन व्यवस्था ही स्वातंत्र्य,समता, बंधुता व न्याय या तत्त्वांची जोपासना करणारी व्यवस्था ठरली आहे

**समारोप:** थोडक्यात लोकशाही हा जसा शासनाचा प्रकार आहे तसाच तो एकत्रित राहण्याचा सिद्धांत आहे किंबहुना तत्त्वज्ञान आहे लोकशाही शासन हे साध्य नसून ते लोककल्याणाचे साधन आहे कोणत्याही व्यक्तीला इतरांच्या सुखाचे साधन मानण्यास येऊ नये असे तत्त्वज्ञान या पद्धतीने देण्यात आली आहे म्हणून जीवनपद्धती आणि शासनाचा प्रकार या दोन्ही दृष्टीने लोकशाहीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे

संदर्भसूची


1. डॉ. भोळे भास्कर ,राजकीय सिद्धांत, -प्रकाश पिंपळापुरेकर अँणड कंपनी पब्लिशर्स नागपूर 2002.
2. डॉ. विभूते भालबा -प्रबोधन प्रकाश ज्योती निवडक प्रबंध निवडक निबंध ,ग्रामपंचायत लोक सहभाग आणि विकास ,,प्रकाशक प्रसाद कुलकर्णी इचलकरंजी 2004
3. डॉक्टर भोळे भास्कर भारताचे शासन आणि राजकारण प्रकाशक पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर 2004
4. डॉ. भोळे भास्कर,भारताचे शासन आणि राजकारण,प्रकाश पिंपळापूरेकर अँड कंपनी पब्लिशर्स नागपूर 2004
5. इंटरनेट
6. वर्तमानपत्र

# भारतीय लोकशाही

**कु. प्राजक्ता अजितकुमार वाडकर**
बी .ए भाग ३ मुधोजी महाविद्यालय ,फलटण

**सारांश :** जगतील सर्वात मोठी लोकशाही कोणत्या देशाची असा प्रश्न पडला तर त्याच उत्तर हे भारतीय लोकशाही असेल स्वातंत्र्य प्राप्ती नंतर जगतील राजकीय विचारवंतना हा प्रश्न पडला होता कि ह्या अडाणी व रानटी लोकांना प्रश्न लोकशाही व्यवस्था झेपेल का तरीही गेली ७ दशकाहून अधिक काळ भारतीय लोकशाही जगतील सर्वात मोठी लोकशाही म्हणून थाट मानेने उभी आहे,याचा शोध घेण्यासाठी मी हा शोध निबंध लिहित आहे .त्या साठी मी वर्णात्मक समीक्षा पद्धतीचा वापर करणार आहे .

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, शासन, आव्हाने

प्रस्तावना :-

आज रोजी भारतीय लोकशाहीला **75** वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने 'आजादी चा अमृत महोत्सव' हा शासनातील सर्व स्तरावरती साजरा करीत आहोत.या संकल्पनेतून भारतीय लोकशाही ही जगातील सर्वांत मोठी लोकशाही आहे. म्हणून मी माझे विचार प्रकट करण्याच्या हेतूने हा शोध निबंध लिहित आहे.

संज्ञा :-

● लोकशाही म्हणजे 'लोकांची सत्ता,लोकांनी चालविलेली प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सत्ता होय.

●अब्राहम लिंकन - लोकांचे, लोकांनी लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय.

उद्देश :-

प्रस्तुत संशोधन निबंधाचे खालील उद्देश आहेत.

**1)**लोकशाही म्हणजे काय **?** हे समजून घेणे.

**2)** भारतीय लोकशाहीचे भवितव्य काय **?** हे अभ्यासणे.

गृहीतके :-

**1)** मा. नरेंद्र मोदी सारखा एखादया सामान्य कुटूंबामध्ये जन्मलेला व्यक्तीसुद्धा भारतीय लोकशाहीच्या समता या तत्त्वामुळे भारताचा पंतप्रधान झालेला आपल्याला पहायला मिळतो.

**2)** मा.'इंदिरा गांधी'ही एक स्त्री असूनसुद्धा भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनण्याचा त्यांना मान मिळाला भारतीय लोकशाहीच्या न्याय व समता या तत्त्वामुळे हे सिद्ध झाले.

**3)** राजू शेट्टीसारखी दुध व्यवसाय करणारी व्यक्तीसुद्धा शेतकऱ्यांच्या प्रश्न ,मागण्या मान्य करून घेते. हे केवळ शक्य होते ते म्हणजे भारतीय लोकशाहीच्या समता व न्याय या तत्त्वामुळेच शक्य होते.

**4)** भारतीय लोकशाही ही जगातील खरीखुरी लोकशाही आहे. कारण मा. एकनाथ शिंदे यांच्यासारखी रिक्षाचालक व्यक्तीसुद्धा राज्याच्या मुख्यमंत्री पदापर्यंत पोहचू शकते हे शक्य होते.

लोकशाही उदय आणि विकास :- प्राचीन ग्रीक व रोमन नगरराज्यात लोकशाहीचा जन्म झाला असे म्हटले असले तरी स्त्रियांना आणि गुलामांना शासनकारभारात भाग घेण्याचा अधिकार नव्हता. प्रत्येक व्यक्तीला शासनामध्ये भाग घेण्याचा नैसर्गिक अधिकार आहे ,या विचारणीला **17** व्या शतकापासून जोर चढू लागला. शासन कार्याचे मूल्यमापन जनतेनेच केले पाहिजे व जनतेच्या पाठिंब्यावरच शासनसंस्था अवलंबून असते. अशी विचारप्रणाली रूढ झाली. त्यामुळे राज्यसत्ता डळमळीत होऊन लोकशाहीप्रणाली विकसित झाली लोकशाही या मराठी शब्दाची उत्पत्ती **Dmocracy** या इंग्रजी शब्दापासून झाली असून **Dmocracy** या इंग्रजी

शब्दाची उत्पत्ती ग्रीक भाषेतील **Demos** आणि **Kartos** या शब्दापासून झाली आहे. थोडक्यात **Dmocracy** म्हणजे लोकांचे राज्य असा अर्थ अभिप्रेत आहे. प्रा. सिली यांच्या मते-ज्या शासनात प्रत्येकाला सहभागी होता येते ती लोकशाही होय. औदयोगिक क्रांतीमुळे लोकशाहीच्या जडणघडणीस पाश्चात्त्य देशात मोठीच चालना मिळाली. नवनवे वैज्ञानिक शोध लागले,महाकाय यंत्रे निर्मान झाली. कारखाने निघून हजारो कामगारांना रोजगार मिळाले.

**15** ऑगस्ट **1947** रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले.भारतीय संविधान सभेने भारताची राजकीय प्रणाली म्हणून संसदीय शासनपद्धतीचा स्वीकार केला आणि खरोखरच जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचा उदय झाला तो दिवस **26** जानेवारी **1950. 26** जानेवारी **1950** रोजी भारताने गणराज्य प्रजासत्ताक शासनपद्धतीचा स्वीकार केला. भारतीय लोकशाही टिकेल की नाही .अशी त्या काळातील राजकीय विचारवंतांना मोठी चिंता होती. कारणही तसेच होते, भारतावरती जवळजवळ इंग्रजांची सत्ता **200** वर्षाहून जास्त होती. त्यातच भारतामध्ये विविध जाती,रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचा भारतीय लोकांवरती प्रभाव होता. त्यामुळे ही लोकशाही व्यवस्था अनुकूल आहे की नाही असे बऱ्याच राजकीय विचारवंताना वाटायचे कारण त्यांचे असे म्हणणे होते की गुलामीची सवय असलेल्या या रानटी लोकांना शासन चालवायला जमेल की नाही यात शंकाच होती. पण भारतीय लोकांनी त्यांचे हे मत पूर्णपणे खोडून काढलेले आहे.

भारतीय लोकशाहीला आज रोजी **75** वर्षी पूर्ण झाली आहेत. या कालावधीमध्ये देशामध्ये **17** निवडणूका लोकशाहीच्या पार पडल्या आहेत. या कालावधीत देशाने विविध पक्षाची सरकारे पाहिली आहेत. त्यामध्ये विविध जाती धर्माच्या लोकांनी देशाचे प्रतिनिधित्व केले आहे.काही बोटांवर मोजण्याइतक्या घटना वगळता देशामध्ये शांतता अबाधित आहे. भारतीय लोकशाहीने न्याय, समता, बंधूता था तत्वांचा स्वीकार करून सर्वांना राज्यकारभारात समाविष्ट करून घेतले आहे.आज रोज भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी व विस्तृत लोकशाही म्हणून ओळखली जाते.जगातील सर्व देश भारतीय लोकशाहीचे अनुकरण करण्याचे प्रयत्न करतात.”भारतीय लोकशाही की जगामध्ये आदर्श लोकशाही म्हणून तिचा नावलौकिक आहे.”

**निष्कर्ष**

**1)** भारतीय लोकशाही खऱ्या अर्थाने नावारूपाला आलेली लोकशाही आहे.

**2)** लोकशाही मध्ये जी गुणधर्म, मूल्य तत्व असतात ते भारतीय लोकशाहीत आढळून येतात .

**3)** लोकशाहीचा अभ्यास करताना राजकीय विचारवंत प्रथम भारतीय लोकशाहीकडे पाहतात. कारण ती लोकशाहीला पुरक आणि पोषक आहे.

**संदर्भ-**

१)देशपांडे, निर्मला ‘’दिल्लीहून नियोजन नको" पंचायतराज्य, जिल्हा नियोजन आणि विकास परिसंवाद निवडक निबंध, संपादक आणि प्रकाशक प्रा. पी. बी. पाटील **1989** प्र.क. **93**

**2 )**डॉ .भोळे भास्कर राजकीय सिद्धांत' प्रशासक पिंपळपुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स नागपूर **- 2002** पृ. क्र **.13 152**

२ ) डॉ. भोळे भास्कर **''**भारताचे शासन आणि राजकारण’’ प्रकाशक पिंपळपुरे ॲन्ड कंपनी पब्लीशर्स नागपूर **- 2004** पृ.कृ **42**

**4)**डॉ. विभूते, भालबा, प्रबोधन प्रकाशन, ज्योति निवडक निबंध "ग्रामपंचायत लोक सहभाग आणि विकास " प्रसाद कुलकर्णी, इचलकरंजी **2004** पृ. क्र. **8**

**5)** उक्त पृ. क्र. **152**

**6)** उक्त पृ. क्र. **152**

**7)**उक्त पृ. क्र.**42**

# लोकशाही शासनपद्धती मधील प्रचाराचे बदलते स्वरूप

**प्रा. प्रदीपकुमार आनंदराव चरणकर**
श्री शिव शाहू महाविद्यालय सरूड
ता.शाहूवाडी जि. कोल्हापूर

**सारांश**

आजच्या युगात लोकशाही हा एक सर्वोत्तम शासन प्रकार म्हणून जगभर स्वीकारला गेला आहे . लोकशाही हा अतिशय लोकप्रिय प्रकार मानला जातो त्यामुळे जगातील बहुतेक राष्ट्रांनी लोकशाही हा शासन प्रकार स्वीकारला आहे म्हणूनच या युगाला लोकशाहीची युग असं म्हटलं जातं.लोकशाही म्हणजे लोकांचे शासन होय. लोकशाहीमध्ये प्रचाराचे मुख्यता दोन उद्दिष्ट असतात एक म्हणजे लोकशाही लोकांच्या मध्ये रुजवणे तिचं जतन करणे व दुसरे कार्य म्हणजे सत्ता मिळवण्यासाठी प्रयत्न करणे

**पारिभाषिक शब्द:** प्रचाराचा इतिहास, प्रचाराचे महत्त्व, प्रचाराचे वर्गीकरण, प्रचाराची साधने

**प्रस्तावना**

लोकशाहीमध्ये प्रचाराचे प्रथम उद्दिष्ट म्हणजे लोकशाही लोकांच्या मनामध्ये रुजवणे,लोकशाहीची मूल्यांची जपणूक करणे,लोकशाहीच जतन करणे व लोकशाहीच्या मूल्यानुसार राज्यकारभार करणे ही प्रक्रिया निरंतरपणे कार्यरत ठेवावे लागते तरच लोकशाही आपलं अस्तित्व टिकून ठेवू शकते. लोकशाही ही केवळ शासन पद्धती न राहता नागरिकांची जीवनपद्धती बनली पाहिजे यासाठी विविध स्तरावर प्रयत्न चालू असतात म्हणूनच महात्मा गांधीजींनी लोकशाहीची व्याख्या करताना लोकशाही एक जीवन पद्धती आहे असं म्हटलं आहे. लोकांनी लोकशाहीवादी जीवन पद्धती स्वीकारल्यास, ती जतन केल्यास आपोआपच राजकीय लोकशाही टिकून राहते त्यामुळेच लोकशाही लोकांच्या मध्ये रुजवण्यासाठी विविध स्तरावर विविध प्रकारे लोकशाहीचा प्रचार करण्याचं कार्य चालू असते

लोकशाहीमध्ये प्रचाराचे दुसरे उद्दिष्ट म्हणजे सत्ता प्राप्त करण्यासाठी बहुमत मिळवणे.लोकशाहीमध्ये अंतिम सत्ता ही जनतेच्या पर्यायाने लोकांच्या हातात असते. व ती सत्ता सर्व लोकांच्या हितासाठी वापरली जाते यामध्ये जनता ही सार्वभौम मानली जाते लोक प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीद्वारे आपल्या प्रतिनिधींची निवड करतात व ते निवडून आलेले प्रतिनिधी कायदेमंडळात लोकांच्या वतीने कारभार पाहतात. लोकप्रतिनिधींची केलेली निवड ही ठराविक काळासाठी असते. निश्चित कालावधी संपल्यानंतर ह्या लोकप्रतिनिधींना परत निवडणूक प्रक्रियेला सामोरे जावे लागते.आपल्या भारत देशामध्ये लोकशाही शासन पद्धती स्वीकारली आहे भारतामध्ये केंद्रीय कायदेमंडळ व राज्यातील कायदेमंडळातील सदस्यांची व स्थानिक स्वराज्य संस्थांतील सदस्यांची निवड ही पाच वर्षासाठी केली जाते. दर पाच वर्षांनी निवडणुका घेतल्या जातात व सरकार निवडले जाते त्यामुळे प्रत्येक पक्ष हा आपल्याच पक्षाला जास्तीत जास्त मते मिळावीत अर्थात आपल्या पक्षाला सार्वत्रिक निवडणुकीत बहुमत प्राप्त व्हावे यासाठी प्रयत्न करत असतो त्यासाठी तो जनतेला पर्यायाने मतदारांना प्रभावीत करण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न करत असतो त्याच प्रयत्नांचा एक भाग म्हणजे निवडणूक प्रचार होय. प्रस्तुत शोधनिबंधात लोकशाही मधील निवडणूक प्रचार व त्याचे काळानुसार बदलते स्वरूप यावर चर्चा करण्यात आलेली आहे. लोकशाहीमध्ये बहुमत प्राप्त करण्यासाठी व मतदारांनी आपल्याच पक्षाला बहुमत द्यावे यासाठी मतदारांना प्रभावित करणे आवश्यक असते आणि मतदारांना प्रभावित करण्यासाठी प्रचार हे सर्वोत्तम साधन मानले जाते.मतदारांना आपल्या विचाराने प्रभावित करण्यासाठी प्रचार करण्याचा प्रकार हा आधुनिक नाही तर प्राचीन काळातही आपल्या जनतेला प्रभावित करण्यासाठी प्रचाराचे साधन वापरले जात असे

काळानुसार प्रचाराचे स्वरूप हे नेहमी बदलत गेले आहे. प्राचीन काळात हिंदू धर्मामध्ये धर्मप्रसार व धर्म प्रचार करण्यासाठी वेद,पुराण यांचा आधार घेतला गेला आहे किंबहुना प्रचार साधने म्हणून वापरले गेलेली आहेत आणि आजही वापरले जातात

आजच्या युगात प्रचाराचे स्वरूप हे पूर्णपणे बदलले गेले आहे . आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान च्या युगात नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रचार करण्याचा प्रयत्न केला जातो सध्या व्हाट्सअप, फेसबुक व इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांची मते प्रभावित करण्याचा प्रयत्न केला जातो. त्याचबरोबर सिनेमा, वर्तमानपत्र, रेडिओ लोड स्पीकर, टेलिव्हिजन, साहित्य, सभा, घोषणा व सांस्कृतिक कार्यक्रम याद्वारे ही प्रचार केला जातो प्रस्तुत शोध निबंधात या सर्वांचा आढावा घेण्यात आला आहे त्याद्वारे लोकशाहीमध्ये सत्ता मिळवण्यासाठी प्रचाराचे महत्त्व, प्रचाराचे चांगले वाईट परिणाम, प्रचार साधने व प्रचाराचे प्रकार इत्यादी बद्दल लिखाण करण्यात आले आहे.

आजच्या काळात लोकशाही हा सर्वोत्तम शासन प्रकार म्हणून स्वीकारला गेला आहे सर्वोत्तम शासन प्रकार म्हणून लोकप्रिय झाला आहे जगातील बहुतेक राष्ट्रांनी लोकशाही हालोकशाही हा शासन प्रकार प्रकार स्विकारला आहे.त्यामुळे ह्या युगाला लोकशाहीचे युग म्हणून ओळखले जाते. लोकशाही म्हणजे लोकांचे शासन होय.लोकशाहीमध्ये प्रचार या माध्यमाचा वापर दोन उद्दिष्टासाठी केला जातो एक म्हणजे लोकशाहीची अस्तित्व टिकवणे,ती बळकट व सक्षम बनवणे व दुसरे उद्दिष्ट म्हणजे राजकीय सत्ता हस्तगत करणे या दोन्ही उद्दिष्टांसाठी प्रचार या माध्यमाचा प्रभावीपणे उपयोग करून घेतला जातो. प्राचीन काळापासून लोकांना प्रभावित करण्यासाठी प्रचार या माध्यमाचा वापर केला जात आहे आधुनिक काळातही त्याचा वापर प्रभावीपणे केला जातो पण आधुनिक काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे प्रचाराचे स्वरूप हे पूर्णतः बदललेले दिसत

उद्दिष्ट

लोकांना प्रभावित करण्यासाठी प्रचाराचे माध्यम हे पार पूर्वीपासून वापरले जात असले तरी आधुनिक काळात त्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग करून घेतला जातो. व त्या माध्यमातून लोकांची मने आपल्याकडे वळवली जातात. प्रचाराचे स्वरूप व पद्धती ह्या काळानुसार बदलत असतात.आधुनिक काळात विज्ञान तंत्रज्ञान च्या युगात प्रचाराचे स्वरूप हे पुर्णतः बदलून गेले आहे.ते अधिक प्रभावी व परिणामकारक झाले आहे. आधुनिक काळात प्रचाराचे बदलते स्वरूप यावर प्रकाश टाकण्याचे उद्दिष्ट प्रस्तुत शोध निबंधात स्वीकारले आहे

विषय मांडणी

प्रचाराचा इतिहास

आधुनिक काळात प्रचाराचे जे स्वरूप दिसते यावरून असे म्हणता येणार नाही की प्रचार ही आधुनिक काळाची उत्पत्ती आहे तर ती प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे प्राचीन काळापासून आपल्या देशात विविध धर्म आणि धार्मिक संप्रदायाद्वारे आपल्या धर्माचा आणि संप्रदायाचा प्रचार करण्याचा प्रयत्न केलेला आहे अति प्राचीन काळात आर्य लोकांनी आपल्या धर्म प्रचारासाठी वेद पुराण ,स्मृती ,उपनिषद आदींची रचना केली होती. प्रचाराच्या विकासामध्ये बौद्ध धर्माने ही महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे गौतम बुद्ध आणि त्यांचा संघ यांनी केवळ भारतातच नाही तर भारताबाहेरही श्रीलंका, चीन, जपान, थायलंड व मंगोलिया याचबरोबर मध्ये आशियाई देशांमध्येही बौद्ध धर्माचा प्रचार केला आहे. लोकशाहीवादी देशांमध्ये सज्ञान राज्यकर्ते नेहमीच जनसंपर्काच्या माध्यमातून प्रचार करत आले आहेत

आधुनिक काळात नेपोलियन बोनापार्ट यांनी वैज्ञानिक कृतीने प्रचाराचा प्रयोग आपल्या युद्धांच्या वेळी केला आहे त्याने सर्व वर्तमानपत्र वर अशी बंधनं घातली होती की त्या वर्तमानपत्रांमध्ये फक्त सरकारी सूचना छापल्या जाव्यात. त्यानंतर इंग्लंडमध्येही काही वेळा सरकारने वर्तमानपत्रावर निर्बंध घातले होते दुसऱ्या महायुद्ध काळात तर प्रचाराचा प्रसार हा विश्वव्यापी झाला यामध्ये हिटलरचे प्रचार मंत्र्यांनी आश्चर्यजन्य रित्या प्रचार करण्याचा इतिहास बनवला आपल्या प्रचाराच्या माध्यमातून त्यांनी खोट्याचे खरं आहे असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला

प्रचाराचे महत्त्व

१. प्रचाराचा उद्देश चांगला किंवा वाईट यापैकी कोणताही एक असू शकतो

२. प्रचार हे एक दुसऱ्याच्या विचारांना नियंत्रित करण्याचे सर्वात प्रभावशाली साधन आहे

३. प्रचार करणारा प्रचाराच्या साठी विविध साधनांचा उपयोग करतो उदाहरणार्थ रेडिओ वर्तमानपत्र सिनेमा भाषण इत्यादी यामध्ये तो एका बाजूला आपल्या विचारांनी लोकांना प्रोफाईल करण्याचा प्रयत्न करत असतो त्याचबरोबर दुसऱ्याच्या विचाराने लोक प्रभावित होऊ नये यासाठी तो प्रयत्न करत असत

४. प्रचार मुख्यता विचारपूर्वक व व्यवस्थित पद्धतीने केला जातो हा एक जाणीवपूर्वक स्वीकारलेला किंवा आयोजित केलेला एक क्रमबद्ध कार्यक्रम किंवा प्रयत्न असतो

५. प्रचाराचा उद्देश हा लोकांचे विचार त्यांची मनोवृत्ती व त्यांचे व्यवहार यांच्यावर नियंत्रण करून ते एका निश्चित दिशेला वळवण्यासाठी प्रयत्न केला जातो

६. मानसशास्त्रीय दृष्ट्या प्रचाराला खूप महत्त्व आहे कारण यामध्ये प्रचार करणाऱ्याला दुसऱ्याकडून काहीतरी करून घ्यायचे असते आणि त्यासाठी तो मानसशास्त्रीय दृष्ट्या प्रभाव पूर्ण पद्धतीने प्रचार करत असतो

७. प्रचार हा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष या दोन्ही प्रकारे केला जातो

प्रचाराचे वर्गीकरण

किंबल यंग. यांनी प्रचाराचे तीन प्रकार पडले आहेत

१.साधनात्मक प्रचार -ज्या प्रचारामध्ये प्रचार करणारा फोडा आणि राज्य करा या नीतीचा पालन करतो त्यास साधनात्मक प्रचारा असे म्हणतात विशेषतः हा प्रकार राजकीय क्षेत्र अथवा युद्धकाळात विरोधी पक्षांमध्ये फुट पाडण्यासाठी केला जातो

२. रूपांतर प्रचार यामध्ये प्रचार कर्ता चा उद्देश लोकांचे विचार ,विश्वास यामध्ये रूपांतरण करण्याचा असतो. व्यापार विषयी प्रचार हे रूपांतरण प्रचाराचे प्रमुख उदाहरण म्हणता येईल

३. एकीकरण प्रचार यामध्ये वर्तमान मूल्य विश्वास आणि मनोवृत्ती अधिक दृढ बनवण्याच्या उद्देशाने प्रयत्न केला जातो विशेषता युद्ध परिस्थितीमध्ये आपल्या देशवासीयांचे धाडसी बनवण्यासाठी या प्रकारच्या प्रचाराचा आधार घेतला जातो

मनोवैज्ञानिक महत्व

कोणत्याही प्रकारच्या प्रचाराचे यश आणि अपयश हे मानसशास्त्री तत्त्वावर आधारलेले असते. लोकांचा विश्वास लोकांच्या पूर्वधारणा ते राहत असलेली परिस्थिती याच्यावर त्या व्यक्ती कोणत्या प्रकारचा विचार स्वीकारतील हे ठरते यावरून असे म्हणता येईल की प्रचार हा मानसशास्त्री तत्त्वावर अवलंबून असतो

प्रचाराची साधने

प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत समाजामध्ये प्रचाराने एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे प्राचीन काळामध्ये समाज रचना सामान्य होती तर आधुनिक काळात समाज सदस्य रचना ही अधिक जटील झाली आहे आधुनिक काळात भाषण, साहित्य, रेडिओ वर्तमानपत्र, स्पीकर, स्टेज सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी साधना द्वारे प्रचाराचे काम केले जाते.

सिनेमा

सिनेमा द्वारे फक्त शिक्षितच नाही तर अशिक्षित लोकांच्या मध्येही प्रचार केला जाऊ शकतो सिनेमाच्या माध्यमातून लोकांच्या भावना व त्यांच्या मनोवृत्तीला आपल्या इच्छेनुसार वळवण्याचा प्रयत्न केला जातो कारण सिनेमाचा प्रभाव हा लोकांच्या मेंदूवर अधिक प्रमाणात पडतो कारण यामध्ये प्रचार फक्त ऐकला जात नाही तर डोळ्यांनी पाहिला सुद्धा जातो . सिनेमा द्वारे फक्त भौतिक वस्तूंचा प्रचार केला जात नाही तर नवीन विचार नवीन आदर्श यांचाही प्रचार केला जातो सिनेमाच्या माध्यमातून विविध आदर्शांचा आणि विचारांचा प्रचार प्रभावशाली बनतो त्यामुळे सर्वेक्षणाद्वारे सिनेमा हा प्रचाराचे महत्त्वपूर्ण साधन मानले जाते

प्रेस

प्रचाराचं प्रमुख साधन प्रेस ही आहे प्रेस द्वारे वर्तमानपत्र, पत्रिका, पोस्टर, पुस्तके, प्रचार साहित्य इत्यादी प्रकाशित केले जाते या सर्व माध्यमातून प्रचाराचे कार्य केले जाते प्रेस द्वारे प्रकाशित केलेल्या सर्व साधनांमध्ये वर्तमानपत्राचे स्थान हे विशेष आहे या वर्तमान

पत्रांमधून व्यवसायिक जाहिरात लेख संपादकी लेख इत्यादी छापून त्याद्वारे प्रत्यक्ष व प्रत्यक्ष रूपाने प्रचाराची कार्य केले जाते वर्तमान काळात समाजाच्या सर्व घटकांमध्ये वतन पत्र वाचण्याची विशेष रुची दिसते त्यामुळे या वर्तनपत्राद्वारे प्रचार कार्याला विशेष मदत मिळते त्यामुळेच यामध्ये फक्त व्यावसायिक प्रचार न होता राजकीय प्रचार ही मोठ्या प्रमाणात केला जातो निवडणुकीच्या काळामध्ये वर्तमानपत्र मध्ये निवडणूक संबंधी मोठ्या प्रमाणात प्रचार करण्याचा प्रयत्न हा केला जातो त्याच बरोबरच प्रेस कडून प्रकाशित मोठ्या मोठ्या पोस्टरच्या माध्यमातून लोकांचे लक्ष आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो त्याद्वारे लोकांचे मनोवृत्तीमध्ये परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला जातो याबरोबर प्रेस द्वारे विविध पत्रिका पुस्तके ही प्रकाशित केले जातात व त्यांच्या माध्यमातून प्रचार करण्याचा प्रयत्न केला जातो कावले यांनी असं म्हटले आहे की पुस्तकांच्या मध्ये युगांतरकारी बदल घडण्याची क्षमता असते

व्यासपीठ

प्रचार करण्याचे साधनांमध्ये मंचाचे महत्त्व आहेच पण त्याबरोबरच त्या मंचावर असणारा वक्ताही महत्त्वपूर्ण ठरतो मंच किती मोठा व आकर्षक असला तरी त्याच्यावर बोलणारा वक्ता हा प्रभावशाली नसेल तर प्रचाराचे कार्य सफल होत नाही विशेषतः निवडणुकीच्या काळामध्ये मंचाचे महत्त्व खूपच वाढते कारण कोणताही नेता हा मंचावर उभा राहूनच आपले विचार जनतेस म्हणून मांडून लोकांची मने आपल्या बाजूने होण्यासाठी प्रयत्न करत असतो यामध्ये प्रचारक आणि जनता यांच्यामध्ये प्रत्यक्ष समोरासमोर संबंध येत असतो त्यामुळे प्रचारात आपल्या व्यक्तिमत्व द्वारे उपस्थित असणाऱ्या लोकांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतो किंबहुना त्याला त्याची ही संधी मिळत असते

रेडिओ

रेडिओ च्या माध्यमातून संगीत आणि मनोरंजनाची कार्यक्रम प्रसारित केले जातात या कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध उत्पादनाचाही प्रचार केला जातो या प्रचाराबरोबरच राजकीय प्रचार करण्याचे रेडिओ एक महत्वपूर्ण साधन मानले जाते कारण या माध्यमातून अधिक अधिक लोकांच्या पर्यंत पोहोचता येते त्यामुळे रेडिओला प्रचाराच्या कार्यामध्ये अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होते

स्पीकर

स्पीकर हा प्रचार साधना मधला सर्वात कमी खर्चाचा साधन होय लाड स्पीकरच्या माध्यमातून प्रचार केल्यास सहजरीत्या लोक प्रचार कर्त्याकडे आकर्षित होतात स्पीकर द्वारे समाजाच्या सर्व घटकांमध्ये प्रचार केला जातो आणि त्या सर्वांपर्यंत आपला संदेश पाठवला जातो निवडणूक काळात लाऊड स्पीकर हे प्रचाराचे मुख्य साधन मानले जाते

टेलिव्हिजन

रेडिओ द्वारे फक्त आवाज लोकापर्यंत पोहोचतो पण टेलिव्हिजन द्वारे आवाजाबरोबर चित्र ही दिसतात त्यामुळे टेलिव्हिजन द्वारे केलेला प्रचार रेडिओ पेक्षा अधिक प्रभावी होतो. त्यामुळेच टेलिव्हिजनवर जास्त वेळ विविध उत्पादनाच्या प्रचार बघायला मिळतो

साहित्य

साहित्य हा प्रकार प्रचारासाठी महत्त्वपूर्ण मानला जातो काही पुस्तके मात्र विशिष्ट उद्दिष्टाला धरून गेली जातात उदाहरणार्थ कार्ल मार्क्स यांचा कम्युनिस्ट मॅनिफेस्टो या पुस्तकाला साम्यवादी विचारधारेचे बायबल म्हटलं जातं त्याप्रमाणे गांधी आणि विनोबा भावे यांनी सर्वोदयचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अनेक पुस्तक लिहीली पुस्तकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष प्रचार होतो या व्यतिरिक्त कहाणी नाटक कविता याद्वारे प्रचार होत असतो. विशेषतः देशावर युद्धासारखी संकट आले असेल तर अनेक कवी नाटककार देशभक्तीपर कविता आणि त्याच्या माध्यमातून लोकांची देशाप्रती असणारी त्या भावना समजून सांगतात हा जरी अप्रत्यक्ष प्रचार असला तरी तो अधिक प्रभावशाली होत असतो

शक्तीचा प्रयोग

खरंतर प्रचारामध्ये शक्तीचा प्रयोग करणे उचित ठरत नाही तरीही प्रचारामध्ये नेहमी शक्तीचा प्रयोग होताना दिसतो त्यामुळे शक्तीचा उपयोग हा प्रचाराचा एक भाग होतो प्राचीन काळापासूनच जे शासनकर्ते होऊन गेले त्यांनी आपली विचारसरणीचा प्रसार करण्यासाठी शक्तीचा उपयोग केलेला दिसतो धर्माच्या प्रचारासाठी अनेक वेळा धार्मिक संस्थांकडून शक्तीचा उपयोग हा केलेला दिसतो. सध्याच्या काळात मात्र प्रचारासाठी शक्तीचा प्रयोग हा अप्रासंगिक ठरतो

सांस्कृतिक कार्यक्रम

सांस्कृतिक कार्यक्रमाचे ठिकाणी लोक आपोआपच जमतात त्यामुळे प्रचार करण्यासाठी एक उत्तम माध्यम करू शकतो त्यामुळेच प्रचारासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचा आधार हा नेहमीच घेतला जातो यामध्ये नाटक,संगीत, नृत्य आधी कार्यक्रम करून किंवा कवी संमेलन कथाकथनच्या माध्यमातून आपला प्रचार अधिक प्रभावशाली बोलण्यासाठी प्रचारांच्या कडून अनेक वेळा प्रयत्न केला जातो

प्रचाराच्या मर्यादा

प्रचाराच्या प्रवाहाला त्याच्या विरोधात केलेला प्रचार मर्यादित करत असतो कारण एखाद्या गोष्टीचा प्रचार केला जात असेल त्याची वेळी विरोधी गटाकडून विरोधी प्रचार केला जात असेल तर त्या प्रचाराचा महत्त्व कमी होत जातं

सामाजिक परिस्थितीला अनुकूल असणाऱ्या प्रचाराचा सहज स्वीकार केला जातो सामाजिक परिस्थिती अनुकूल नसणाऱ्या प्रचाराचा स्वीकार केला जात नाही

लोकांच्या असणाऱ्या प्रचलित भावना विश्वास आदर्श या विरोधात जाऊन केलेला प्रचार हा स्वीकारला जात नाही

प्रचारामध्ये शारीरिक शक्तीचा उपयोग केला तर उच्च व शिक्षित वर्ग त्याचा विरोध करतो

**निष्कर्ष**

आधुनिक काळात प्रचाराचे स्वरूप हे पूर्णतः बदललेले दिसते. लोकशा हिचे अस्तित्व टिकवणे व तिचे बळकटीन करणे या उद्देशा बरोबरच राजकीय सत्ता मिळवण्यासाठी प्रचार या माध्यमाचा उपयोग केला जातो आधुनिक काळात प्रचाराचे स्वरूप हे पूर्णतः बदललेले दिसते विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे प्रचार पद्धतीमध्ये हे बदल झालेले दिसतात विशेषता आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून लोकापर्यंत पोहोचण्याचा व त्यांना प्रभावित करण्याचा प्रयत्न केला जातो . विशेषता सोशल मीडियाचा प्रचार साठी वापर हा मोठ्या प्रमाणात केला जातो कारण सोशल मीडियाच्या माध्यमातून एकाच वेळी अनेक लोकांपर्यंत पोहोचता येते त्याचबरोबर रेडिओ व टेलिव्हिजन सारख्या पारंपारिक साधनांच्या मार्फत ही आपला प्रचार अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला जातो यावरून असा निष्कर्ष काढता येईल की विज्ञान व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आजच्या काळात प्रभावीपणे प्रचार केला जात आहे

**संदर्भ**

१. डॉ. विनी शर्मा , लोकतंत्र का बदलता स्वरूप , सत्यम पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स जयपुर

२. राजेंद्र होरा सुहास पळशीकर, भारतीय लोकशाही- अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन

३. डॉ.बी .बी पाटील, भारतीय शासन आणि राजकारण , फडके प्रकाशन

४. जोसी जोसेफ, अनुवाद पूनम छत्रे, लोकशाहीचे वास्तव, मधुश्री पब्लिकेशन

# A STUDY OF EMERGING ISSUES AND CHALLENGES TO INDIAN DEMOCRACY

**Prof. Gujar Kishor Shivaji**
M.Com. M.Ed. SET, NET, Ph.D. (App.)
GDC&A, DMOA&FA
Assistant Professor,
Department of Commerce
Mahila Mahavidyalaya, Karad.

**Abstract –**

This Research paper is discusses about concept of democracy, development of Indian democracy. There is lot of issues and challenges faced by Indian democracy are discussed like corruption, poverty, illiteracy, casteisms, horse-trading in politics, criminalization of politics and violence, new education policy, gender discrimination, communalism, regionalism etc.

This Research paper also focuses on the various strategies for improve the Indian democracy. Also useful in finding the corrective measures for improving the Indian democracy. Also focuses on roles of citizens in making an efficient and successful democracy. For a better understanding of the same, we discuss this in this research paper.

**Key words:** criminalization of politics and violence, new education policy, gender discrimination, communalism, regionalism

**Introduction –**

India is the largest democratic country in the world. We are proud to be the largest democracy in the world. For more than sixtyfive years we have witnessed the conduct of successful elections, peaceful changes of government at the Centre and in the States, people exercising freedom of expression, movement and religion. India has also been developing and transforming economically and socially. At the same time we, quite often, listen complains about prevalent inequalities, injustice or non-fulfillment of expectations of certain sections of the society. These people do not feel themselves participative in the democratic process.

We know that democracy means 'government of the people, for the people, and by the people'. It means democracy is not limited to just a process of election, but also fulfilling social and economic aspirations of the people. In India we keep on debating these various aspects of democracy and its achievements and issues as well as challenges. Important issues like horse-trading in politics, the anti-defection law, pros and cons of post-poll alliances and discretionary powers of the governor has brought to light the various challenges facing Indian democracy. For a better understanding of the same, we discuss this in this research paper.

Some objectives of this paper are -

1. To understand the concept of democracy.
2. To understand the development of Indian democracy.
3. To identify current issues and challenges being faced by Indian democracy.
4. To explain the roles of citizens in making an efficient and successful democracy.
5. To suggest some corrective measures for improving the Indian democracy.

Democracy -

Let us begin with understanding the meaning of democracy and the conditions that are essential for its successful functioning. This will help us in appreciating the challenges to Indian democracy. Former President of the United States of America, Abraham Lincoln said, "Democracy is a government of the people, for the people, and by the people." The term 'democracy' comes from the Greek word demokratia which means "rule of the people".

Democracy is defined as a form of government in which the supreme power is vested in the people and exercised by them directly or indirectly through a system of representation usually involving periodic free elections. When you examine the definitions of democracy, as suggested above, you will find that most of those definitions define democracy as a form of government which is run by the elected representatives.

Emerging Issues and Challenges -

Since last decades Indian democracy has faced number of challenges as well as there is lots of issues are created by political parties. New Ethical wrong trends are coming-up like horse-trading in politics, criminalization of politics and political violence. That's affects the general people in country. Now days it is seen that the Indian democracy is not properly worked in any way.

Since independence India has been functioning as a responsible democracy. The same has been appreciated by international community. It has successfully adapted to the challenging situations. There have been free and fair periodic elections for all political offices from the panchayats to the President. There has been smooth transfer of political power from one political party or set of political parties to others, both at national and state levels on many occasions.

India is a very large country full of diversities – linguistically, culturally, and religiously. At the time of independence it was economically underdeveloped. There were enormous regional disparities, widespread poverty, illiteracy, unemployment, and shortage of almost all public welfare means. Citizens had enormous expectations from independence. As mentioned above, India has changed a lot. Yet, there are various challenges that the country faces in terms of fulfillment of expectations of various sections of society. The challenges come both from prevailing domestic and international conditions as well as lack of adequate prerequisites for a smooth functioning of democracy.

Some challenges were found like Illiteracy, Poverty, Gender Discrimination, Casteism, Religious Fundamentalism, Regionalism, Communalism, Corruption, and Criminalization of Politics etc. all are the major challenges in front of Indian democracy.

Anti-Defection law does not seem to be doing much to stop MLAs from defecting. This is primarily because MLAs are offered back-door entry to assemblies by rival parties. Ethics of post-poll alliances, unlike pre-poll alliances, where the voters are aware of whom they are voting for, post-poll alliances present a new set of challenges. The post-poll alliance is seen as a betrayal of the trust of the voters by many. Misuse of data on social media sites, privacy of users and the power of social media to influence important political outcomes. Dynastic politics, lack of strong opposition at the centre and Religion based politics. Freebies given by political parties during elections.

We have moved towards multi-party system, with fractured mandates becoming the norm. Another issue is that of the discretionary powers of the governor. Government formation now seems to be like who approaches the governor the fastest to stake claim to form the government. We saw a situation of Maharashtra state government in last few days about the government formation and role of governor of Maharashtra state. Four senior-most judges of the Supreme Court held a press conference and raised a banner of revolt against the Chief Justice of India (CJI). The duration for which Parliament meets in India, compared with other democracies, is short. As well Disruptions in parliament by the members of parliament is becoming most issue.

ROLE OF CITIZENS IN AN INDIAN DEMOCARCY

The role of citizens of India in democracy is very important. As citizens of India, do we really appreciate the role of a citizen in a democracy? Why is this role so important? Generally, it is believed that the government rules the people who have to respect the political authority and obey it. They are there to be governed. But don't you think that this is not so in a democracy? The people who are citizens in a democratic system like India cannot and ought not remain passive and treat them as governed. In fact, a democracy can be successful and vibrant only when citizens imbibe and reflect in their mindset, thinking and behavior the basic values like equality, freedom, secularism, social justice, accountability and respect for all. They have to appreciate the opportunities for their desired roles and play proactive roles to actualize the goals of democracy.

**Conclusion–**

The citizens must respect the law and reject violence. Every citizen must respect the rights of his or her fellow citizens, and their dignity as human beings. No one should denounce a political opponent as evil, just because of holding different views. People should question the decisions of the government, but not reject the government's authority. There is need for collaboration among governmental agencies, political parties, civil society and citizens in general.

The corrective measures that are needed to meet the challenges to Indian democracy are focused around the issues and concerns like universal literacy i.e. education for all, poverty alleviation, elimination of

gender discrimination, removal of regional imbalances, administrative and judicial reforms and sustained economic, social and environmental development.

Indian democracy can adequately respond to all the challenges when it moves forward on the path of sustainable development. Sustainable development is a pattern of using resources that aims to meet human needs while preserving the environment so that these needs can be met not only in the present, but also for future generations to come. The term was used by the Bruntland Commission (1987) which coined what has become the most often-quoted definition of sustainable development as development that “meets the needs of the present without compromising the ability of future generations to meet their own needs.”

Voter education, electoral reforms and periodical highlighting of the performance (or nonperformance) of elected representatives should be high priority. People must exercise their right to vote, participate in democracy and contribute towards the development of the country. The youth must be aware of the problems that the country is facing and choose the candidate who is most likely to bring about a change. Democracy cannot survive without both citizens’ participation and politicians’ accountability. The promises of democracy can only be realised through collective action in civil society. The state must respect the articulation of the politics of voice and not just the politics of the vote.

**References:**

Indian Democracy: Meanings and Practices, Rajendra Vora and Suhas Palshikar, SAGE Publications, 2004

Websites:

https://www.nios.ac.in/media/documents/SecSocSciCour/social_science_213_English_Medium/Lesson_23.pdf

https://unacademy.com/content/upsc/study-material/modern-indian-history/democratic-system-in-india/

https://www.geeksforgeeks.org/challenges-faced-by-indian-democracy/

# अकार्यक्षम विरोधी पक्ष : भारतीय लोकशाहीसमोरील आव्हान

**डॉ.प्रविण अरुण पोवार**
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग,
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, इचलकरंजी

**सारांश:** संसदीय लोकशाहीला स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी विरोधी पक्षांचे अस्तित्व सर्वमान्य आहे. संसदीय शासनपध्दतीत विरोधी पक्षांना विधिमंडळात आणि विधिमंडळाबाहेर कार्य करावे लागते. विधिमंडळात विरोधी पक्ष मुख्यतः संसदीय आयुधांद्वारे शासनाच्या ध्येयधोरणावर नियंत्रण ठेवून सरकारला योग्य दिशा प्राप्त करून देण्याचे व लोकप्रश्नाना अग्रक्रमाने विचार करण्यास भाग पाडत असतो. तसेच राज्यातील निरनिराळे प्रश्न सभागृहात उपस्थित करणे, त्यावर चर्चा घडवून आणणे शासनास सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडणे, शासनाच्या निरंकुश वृत्तीवर नियंत्रण ठेवणे, चांगल्या धोरणास पाठिंबा देणे आणि चूकीच्या धोरणांना वेळीच विरोध दर्शविणे आदी कार्ये विरोधी पक्ष विधिमंडळात करीत असतात. विधिमंडळाबाहेरसुद्धा विरोधी पक्षाची कामे महत्वाची ठरत असतात. सरकारच्या चुकीच्या धोरणावर टीका करून त्याविरूध्द मोर्चे, धरणे, आंदोलनाद्वारे जनतेला संघटीत करुन सरकारला लोकहिताचे निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी विरोधी पक्षांची संघटना कार्यरत असते. त्यामुळे लोकशाहीच्या यशस्वितेसाठी, तिच्या संवर्धनासाठी विरोधी पक्षांचे अस्तित्व आणि त्यांची प्रभावी कृतीशील भूमिका महत्वाची असते.
**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, विरोधी पक्ष, संसद, लोकहित

**प्रास्ताविक :**

संसदीय लोकशाहीला स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी विरोधी पक्षांचे अस्तित्व सर्वमान्य आहे. संसदीय शासनपध्दतीत विरोधी पक्षांना विधिमंडळात आणि विधिमंडळाबाहेर कार्य करावे लागते. विधिमंडळात विरोधी पक्ष मुख्यतः संसदीय आयुधांद्वारे शासनाच्या ध्येयधोरणावर नियंत्रण ठेवून सरकारला योग्य दिशा प्राप्त करून देण्याचे व लोकप्रश्नाना अग्रक्रमाने विचार करण्यास भाग पाडत असतो. तसेच राज्यातील निरनिराळे प्रश्न सभागृहात उपस्थित करणे, त्यावर चर्चा घडवून आणणे शासनास सकारात्मक निर्णय घेण्यास भाग पाडणे, शासनाच्या निरंकुश वृत्तीवर नियंत्रण ठेवणे, चांगल्या धोरणास पाठिंबा देणे आणि चूकीच्या धोरणांना वेळीच विरोध दर्शविणे आदी कार्ये विरोधी पक्ष विधिमंडळात करीत असतात. विधिमंडळाबाहेरसुद्धा विरोधी पक्षाची कामे महत्वाची ठरत असतात. सरकारच्या चुकीच्या धोरणावर टीका करून त्याविरूध्द मोर्चे, धरणे, आंदोलनाद्वारे जनतेला संघटीत करुन सरकारला लोकहिताचे निर्णय घेण्यास भाग पाडण्यासाठी विरोधी पक्षांची संघटना कार्यरत असते. त्यामुळे लोकशाहीच्या यशस्वितेसाठी, तिच्या संवर्धनासाठी विरोधी पक्षांचे अस्तित्व आणि त्यांची प्रभावी कृतीशील भूमिका महत्वाची असते.

दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जगातील अनेक राष्ट्रे वसाहतवादातून मुक्त होऊन लोकशाही शासनव्यवस्था स्वीकारली. त्यापैकी आपले एक राष्ट्र आहे जे ब्रिटीश वसाहतीतून मुक्त झाले आणि त्याच (इंग्लंड) राष्ट्रातील शासनसंस्थेचे अनुकरण केले आणि भारतात संसदीय लोकशाहीला जन्माला घातली. आज आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत अर्थातच भारतीय लोकशाहीचा देखील हा महोत्सव म्हंटले तर वावगे ठरणार नाही. गेली सात दशके आपली लोकशाही वसाहतवादातून स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांच्या तुलनेत चांगल्या रितीने वाटचाल करीत आली आहे. पण बहुमताचे राज्य म्हणजेच लोकशाही. ही संकल्पना याठिकाणी रुजली आहे. आपण केवळ औपचारिकता म्हणून लोकशाही स्वीकारली आहे का असा प्रश्न पडतो. याचे कारण लोकशाही विरोधी पक्षाविना अपूर्ण आहे. लोकशाहीत सत्ताधारी पक्षाइतकेच महत्व विरोधी पक्षाला असते, तो एकप्रकारे लोकशाहीचा आत्मा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. विरोधी बाकावर असताना प्रभावीपणे भूमिका घेऊन सरकारवर नियंत्रण ठेवण्यात

यश मिळत असेल तर आगामी निवडणुकीत मतदारांना चांगला पर्याय निर्माण होऊ शकतो. यासाठी त्यांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. मात्र आज विरोधी पक्षांची अवस्था कमकुवत बनली आहे.

भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने :

आज देशातील गरीबी, बेकारी, महागाई, जातीय व धार्मिक सलोख्यातील बिघाड, घटनात्मक संस्थामध्ये सरकारचा वाढता हस्तक्षेप अशी अनेक आव्हाने आपल्या लोकशाहीसमोर आहेत. पण गत दोन दशकात राजकारणातील बदलेला प्रवाह लक्षात घेतला, तर सबळ व कार्यक्षम विरोधी पक्षाचा अभाव हेच आपल्या लोकशाहीसमोर मोठे आव्हान उभे असल्याचे दिसते. कारण अलीकडे आपल्या लोकशाहीत सत्तेबरोबर निर्णयांचेसुद्धा केंद्रीकरण होत आहे. काळा पैसा परत आणण्याच्या मथळ्याखाली घेतलेला नोटाबंदी निर्णय. परिणामांचा विचार न करता आणि पर्यायी यंत्रणेची आधीच व्यवस्था न करता मोठा निर्णय घेतला. परिणामी जनतेला त्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागला. जीएसटी निर्णयामुळे आज राज्यांची आर्थिक नाकेबंदी होत आहे. कृषी कायद्यांच्या निर्मितीपासून रद्दबादल ठरविण्यापर्यंतच्या प्रवासात शेतकऱ्यांना झालेला त्रास. असे अनेक निर्णय व विधेयके भाजपने बहुमताच्या बळावर पूर्ण चर्चेविना संमत केली. किंबहुना विरोधी बाकावरील पक्षांना देखील विश्वासात न घेता घाईगर्दीने संमत केली हे लोकशाहीस पूरक नाही. हा परिणाम संसदेत भाजपला बहुमत असल्याचा आहे असे कितपत म्हणता येईल? सुरुवातीच्या काळात काँग्रेसकडेसुद्धा असेच पूर्ण बहुमत होते आणि विरोधी पक्षाचे संख्याबळ अल्प होते. पण असे असतानादेखील तत्कालीन विरोधी पक्ष आपल्या भूमिकेवर ठाम राहून सभागृहात आणि सभागृहाबाहेर लोकांच्या प्रश्नावर आवाज उठवून लोकहित साध्य करीत होते. सरकारच्या ध्येयधोरणांची चिकित्सा करून त्यांच्या चूका लक्षात आणून देऊन देशहित व जनहितास अनुकूल अशी सार्वजनिक धोरणे निर्माण करण्यास भाग पाडत होते. त्यामुळे आज भाजपला संसदेत बहुमत असल्याचा हा परिणाम आहे असे नक्कीच म्हणता येणार नाही. तर याठिकाणी विरोधी पक्ष अकार्यक्षम ठरत आहे.

पुणे बार कौन्सिलच्या ग्रंथालय उद्घाटनप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात लोकशाही यशस्वी करायची असेल, तर तिच्यापुढील आव्हाने लक्षात घेतली पाहिजेत असे प्रतिपादन केले होते. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांनी 'कार्यक्षम विरोधी पक्ष नसणे' याचाही उल्लेख त्यांनी केला होता. कार्यक्षम विरोधी पक्ष असला की, लोक खांदेपालट करू शकतात व सरकारला पर्याय उपलब्ध होतो असे आंबेडकरांचे मत होते. आताच्या विरोधी पक्षांनी हे लक्षात घेतले पाहिजे. तसेच गेल्या दोन लोकसभा निवडणुकीत कोणत्याच राजकीय पक्षाला विरोधी पक्षनेतेपद देखील मिळविता आले नाही. शिवाय लोकशाहीत विरोधी पक्षनेता असणे महत्वाचे आहे. कारण विरोधी पक्षनेत्याला काही घटनात्मक अधिकार असतात. अनेक नियुक्त्या करण्यात विरोधी पक्षनेता पदसिद्ध सदस्य असतो. उदा. निवडणूक आयुक्त, न्यायाधीश आदी. जर संसदेत अधिकृत विरोधी पक्षनेता नसेल तर सत्ताधारी आपल्या मर्जीतील व्यक्तीची निवड करतील व असे अधिकारी सरकारी निर्देशानुसारच काम करतील. त्यामुळे अधिकृत विरोधी पक्ष आणि विरोधी पक्षनेता असणे हे लोकशाहीस नेहमी पूरक असते ही बाब समजून घेतली पाहिजे.

अकार्यक्षम विरोधी पक्ष :

सध्या देशातील विरोधी पक्ष हे क्षीण झाले आहेत. सत्तेत असणाऱ्या भाजपला प्रतिस्पर्धक म्हणून काँग्रेसकडे पाहिले जाते. परंतु अनधिकृतपणे विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळालेल्या काँग्रेसची भूमिका ही मर्यादित बनली आहे. तसेच इतरही भाजपविरोधी राजकीय पक्ष राष्ट्रीय राजकारणात दुबळे वा अकार्यक्षम बनले आहेत. वास्तवात या सर्व विरोधी पक्षांनी वेळीच अंतर्मुख होणे आवश्यक आहे. याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

१. विरोधी पक्षातील नेत्यांकडे असलेला नेतृत्वगुणांचा अभाव. अभ्यासू, चिकित्सकवृत्ती, संघटन कौशल्य, दूरदृष्टीपणा व जनभावनेचा आदर असे नेतृत्व गुण एखाद्या नेतृत्वाला यश प्राप्तीसाठी मदत ठरत असतात. आजच्या नेतृत्वांनी या गुणांना अंगी बानून कृतीशील बनले पाहिजे तर कदाचित भाजपच्या वाढत्या आलेखाला छेद देता येईल.

२. आपल्या लोकशाहीत बहुपक्षपद्धती आहे त्यामुळे काही पक्ष सत्तेत तर काही विरोधी बाकावर बसतात. या विरोधी पक्षांत एकमत आढळत नाही आणि हे स्वाभाविक आहे. कारण आज विरोधी गटात असणारे काँग्रेस, समाजवादी, राष्ट्रवादी काँग्रेस,

तृणमूल काँग्रेस व इतर प्रादेशिक पक्ष यांची विचारसरणी, अजेंडा, अस्मिता व हितसंबंध वेगळे आहेत. पण आजच्या परिस्थितीत पक्षहितापेक्षा राष्ट्रहिताचा प्राधान्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

३. आज राजकीय पक्षांतर्गत नेत्यांमध्ये वैयक्तिक स्तरावर मतभेद आहेत, त्यांच्यामध्ये वर्चस्वाची लढाई पाहायला मिळते. यामुळे पक्ष संघटना मजबूत होण्यास अडचण ठरते, पक्ष एकसंघ बनत नाही. तसेच पक्षनिष्ठाही कमी होते. महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचा विचार करता नाना पटोले, अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण आणि अलीकडे बाहेर पडलेले नारायण राणे हे याचे उदाहरण म्हणून समजून घेता येईल.

४. विरोधी पक्षाकडे प्रभावी भूमिकेच्या अनुभवाची असलेली पोकळी. सत्तर वर्षाच्या काळात काँग्रेस पक्षाने दोन ते तीन टर्मच विरोधी पक्ष म्हणून काम पाहिले आहे. त्यामुळे एक जबाबदार विरोधी पक्ष म्हणून आपली भूमिका पार पाडताना मोठी कसरत घ्यावी लागत आहे आणि तीही निष्फळ ठरत आहे. आज जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावरच्या लढाई बरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा अर्थातच समाज माध्यमांचा कौशल्याने वापर करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

लोककल्याणकारी राज्य उद्दिष्ट असलेल्या आपल्या लोकशाहीत सक्षम विरोधी पक्षाची नितांत गरज आहे. केवळ विरोधासाठी विरोध ही वाढत चाललेली प्रवृत्ती बाजूला करून अधिवेशन काळात सभागृहात पूर्णवेळ उपस्थित राहून सार्वजनिक धोरणावर चर्चा केली पाहिजे. सरकारच्या चुकीच्या निर्णयांचे खंडण केले पाहिजे, तर चांगल्या धोरणांचे समर्थन करण्याचे साहसही दाखविले पाहिजे. आज विरोधी पक्षातील नेत्यांवर सरकारी यंत्रणांचा वापर करून दबाव आणला जात आहे. या दबावाला बळी न पडता पक्षनिष्ठा दृढ करून जनाधार वाढविला पाहिजे आणि त्याआधारे जनआंदोलन उभी केली पाहिजे. तरच सत्ताधारी पक्षाची निरंकुशता मोडता येईल. आताची देशातील राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन पक्षहित बाजूला सारून जनहित व राष्ट्रहित यासाठी सर्व विरोधी पक्षांनी आज एकत्रित येण्याची गरज आहे. शिवाय जनतेच्या भावना, त्यांच्या अडचणी लक्षात घेऊन पर्यायी सरकारची प्रतिमा निर्माण केली पाहिजे. अर्थातच, आपली लोकशाही निकोप व निर्दोष ठेवयाची असेल तर, कृतीशील आणि कार्यक्षम विरोधी पक्ष असणे गरजेचे आहे .

**संदर्भसूची :**

१. Fartyal H.S., 'Role of the Opposition in the Indian Parliament', Chaitanya Publishing House, Alahabad, 1971.

२. गोस्वामी भालचन्द्र, 'संसदीय लोकतंत्र में विपक्ष की भूमिका', पोइंटर पब्लि., जयपूर ,१९९७.

३. अक्षरगाथा विशेषांक, अंक ४, १० जानेवारी २०१९.

४. EPW, 'Democracy & the Opposition in India', 23 Apr, 1988.

# भारतीय लोकशाही एक अभ्यास

**डॉ.भीमाशंकर मधुसूदन डहाळके**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
राजे रामराव महाविद्यालय जत जिल्हा सांगली
bmdahalke@gmail.com
9922147726

**सारांश:** भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही असणारा देश आहे भारतामध्ये विविध धर्म भाषा संस्कृती असणारे लोक एकत्रित व आनंदाने राहत आहेत. हे जरी खरे असले तरी भारतासमोर आज लोकशाही टिकविणे चे आव्हान आहे. असे अनेक जणांना वाटते आणि ते काही अंशी खरेही आहे याला कारण म्हणजे भारतामध्ये भारतीय लोकशाही समोर काही समस्या जाणवतात दिसतात. सर्वात मोठी समस्या ही बेरोजगारीची आहे. त्याचबरोबर जातीयता धर्मांधता भ्रष्टाचार यासारख्या मानवनिर्मित समस्या भारतीय लोकशाहीला पोखरायला निघालेले आहेत असे दिसते खरंतर भारतीय लोकशाही ही जगामध्ये सर्वात मोठ्या व सर्वात चांगली लोकशाही या अर्थाने नावारूपाला आली आहे. विविध जातीचे धर्माचे पंथाचे भाषेचे लोक या ठिकाणी आनंदाने राहत आलेले आहेत परंतु काळाच्या ओघात या भारतीय लोकशाही समोर काही आव्हान आहेत त्यामुळे त्या आव्हानांचा सामना भारतीय लोक कशा पद्धतीने करतात यावर भारतीय लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे. भारतात लोकशाहीला विशेष असे स्थान आहे शिवाय भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही यशस्वीरित्या पूर्णत्वास नेलेला देश आहे.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही,आव्हाने, जमातवाद, जातीवाद, विरोधी पक्ष

**प्रस्तावना:** अर्थात भारताची लोकशाही भारतीय संविधानातून निर्माण झालेली आहे. भारतीय लोकशाहीचे तीन आधारस्तंभ आपल्याला दिसतात कायदेमंडळ कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ येथील प्रत्येक व्यवस्था एकमेकांपासून स्वतंत्रपणे काम करते प्रसारमाध्यम हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखला जातो. डॉ.आंबेडकरांनी लोकशाहीच्या भविष्याविषयी वेळोवेळी काळजी व्यक्त केली होती ते असे म्हणतात की भारतात संसदीय लोकशाही विफल झाली तर बेबंधशाही आणि बंडखोरी देशात उद्भावेळ सध्या काहीजण हिंदू राष्ट्राची भाषा करतात त्याबाबत बाबासाहेबांची विचार परखड आहेत. अशा प्रकारचे राज्य निर्माण करणे म्हणजे लोकशाही वरच घाला घालण्यासारखे आहे. हिंदू राष्ट्र ही बाब देशासाठी घातक असेल असा इशारा त्यांनी दिला होता. तो आंबेडकरांनी घटनेच्या अनुषंगाने विचार व्यक्त करताना त्यांनी जी तत्व राज्यघटनेच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीला दिलेली आहेत ती खरोखर भारतीय लोकशाहीला यशस्वी करण्याकरता महत्त्वाची आहेत. पण आपण योग्य रीतीने त्याची जोपासना करायला हवी. सामाजिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाहीला काहीच किंमत राहत नाही सामाजिक लोकशाही म्हणजे अशी जीवनप्रणाली जिथे स्वातंत्र्य समता व बंधुत्वाला जीवनाची तत्त्व मानली जातात. मागासवर्गाला प्रत्यक्ष कृतीद्वारे समान संधी मिळत नसेल तर मग कलम 14 ते 16 आणि 46 व 335 ही कलम म्हणजे अवास्तव वचनांची चेष्टा करणारे उदाहरण ठरू शकतात. भारतातील मागासवर्गीयांवर यापुढे अन्याय होऊ नये म्हणून संविधानामध्ये विशिष्ट कलमांची वर्गवारी करण्यात आली आहे व ते संविधानिक दृष्ट्या बंधनकारक करण्यात आले आहे. भारतामध्ये बंधुभाव व समता नांदावी म्हणून घटनाकारांनी कलम 340 41 42 अनुसार अनुसूचित जाती जमाती मधील मागासवर्गीयांबरोबरच अल्पसंख्याकांना संरक्षण दिलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर धर्मनिरपेक्षतेला खूप महत्त्व देतात सरकारने कोणत्याही धर्माला प्राधान्य देता कामा नये हे त्यांनी वेळोवेळी स्पष्ट केली आहे. लोकशाहीमध्ये लोकशाहीचे जे रूप असतं ते सातत्याने बदलत असतं तिची वाढ ही आपोआप होत नसते तर लोकशाहीची वाढ योग्य पद्धतीने व योग्य दिशेने होण्यासाठी लोकशाहीला पोषक असे नागरिक सुद्धा असावे लागतात यासाठी तिचा पाया हा चांगल्या सामाजिक संबंधांवर आधारलेला असतो जनतेचे दारिद्र्य निरक्षरता भेदभाव हा लोकशाहीला धोकादायक असल्याचे आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे. मानवी हक्क वापरण्याबाबत समाजामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव असता कामा नये. तसं जर असेल तर मग

सामाजिक व राजकीय लोकशाही ही जिवंत राहणार नाही. सामाजिक पाया मजबूत न करता राजकीय लोकशाही बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात राजकारणी लोकांना अपयश आले आहे. हे आंबेडकरांनी वेळोवेळी दाखवून दिले आहे. समाजामध्ये खास अधिकार असलेल्या खास अधिकार नसलेल्या लोकांमधील फरक हा लोकशाहीशी विसंगती दर्शवतो. तसेच तो लोकशाहीसाठी हानिकारक असतो. उच्च राजकीय उद्दिष्ट सामाजिक ध्येयाशी सुसंवादी असावेत असा बाबासाहेबांचा नेहमी कयास होता, सामाजिक ध्येय आणि राजकीय पद्धती यांच्या समन्वयाने तयार होणारी लोकशाही भारतामध्ये नांदावी हीच त्यांची अपेक्षा होती. संविधानाने भारतात संसदीय रचनेची लोकशाही प्रस्थापित केली आणि खरी लोकशाही ही संसदीय लोकशाहीत असू शकते ज्यात हिंसक क्रांती शिवाय सरकार बदलले जाऊ शकते. परंतु गेल्या काही वर्षापासून देशातील लोकशाहीची मूळ दळमळीत होताना दिसतात अनेक ठिकाणी कायदा व सुव्यवस्था अनियंत्रित झाली असून हिंसाचार दंगली लुटमार मतदान केंद्र ताब्यात घेणे असे प्रकार नेहमीचेच झालेले दिसतात. दहशतवाद व नक्षलवाद पसरू लागला आहे देशातील सर्वसामान्य माणूस गरिबी बेरोजगारी आणि महागाईने त्रस्त आहे. महागाईमुळे तर त्यांची आर्थिक स्थिती बिघडत गेली आणि एका वेगळ्या टप्प्यात येऊन पोहोचली आणि सत्तेच्या असं जाणवते आज भारतीय लोकशाहीत सत्ताधारी लोक संकुचित राजकीय स्वार्थासाठी लोकशाहीतील श्रेष्ठ मूल्यांच्याकडे आदर्शांकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे भारतीय लोकशाही समोर संघर्षा सारखी परिस्थिती निर्माण होत आहे. संविधानात आपण स्वीकारलेली धर्मनिरपेक्षता मानवतावाद स्वातंत्र्य समता व बंधुता यांची अंमलबजावणी करण्यात राज्यकर्ते कितपत यशस्वी झाले आहेत हा एक प्रश्न सर्वसामान्य माणसाला भेडसावतो त्याचबरोबर भारतीय लोकशाही भारतीय मूल्यांशी जनता किती प्रामाणिक राहिली प्रामुख्याने घटनात्मक नीतिमत्तेच्या बाबतीत राज्यकर्ते किती बेफिकर राहिले लोकशाही म्हणजे केवळ निवडणूक जिंकून जगणे एवढाच मर्यादित अर्थ त्यांनी घेतल्यामुळे राजकारण आणि नीतिमत्ता यांची सांगड या लोकशाहीमध्ये घातली गेली आहे काय. हा प्रश्न पडतो त्याचा परिणाम असा झाला की राजकारण हे एक नैतिक कार्यक्षेत्र आहे हे कधीच मान्य झाले नाही आणि आज भारतीय नागरिक राजकारणाकडे चांगल्या दृष्टीने बघायला तयार नाही राजकारण म्हणजे वाईट अशा प्रकारचा संदेश विचार भारतीय जनमानसामध्ये राजकारणाविषयी झाल्याचं बघायला मिळत आहे निवडणूक राजकारणात नीतिमत्तेला काही स्थान नाही अशी मानसिकता झालेल्या पर्यावरणात वावरणाऱ्या संसदीय लोकशाहीचा बोजवाडा उडाला आहे. दुसऱ्या बाजूने देशातील धर्मांध शक्ती दे धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व हे संविधानिक मूल्य नाकारले आहे तर भांडवलशाही व्यवस्थेने समाजवादी समाज रचनेची समाप्ती करण्याचा प्रयत्न यशस्वीपणे केला आहे. असे जाणवते त्यामुळेच एका विषम समाज रचनेचा आकृतीबंध या देशांमध्ये तयार होतो आहे आणि संविधानातील सामाजिक न्याय या मूल्यांची पीछेहाट होताना दिसते आहे. भारतीय समाजात एक सामान्य सांस्कृतिक रस झाला आहे. त्याचा परिणाम संसदीय राजकीय संस्कृतीवरही दिसून येतो त्यामुळे भारतीय लोकशाहीतील नैतिक मूल्यांचा ऱ्हास झाला आहे. परिणामी स्वार्थ भ्रष्टाचार गुन्हेगारीकरण आणि माफिया करण या प्रवृत्ती राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढले आहेत आता तर धर्म आणि जातीच्या नावावर सरकार बनवली जात आहेत. देशातील बेरोजगारी गरिबी प्रदूषण सामाजिक विषमता हुंडा प्रथा आरोग्य बालविवाह निरक्षरता निर्मूलन दहशतवाद इत्यादी महत्त्वाच्या मुद्द्यांना भारतीय राजकीय कार्यपद्धतीमध्ये महत्त्वाचे स्थान नाही. त्यामुळे भारतीय लोकशाहीत सामान्य माणसाची भागीदारी थांबलेली आहे कारण तो भयमुक्त नाही भारताची झालेली वाटचाल भारतीय संविधानाने घालून दिलेल्या सामाजिक व नैतिक मूल्याच्या आधारावर मागच्या 70 वर्षात झालेली आहे यामुळे सामाजिक धार्मिक वर्गीय भिन्नता अजूनही भारत एकसंध केवळ बांधला गेला नाही तर तो टिकून राहिला आहे मागील काही वर्षात भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांना तिलांजली देण्याचा प्रयत्न राजकीय पक्षाबरोबर सामाजिक व धार्मिक घटकांकडून होत असल्याने भारतीय संविधानाची मूलभूत चौकट मोडकळीस येण्याची भीती मोठ्या प्रमाणात जाणवते आहे.

धर्मनिरपेक्षता आणि भारतीय लोकशाही- 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय संविधान देशासाठी लागू करण्यात आले आणि भारत हा एक प्रजासत्ताक गणराज्य देश बनला म्हणजे खऱ्या अर्थाने भारतामध्ये लोकांची सत्ता निर्माण झाली कारण भारतीय संविधानाने या देशाची अंतिम सत्ता जनतेच्या हातामध्ये दिलेली होती. संविधानातील तरतुदीनुसार या देशाची अंतिम सत्ता या देशाचा सर्वोच्च शासन प्रमुख प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने जनतेद्वारे निवडण्याची संविधान निर्मात्यांनी भारताला एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनविले आणि तशा प्रकारची स्पष्ट तरतूद 42 व्या घटनादुरुस्तीनुसार करण्यात आली याचा अर्थ सरकारसाठी सर्व धर्म हे समान असतील

सरकार कोणत्याही धर्माला विशेष महत्त्व देणार नाही. कोणत्याही धर्माचा द्वेष करणार नाही धर्माच्या बाबतीत सरकारची भूमिका तटस्थ व न्यायपूर्ण अशा प्रकारची राहील. परंतु दुर्दैवाने स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर भारतामध्ये अनेक राजकीय पक्षांनी आणि काही राजकीय नेतृत्वाने देखील आपणास राजकीय लाभ प्राप्त करण्यासाठी धर्माचा व जातीचा आपल्या सोयीनुसार वापर केल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळेच निवडणुकीची रणनीती धर्म व जातीवर आधारित बनविण्यात येत आहे मागील काही दशकापासून दुर्दैवाने भारतीय लोकशाहीमध्ये धर्मनिरपेक्षता धोक्यात आल्याचे स्पष्टपणे दिसते आहे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धर्माच्या नावावर लोकांमध्ये ध्रुवीकरण करणे आणि त्याचा राजकीय ला प्राप्त करणे हे जुनं काही निवडणुका जिंकण्याची सूत्र बनत चालली आहे जवळपास या कोणताही राजकीय पक्ष अपवाद नाही असेच म्हणावे लागते. संविधान समितीने दूरदृष्टीचा विचार करून भारताला एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र बनविण्याच्या नंतर या धर्मनिरपेक्षतेला एक मोठे आव्हान मिळू लागले आहे त्यामुळे भारतामध्ये भावनिक धार्मिक मुद्द्यांना आपल्या ध्येयधोरणामध्ये राजकीय पक्ष स्थान देताना दिसत आहेत आणि यामुळेच अलीकडे जनतेमध्ये अनेक धार्मिक वाद निर्माण होताना दिसत आहेत. जे भारतीय लोकशाहीला कुठेतरी पाठीमागे नेताना दिसते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही- आज आपण ज्या राजकीय सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीतून पुढे जात आहोत त्या परिस्थितीचा विचार करता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही संकल्पनेपासून आपण दूर जात आहोत असे वेळोवेळी जाणवते. देशात राजकीय लोकशाहीतून सामाजिक व आर्थिक लोकशाहीची प्रस्तावना त्यांना करायची होती म्हणूनच ते राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत परिवर्तन व्हावे यासाठी प्रयत्नशील होते आग्रही होते. म्हणजेच लोकशाही प्रणालीतून त्यांना या देशातील लोकांच्या जीवनामध्ये सामाजिक व आर्थिक स्तरावर बदल घडून आणायची होती केवळ नागरिकांना निवडणुकीत मताधिकार मिळाला म्हणून तेवढ्यांनी लोकशाही यशस्वी होणार नाही तर त्यांच्यामध्ये एक सामाजिक वास्तविक अस्तित्व निर्माण होईल ते लोकशाही तत्त्वांना समोर घेऊन जाईल. त्यांच्या विचारात उदारमतवादी लोकशाही दिसून येते त्यामुळे त्यांनी स्वातंत्र्य समता बंधुता ही मूल्य सर्वंकष्य समाज क्रांतीची व नव समाज निर्मितीची मूल भेटत मांडली होती. संसदीय लोकशाही घटनात्मक मार्ग व नीतिमत्ता स्वतंत्र न्यायपालिका आदींचा विचार व संख्यात्मक संकल्पनांचा त्याने पुढाकार केला. त्यांच्या मते भारतीय समाजात जाती व्यवस्थेचे निर्मूलन झाले पाहिजे त्याशिवाय राजकीय व आर्थिक सुधारणा अर्थपूर्ण ठरणार नाही. भारतातील सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात उदारमतवादी विचाराला त्यांच्या सामर्थ्याची व मर्यादांचे भान ठेवून नवी दिशा देण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारात दिसून येतात.

जातीयता व धर्म संस्थेचा प्रभाव- जात आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत जातीच्या नावावर राजकारण चालते व राजकारणात जात हाच मुख्य मुद्दा ठरू पाहतो आहे. जाती संस्था ही आपल्या लोकशाही समोरील सर्वात मोठे आव्हान आहे हे अलीकडील काही उदाहरणावरून सहज लक्षात येईल. लोकशाहीला यशस्वी करण्यासाठी राज्यघटना निर्मात्यांनी व्यक्तीचा जन्मसिद्ध दर्जा नाकारून सर्वांना समान प्रतिष्ठा देणारा दर्जा निर्धारित केला व भारतीय राज्यघटनेत कलम 17 च्या माध्यमातून असमानता कमी करण्याचा प्रयत्न केला. याच कलमाच्या आधारे विकृत राजकारण सध्या सुरू आहे सद्यस्थितीत प्रत्येक समाज घटकास आपले सामाजिक राजकीय अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी आरक्षणाचा आधार हवा आहे. महाराष्ट्रात मराठा धनगर राजस्थानात गुजरात तेलंगणाच्या कापू या समाजाची आरक्षण साठीची जन आंदोलन लोकशाहीच्या स्थैर्यास बाधा आणताना दिसून येतात. त्याचबरोबर धर्म म्हणजेच आपले सामाजिक जीवन निश्चित करणारी महत्त्वाची सामाजिक संस्था होय भारतीय संविधानाने आपणास धर्म स्वातंत्र्य बहाल केली आहे याच धर्माच्या नावाने भारताच्या राजकारणाचा सर्व सर्व बाबी धर्माच्या नावाने चालतात असे स्पष्ट होते उदाहरणार्थ राम मंदिर बाबरी मज्जिद हनुमान चालीसा वाचन या मुद्याभोवती महाराष्ट्रातील राजकारण पार ढवळून निघाली आहे.

विरोधी पक्षाचे स्थान कमकुवत करणे- संसदीय लोकशाहीमध्ये सत्ताधारी पक्षाला जेवढे महत्त्व आहे तेवढेच अनन्य साधारण महत्व विरोधी पक्षाला सुद्धा असते याचे भान बहुतेकांना असेलच सत्ताधारी पक्षाच्या निर्बंध सत्तेवर अंकुश ठेवण्यासाठी विरोधी पक्षाची महत्त्व संविधान करांनी सुद्धा स्पष्ट केले आहे. मात्र सध्याच्या राजकीय परिस्थितीत साम दाम दंड भेद या शत्रूच्या वापराने विरोधी पक्षांचे अस्तित्व नष्ट करण्याचे काम सत्ताधारी पक्षांनी चालविले आहेत. त्याचबरोबर अनेक घटनात्मक संस्थांचा

दुरुपयोग करून विरोधी पक्षाचा आवाज बंद करण्याचे काम सर्रासपणे होत आहे हे समजणार देखील नाही. संपूर्ण देश कोरोना विषाणूचे विरोधात झगडत असताना भारताच्या मध्यभागी असणाऱ्या मोठ्या राज्यातील केंद्रातील सत्तेचा दुरुपयोग करून त्यात कालीन सत्ता पक्षातील संतुष्ट नेत्यांना पुढून आपले शासन बनविण्याचा लाजिरवाणा प्रकार व देशाने पाहिला त्यामुळे जनादेशाचा अपमान करून लोकशाहीची हत्या आपण करीत आहोत असे काहीही चित्र भारतातील लोकशाही विषयी निषेध करता येईल. मतदाराला ग्राहक बनविण्याचा प्रयत्न लोकशाही व्यवस्थेत अंतिम सत्ता ही जनतेच्या अवलंबून असते. या प्रक्रियेत मतदार हा केंद्रबिंदू असतो. सद्यस्थितीत या मतदाराला विविध प्रकारची आमिष दाखवून त्याच्या पवित्र मताची अक्षरशा बोली लावली जाते व मतदान हा आपला ग्राहकच आहे. या अर्थाने सर्वच राजकीय पक्ष वागत आहेत म्हणजेच सर्वसामान्य मतदारांना गृहीत धरण्याचे काम विषया लोकशाहीमध्ये सुरू झालेली आहे.

लोकशाही व बदलती प्रसार माध्यमातून- आजच्या नव्या व्यवस्थेमध्ये भारतीय प्रसार माध्यम खासकरून इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. गेल्या काही वर्षापासून दूरचित्रवाणी वरील बातम्यांमध्ये निपक्षपातीपणा आणि नैसर्गिकता यांचा अभावोर असल्याचे दिसून येते आदर्श दूरचित्रवाणीच्या गुरु आणि पुढाकारांनी जमीन दिले नाही. गतिमानता हाच आजच्या पत्रकारितेचा लोकशाहीचा प्रसार माध्यमे हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे हे जगभरातील लोकशाही देशांनी स्वीकारलेले वास्तव आहे. ब्रिटनच्या संसदेत या संकल्पनेचा जन्म झाला संसद प्रशासन दुबळी होईल व माध्यम हस्तंभ अधिक मजबूत असला पाहिजे असे लोकशाही व्यवस्था मानते कारण लोकशाहीचे पहिले तीन स्तंभ आणि समाज यांच्यातील दुवा म्हणून महत्त्वाची भूमिका बजावण्याची मोठी जबाबदारी माध्यमांवर असते देशातील वा जगभरातील सामाजिक राजकीय आर्थिक आणि समाज जीवनाशी निगडित असलेल्या प्रत्येक घडामोडीची भान समाजास देण्याची जबाबदारी माध्यमांवर असते आणि ही जबाबदारी निभावणी हे एक व्रत आहे. हे माध्यमांनी स्वतःहून मान्य केले असेल तर ते काही समाजापर्यंत पोहोचवायची असते हे निखळपणे व जसे आहे तसे त्याला कोणताही रंग न लावता पोचविणे हे माध्यमांचं महत्त्वाचं कर्तव्य ठरते. अलीकडे मात्र या नव्याने विस्तारत असलेल्या समारंभ समाज माध्यमांना यजबाबदारीचे पुरेसे भान येणे गरजेचे आहे. समाज माध्यमांचा समाज विघात कामासाठी गैरवापर होत असल्याच्या असंख्य बातम्या माध्यमातूनच समाजापर्यंत पोहोचत असतात. लोकशाही व्यवस्थेचा चौथा स्तंभ म्हणून जबाबदाऱ्या माध्यमांवर असतात. त्यांची पालन केल्याची पुण्य माध्यमांना प्राप्त होईल कारण त्याच अपेक्षेने समाज माध्यमांकडे आजही पाहत आहे. माध्यमांवरील समाजाचा विश्वास आजही कायम आहे अधून मधून दाटणारे संसयाची ढग बाजूला सारून लोकशाहीकडून असलेल्या अपेक्षांची भान कायम टाकले तर माध्यमांची समाजमनातील स्थान कधीच कमी होणार नाही हे स्पष्ट आहे. लोकशाहीच्या बळकटीसाठी माध्यमांनी विश्वासारख्या जपली पाहिजे तरच माध्यमांचा समाजातील स्थान बळकट होईल याचबरोबर लोकशाही सुद्धा बळकट होईल.

भारतातील महिला सबलीकरण व लोकशाही- भारतीय लोकशाहीची स्त्री आणि पुरुष ही दोन महत्त्वाची शाखा आहेत ती जर समान गतीने चालली तर खऱ्या अर्थाने भारतात लोकशाही सुव्यवस्था नांदेल पुरुष प्रधान संस्कृतीत आजही लोकांची मानसिकता बदललेली नाही हा बदल होणे काळाची गरज आहे. तसेच स्त्रियांनी सुद्धा स्वतःची मानसिकता बदनावी. आत्मविश्वास वाढवावा आत्मभनाची जाणीव निर्माण व्हावी आपली बुद्धीच्यातुल्य ओळखून आपला विकास करावा. पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक राजकीय आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात वाटचाल करण्यासाठी सक्षम बनवणाऱ्या धोरणांचा पूर्ण आढावा घेऊन नवनवीन कल्याणकारी योजनांमध्ये सहभाग नोंदवला. तर त्या नक्कीच सक्षम होतील व पुरुषांच्या बरोबरीने समाजामध्ये स्थान प्राप्त करतील व लोकशाहीला अधिक सक्षम व बळकट करतील आजच्या स्त्रीला आरक्षण देण्यापेक्षा संरक्षण देणे ही काळाची गरज आहे सामाजिक परिवर्तनासाठी तिला मनाने व शरीराने खंबीर बनवण्यासाठी लोकशाहीने नवे पाऊल उचलले पाहिजे असे वाटते. शासनाबरोबरच स्त्रियांच्या सबली करण्यासाठी जागरूकपणे कुटुंब समाज शासन यांनी पुढाकार घेतला पाहिजे परंतु समाजामध्ये मात्र वारंवार स्त्रियांच्या विषयी एका बाजूला मोठमोठ्या मंचावरून विचार मांडण्याचे काम चालू असतात. तर दुसऱ्या बाजूला मात्र दुसऱ्या हाताने स्त्री एक उपभोगाची वस्तू आहे असे समजून तिच्यासोबत व्यवहार करत असतात स्त्रियांवर वारंवार होणारे अत्याचार स्त्री समोर निर्माण होणाऱ्या अडचणी स्त्रियांना सातत्याने राजकारणापासून दूर बाजूला करणे स्त्रियांना धार्मिक गोष्टींमध्ये अडकवून ठेवणे अशा बाबतीत स्त्रिया या अधिक

कशा लोकशाही विषयक मूल्यांपासून दूर जातील पर्यायाने त्यांच्या अधिकारापासून दूर जातील अशी व्यवस्था काही बाबतीत सातत्याने सुरू असते. त्यामुळेच भारतीय लोकशाही एका वेगळया पद्धतीने वाढवणे व प्रत्येकाला प्रत्येकाचा अधिकार बहाल करणे हे लोकशाही समोर एक आव्हान आहे असे म्हणावे लागते.

सामाजिक चळवळी व लोकशाही- लोकशाहीमध्ये सामाजिक चळवळी महत्त्वाची भूमिका बजावत असतात लोकशाहीला आकार देण्याचे काम या सामाजिक चळवळी करीत असतात. मात्र बदलत्या परिस्थितीनुसार लोकशाही यंत्रणे बरोबरच सामाजिक चळवळी देखील संक्रमणावस्थेमध्ये आहेत. या सामाजिक चळवळीतून राजकीय नेतृत्वास व्हावा मिळतो व नवीन राजकीय नेतृत्व उदयास येते मात्र संक्रमण अवस्थेतील लोकशाही चळवळी या सध्या उदासीन अवस्थेतून आपली भूमिका बजावत आहे. सर्वसामान्य तरुणांचा सामाजिक चळवळीकडे बघण्याचा दृष्टिकोन निश्चितच कालमानाप्रमाणे बदललेला आहे हे सत्य ही आपल्याला व्याकरण चालणार नाहीत सामाजिक चळवळी टिकल्या तरच लोकशाही टिकेल. आणि लोकशाही टिकली तरच जीवनशैली योग्य पद्धतीने चालण्यास मदत होणार आहे यातूनच सामाजिक चळवळीच्या नदी बरोबरच लोकशाहीचे संवर्धन करणे ते भारतीय नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे.

**निष्कर्ष:**

थोडक्यात भारतीय लोकशाही ही सध्या एका विशिष्ट टप्प्यावर येऊन पोहोचलेली आहे. आणि या टप्प्यावर या लोकशाहीला नागरिकांनी व्यवस्थितरित्या सांभाळणे ही काळाची गरज आहे धर्मनिरपेक्षता असो बेरोजगारी असो किंवा लोकशाही व्यवस्था टिकवणाऱ्या संस्था असो ह्या सगळयांच्या बरोबरीने भारतीय नागरिकांनी सुद्धा भारतीय लोकशाहीची काळजी जर केली तर नक्कीच भारतीय लोकशाही ज्या पद्धतीने भारतामध्ये रुजली त्या पद्धतीने ती टिकेल अन्यथा भारतीय लोकशाही ही ज्या पद्धतीने इतर देशांची वाटचाल झाली व लोकशाही किंवा नावापुरतीच अस्तित्वात राहिली अशी अवस्था व्हायला वेळ लागणार नाही त्यामुळे नागरिकांनी सुद्धा लोकशाहीच्या भवितव्याचा विचार करणे गरजेचे आहे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भारतीय लोकशाहीला वाचवणे व तिच्या उज्वल भविष्यासाठी प्रत्येकाने प्रामाणिकपणे प्रयत्न करणे हेच यानिमित्ताने यशस्वी लोकशाहीसाठी मोलाचे मार्गदर्शन ठरेल

**संदर्भ:-**

1. डॉ. सुहास पलाशिकर, पॉलिटिकल साइंस डिक्शनरी। पुरा दस्ताने रामचंद्र एंड कंपनी पुणे
2. डॉ. दिलीप सिंह निकुंभ, आधुनिक राजनीतिक विचार, प्रशांत प्रकाशन जलगाँव जनवरी 2015
3. पलाशिकर सुहास, द बैलेंस शीट ऑफ पॉलिटिक्स एंड द मूवमेंट ऑफ इंडियन डेमोक्रेसी, साधना प्रकाशन पुणे 2017
4. पलाशिकर सुहास, रीजनल पार्टी पॉलिटिक्स इन इंडिया, साधना प्रकाशन पुणे 2009। 5. प्रो. लोट्टे रेस। राज्य शास्त्रीय सिद्धांत, पिंपलापुरे प्रकाशन नागपुर।
6. पाटिल विलास महाराष्ट्र सरकार और राजनीति, फड़के प्रकाशन कोल्हापुर।
7. डॉ. वैद्य सुमन डॉ. कोठेकर शांता, आधुनिक भारत का इतिहास, साईनाथ प्रकाशन नागपुर
8. डॉ. रावसाहेब कस्बे, डॉ. बाबासाहेब अम्बेडकर और भारत का संविधान, सुगावा प्रकाशन पुणे 2014
9. डॉ. कुरकुटे डॉ. खरात डॉ. भारतीय लोकतंत्र का देशमुख आंदोलन, अथर्व प्रकाशन 2021।

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची संकल्पना

**डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
आझाद महाविद्यालय, औसा जि.लातूर
मो.नं.9890494856
ईमेल-**dilipkumarkshirsagar** 321@gmail.com

**सारांश:**आधुनिक भारतातील राजकीय विचारवंतांच्या मांदियाळीत डॉ. भिमराव (डॉ.बाबासाहेब) रामजी आंबेडकर (14 एप्रिल 1891 - 6 डिसेंबर 1956) हे अनेक कारणांनी इतर आधुनिक भारतीय राजकीय विचारवंतापेक्षा वेगळे ठरतात. एक म्हणजे तत्कालीन सवर्णांकडून अस्पृश्य, शुद्र म्हणून मिळालेल्या अवमानकारक वागणुकीमुळे, साधेसुधे जीवनही मानाने जगणे अगदी अशक्य नसले तरी अत्यंत दुरापास्त असण्याच्या त्या काळात अतुलनीय धैर्य आणि सामाजिक अगतिकतेविरोधात लढणारे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिसतात. अगतिक ते सक्षम असा संघर्षमय प्रवास करताना, त्यातूनच प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, दलितांचा नेता, भारतीय संविधानाचे शिल्पकार, म्हणून ते सर्वमान्य झालेले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर एका अस्पृश्य व्यक्तिमत्वाची ज्वलंत जीवनगाथा आहे. अत्यंत प्रतिकूल आणि दडपशाहीच्या परिस्थितीतही एखादा माणूस आत्मक्लेश आणि दुर्दम्य चिकटीने काय घडवू शकतो याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, डॉ. आंबेडकर, राजकीय विचार, दलित

प्रस्तावना :-

आधुनिक भारतातील राजकीय विचारवंतांच्या मांदियाळीत डॉ. भिमराव (डॉ.बाबासाहेब) रामजी आंबेडकर (14 एप्रिल 1891 - 6 डिसेंबर 1956) हे अनेक कारणांनी इतर आधुनिक भारतीय राजकीय विचारवंतापेक्षा वेगळे ठरतात. एक म्हणजे तत्कालीन सवर्णांकडून अस्पृश्य, शुद्र म्हणून मिळालेल्या अवमानकारक वागणुकीमुळे, साधेसुधे जीवनही मानाने जगणे अगदी अशक्य नसले तरी अत्यंत दुरापास्त असण्याच्या त्या काळात अतुलनीय धैर्य आणि सामाजिक अगतिकतेविरोधात लढणारे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिसतात. अगतिक ते सक्षम असा संघर्षमय प्रवास करताना, त्यातूनच प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, दलितांचा नेता, भारतीय संविधानाचे शिल्पकार, म्हणून ते सर्वमान्य झालेले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर एका अस्पृश्य व्यक्तिमत्वाची ज्वलंत जीवनगाथा आहे. अत्यंत प्रतिकूल आणि दडपशाहीच्या परिस्थितीतही एखादा माणूस आत्मक्लेश आणि दुर्दम्य चिकटीने काय घडवू शकतो याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत.

लोकशाही म्हणजे काय **? :-**

व्यक्ति स्वातंत्र्य, समता व न्याय या तत्त्वांची प्रतिष्ठापना हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे उदिष्ट होते. त्यामुळे ते लोकशाहीचे कटटर पुरस्कर्ते होते. स्वातंत्र्यपूर्वकाळापासून त्यांनी लोकशाहीचे समर्थन केल्याचे दिसून येते. भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतीय संविधानानुसार स्वीकारलेली लोकशाही शासन प्रणाली सदृढ, अधिकाअधिक सक्षम कशाप्रकारे होईल याचा सातत्याने ध्यास त्यांनी घेतलेला होता. त्यांना भारतीय लोकशाहीत पिळवणूकीपासून मुक्त असलेला समताधारित समाज अपेक्षित होता. लोकशाही म्हणजे काय **?** हे स्पष्ट करताना त्यांनी म्हटले होते, लोकशाहीचे स्वरूप सातत्याने बदलत असते. एकाच राष्ट्रातील लोकशाही आहे त्या परिस्थितीत राहू शकत नाही. तिचे उददेश बदलत असते. आधुनिक लोकशाहीचे उदिष्ट एखाद्या अनियंत्रित राजाचे अधिकार कमी करणे नसून लोकांचे कल्याण साधणे आहे. " लोकशाही म्हणजे चर्चेच्या, रूपाने, मार्गदर्शन घडून चालणारे शासन " ही वॉल्टर बेजहॉटची व्याख्या, तर लोकशाही म्हणजे लोकांचे, लोकांकरिता, लोकांनी चालविलेले शासन ही अब्राहम लिंकनची व्याख्या. परंतू

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली लोकशाहीची व्याख्या अत्यंत वेगळी असून " ज्या शासन पध्दतीत लोकांच्या आर्थिक, सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्तपाताशिवाय घडतात ती शासन प्रणाली म्हणजे लोकशही होय 2. विद्यार्थी दशेपासून डॉ. बाबासाहेबांना सामाजिक विषमतेला सामोरे जावे लागल्याने त्यांनी लोकशाहीचे समर्थन करताना इंग्लडमध्ये उदय पावलेल्या व रुजलेल्या संसदीय शासन प्रणालीचा भारतासाठी आग्रह धरीत आदर्श आणि वास्तवाचा मेळ घालण्याचा विचार मांडला. भारतातील सामान्य माणसाची प्रतिष्ठा जपणारी केवळ राजकीय नव्हे तर आर्थिक आणि सामाजिक समतेचा ध्यास घेणारी आणि सत्तेची एकाधिकाराही संपुष्टात आणून सर्वांनी सत्तेत, निर्णय प्रक्रियेत, निर्णयाच्या अंमलबजावणीमध्ये समानसंधी उपलब्ध करून देणारी शासन पध्दती म्हणजे लोकशाही शासन पध्दती होय असे त्यांचे मत होते. भारतीय संविधानानुसार प्रौढ सार्वत्रिक मताधिकार, व्यवसायस्वातंत्र्य तसेच सामाजिक विषमतेविरूध्द वंचित समाजाला मिळालेले अधिकार ही आपल्या लोकशाहीची वैशिष्टये आहेत. 3 डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय चिंतनातील लोकशाही हा विचार केवळ आदर्शाच्या स्वप्नरंजनातून निर्माण झालेला नसून सभोवतालच्या सामाजिक, राजकीय वास्तवाच्या मुशीतून तो तावून-सुलाखून निघाला होता. भारतात लोकशाहीची उभारणी करणे एवढयापुरतेच त्यांचे राजकीय ध्येय सीमीत नव्हते, तर जगात जिथे जिथे लोकशाही असेल त्या सर्वंच राष्ट्रांशी सहकार्य करून भारतात लोकशाही मुल्यांचे संरक्षण करावे अशीही त्यांची इच्छा होती. सामान्य माणसावर त्यांचा एवढा लोभ आणि विश्वासही होता की, त्याच्या व्यक्तिगत व सामुहिक प्रतिष्ठेच्या प्रतिष्ठापनेसाठी लोकशाही जीवनमार्गाचा त्यांनी ध्यास घेतलेला होता. जुलूम, जातीयता व गुलामगिरीतून सामान्य माणसाला मुक्त करणारी शासन व्यवस्था कशी असावी हाच शोध त्यांनी आमरण चालविला होता. भारतातील सामाजिक संबंधांची फेररचना फक्त लोकशाही शासन व्यवस्थाच करू शकेल असा त्यांना विश्वास होता. लोकशाही म्हणजे सहजीवन, लोकशाहीची मुळे सामाजिक संबंधांतच आढळतात अशी त्यांची धारणा होती. ज्या समाजात भिन्न सामाजिक गटांच्या सांस्कृतिक दृष्टीकोणात प्रबळ तफावती असतात आणि भिन्न लोकसमूहांच्या ठायी सहजीवनाची भावनाच अपुरी किंवा अनुपस्थित असते तेथे लोकशाही वातावरण निर्माण होणे अवघड असते हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाहीवरील चिंतनाचा केंद्रबिंदू होता. दारिद्रय, निरक्षरता, जातीय पृथगात्मता हे त्यांच्या मते भारतीय लोकशाहीच्या मार्गातील अडथळे होते. जोपर्यंत प्रयत्नपुर्वक या तिन्हींचे निर्मूलन होते नाही तोपर्यंत भारतात लोकशाही अस्तित्वात येऊच शकत नाही. कारण तोपर्यंत या देशातील बहुमत हे त्या त्या मतदार संघातील सर्व गटांचे प्रतिनिधिक होऊच शकत नाही.4

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीप्रधान राष्ट्रांसमोर जे मार्गदर्शनपर विचार मांडलेले आहेत, ते अत्यंत उदबोधक आहेत. केवळ भारतीय नव्हे तर जगातील लोकशाहीच ते मोठे चाहते, समर्थक आणि आधारस्तंभ होते, सद्यकालीन जगात लोकशाहीचे जे पाठिराखे आणि कैवारी होऊन गेले, त्यामध्ये त्यांचे स्थान उल्लेखनीय असेच आहे. भारतीय लोकशाही बलशाली, प्रभावी आणि प्रगत व्हावी यासाठी ते अहोरात्र तळमळीने विचार करीत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेतील महत्वपूर्ण घटक पुढीलप्रमाणे आहेत.

डॉ. आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेतील समाविष्ठ घटक :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या लोकशाही संकल्पनेमध्ये पुढील प्रमुख घटकांचा समावेश होतो. या घटकांचा अभ्यास केल्याशिवाय त्यांची लोकशाहीची समग्र संकल्पना समजून घेता येत नाही.

1) पददलित वर्गाला सत्ताप्राप्ती व्हावी :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते प्रत्येक देशात एक प्रस्थापित सत्ताधारी वर्ग असतो. भारतासारख्या देशात स्वातंत्र्योत्तर काळात प्रस्थापित सत्ताधारी वर्गाच्या हाती सत्ता जाणे स्वाभाविक असले तरी लोकशाहीच्या मुलतत्त्वांशी विसंगत असते. सत्तेचा ज्यांना कधी स्पर्श झाला नाही अशा समाजातील खितपत पडलेल्या पददलित वर्गाला सत्ता प्राप्त होणे हीच खरी लोकशाही असते. सार्वत्रिक अमर्याद प्रौढ मताधिकाराच्या मार्गाने हे साध्या होऊ शकते, परंतू त्याबरोबरच कनिष्ठ वर्गीय यांना इतर संरक्षणाची आवश्यकता असते. आज हा कनिष्ठ, निम्न वर्ग ज्या असहाय्य व उपेक्षीत अवस्थेत आहेत त्यातूनच त्याला योग्य व मोफत

शिक्षणाच्या सहाय्याने बाहेर काढता येईल. त्यांना सुखी, स्वास्थ्यपूर्ण व निवांत जिवनाची हमी मिळणे ही तितकेच आवश्यक आहे. कारण त्याशिवाय लोकशाही संस्कृतीचा अंगीकार करण्यास त्यांना उसंतच मिळणार नाही. लोकशाही हे शेवटी सामाजिक संघटन आहे. भारताची पारंपारिक समाजरचना लोकशाहीला मुळीच पोषक नाही. कारण आपल्या देशात श्रीमंत-गरीब , उच्च-नीच, मालक-मजूर असे कायमस्वरूपी वर्ग समाजात अस्तित्वात आहे. आधि भारतातील या समाजरचनेत मौलिक फेरफार केल्याशिवाय वर लोकशाहीचे इमले उभारल्यास भर भक्कम पाया नसलेल्या इमारतीप्रमाणे ते कोसळतील असे त्यांचे मत होते. या मौलिक फेरफारांनाच ते सामाजिक लोकशाहीची निर्मिती म्हणून संबोधतात. अल्पसंख्याकांचे बहुसंख्याकांच्याद्वारे शोषण होणे सामाजिक लोकशाही विरोधी आहे. संरक्षीत मानवी हक्क, व्यक्तीची प्रतिष्ठा, राजकीय स्वातंत्र्य, समाज विकास इत्यादी लोकशाही मुल्य कितपत वास्तवात अवतरतील हे लोकशाहीच्या तळमजल्याचा नकाशावर अवलंबून असते. हा नकाशा म्हणजे भारतातील सामाजिक संरचना होय. सामाजिक संरचनेचा खूप प्रभाव पडत असतो. लोकशाही शासन प्रकार लोकशाही समाजरचना गृहीत धरत असतो. सामाजिक लोकशाही अस्त्विात असल्याखेरीज लोकशाही औपचारिक सांगाडयाला मुळीच अर्थ नसतो म्हणत असतं. 5

2) " एक व्यक्ती एक मुल्य ” या तत्वाचा स्वीकार :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते एका व्यक्तीला एक मत देऊनच सामाजिक लोकशाही निर्माण होत नाही. सामाजिक लोकशाहीत दोन बाबींचा समावेश होतो. पहिली, सहबांधवाबददल सममनस्कता, सन्मान आणि समभाव आणि दुसरी, ताठर अशा सामाजिक बंधनातून मुक्त अशी सामाजिक रचना. त्यांच्या मतानुसार काही लोकांना विशेषाधिकार असणे व काहींना ते नसणे यामधून समाजातील काही वर्ग एकाकी व तुटून पडणे लोकशाहीशी विसंगत आहे. निसर्गाने मानवात विषमता निर्माण केली असली तरी ही बाब लोकशाहीच्या विकासाआड येऊ शकत नाही. किंबहुना माणसे निसर्ग:त विषम असतात म्हणूनच त्यांना समतेची वर्तणूक देणे गरजेचे असते. एक व्यक्ती एक मत यापेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना " एक व्यक्ती एक मूल्य हे तत्व अधिक स्वीकारणीय वाटते. सामाजिक आणि राजकीय संबंधांमध्ये व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वातील अंगभूतमूल्य या तत्वांच्या मुळाशी आहे. त्यात त्यांना जनतेच्या सर्वांगिण आर्थिक, सामाजिक विकासाचे रहस्य आढळते सर्वांना समान दर्जा समाजमाणसात मिळाला पाहिजे, तरच यशस्वी लोकशाही भारतात निर्माण होईल. 6

3) लोकशाहीत मानवी हक्कांच्या संरक्षणाला महत्त्वाचे स्थान :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही संकल्पनेत मानवी हक्कांना व त्यांच्या संरक्षणा नाही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांच्या मते राजकीय लोकशाहीची उभारणी चारगृहितांवर झालेली असते. एक व्यक्ती हेच स्वयंमेव साध्य आहे. दोन- व्यक्तीला काही अदेय हक्क असतात व राज्यघटनेने त्या हक्कांची हमी त्याला दिलीच पाहिजे. तीन - कोणत्यांही विशेषाधिकाराच्या प्राप्त्यर्थ्य व्यक्तीला आपल्या संविधानाने दिलेल्या अधिकारांचा त्याग करावा लागू नये, चार - इतरांवर शासन करण्याची सत्ता राज्यसंस्था कोणाही खाजगी व्यक्तींना प्रदान करणार नाही." अधिकसत्तावाद, सर्वंकष सत्तावाद, फासिस्टवाद कोणत्याही स्वरूपात असोत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा त्यांना कसून विरोध होता, कारण व्यक्तीची अंगभूत प्रतिष्ठाच या शासन प्रकारांना अमान्य असून व्यक्तीचे व्यक्तित्व चिरडणे हाच त्यांचा स्वभावधर्म आहे. अधिकारांचा लाभ समाजातील अधिकाधिक लोकांना प्राप्त होणे हा, डॉ. आंबेडकरांच्या मते, लोकशाहीचा सर्वश्रेष्ठ निंकष आहे. सर्व नागरिकांना समानसंधी मिळायला पाहिजे, सौजन्य बहुसंख्याकांजवळ हवे. त्यांच्या हक्कांना जपले जावे. मानवी हक्कांच्या संदर्भात माणसामाणसांत भेदभाव केला जाऊ नसे असा त्यांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता. 7

4) व्यक्तिवादाचे आकर्षण :-

व्यक्तिवाद आणि सिमित शासन ही उदारमतवादी लोकशाहीची दोन वैशिष्टये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विशेष भावली होती. प्रत्येक व्यक्तीला अंगभूत मूल्य असते. स्त्री- पुरूष, श्रीमंत-गरीब, शिक्षित- अशिक्षित, बलवान- दुर्बल, स्पृश्य- अस्पृश्य या

भेदभावांना मुळीच विचारात न घेतले जाता प्रत्येक व्यक्तीला साधन म्हणून वापरले जाऊ नये. समाजाखातर व्यक्तीचा बळी दिला जाऊ नये. प्रत्येक व्यक्तीला समान स्वातंत्र्य असावे. व्यक्तित्व मुल्याची प्रतिष्ठा सर्वसामान्य व्हावी, मुक्त व्यक्तिमत्वाच्या नैतिक तत्वाची प्रतिष्ठापना व्हावी, आणि त्यातून न्याय समाजाची उभारणी व्हावी, या अपेक्षा केवळ लोकशाहीतच पूर्ण होऊ शकतात, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला होता. राजकीय क्षेत्रात व्यक्तीच्या, धार्मिक - नैतिकक्षेत्रात सद्सद् विवेकाच्या आणि आर्थिक क्षेत्रात ग्राहकांच्या सार्वभौमत्वावर उदारमतवादी लोकशाहीचा भर असतो. प्रत्येक व्यक्तीला सन्माननीय नागरिक म्हणून जगता येण्यासाठी जे लागते ते सर्व काही लाभेल अशी समाज व्यवस्था निर्माण करणे हे त्यांच्या मते लोकशाहीचे साध्य असते. 8

5) निरंकुश शासन पध्दतीला विरोध :-

व्यक्तीच्या स्वातंत्र्याची हमी मिळायची, तर राज्य सत्ता निरंकुश असून चालणार नाही. राज्यकर्त्यांच्या लहरीनुसार मन:पूतपणे राज्यकारभार चालू नये, तर विवेकी तत्वाप्रमाणे चालावा. राज्य व्यक्तीचे नव्हे, तर कायद्याचे राज्य ही संकल्पना डॉ. आंबेडकरांच्या राजकीय विचारांचा केंद्रबिंदू होता. शासनाने सर्व व्यक्तींना कायद्याचे समान संरक्षण द्यावे, कायदेशीर कारणाखेरीज कोणालाच आपल्या जीवित वित्ताला व स्वातंत्र्याला वंचित व्हावे लागू नये, कायद्यातून लोकमताचे प्रतिबिंब उमटावे त्यासाठी शासन प्रातिनिधिक असावे असा विचार त्यांनी मांडला. त्यांच्या मते शासन सत्तेला सत्ता लोकांनुवर्ती राहावे लागणे व जनतेला उत्तरदायी असावे लागले. यातून उदारमतवादी लोकशाहीतील राज्यसत्ता निरंकुश होण्याचा धोका टळतो. जनसंमतीद्वारे तिथे सत्तेचे रूपांतर निरंतरपणे अधिसत्तेत घडत असल्यामुळे राज्यसत्तेची अधिमान्यता अखंड टिकते 9

6) धर्मनिपरेक्ष राज्याचा स्वीकार :-

पाश्चात्य देशातील उदारमतवादी लोकशाही परंपरेतून उदयाला आलेली धर्मनिरपेक्ष राज्याची संकल्पना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारली होती. धर्म स्वातंत्र्य, धर्मनिरपेक्ष नागरिकत्व, धार्मिक बाबतीत पैशाने चालणाऱ्या शिक्षण संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण देण्यास विरोध, धार्मिक विचारांची सक्ती करण्यास प्रतिबंध आणि कोणताही धर्म राज्य पुरस्कृत नसणे असा धर्म निरपक्षेतेचा अर्थ त्यांनी वेळोवेळी स्पष्ट केला होता. 10

7) संविधानिक मार्गावर निष्ठा :-

आपले हक्क पदरात पाडून घेण्याकरिता दलित, शोषितांना संघटितरित्या संघर्ष करण्याशिवाय पर्याय नाही, हे डॉ. आंबेडकरांना मान्य असले तर आंदोलनाचे हिंसक मार्ग त्यांनी नाकारले होते. संविधानिक नीतिमत्ता प्रत्येक नागरिकाने अंगी बाणवलीच पाहिजे, म्हणजे संविधानबाहय वर्तन कोणीही करता कामा नये. कोणत्याही परिस्थितीत प्रत्येकाचा प्रत्येक व्यवहार संविधानाला धरूनच असला पाहिजे यावर त्यांचा भर होता. 11

8) संतुलित पक्षपध्दती आवश्यक असते :-

संसदीय लोकशाही शासन प्रणाली हा मर्यादीत शासनाचाच एक भाग म्हणून संतुलित पक्षपध्दती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महत्त्वाची वाटते. विरोधी पक्षाचा वचक राज्यकर्त्या पक्षावर नसेल तर तो सत्तेचा गैरवापर करेल. अशा भूमिकेतून द्विपक्ष पध्दतीने समर्थन त्यांनी केले. स्वातंत्र्याचे रहस्य धारिष्टयात असते आणि व्यक्तींनी राजकीय पक्षांच्या स्वरूपात एकजूट बांधण्यातून धारिष्टयाचा जन्म होतो. शासन चालविण्यासाठी राजकीय पक्ष असावे लागतात. शासनाला हुकूमशाही पासून रोखण्यासाठी राष्ट्रात दोनपेक्षा जास्त राजकीय पक्ष असावेत. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी किमान दोन तुल्यबळ राजकीय पक्ष आवश्यक असतात. विरोधी राजकीय पक्ष नसेल तिथे लोकशाहीच नसते. राष्ट्रैक्याच्या अन्य कोणत्याही कारणास्तव एक पक्षीय पध्दतीचा स्वीकार करणे त्यांच्या लोकशाहीला निष्ठेला मानवणारे नव्हते. त्यांच्या मते, एकपक्षीय शासन हे जुलूमशाहीला निमंत्रणच

असते. लोकशाही शासनाला एक पक्षीय शासन नेहमीच मारक असते. निवडणुकीच्या मार्गाने जरी तो एकमेवाद्वितीय राजकीय पक्ष सत्तारूढ झालेला असला तरी तेवढयाने हुकूमशाहीला पायबंद बसण्याची मुळीच हमी नसते.12

9) वर्ग विभक्त समाजरचना लोकशाहीसाठी प्रतिकूल :-

वर्ग विभक्त समाजरचना ही लोकशाहीसाठी प्रतिकूल असते, याची जाणीव व डॉ. आंबेडकरांना होती. वर्गीय समाजात सधन वर्गाच्या ठायीपोकळ दंभ- दुराभिमान, औध्दत्य, अप्पलपोटेपणा व जुलमीवृत्ती तर दुसऱ्या बाजूला दीनदलितांच्या वाटयाला असुरक्षितता, दारिद्रय आणि अध:पतन होते. अशा विषमतेत सर्वांना स्वातंत्र्य,स्वाभिमान, प्रतिष्ठा व स्वावलंबन यांचा समान लाभ होणे अशक्य असते. समाजातल्या प्रत्येक व्यक्तीला पर्याप्त फुरसत, सांस्कृतिक विकासाची संधी लाभली. तरच ती लोकशाहीतील जबाबदाऱ्या समर्थपणे पेलू शकते असे त्यांनी म्हटले आहे. 13

10) संसदीय लोकशाहीचे समर्थन :-

संसदीय लोकशाहीवर आंबेडकरांचा विशेष भर होता. त्यांच्या मते संसदीय शासन पध्दती हीच व्यक्तीच्या अंगी आत्मनिर्भरता, उपक्रमशीलता व जबाबदारीची जाणीव निर्माण करू शकते. सहकार्य, शिस्त व समर्पणादी गुणांचा विकास करू शकते, उच्चतर प्रतीचे राष्ट्रीय चारित्र्य घडवून शील, सचोटी, उद्यम व धारिष्टय इत्यादींचा परिपोष या पध्दतीतच होऊ शकतो. संसदीय लोकशाहीच मानवी जीवनाच्या प्रवाही स्वरूपाशी सुसंगत ठरते, कारण रक्तपात न घडविता सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात मुलभूत स्वरूपाचे बदल घडवून आणण्याचा मूलमंत्र फक्त तिलाच अवगत असतो; दुसरे असे की, विविध मुद्यांसंबंधीचे निर्णय मनमोकळया चर्चेअंती व सर्वांच्या संमतीने घेण्याची तरतूद फक्त संसदीय पध्दतीच असते. अहिंसक, घटनात्मक व शांततापूर्ण विचारविनीमयालाच या पध्दतीत वाव असतो. संसदीय शासनप्रणाली डॉ. आंबेडकरांच्या मते अतिमोलाच्या आहेत. पहिली आहे विरोधी पक्ष आणि विरोधी वृत्तपत्रे आणि दुसरी आहे मुक्त आणि न्याय निवडणुका. समर्थ सत्ताधारी पक्षाइतकाच प्रबळ विरोधी पक्ष संसदेत असणे अत्यावश्यक असते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचे केवळ स्वागत होणे एवढेच नाही तर उचित प्रमाणात सन्मानही केला जातो. सत्ताधारी पक्षाला हुकूमशाही व मन:पूत वर्तनापासून दूर ठेवण्याचे कार्य फक्त खंबीर आणि प्रामाणिक विरोधी पक्ष करू शकतो. 14

11) लोकशाहीचे व्यवच्छेदक लक्षण शांततापूर्ण सत्तांतर :-

शांततापूर्ण मार्गांनी सत्तांतर शक्य होणे हे कोणत्याही लोकशाही शासन व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. संसदीय लोकशाहीबाबत तर ते विशेषयच महत्त्वाचे आहे. नियतकालीन, मुक्त व न्याय्य निवडणुका संसदीय लोकशाहीचा कणाच आहे. एका राजकीय पक्षाकडून दुसऱ्या राजकीय पक्षाकडे सत्ता बदलण्याची ही संधी जर नागरिकांना नसेल तर त्यांना शासन बदलण्याचा एकच मार्ग उरेल आणि तो म्हणजे रक्तरंजीत क्रांतीचा. राजकीय पक्षामध्ये यशापयशासंबंधी खिलाडवृत्ती असणे यासाठी आवश्यक असते. भारतात अशी परिस्थिती निर्माण होऊ शकलेली नाही याची डॉ.आंबेडकरांना पुरेपुर जाणीव होती आणि त्यांच्या मते या त्रुटीचे अप्रश्रेय मुख्यत्वे या समाजातील जातीव्यवस्थेला द्यावे लागेल. 15

12) भारतात संसदीय लोकशाही यशाआड येणारे विविध घटक :-

भारतात संसदीय लोकशाहीच्या यशाआड येणारे अनेक घटक आहेत याची डॉ. आंबेडकरांना जाणीव होती. ही संसदीय शासन पध्दती परकी आहे. अजून तिची मुळे भारताच्या भूमीत पुरेशी रुजलेली नाहीत. म्हणून काही दिवस ती पध्दती राबविताना भारतीय नागरिकांना त्रास होईल. भारतीय समाजाचे राजकीय आधुनिकीकरण आणि लोकशाहीकरण या प्रक्रिया विलक्षण संथ असणे अपरिहार्य आहे. संसदीय लोकशाहीत घडून येणाऱ्या घडामोडी या नेहमी संथच असतील. प्रसंगी हा संथपणा अत्यंत जीवघेणाही होतो. परंतू घिसाड घाईने घडून येणाऱ्या परिवर्तनापेक्षा हे संथ व रचनात्मक परिवर्तन दीर्घकालीन परिणामांच्या दृष्टीने

इष्ट म्हटले पाहिजे. म्हणूनच प्रांरभीच्या अपयशाने खचून न जाता भारतीयांनी धीर धरून संसदीय शासन पध्दती शिकायला समजून घ्यायला पाहिजे.

13) लोकशाहीत कायद्यांना महत्त्वाचे स्थान :-

कायद्यांना लोकशाहीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. लोकशाहीतील कायदा सर्वांसाठी समान, हितकर व मानवी असायलाच पाहिजे. तो मन:पूत व जुलमी असू नये. मानवनिर्मित असल्यामुळे परिस्थितीसापेक्ष, परिवर्तनीयता या कायद्यात असाव्यात. पण कायद्यापेक्षा घटनात्मक नितिमत्तेला डॉ. आंबेडकर अधिक प्राधान्य देतात. 16

14) विधायक विरोधी पक्ष असावा :-

भारतातील लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी संघटित व शिस्तबध्द राजकीय पक्षांचाही नितांत आवश्यकता असते. टीका करण्याचा हक्क हा संसदीय लोकशाहीतील सर्वांत महत्त्वपूर्ण हक्क आहे. आणि संघटित विरोधी पक्ष अस्तित्वात असल्याशिवाय या हक्कास काही अर्थच उरत नाही. राजकीय पक्षाखेरीज लोकशाहीची कल्पनाच करणे अशक्य आहे. लोकशाही शासन हुकूमशाही व्हायचे नसेल तर किमान दोन राजकीय पक्ष असावे लागतात. सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्ष असे दोन राजकीय पक्ष असल्याशिवाय लोकशाही शासन लोकशाही शासन राहू शकत नाही. परंतू केवळ विरोधासाठी विरोध किंवा विरोधाच्या नावाखाली विध्वंस व अराजक हे डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. 17

15) संसदीय लोकशाहीचा समन्वय राज्य समाजवादाशी :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय विचारात संसदीय लोकशाहीचा समन्वय राज्य समाजवादाशी घालण्यात आला आहे. या दोन संकल्पना वरकरणी विसंगती वाटत असल्या तरी त्यांचा योग्य मेळ घातला गेल्यास त्या परस्पपूरक ठरू शकतात हा त्यांच्या लोकशाही समजावादाच्या मुळाशी असलेला विचार आहे. 18

16) विभूतीपूजेचा विरोध :-

श्रेष्ठ माणसाबददल कृतज्ञता असणे यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध नाही. आत्माच्या उध्दाराचा मार्ग म्हणून भक्तीचे धर्मात असलेले महत्व त्यांना मान्य होते. पण राजकारणात भक्ति किंवा विभूतीपुजा म्हणजे अध:पाताचा मार्गच असतो. परिणामत: हुकूमशाही प्रवृत्ती वाढते असे त्यांचे मत होते. 19

निष्कर्ष :-

"डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाहीची संकल्पना" या संशोधनात्मक लेखाची मांडणी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही संबंधी विचारांचा आढावा घेतला आहे. त्यांच्यावर ब्रिटन मधील शैक्षणिक वास्तवाच्या काळात ब्रिटिश संसदीय शासन पध्दतीचा प्रभाव पडल्यामुळे आपल्या भारतासारख्या विविध धर्म आणि जाती तसेच प्रदेश असलेल्या देशासाठी संसदीय लोकशाहीचे समर्थन केल्याचे स्पष्ट होते.त्यांनी लोकशाहीची व्याख्या करताना म्हटले की, ज्या शासन प्रणालीत लोकांच्या आर्थिक, सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्तापाशिवाय घडतात ती शसनप्रणाली म्हणजे लोकशाही होय.या व्याख्येतून त्यांनी लोकशाहीतील बदल शांततामय मार्गाने होतात हे अधोरेखित केल्याचे स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाही शासन पध्दतीचे समर्थन करून साम्यवादी शासनप्रणाली, हुकूमशाही शासन प्रणालींना विरोध केल्याचे स्पष्ट होते. भारतासारख्या देशात अमेरिकेने स्वीकारलेली अध्यक्षीय शासन प्रणाली न स्वीकारता इंग्लडप्रमाणे संसदीय शासन प्रणाली योग्य असल्याचे मत व्यक्त केले. संसदीय शासन प्रणाली भारतासारख्या देशात यशस्वी होण्यासाठी कोणत्या घटकांची आवश्यकता आहे याचाही उहापोह त्यांनी केल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबडकरांची लोकशाहीची संकल्पना भारतीय राजकीय विचाराला दिलेली महत्त्वपूर्ण

अशी देणगी आहे. त्यांची लोकशाही संकल्पना (विचार) स्वप्नरंजनात्मक नसून भारतीय समाजाच्या वास्तवतेच्या संदर्भात आहे. लोकशाही संकल्पनेची सामाजिक तसेच आर्थिक दृष्टीकोणातून मांडणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले . त्यांच्या मते लोकशाही संकल्पना समाजाच्या समग्र परिवर्तनाचा विचार असून केवळ राजकीय लोकशाहीद्वारे समाजाचे आमुलाग्र परिवर्तन होत नसते. राजकीय लोकशाहीला सामाजिक लोकशाही, आर्थिक लोकशाहीशी मेळ घातल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकून राहणार नाही समाजातील सामाजिक, आर्थिकदृष्टया शोषित, दलित आणि सत्तावंचित वर्गाला सत्ताप्राप्तीची व्यापक संधी मिळाल्याशिवाय खऱ्या अर्थाने लोकशाही म्हणता येणार नाही. त्यांच्यालोकशाही संकल्पनेत स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय ही लोकशाहीची मुलभूत तत्वे (मुल्ये) समाविष्ट असून राज्य समाजवादाच्या संकल्पपनेच्या माध्यमातून त्यांना भारतीय लोकशाहीला राज्यसमाजवादाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण विचार मांडले. सारांश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही संकल्पना आधुनिक भारतीय लोकशाहीच्या भवितव्यासाठी, यशासाठी महत्त्वपूर्ण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची लोकशाही संकल्पना भारतीय लोकशाही शासनाच्या दीर्घकालीन भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ सूची :-**


1. चक्रवर्ती विद्युत, पांडे राजेंद्रकुमार, (अनुवाद लेले चित्रा), प्रथमावृत्ती 2013, आधुनिक भारतीय राजकीय विचार, संहिता आणि संदर्भ, डायमंड पब्लीकेशन्स पुणे, पृ.71
2. जैन अशोक, प्रथमावृत्ती 2009, निवडक राजकीय विचार, शेठ पब्लीशर्स, मुंबई, पृ.245
3. नांदेडकर व.गो.,प्रथमावृत्ती ऑगस्ट 2017, राजकीय विचार आणि विचारवंत, डायमंड पब्लीकेशन्स पुणे, पृ. 285
4. भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयवृत्ती 2016, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स नागपूर, पृ.950
5. सुरवाडे दिलीप, प्रथमावृत्ती 1 मे 2010, लोकशाही एकचिंतन, लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद, पृ.91
6. भोळे भास्कर लक्ष्मण, तृतीयावृत्ती 2016, पुर्वोक्त, पृ. 950 व 951
7. कित्ता, पृ.951 व 952.
8. सुरवाडे दिलीप, प्रथमावृत्ती 1 मे 2010, पुर्वोक्त, पृ.46 व 47
9. कित्ता, पृ.47
10. कित्ता, पृ.50 व 53
11. कित्ता, पृ.50
12. कित्ता, पृ.48
13. कित्ता, पृ.54
14. भोळे भास्कर लक्ष्मण, तृत्तीयावृत्ती 2016, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पुर्वोक्त, पृ.952
15. कित्ता, पृ.952 व 953
16. कित्ता, पृ.954
17. कित्ता, पृ.954 व 955
18. कित्ता, पृ.955
19. सुरवाडे दिलीप, प्रथमावृत्ती 1 मे 2010, पुर्वोक्त पृ.104

# नेहरु आणि लोकशाही समाजवाद

**डॉ. महेश एम. लोहार**
Mob No – 9881890021
Email – Lmahesh2008@gmail.com
शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय,
कराड जि. सातारा

**सारांश:** आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, स्वातंत्र्यापासून सलग 16 वर्षे भारताचे पंतप्रधान, औदयोगिकीरणाशिवाय आर्थिक विकासाची प्रक्रिया साधता येणार नाही असे विचार मांडणारे, समाजवादाची कास धरण्याचा आग्रह धरणारे पंडीत जवाहरलाल नेहरू लोकशाही समाजवादाचे प्रणेते होते. लोकशाही मार्गाने समाजवादी समाजरचना निर्माण करता येणे शक्य आहे असे विचार मांडताना मिश्र अर्थव्यवस्था आणून खाजगीत सार्वजनिक क्षेत्राचे अस्तित्व त्यांनी मान्य केले. मिश्र अर्थव्यवस्थेने समाजवादी अर्थव्यवस्था आणि औदयोगिकीकरण या गोष्टी साधणे शक्य आहे हे त्यांनी प्रत्यक्षात दाखविले. भारतात अनेक जाती जमाती, धर्माचे लोक राहतात अशा वेळी त्यांच्यात ऐक्य साधण्यासाठी धर्मनिरपेक्षता तत्त्वाचा अंगिकार त्यांनी ठामपणे मांडला. लोकशाहीवादी नेहरूंवर परदेशी शिक्षणाने परकीय वातावरणाचा प्रभाव दिसून येतो. त्यांच्यावर इंग्लंडममधील राजकीय वातावरणाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. इंग्लडमधील व्यक्ती स्वातंत्र, संसदीय शासन व्यवस्था, लोकशाही, समाजवाद उदारमतवाद याचा त्यांनी प्रत्यक्षात अनुभव घेतला होता. त्या कल्पना भारतात राबविणे आवश्यक आहेत याची कल्पना त्यांना होती.

**पारिभाषिक शब्द:** जवाहरलाल नेहरू, लोकशाही, लोकशाही समाजवाद

प्रस्तावना -

आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, स्वातंत्र्यापासून सलग 16 वर्षे भारताचे पंतप्रधान, औदयोगिकीरणाशिवाय आर्थिक विकासाची प्रक्रिया साधता येणार नाही असे विचार मांडणारे, समाजवादाची कास धरण्याचा आग्रह धरणारे पंडीत जवाहरलाल नेहरू लोकशाही समाजवादाचे प्रणेते होते. लोकशाही मार्गाने समाजवादी समाजरचना निर्माण करता येणे शक्य आहे असे विचार मांडताना मिश्र अर्थव्यवस्था आणून खाजगीत सार्वजनिक क्षेत्राचे अस्तित्व त्यांनी मान्य केले. मिश्र अर्थव्यवस्थेने समाजवादी अर्थव्यवस्था आणि औदयोगिकीकरण या गोष्टी साधणे शक्य आहे हे त्यांनी प्रत्यक्षात दाखविले.

भारतात अनेक जाती जमाती, धर्माचे लोक राहतात अशा वेळी त्यांच्यात ऐक्य साधण्यासाठी धर्मनिरपेक्षता तत्त्वाचा अंगिकार त्यांनी ठामपणे मांडला. लोकशाहीवादी नेहरूंवर परदेशी शिक्षणाने परकीय वातावरणाचा प्रभाव दिसून येतो. त्यांच्यावर इंग्लंडममधील राजकीय वातावरणाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. इंग्लडमधील व्यक्ती स्वातंत्र, संसदीय शासन व्यवस्था, लोकशाही, समाजवाद उदारमतवाद याचा त्यांनी प्रत्यक्षात अनुभव घेतला होता. त्या कल्पना भारतात राबविणे आवश्यक आहेत याची कल्पना त्यांना होती.

स्वातंत्र्यापूर्वी भारतात अनेक सामाजिक समस्या होत्या. त्यातून समाजास उभारी देणे आवश्यक होते. सर्वात महत्त्वाचे साम्राज्यवाद, जाती-जमाती मधील संघर्ष, धर्मा-धर्मातील संघर्ष यामुळे जनतेमध्ये भीतीची भावना होती. यासाठी स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासन व्यवस्थाच यातून सर्वाना तारू शकेल. असा दृढविश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला होता. त्यांना समाजवादी विचारांची आवड असली तरी रशियातील पक्षीय हुकूमशाहीची वास्तवता त्यांना माहित होता अशा परिस्थितीत समाजवाद आणि नाझीवादामुळे स्वातंत्र्य धोक्यात येते त्यांना जाणीव होती. त्या सर्वांचा विचार करता त्यांनी लोकशाही ही भारत देशासाठी योग्य असल्याचे मत त्यांनी निर्माण केले होते.

नेहरूंच्या मते काँग्रेसी विचारधारा व्यक्तीचा राजकीय स्वातंत्र्याकडे लक्ष देत आहे. त्यासाठी त्यांनी सामाजिक स्वातंत्र्य कशा प्रकारे आवश्यक आहे हे पटवून दिले. त्यांनी काँग्रेसची ध्येयधोरणे समाजवादी विचारांच्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला.

समाजवादाचे मूळ खऱ्या अर्थाने 1931 च्या कराची मधील काँग्रेसच्या बैठकीत घातले गेले असे मानावे लागेल या बैठकीत आर्थिक धोरण आणि मूलभूत हक्काविषयी ठराव करण्यात आले. उदयोगधंदयाच्या राष्ट्रीयीकरणाचा ठराव करण्यात आला. 1936 साली लखनौ मध्ये समाजवादी विचारांवर काँग्रेसने चर्चा घडवून आणली. त्यावेळी निर्माण झालेल्या काँग्रेस समाजवादी गटापासून अलिप्त राहताना समाजवाद आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. सर्वात महत्त्वाचे वेगळया समाजवादी गटात न जाता त्यांनी पूर्वीचीची संघटना अधिक बळकट करण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात समाजवादी विचारांची भावना इंग्रजांच्या काळातच खऱ्या अर्थाने बळकट झाली होती. नेहरूंच्या मते देशात सामाजिक व आर्थिक स्थिती बदलणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी समाजवादी विचार मांडले आहेत.

उद्दिष्टे -

1- पं. नेहरुंचे समाजवादाचे विचार जाणून घेणे.
2- पं. नेहरुंचे लोकशाही समाजवादाचे विचार जाणून घेणे.
3- पं. नेहरुंच्या लोकशाही समाजवादाची वैशिष्टे जाणून घेणे.
4- पं. नेहरुंच्या लोकशाही समाजवादाबद्दल निष्कर्ष मांडणे.

संशोधन पद्धती -

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. ग्रंथालये, इंटरनेट च्या माध्यमातून माहिती गोळा करुन माहिती मिळवण्यात आली आहे.

समाजवादाचे विचार -

भारतात इंग्रजी सत्तेच्या अधिपत्यामुळे सामाजिक व आर्थिक बाबतीत प्रचंड तफावत निर्माण झाली होती. समाजात दारिद्रता, बेकारी, सरंजामी व्यवस्था निर्माण झाली होती. या समाजात बदल करण्यासाठी त्यांनी समाजवदाचे विचार मांडले कारण गांधीजींच्या मते समाजवादातून खऱ्या अर्थाने समाजाचा विकास साधता येईल.

देशातील सामाजिक समस्या सोडविणे गरजेचे होते तेव्हा त्या समस्या या शास्त्रीय दृष्टीकोनातून सोडविणे आवश्यक आहे याची जाणीव समाजवादाने नेहरूंना करून दिली आहे. विविध सामाजिक समस्यांची कारणे शोधून त्यावर समाजवादी विचार सरणीतून उपाय करणे शक्य आहे.

औदयोगिक क्षेत्रात कामगारांची पिळवणूक थांबविण्यासाठी समाजवादी विचारांशिवाय पर्याय नाही याची जाणीव नेहरूंना होती. त्यामुळे त्यांनी समाजवादाचा प्रचार आणि प्रसार केला. काँग्रेसी नेत्यांना समाजवादी विचारांचे महत्त्व त्यांनी सांगितले.

नेहरूंचा लोकशाही, समाजवाद, गणराज्य यावर विश्वास होता पण राजेशाही त्यांना मान्य नव्हती. पूर्वी राजेशाही तर आधुनिक काळात सरंजामदार, भांडवलदार लोकांचे शोषण करू शकतात यावर समाजवादी विचार फायदयाचे ठरतील असे विचार नेहरूंनी मांडले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील शेतकऱ्यांची स्थिती, कुळांचे प्रश्न शेतकऱ्यांचे दारिद्र, पिळवणूक, श्रमाचा मोबदला कमी, शेतकऱ्यांची कर्जप्रकरणातून सुटका करण्याची गरज निर्माण झाली होती. नेहरूंच्या मते समाजवादी विचारातून यावर नियंत्रण मिळविणे शक्य आहे. यासाठी त्यांनी समाजवादाचा पुरस्कार केला.

नेहरूंनी मार्क्सवादी विचार भारतात राबविणे शक्य नाही असे विचार मांडले तर मार्क्सचा शास्त्रीय दृष्टीकोन आवश्यक मानला तसेच मार्क्सचा भौतिकवादी व ऐतिहासिक सिदृधांत सुद्धा मान्य केला. पण मार्क्सचा विचारातील कामगारांची हुकुमशाही त्यांना मान्य नव्हती. त्यांनी मार्क्सवादी विचारापंक्षा लोकशाहीला महत्त्व दिले. मुलभुत हक्क, मत अधिकार यांना महत्त्व देताना हुकुमशाही अमान्य केली.

नेहरूंच्या मते, भांडवलीशाहीमुळे उत्पादन वाढते पण त्यातून अनेक समस्यांना तोंड दयावे लागते. अशा समस्यांवर समाजवाद हा एकच मार्ग आहे असे नेहरूंची मत होते.

समाजवाद साधण्यासाठी कामगारांचे शोषण संपविण्यासाठी राष्ट्रीयकरण करणे आवश्यक आहे. कामगार वर्गाला उत्पादन प्रक्रियेत भागीदार बनविणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीयकरणाच्या माध्यमातून उत्पादन साधने सरकारच्या मालकीची होणे आवश्यक आहे असे नेहरू मानतात.

नेहरूंच्या मते समान आर्थिक न्याय व संधी साठी मतपरिर्वन करण्यात यावे प्रसंगी सक्ती करावी पण सक्ती करताना ती मर्यादित स्वरूपात असावी. विरहित समाजरचना उभी राहणे आवश्यक आहे.

नेहरूंनी एकपक्षीय लोकशाहील विरोध केला आहे. लोकशाहीत विरोधी पक्षाला त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले आहे. त्यांच्या मते विरोधी पक्ष नेहमी दक्ष असणे आवश्यक आहे.

नहेरूंना रशिया, लेनीन, मार्क्स यांच्याबद्दल आदर होता पण त्यांच्या हिंसा किंवा क्रांतीवर विश्वास नव्हता. लोकशाहीच्या माध्यमताून समाजवाद आणला जावू शकतो. भारताला तारण्यासाठी साम्यवाद आणि लोकशाहीचा समन्वय साधणे आवश्यक आहे असे नेहरू मानत होते.

## लोकशाही समाजवाद

लोकशाही समाजवाद म्हणजे समाजवादी समाजरचना निर्माण करताना समाजातील आर्थिक पिळवणूक बंद करणे, समाजातील विषमता कमी करणे होय. यालाच सामाजिक समता व राजकीय लोकशाही असे म्हणतात. समाजातील मागलेपणा, बेरोजगारी, गरिबी दूर करण्यासाठी समाजवाद हा चांगला पर्याय आहे. असे नेहरू मानतात. त्या दूर करण्यासाठी त्याच्या मूळ कारणांपर्यंत जाणे आवश्यक आहे. त्यातून निर्माण होणारे दोष दूर करता येतील.

दारिद्र्य निर्मूलनातून विषमता निर्मूलन करणे शक्य आहे. समाजात प्रत्येकाला त्याचा विकास करण्याची संधी देणे आवश्यक आहे. दारिद्राचे निर्मूलन करताना संपत्तीचे योग्य वितरण आवश्यक आहे. म्हणजे श्रीमांतकडील पैसा गरिबांना न वाटतना देशात उत्पादनात योग्य वाढ करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना सरंजामशाही व भांडवलशाहीला विरोध केला आहे. भांडवलशाहीत लोकांसाठी लोकशाही शासन निर्माण होणे शक्य नाही. समाजवादात लोकांचे लोकांकडून शासन चालविणे जाते. नेहरूंनी नियोजनाला महत्त्व दिले आहे. समाजवादासाठी आर्थिक नियोजन करणे आवश्यक आहे असे मत त्यांनी मांडले 1938 च्या नॅशनल प्लॅनिग कमिशनचे अध्यक्षपद भूषविताना देशातील बेकारी, दारिद्रय, मागासलेपणा यावर चर्चा झाली यातून बाहेर पडण्यासाठी समाजवादी भूमिका आवश्यक आहे असे नेहरू मानतात. समितीने सामान्य मानसाला समोर ठेवून नियोजनाची उद्दिष्टे ठरविली. यात विकासाच्या संधी, सामान्य माणसाचे हित पाहणे, विकासातील अडथळे दूर करून मानवी विकास साधणे हा नियोजनाचा केंद्रबिंदू ठरविण्यात आला.

समाजवादात व्यक्ती स्वातंत्र्य महत्त्वाचे मानण्यात येते. खाजगी मालमत्तेवर मर्यादा न घालता मोठे उदयोग सरकारच्या मालकीचे करणे समाजवादी विचारात आवश्यक असते. तर काही छोटे उदयोग सहकारी तत्त्वाचा वापर करून चालविणे आवश्यक असल्याचे मत नेहरू मांडतात. त्यासाठी त्यांनी मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला आहे. त्यांनी कल्याणकारी राज्य अस्तित्वात येणे आवश्यक मानले आहे. जनतेचे कल्याण करण्यासाठी धडपडणारी शासन व्यवस्था महत्त्वाची मानली आहे. नियोजन, कररचना, काही प्रमाणात खाजगी मालमत्तेवर मर्यादा घालून न्यायाचे योग्य वितरण होणे आवश्यक आहे. तसेच मालमत्त्ेचे सुद्धा योग्य वितरण होणे आवश्ये आहे. राज्यामण्ध्ये आर्थिक समस्या पेलण्याची ताकद निर्माण झाल्यास अशा राज्यास कल्याण कारी राज्य म्हणता येईल.

## लोकशाही समाजवादाची वैशिष्टये -

**1.** व्यक्ती स्वातंत्र्य

नेहरूंनी व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे. लोकशाही समाजवादात व्यक्तीचा विकास होणे आवश्यक आहे. व्यक्त्ीच्या विकासात राज्याची भूमिका साधत आहे तर लोकांचे कल्याण हे साध्य मानल आहे. नेहरू व्यक्ती स्वातंत्र्य व व्यक्ती

विकास महत्त्वाचा मानताना उदयोग, व्यवसाय शिक्षण, धर्म व्यक्तीचे आचार-विचार यात स्वातंत्र्याला महत्तव देतात. पण त्यांनी व्यक्ती स्वातंत्र्य हे मर्यादितच असावे असे सुद्धा मत मांडले आहे.

**2.** राष्ट्रीयकरण तत्वाचा स्विकार

स्वातंत्र्यानंतर जगातील भांडवलशाही व्यवस्थेचा विचार करता भारतात अशी परिस्थिती निर्माण मुठभर लोकांच्या हाती सत्ता, भांडवल जाईल. यातून संपत्तीचे विकेंद्रिकरण होणार नाही म्हणजे श्रीमंत, भांडवलदार अधिक श्रीमंत बनू शकतात. यातून श्रीमंत, गरिब, भांडवलदार कामगार वर्ग तयार होवून लोकांचे विभाजन होते हे नेहरूंना लोकशाही समाजवादात नको होते. त्यासाठी काही उदयोगाचे राष्ट्रीयीकरण करणे आवश्यक मानले तर काही उदयोग सहकारी तत्त्वावर चालविताना काही उदयोग खाजगी नियंत्रणावर ठेवण्याचा घाट घातला गेला. यामुळे लोकांचे शोषण, पिळवणुक, नफाखोरी यासारख्या गोष्टींना पायबंद घालणे शक्य आहे.

**3.**आर्थिक सत्तेचे विकेंद्रिकरण

नेहरूंनी भांडवलशाही अर्थव्यवस्था अमान्य होती. यामुळे कामगार श्रमिकांचे शोषण होते. यातून आर्थिक विषमता असणारा समाज निर्माण होतो. भांडवलशाहीत भांडवलदार मोठा, श्रीमंत होतो तर कामगार हे गरिबच राहतात. यातून आर्थिक सत्तेचे केंद्रिकरण होते. त्यामुळे एकच समाज किंवा वर्ग मोठा होत असतो. नेहरूंच्या मते माणसाने माणसाची पिळवणूक करता कामा नये. भांडवलशाहीत उत्पादन वाढल्यास त्याचा मोबदला हा कामगार वर्गाला सुद्धा मिळावा यातून आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. समाजातील आर्थिक विषमता नष्ट करून समाजात समान लोकशाही व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे.

**4.** दारिद्रय निर्मुलनासाठी खाजगी मालमत्ता नष्ट करणे

समाजवादात दारिद्रय निर्मुलनासाठी खाजगी मालमत्ता नष्ट करणे आवश्यक आहे असे मत नेहरू मांडतात. त्यांच्या मते सत्तेचे केंद्रिकरण काही लोकांच्या हातात जाणे म्हणजे आर्थिक विषमता निर्माण होण्यासारखे आहे. त्यातून समाजवादी विचारांची पायमल्ली होईल. त्यासाठी खाजगी मालमत्ता पूर्ण नष्ट न करतान त्यावर काही मर्यादा घातल्या जावू शकतात. नेहरूंनी दारिद्रय निर्मूलनास अधिक भर दिल्याने श्रीमंत व गरिब भेद कमी करणे शक्य झाले आहे. समाजात न्याय वितरणासाठी संपत्तीचे उत्पादन, उत्पादित वस्तंचू वितरण आवश्यक मानले.

**5.** हिसात्मक क्रांतीला विरोध

नेहरूंना लोकशाही समाजवाद प्रत्यक्षात आणण्यासाठी हिंसात्मक क्रांतीला विरोध केला आहे. नेहरू समाजव्यवस्था बदलण्यासाठी समाजवाद आवश्यक मानतात. शांततापुर्ण घटनात्मक व सनदशीर मार्गाने समाजवादी रचना प्रस्थापित करता येवू शकते. त्यासाठी ते मार्क्सच्या हिंसात्मक क्रांतीला विरोध करतात. समाजत संघटीत कृतीतून विकासाची प्रक्रिया पूर्ण करता येवू शकते असे त्यांचे मत होते. पण तरी सुद्धा समाजवाद आणताना काही त्रुटी त्यांनी सांगितल्या आहेत यात ज्यांच्यावर अन्याय होईल ते संघर्ष करतील याची जाणीव नेहरूंना होती.

**6.** व्यक्ती हितापेक्षा सार्वजनिक हिताला प्राधान्य

स्वातंत्र्यानंतर भारतातील आर्थिक विषमता, दारिद्रता यावर नियंत्रण मिळविण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचे तत्त्व त्यांनी मानले आर्थिक नियोजनाला महत्त्व दिले. स्वांत्र्यानंतर औदयोगिकरणास चालना देताना सामाहिक हित महत्त्वाचे मानले त्यासाठी काही उदयोगांचे राष्ट्रीयीकरण करण्यावर भर दिला. तसेच काही खाजगी मालमत्तेला सुद्धा मान्यता दिली. लोकांना आवश्यक वस्तू वितरित करण्यासाठी सार्वजनिक प्राधान्य दिले.

**7.** आर्थिक नियोजन आवश्यक

देशाचा परिपूर्ण विकास हा देशाच्या आर्थिक प्रगतीतून शक्य आहे. योग्य नियोजन केल्यास आर्थिक बाबीतून विकास करता येईल. त्यासाठी औदयोगिकरणाचे सुद्धा योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. समाजातील आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आर्थिक नियोजन लोकशाही समाजवादाचा पाया मानला आहे.

भारतात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शेतीचा व औदयोगिकरणाचा विकास घडविता येवू शकतो असे मत मांडले. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून लोकशाही मार्गाने समाज विकास घडविण्याचा प्रयत्न केल्यामुळे योग्य आर्थिक नियोजन करणे शक्य झाले. देशात ग्रामीण उदयोग, कुटीरउदयोग व मोठया उदयोगांना सुद्धा चालना मिळाली नियोजन मंडळाच्या स्थापनेने आर्थिक विकास घडून येण्यास मदत झाली.

**8.**नेहरूंचा समाजवाद

नेहरूंच्या मते समाजवाद म्हणजे फक्त आर्थिक धोरण नव्हे तर त्याचे स्वरूप भव्यदिव्य होते. स्वातंत्र्यानंतरची समाजव्यवस्था बदलून विषमतारहित, शोषण रहित समाजनिर्माण करणे म्हणजे नेहरूंचा समाजवाद होता. त्यांनी मांडलेला समाजवाद सामाजिक व राजकीय क्षेत्रासाठी सुद्धा तितकाच मोठा ठरतो.

नेहरुंची विचारप्रणाली लोकशाहीवादी स्वरुपाची होती. जनतेच्या समर्थनातून आणि शांततापूर्ण सहकार्यातून त्यांचा विकास करण्याची प्रक्रिया फक्त लोकशाहीत आहे असे त्यांचे मत होते. नेहरु समाजवादाला विकसनशील आणि गतिशील मानतात. समाजवादाचे स्वरुप पाहिले तर औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत एक वेगळे स्थान तर कृषीप्रधान अर्थव्यवस्थेत एक वेगळ्या प्रकारचे स्थान समाजवादात आहे. त्यांनी लोकशाही समाजवाद आणताना खाजगी क्षेत्र पूर्ण नष्ट केले नाही तर फक्त मोठ्या उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणावर भर दिला. नेहरुंच्या लोकशाही समाजवादात त्यांना काही समस्या जाणवतात. त्यात प्रामुख्याने लोकशाही व समाजवाद यातील समन्वयाची समस्या, व्यक्तीगत व्यक्ती स्वातंत्र्य त्यांच्या हिताची समस्या, आर्थिक क्षेत्रात सामूहिक नियंत्रणाचा मेळ घालण्याची समस्या पण या सर्व गोष्टीत त्यांनी भरपूर काम केले. नागरिकांना प्रशिक्षणाची आवश्यकता भासली. ती त्यांनी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोकशाहीत समाजाचा आणि व्यक्तीचा विकास करणे आवश्यक असल्याचे मत बनविले त्यासाठी आवश्यक वस्तूंचे उत्पादन वाढणे गरजेचे आहे याची जाणीव झाली. व्यक्तीचे राहणीमान, त्याचा दर्जा वाढणे आवश्यक आहे याची जाणीव त्यांना होती.शेतक-यांची आंदोलने, युवकांच्या आंदोलनांनी त्याकाळी परिस्थितीत अमूलाग्र बदल दिसून आले. याच गोष्टीचा फायदा नेहरुंनी लोकशाही समाजवादात घेतला आणि समाजवादी विचारांची मांडणी केली. आंतरराष्ट्रीय परिस्थिती, फॅसिझमचे संकट, लोकशाही मूल्यांवर आलेले संकट यातून समाजवाद हा एकच मार्ग यातून सुटका करण्याचा आहे असे नेहरुंना वाटत होते. भारतात स्वातंत्र्यपूर्व स्थिती व नंतरची स्थिती याच्यावर समाजवादी विचारांचे नियोजनच प्रभावी ठरेल अशी आशा नेहरुंना होती. समाजातील दारिद्र, मागासलेपणा, बेरोजगारी दूर करण्यासाठी समाजवाद महत्वाचा ठरेल. समाजात असणारी सरंजामशाही नष्ट करण्यासाठी समाजवादी विचारांची गरज नेहरुंना वाटली.

निष्कर्ष -

- पं. नेहरुंचा समाजवाद हा महात्मा गांधीच्या नैतिक आध्यातिक संकल्पनेतून वेगळा होता. तर गांधीजींची समाजवादाची भूमिका गोंधळातील मानवतावादी होती अशी टिका नेहरु करतात.
- गांधीचे विचार हे व्यक्तीचे हृदयपरिवर्तन करुन समाजवाद मांडणे होते तर यावर नेहरु विश्वास ठेवत नव्हते.
- नेहरुंचे समाजवादी विचार लेनिन व मार्क्स यांच्या विचारांचे होते.
- नेहरुंच्या काळात कामगार चळवळींनी एक योग्य दिशा प्राप्त केली होती.
- समाजातील आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी त्याच्या मूळापर्यंत जावून समस्या निराकरण करणे गरजेचे आहे अशील नेहरुंची खात्री होती.
- नेहरुंनी समाजवादी विचारात दारिद्र निर्मूलनाला विषमता निर्मूलनापेक्षा अधिक महत्व दिले आहे. नेहरुंवर मानवतावादी उदारमवादाचा जास्त प्रभाव दिसून येतो.
- मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांताला नेहरु महत्व देताना दिसतात.
- समाजवाद आणण्यासाठी लोकशाहीतील सनदशीर व शांततापूर्ण मार्गाचा अवलंब नेहरुंनी केला. समाजवादी विचार सर्वच वर्गाला पतणारे नव्हते तर त्यातून काही वर्गामध्ये संघर्ष अटळ होता याची जाणीव नेहरुंना होती.

- त्यांनी भांडवलदारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी लोकमत जमविणे व पुरोगामी कायद्यातून त्यावर नियंत्रण मिळविण्याचे विचार मांडले आहेत.

थोडक्यात नेहरुंचा लोकशाही समाजवाद देशातील विषमता दूर करण्यासाठी महत्वाचा होता. उद्योगधंद्याच्या विकासासाठी, ग्रामोद्योगांना झळाळी मिळवून देण्यासाठी आवश्यक होता.

**संदर्भ**

1. भोळे, भास्कर लक्ष्मण, भारतीय राजकीय विचारवंत, पिंपळापुरे, नागपूर.
2. देवरे, पी. डी., निकुंभ डी. एस., भारतीय राजकीय विचार, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव, 2012
3. पळशीकर रेखा, देवळाणकर शैलेंद्र, आधुनिक भारतातील राजकीय वारसा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, 2013
4. वळसंगकर, कृ. ना., विसावे शतक आणि समाजवाद, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1985

# भारतीय लोकशाही पुढील आव्हाने

**जयसिंह सुभाष ओहोळ**

संशोधक विदयार्थी, राज्यशास्त्र

अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

मो. नो. ७३८५२४४१२९

इ मेल आयडी - oholjs@gmail.com

**सारांश**

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये भारतीय लोकशाही पुढील प्रमुख आव्हाने या मुख्य विषयावर प्रकाशझोत टाकला आहे. तदनुषंगाने भारतीय लोकशाहीचा मागील ७५ वर्षाच्या प्रदीर्घ अशा वाटचालीचा अभ्यास करता आढळून आलेल्या प्रमुख आव्हानापैकी घराणेशाही, मतदानाचे अल्पप्रमाण, विरोधी पक्ष अस्तित्व, सत्ता आणि पैसा समीकरण, जातिय व धार्मिक वाद आणि संविधानात्मक नितीमुल्याचे अवमूल्यन यांचा अभ्यास करून यांच्या भारतीय लोकशाहीवरील परिणामांचा अभ्यास केला आहे.

**पारिभाषिक शब्द** : लोकशाही, राजकीय पक्ष, घराणेशाही, मतदान, विरोधी पक्ष, जात आणि धर्म, अल्पजनशाही आणि अध्यक्षीय हुकुमशाही

**प्रस्तावना**

वासाहतीक कालखंडातील ब्रिटीशांच्या पारतंत्र्यातून मुक्त होऊन भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. आज जगभर भारतीय लोकशाहीस जगातील सर्वात मोठी आणि यशस्वी लोकशाही अशी ओळख आहे. कोणतीही व्यवस्था पूर्णतः परिपूर्ण सर्व समाधानकारक अशी नसते. प्रत्येक व्यवस्थेत काही उणीवा कमी अधिक प्रमाणात अस्तित्वात असतात. मात्र यातूनही व्यवस्था विकसित होत मार्गक्रमण करत असते. स्वातंत्र्याची पंच्याहत्तरीत आजही भारतीय लोकशाही यशस्वीपणे वाटचाल करत असताना काही भारतीय लोकशाही समोर काही आव्हाने निर्माण झाली आहेत. ही आव्हाने लोकशाही शासन व्यवस्थेच्यादृस्ठीने घातक असतात. या संदर्भात अभ्यास होणे महत्वाचे आहे. या संशोधन पेपर मध्ये भारतीय लोकशाही समोरील आव्हानाचा परामर्श पुढीलप्रमाणे घेण्यात आला आहे.

**उद्दिष्ट**

१. भारतीय लोकशाही पुढील आव्हाने यांचा आढावा घेणे.

२. भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत अडथळा ठरणाऱ्या आव्हानाची कारणे, सद्यस्थिती समजून घेणे.

३. मागील ७५ वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीत भारतीय लोकशाही पुढे निर्माण झालेल्या आव्हाने याचा भरतीय लोकशाहीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

**गृहीतके**

१. भारतीय लोकशाहीची यशस्वी वाटचाल सुरु असताना काही आव्हाने निर्माण झाली आहेत.

२. भारतीय लोकशाही समोरील निर्माण झालेल्या आव्हानाचा गंभीर परिणाम झाला आहे.

३. भारतीय लोकशाहीचे घटनात्मक उद्देशीत स्थान धोक्यात आले आहे.

**विषय विवेचन**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जागतिक स्तरावर अनेक राष्ट्रे हि ब्रिटीशांच्या पारतंत्र्यातून स्वतंत्र झाली. ब्रिटीशांच्या वसाहतीक कालखंडात या देशात लोकशाही शासन व्यवस्थेची जडणघडण झाली होती. यामुळे स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बहुतांश देशांत लोकशाही या शासन व्यवस्थेचा स्वीकार केला गेला. मात्र काही देशांत लोकशाही शासन व्यवस्था रुजू शकली नाही. भारतीय लोकशाहीने योग्य दिशेने वाटचाल करत आपली जगभर यशस्वी आणि जगातील सर्वात मोठी लोकशाही अशी ओळख निर्माण केली. मात्र भारतीय लोकशाहीच्या मागील ७५ वर्षाच्या प्रदीर्घ अश्या वाटचालीवर दृस्टीक्षेप टाकला असता आज भारतीय लोकशाही समोरदेखील गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत. ती आव्हाने पुढीलप्रमाणे

**घराणेशाही**

कोणत्याही लोकशाही व्यवस्थेत राजकीय पक्षाचे अस्तित्व गरजेचे असते. राजकीय पक्षाच्या व्यतिरिक्त कोणतीही लोकशाही व्यवस्था आकारास येऊ शकत नाही. राजकीय पक्ष निवडणुकीच्या माध्यमातून जनमताचा कौल प्राप्त करून सत्तारूढ होतात. भारतीय लोकशाहीच्या राजकीय पटलावर असणाऱ्या राजकीय पक्षात घराणेशाही हे एक समान वैशिष्ट्य सर्वच राजकीय पक्षात प्रामुख्याने दिसून येते. ही घराणेशाही आज लोकशाही समोरील प्रमुख आव्हान निर्माण झाली आहे. आज भारतात असणाऱ्या प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या पक्षात आपल्या घराण्याचे वर्चस्व निर्माण केले आहे. लोकशाही शासन व्यवस्थेत जनतेचे एका अर्थाने राजकीय पक्ष हे जनतेचे प्रतिनिधित्व करत असतात. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत निवडून आलेले राजकीय पक्षाचे एकूण सदस्य ५४३ होते यापैकी १५६ खासदार हे कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी असलेल्या घराण्यातील होते. यामध्ये राष्ट्रीय कॉंग्रेस या पक्ष ७८, राष्ट्रीय लोकदल ५, राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष ५, बिजू जनता दल ६, बहुजन समाज पार्टी ७, समाजवादी पक्ष ६, मार्क्स्वादी कम्युनिष्ट पक्ष ४ आणि भारतीय जनता पक्ष २२ खासदार हे राजकीय पार्श्वभूमी असणाऱ्या घराण्याचे होते. या राजकीय पक्षातील घराणेशाहीच्या अस्तित्वाने भारतीय लोकशाहीचे प्रतिनिधित्व हे प्रमुख घराणे करत आहेत असे दिसून येते. कारण सत्ता कोणत्याही पक्षाकडे असले तरी या कोणत्याही प्रमुख घराण्यात निश्चित असते. या घराणेशाहीमुळे भारतीय लोकशाहीसमोर एक आवाहन निर्माण झाले आहे.


**सत्ता आणि पैसा समीकरण**

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय पक्ष हे जनमताचा कौल प्राप्त करून सत्तेत येतात. मात्र या निवडणुकीत निवडून येण्यासाठी राजकीय पक्षाचे उमेदवार हे आर्थिकदृष्ट्या धनाढ्य असतात. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत निवडून आलेल्या खासदारांच्या एकूण ५४३ खासदारांपैकी ४७५ खासदार हे कोट्याधीश आहेत यातील २३३ खासदारावर विविध सुरूपाचे गुन्हे नोंद आहे. या आर्थिक क्षमतेच्या जोरावर ते आपले राजकारण करतात. प्रसंगी साम दाम दंड भेद या नीतीचा वापर करून निवडून येतात. निवडणुकीत केलेल्या खर्चाची भरपाई म्हणून आपल्या कालवधीत भ्रष्ट मार्गाचा अवलंब करतात.या भ्रष्ट मार्गाने मिळवलेला पैसा परत निवडणुकीत वापर करून निवडून येतात.म्हणजेच याठिकाणी सत्ता आणि पैसा याचे एक समीकरण

आकारला आलेले दिसून येते.आज भारतीय लोकशाहीत वरवर पाहता संसदिय प्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधित्व करत असल्याचे दिसत असले तरी ते एका उच्च उत्पन असणाऱ्या गटाचे प्रतिनिधित्व करतात असे दिसून येते.

**अल्प मतदान**

भारतीय लोकशाही सर्व जनतेचे प्रतिनिधित्व करते. जनतेने आपल्या मतदानाद्वारे निवडलेले प्रतिनिधी संसदेत पाठवले जातात. मात्र या लोकांनी केलेल्या मतदानाची आकडेवारी पाहता हे भारतीय लोकशाही अथवा संसद हि भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व हे सर्व लोक करत करत नाही असेच दिसून येते. १९५२ ते २०१९ लोकसभा निवडणुकीतील मतदानाची टक्केवारीवर दृस्टीक्षेप टाकला असता मतदानाची टक्केवारीचे प्रमाण अजूनही ७० टक्के पेक्षा कमीच आहे हे. हे मतदान न करण्याची जनमानसातील वृत्ती लोकशाही व्यवस्थेसमोरील प्रमुख आव्हान आहे.




**जातिय व धार्मिक वाद**

भारतीय समाजात पूर्वापार चालत आलेली जातीय प्रथा आजही आपले अस्तित्व टिकवून आहे. जातीय संरचना दिवसेदिवस अधिक प्रबळ होत असून आज प्रत्येक क्षेत्रात प्रभाव टाकत आहे. आज भारतीय संसदिय राजकारणाच्या पटलावर जातीय राजकारण आकारास आलेले दिसून येते. कोणत्याही निवडणूकित मतदारसंघातील उमेदवार हा तेथील जातीय प्राबल्य असणाऱ्या जातीचा अथवा धर्माचा असतो. भारतीय लोकशाहीच्या सदृढतेस राजकीय पटलावर असणारे हे जातीय अथवा धार्मिकतेचे प्राबल्य हे हानिकारक आहे.

**विरोधी पक्ष अस्तित्व**

लोकशाही शासन व्यवस्थेत प्रबळ असा विरोधी पक्ष आवश्यक असतो. संसदिय लोकशाही शासन व्यवस्थेत निवडणुकीच्या माध्यमातून जनमताचा कौल प्राप्त पक्ष हा सत्ताधारी पक्ष असतो. हा पक्ष विधिमंडळातील बहुमताच्या बळावर कायदा निर्मिती, ध्येय धोरण अंमलात आणण्याचा प्रयत्न करतो हे कार्य करत असताना सत्तारूढ पक्ष हा आपल्या सत्तेचा अनियंत्रीत वापर

करून जनमताचा अनादर करु शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामते, “या सत्तारूढ पक्षावर अंकुश ठेवणारा प्रबळ असा विरोधी पक्ष संसदेत असावा. संसदेत विरोधी पक्षाने विधिमंडळ पटलावर कार्यवाही प्रसंगी सत्तारूढ पक्षाने घेतलेल्या चुकीच्या, आततायी निर्णयाला प्रखर विरोध करून यावर चर्चा घडवून सत्तारूढ पक्षावर नियंत्रण ठेवावे. सरकारने घेतलेल्या चुकीच्या निर्णयाचा मुद्दा तापवून एरणीवर आणून संसाबाह्य स्तरावर प्रसंगी आंदोलन करून याप्रश्नी जनजागृती करावी. या जनजागृतीच्या माध्यमातून सत्तारूढ पक्ष विरोधी जनमत तयार होईल.” कारण दर पाच वर्षांनी सार्वजनिक निवडणुकीत प्रत्येक पक्षास जनमताचा कौल घ्यावा लागतो. या विरोधी पक्षाच्या कृतीमुळे सत्तारूढ पक्षावर नियंत्रण प्रस्थापित होईल.

मात्र सद्य स्थितीतील भारतीय संसदीय स्तरावरील राजकारणावर दृस्ठीक्षेप टाकला असता राजकीय पटलावरून विरोधी पक्ष अथवा त्यांचे राजकिय अस्थित्व नष्ट करण्याचा दुर्दीवी प्रयत्न केला जात असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. हे लोकशाही यशस्वी होण्यासाठी घातक आहे. संसदीय लोकशाही व्यवस्थेमध्ये विरोधी मताचे स्थान हे महत्वाचे असते ते जर नष्ट होत असेल तर ते लोकशाही शासन व्यवस्थेच्या अस्थित्वावर निश्चितच प्रश्न निर्माण करते.

**संविधानात्मक नितीमुल्याचे अवमूल्यन**

लोकशाही शासन व्यवस्थेत संविधानात्मक नीतीचे पालन होणे खूप महत्वाचे असते. शासन व्यवस्थेचे सर्व नियम, उपनियम, कायदे निर्मिती क्रिया, केंद्र राज्य अधिकार याबाबत सविस्तर तरतूद ही संविधानात केलेली असते. मात्र अनेकदा सत्तारूढ पक्षाकडून बहुमताच्या बळावर या घटनात्मक नीतीमत्तेचे पालन न करता या संविधानिक मुल्यांची पायमल्ली होते. आज केंद्र राज्य याच्यामध्ये आपल्या अधिकार मर्यादा यावरून वाद उत्पन्न होत आहेत. केंद्राधील सत्तारूढ पक्ष प्रबळ अश्या बहुमताच्या जोरावर राज्य स्तरावरील प्रादेशिक पक्षांची जनमत प्राप्त सरकारे संविधानिक मुल्यांची पायमल्ली करून गैरमार्गाने पाडून आपल्या पक्षाचे सरकार स्थापन करत आहे. या संसदीय लोकशाही प्रणालीमध्ये प्रत्येक पक्षास निवडणुकीच्या माध्यमातून जनमताच्या आधारे सत्ता स्थापन करण्याचा संविधानिक अधिकार आहे. मात्र सत्तारूढ पक्षाने अवलंबलेले हे सत्ता स्थापनेचे असंविधानिक मार्गाचे अनुसरन हे घटनात्मक नीतीचे अवमूल्यन आहे.

**निष्कर्ष**

1) भारतीय लोकशाही समोर घराणेशाही, मतदानाचे अल्पप्रमाण, विरोधी पक्ष अस्तित्व, सत्ता आणि पैसा समीकरण, जातिय व धार्मिक वाद आणि संविधानात्मक नितीमुल्याचे अवमूल्यन या प्रमुख आव्हानाचा परामर्श घेता यामुळे भारतीय लोकशाही पुढे गंभीर आव्हान निर्माण झाले आहे.
2) गेल्या पंच्याहत्तर वर्षात भारतीय लोकशाहीच्या गौरवी वाटचाल पाहता अभिमानास्पद असून मात्र अलीकडील निर्माण झालेल्या आव्हानांनी लोकशाहीचे अस्तित्वच धोक्यात आणले आहे. परिणामी जागतिक स्तरावर भारतीय लोकशाहीची वाटचाल हि अल्पजन लोकशाही अथवा अध्यक्षीय हुकुमशाहीकडे होत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.
3) लोकशाही पुढील आव्हानांनी भारतीय संविधानात उद्धृत केलेल्या घटनात्मक मुल्यांची अवहेलना करून त्यांच्या मुलभूत चौकटितील लोकशाही, सार्वभौमत्व, गणराज्य या तत्वास ठेच पोहचली आहे.

**संदर्भ सूची**

Mitra Sharmila, M. Manisha, (2009) Indian Democracy problems and Prospects, Anthem press new Delhi.

पळशीकर सुहास, व्होरा राजेंद्र,(२०१०) भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, प्रथमावृत्ती, अनुवाद चित्रा लेले, डायमंड पब्लिकेशन पुणे.

कांबळे बाळ, खांदवे एकनाथ, (२००८) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन पुणे.

www.wikipidea.com

www.electioncommission.gov.com

**लोकसत्ता**

# भारतीय लोकशाही व पाकिस्तानची लोकशाही यांचा तुलनात्मक अभ्यास

अपूर्वा गजानन स्वामी
विद्यार्थी, बी ए भाग ३,
राज्यशास्त्र विभाग
विवेकानंद कॉलेज,कोल्हापूर(स्वायत्त)

**गोषवारा :** आज जगातील सर्वच प्रगत राष्ट्रामध्ये लोकशाही शासनाचा अवलंब केलेला आहे. अब्राहम लिंकन यांच्या मते, "लोकांनी, लोकांचे, लोकांच्या साठी केलेले शासन म्हणजे लोकशाही होय. भारत पाकिस्तान हे दोन्ही देश 1947 ला स्वतंत्र झाले परंतु दोन्ही देशांमध्ये खूप तफावत असलेली दिसून येते. भारत पाकिस्तान यांची लोकशाही, लोकशाहीची मूल्य, संविधान, लोकशाहीसमोरील आव्हाने, निवडणुकीच्या प्रक्रिया, पक्षपद्धती, शासन व्यवस्था या सर्वांमध्ये मोठ्याप्रमाणात फरक आढळून येतो. भारत हा एक संसदीय धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक आहे तर पाकिस्तान हा एक लोकशाहीवादी संसदीय संघीय इस्लामिक प्रजासत्ताक आहे. भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांच्या लोकशाहीची तुलना करत असता हे लक्षात येते की भारतीय लोकशाही ही पाकिस्तानच्या लोकशाहीपेक्षा अधिक सुदृढ आहे.

**पारिभाषिक शब्द:** लोकशाही, भारत, पाकिस्तान, तुलनात्मक राजकारण

**प्रस्तावना:** आज जगातील सर्वच प्रगत राष्ट्रांमध्ये लोकशाही शासनाचा अवलंब केलेला आहे. अब्राहम लिंकन यांच्या मध्ये, लोकांनी, लोकांचे, लोकांच्या साठी केलेले शासन म्हणजे लोकशाही होय. भारत पाकिस्तान हे दोन्ही देश 1947 ला स्वतंत्र झाले परंतु दोन्ही देशांमध्ये खूप तफावत असलेली दिसून येते. भारत पाकिस्तान यांची लोकशाही, लोकशाहीची मूल्य, संविधान, लोकशाहीसमोरील आव्हाने, निवडणुकीच्या प्रक्रिया, पक्षपद्धती, शासन व्यवस्था या सर्वांमध्ये मोठ्याप्रमाणात फरक आढळून येतो. भारत हा एक संसदीय धर्मनिरपेक्ष लोक शाही प्रजासत्ताक आहे तर पाकिस्तान हा एक लोकशाहीवादी संसदीय संघीय इस्लामिक प्रजासत्ताक आहे. भारत व पाकिस्तान या दोनी देशांचा लोकशाहीची तुलना करत असता हे लक्षात येते की भारतीय लोकशाही ही पाकिस्तानच्या लोकशाहीपेक्षा अधिक सुदृढ आहे.

**संशोधनाची गरज:** 14 ऑगस्ट, 1947 रोजी पाकिस्तान स्वतंत्र झाला परंतु लोकशाही शासन व्यवस्था निर्माण करण्यामध्ये व ती टिकवून ठेवण्यामध्ये पाकिस्तानने खूप वेळ घेतला तरीही तो प्रयत्न अयशस्वी ठरलेला दिसून येतो. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला आणि समाजाच्या जीवनप्रवासाचा मार्ग म्हणून लोकशाही राज्यव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. त्यामुळे भारतीय लोकशाही व पाकिस्तानची लोकशाही यांचा तुलनात्मक अभ्यास करण्याची गरज भासते.

**संशोधनाची व्याप्ती:**

प्रस्तुत संशोधन हे भारत पाकिस्तान या दोन देशापुरते मर्यादित आहे.

प्रस्तुत संशोधन हे भारत पाकिस्तान या देशातील लोकशाहीची संबंधित आहे.

प्रस्तुत संशोधन हे 1947 ते 2022 कालावधींचे संबंधित आहे.

प्रस्तुत संशोधनातून पुढे येणारे निष्कर्श आहे लोकशाहीचा अभ्यास करणारा अध्यापक व विद्यार्थ्यांना उपयोगी पडणारे आहे.

**संशोधनाचे महत्त्व:**

पाकिस्तानात गेल्या 75 वर्षांत एकही पंतप्रधान आपल्या निवडीची 5 वर्षांची मुदत पूर्ण करू शकलेला नाही. लष्करी कारस्थान, न्यायालयीन कारवाई मुळे ती व्यक्ती पंतप्रधानपदावरून पदच्युत होऊ शकते परंतु भारतामध्ये गेल्या 75 वर्षांत अशा घटना घडलेला दिसून येत नाहीत. त्यामुळे पाकिस्तान व भारतीय लोकशाहीचा तुलनात्मक अभ्यास केला असता दोन्ही देशातील लोकशाहीला पूरक व बाधक असे दोन्ही घटक आपल्याला समजून घेता येतील. यादृष्टीने या संशोधनाचे महत्व आपण लक्षात घ्यायला हवे.

**महत्वाच्या संज्ञा :**लोकशाही,संसदीय शासन पद्धती,हुकुमशाही,धर्मनिरपेक्ष राज्य

**संशोधनाची उद्दीष्टे:**

1. भारत पाकिस्तान यांच्या लोकशाहीचा तुलनात्मक अभ्यास करणे,
2. भारतीय लोकशाहीची मूल्य समजून घेणे.
3. पाकिस्तान लोकशाहीची मूल्य समजून घेणे.
4. भारतीय लोकशाही समोरील आव्हाने समजून घेणे.
5. पाकिस्तान लोकशाही समोरील आव्हाने समजून घेणे.

**संशोधनाची गृहीतके:**

1. भारताची लोकशाही पाकिस्तानच्या लोकशाहीपेक्षा सुदृढ आहे.
2. भारतीय लोकशाहीची मूल्य पाकिस्तानच्या लोकशाहीच्या मूल्यांहून भिन्न असून ती संविधानत दिलेली आहेत.
3. भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने पाकिस्तानहून अतिशय भिन्न आहेत...

**विषय विश्लेषण:**

14 ऑगस्ट 1947 रोजी भारताचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंटबॅटन यांनी पाकिस्तानच्या संविधान सभेला संबोधित केले. 15 ऑगस्ट 1947 रोजी सत्ता हस्तांतरण झाले. इस्लाम हा राष्ट्राचा धर्म आहे. सर्वप्रथम 1956 मध्ये संविधान स्वीकारले गेले पण 1958 मध्ये जनरलनी ते रद्दबातल केले. 1973 मध्ये स्विकारलेले संविधान जिया उल हक यांनी पुन्हा 1977 मध्ये रद्द केले. 1985 मध्ये पुनर्जिवीत केलेली संविधानाची प्रत ही देशातील अत्यंत महत्त्वाचे आणि मूलभूत कायदेपत्रिका आहे. पाकिस्तानच्या राजकीय इतिहासात पाकिस्तानी लष्कराने मुख्य प्रवाहातील राजकारणात प्रभावशाली भूमिका निभावली आहे. 1958 ते 1971, 1977 ते 1988 आणि 1999 ते 2008 या कालखंडात लश्कराने सत्ता काबीज करून लष्करी राजवट लागू केली व लष्करी अधिकारी राष्ट्रपती म्हणून काम करू लागले. यामुळेच पाकिस्तानमध्ये लोकशाहीचे रूपांतर हे हुकूमशाही मध्ये वरचेवर होताना दिसून येते.

26 नोव्हेंबर 1949 रोजी भारताचे संविधान संमत झाल्याचे घोषित करण्यात आले व स्वीकृत करण्यात आले परंतु त्याची अंमलबजावणी 26 जानेवारी 1950 रोजी झाली. संविधानानुसार भारत हा लोकशाहीवादी देश आहे. 15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाल्याबरोबर भारताने लोकशाही जीवनप्रणाली म्हणून स्वीकारली.

भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे परंतु पाकिस्तान हे इस्लामिक पब्लिक राष्ट्र आहे. पाकिस्तानमध्ये धर्माला अधिक महत्त्व असल्यामुळे तेथील लोकशाहीवर मर्यादा येतात. याउलट भारतात धर्मनिरपेक्षता असल्यामुळे हा देश लोकशाहीपूरक असलेला दिसून येतो. परंतु वर्तमान प्रणालीचे लोकशाही स्थापना झाल्यापासून पाकिस्तान हा जगातील सर्वात तरुण लोक शाही देशांपैकी एक आहे.

**गृहितकांची पडताळणी**

**१ ) भारताची लोकशाही पाकिस्तानच्या लोकशाहीपेक्षा सुदृढ आहे**

पाकिस्तान संघराज्य संसदीय प्रणाली असलेला इस्लामिक प्रजासत्ताक देश आहे. या देशात राष्ट्रपती हे लोकांऐवजी संसद किंवा निवडणूक समितीद्वारे निवडले जातात. राष्ट्रपती हे राज्याचा नेता म्हणून कार्य करतात तर पंतप्रधान सरकारचा नेता म्हणून कार्य करतात. पाकिस्तानच्या द्विसदनीय विधानमंडळाचे सिनेट हे वरचे सभागृह असून नॅशनल असेंब्ली हे खालचे सभागृह आहे. सिनेटची स्थापना 1973 साली झाली. सिनेटची निवडणूक दर तीन वर्षांनी निम्म्या जागांसाठी घेतली जाते. सिनेटचे अध्यक्ष हे देशाच्या अध्यक्ष म्हणून कार्य करतात. राज्य घटना सिनेट विसर्जित करण्याची तरतूद करत नाही. नॅशनल असेम्ब्लीचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. ती फक्त राष्ट्रपतीच विसर्जित करू शकतात. दोन्ही सभागृहांची संमती असल्याशिवाय विधेयक पास होत नाही. भारतामध्ये मात्र संसदेचे लोकसभा व राज्यसभा ही दोन सभागृहे असून लोकसभा हे लोकांचे प्रतिनिधित्व करणारे राजसभा राज्याचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे. राष्ट्रपतींची निवडणूकही संसदेच्या दोन्ही सभागृहांचे निर्वाचित सदस्य व घटक राज्यांच्या विधानसभांचे निर्वाचित सदस्य त्यांच्यामार्फत होते. भारतामध्ये दोन विधेयक प्रथम लोकसभेत मांडावे लागते. भारत धर्मनिरपेक्ष संसदीय लोकशाही असलेले राष्ट्र आहे. भारत व पाकिस्तान या देशातील लोकशाहीचे प्रमुख स्तंभ, निवडणुकीच्या प्रक्रिया, पक्ष पद्धती, राज्यघटना या सर्वांमध्ये खूप फरक आढळून येतो. पाकिस्तानचे संविधान 1973 ला म्हणजे स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळपास पंचवीस वर्षांनी लागू झाले. त्यामुळे पाकिस्तानमध्ये वरचेवर हुकूमशाहीचे दर्शन पाकिस्तानी जनतेला घडलेले दिसून येते. परंतु भारतात मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच लोकशाही स्वीकारली गेली व राज्यघटना इतकी प्रभावशाली केली गेली की त्यांचे पालन भारतीय नागरिक काटेकोरपणे करतात. त्यामुळे भारताची लोकशाही ही पाकिस्तानी लोक शाही पेक्षा अधिक सुदृढ असलेली दिसून येते.

**२ ) भारतीय लोकशाहीचे मूल्य पाकिस्तानच्या लोकशाहीच्या मूल्यांहून भिन्न असून ती संविधानाने दिलेली आहेत.**

भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेत सुरुवातीस आम्ही भारताचे लोक, भारतीय लोकशाही, न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांवर आधारित संवर्धित करण्याचा प्रयत्न करू असा संकल्प करतो. भारतीय संविधान हे संविधान सभेतील लोकांनी तयार केले असले तरीही जबाबदारी भारतीय लोकांच्या वतीने संविधान सभेचे पार पाडली आहे, अशी त्यांची भावना आहे. परंतु पाकिस्तान च्या राज्यघटनेच्या प्रास्ताविकेत असे म्हटले आहे, की लोकशाही, स्वातंत्र्य, समता, सहिष्णुता आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व हे मूल्य इस्लामने सांगितली असून ती पूर्णपणे पाळली जातील. यावरून स्पष्ट होते की भारतात व्यक्तीच्या सार्वभौमत्वाला महत्त्व आहे परंतु ते पाकिस्तानात नाही.

**३) भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने ही पाकिस्तानहून अतिशय भिन्न आहेत.**

भारतीय लोकशाहीसमोर गरीबी, दारिद्र्य, आरोग्य समस्या, कमी साक्षरता दर जास्त लोकसंख्या व बेरोजगारी ही आव्हाने मोठ्ग्रा प्रमाणात आहेत. पाकिस्तानच्या लोकशाहीसमोर दहशदवाद, राजकीय अस्थिरता, भ्रष्टाचार ही आव्हाने मोठ्या प्रमाणात आहेत.

**निष्कर्ष:**

भ्रष्टाचार, राजकीय अस्थिरता, सत्तेचे केंद्रीकरण, सत्तापालट, लष्कराचा हस्तक्षेप यामुळे पाकिस्तान लोकशाही अयशस्वी झालेली दिसून येते. राज्यघटनेची कमतरता, इस्लाम विरुद्ध धर्मनिरपेक्षता, कमकूवत शासन, नागरी लष्करी संबंध या सर्वांमुळेच पाकिस्तानात लोकशाही यशस्वी ठरू शकलेली नाही. याउलट भारतात सत्तेचे विकेंद्रीकरण, लिखित राज्यघटना, राजकीय स्थैर्य, लष्कराचा हस्तक्षेप नसणे, लोकशाही मूल्यांची जपणूक यामुळे लोकशाही मोठ्या प्रमाणात यशस्वी झालेली दिसून येते. पाकिस्तानच्या राजकीय इतिहासाने अनेक लष्करी उठावाचा अनुभव घेतला. जनरल अयुब खानने पाकिस्तानातील आपल्या राजवटीला नियंत्रित लोकशाही (कंट्रोल डेमोक्रसी) असेच म्हटले आहे. घांग्रेकर, ची. ग. आधुनिक राजकीय विश्लेषण, 136. भारत व पाकिस्तानच्या लोकशाहीची तुलना केली असता, पाकिस्तानची लोकशाही ही कमकुवत असलेली दिसून येते भारतीय लोकशाही सुदृढ असलेली दिसून येते.

**संदर्भग्रंथ:**

1. ची. गं. घांग्रेकर, आधुनिक राजकीय विश्लेषण
2. साबळे, भारतीय शासन आणि राजकारण
3. बस उरुम्की, आंतरराष्ट्रीय राजकारण संकल्पना, सिद्धान्त आणि समस्या